विशेषांक
ISSN-0971-8400

विकास समर्पित मासिक

योजना

वर्ष ३५ अंक १ ऑगस्ट २००७ मूल्य २० रु.

1857 1947 2007

मराठी मासिक

योजना

योजना घरी आणा.
आजच वर्गणी भरा.

ISSN-0971-8400

योजना

■ वर्ष २५ ■ अंक १० ■ मे १९९८ ■ मूल्य ५/- रु.



विकासाचे सर्व पैलू, सर्व सामाजिक प्रश्न आणि चालू घडामोडी प्रसिध्द करणारे योजना हे एकमेव मासिक आहे. या मासिकात सर्व क्षेत्रातील तज्ज्ञांनी लिहिलेले अभ्यासपूर्ण व अचूक माहिती देणारे लेख असतात. त्यामुळे आपल्याला प्रत्येक क्षेत्रातील बिनचूक माहिती मिळते.

हे मासिक विद्यार्थीवर्ग व विद्वत्जनांचे आवडते आहे .स्पर्धात्मक परीक्षांना बसणाऱ्यांनी योजना वाचणे आवश्यक आहे. यातील माहिती साधारणत: इतरत्र प्रकाशित होण्याआधीच आपल्यापर्यंत येते.

वर्गणीचे दर

नियमित अंक मूल्य	-	१०.०० रुपये
विशेषांक	-	२०.०० रुपये
वार्षिक वर्गणी	-	१००.०० रुपये
द्विवार्षिक वर्गणी	-	१८०.०० रुपये
त्रिवार्षिक वर्गणी	-	२५०.०० रुपये

वर्गणी, मनीआर्डर, इंडियन पोस्टल ऑर्डर
किंवा डिमांड ड्राफ्टद्वारे संपादक,योजना (मराठी)यांचे नावाने
७०१, ''बी'' विंग (७ वा मजला) केन्द्रीय सदन,
बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४
या पत्त्यावर पाठवावी.

वर्गणी मनीऑर्डरने पाठविताना आपले नाव व पत्ता कूपनमध्ये सुवाच्य अक्षरात लिहा.

विक्रीचे ठिकाण : ७०१ सी, ७०१बी, केंद्रीय सदन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४

योजना मासिक भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे प्रसिध्द केले जाते.

(पान क्र. ८० वरुन)

दारिद्र्य रेषेच्या खालील (बी.पी.एल.) असलेल्यांनी पुराव्यासह अर्ज केला तर त्यांना शुल्क भरावे लागणार नाही, तसेच तीस दिवसांनंतर माहिती दिल्यास कोणतेही शुल्क आकारता येणार नाही. कुणाच्या जिवाला धोका असेल तर ती माहिती ४८ तासाच्या आत द्यावी लागेल (ही बाब प्रामुख्याने पोलिस खात्याशी संबंधित आहे) त्रयस्थ व्यक्तीसंबंधीत माहिती देतांना त्या व्यक्तीची संमती घ्यावी लागेल. संमती न दिल्यास जनहित लक्षात घेऊन अधिकाऱ्याने सकारात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. माहिती नाकारण्याकरिता हे कारण पुढे न करणे येथे अपेक्षित आहे. देशहिताविरूद्ध माहितीचा दुरुपयोग होऊ नये. अशा बाबतीत माहिती देता येणार नाही.

विहित मुदतीत (३० दिवसाच्या आत) माहिती न दिल्यास संबंधित अधिकाऱ्याला प्रत्येक दिवसाला रु. २५०/- दंड किंवा जास्तीत जास्त रु २५,०००/-, त्याशिवाय खातेनिहाय चौकशी (Departmental Enquiry) होऊ शकते. सर्व प्रकारची माहिती मागणी करणाऱ्याला द्यावयाची आहे. प्रशासनातील आदेशधारिका, पत्रव्यवहारधारिका, परिपत्रकधारिका, माहिती धारिका इत्यादीची पाहणी करण्याचा अधिकार नागरिकांना आहे. ह्याकरिता एक तासापर्यंत नागरिकांना फी भरावी लागणार नाही. महाराष्ट्रातील माहिती अधिकार कायदा २००२ हा आता रद्द झालेला आहे.

ह्याकरीता प्रत्येक कार्यालयात माहिती अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली आहे. त्याचे वर अपिलीय अधिकारी नेमण्यात आला आहे. त्यांची नावे, संपर्क पत्ते हे कार्यालयाच्या दर्शनी भागी लावण्याचे बंधन त्यांना घालण्यात आले आहे. विहित मुदतीत माहिती न दिल्यास माहित नाकारली असे समजले जाईल. स्वत:कडे उपलब्ध असलेली माहिती प्रथम द्यावी, अन्य ठिकाणी असलेली माहिती, माहिती नाकारतांना कारण व अपील कुणाकडे करावे ही माहिती तपशिलासह देणे बंधनकारक आहे. दुसरे अपिल मुख्य माहिती आयुक्त यांचेकडे करता येते. त्यांचेकडे तक्रारी, सूचनाही करता येतात. ह्या कायद्यानुसार माहिती देण्यामध्ये १९२३ चा (इंग्रजांनी त्यांचा कारभार एक छत्री चालण्याच्या दृष्टिने केलेला एककल्ली) गोपनीयता कायदा आड येणार नाही. माहिती अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देऊन त्यांना कार्यतत्पर करण्यात यावे असे ह्या कायद्याने शासनावर बंधन घातले आहे. माहितीच्या अधिकाराचा विहित अर्ज रु. १० फी भरून नागरिकांना करता येईल. माहितीच्या एका झेरॉक्स पृष्ठाकरीता रु. २/- अधिक टपालखर्च लागेल. तसेच फ्लॉपी १ डिस्केटकरिता ५० रु. प्रमाणे प्रत्येकी भरावी लागेल. पहिल्या आपिलाकरीता ३० दिवसांची तर दुसऱ्या अपिलाकरीता ९० दिवस, रुपये २० फी सह करण्याची मुभा ह्या कायद्याने दिली आहे.

ह्या कायद्याचे सर्व स्तरातून नागरिकांनी मनोमन स्वागत केले आहे. परंतु ह्याच्या पुरेपूर व न्यायोचित उपयोगाकरीता लोकांनी दक्ष राहून ह्याचा उपयोग घ्यावा. प्रसार माध्यमे, स्वयंसेवी संस्था ह्यांनी नागरिकांना माहितीचा अधिकार कसा वापरावा ह्याबद्दल प्रशिक्षण, प्रबोधनाची गरज आहे. अधिकारी व कर्मचारी वर्गातून ह्याचा दुरुपयोग होण्याची शक्यता असल्याचा उठत आहेत. परंतु अधिकारी, कर्मचाऱ्यांची निकोप प्रशासकीय लोकभिमुखता व प्रामाणिकता असली तर हा कायदा करण्याची मुळात गरज पडली नसती, हे नम्रपणे नमूद करावेसे वाटते. आपण लोकसेवक असल्याने कार्यतत्परता, पारदर्शकता दाखविली तर नागरिकांकडून कोणताही त्रास होणार नाही एवढे मात्र खरे. माहितीच्या अधिकारामुळे अधिकारी, कर्मचाऱ्यांनी, व्यवस्थापकांनी घाबरून जाण्याचे कारण नाही. प्रशासनाची कार्यक्षमता नव्याने सिद्ध करण्याची ही एक संधी समजून आपण कार्यशासनात दक्ष राहावे. ह्या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी व अपेक्षित परिणाम शेवटी लोक जागरुकतेवरच अवलंबून आहेत.

अभि. श्रीकृष्ण लांडे
सिव्हिल लाईन, खामगाव, जि. बुलढाणा.

तुम्ही सांगू शकाल काय?

उत्तरे

१. १८५८
२. १८८५
३. असहकार चळवळ
४. साबरमती आश्रम
५. पूर्ण स्वराज्य
६. मुंबई
७. गव्हर्नर जनरल लॉर्ड माऊंटबॅटन
८. डॉ. बी. आर. आंबेडकर
९. २६ जानेवारी १९५० (प्रजासत्ताक दिन)
१०. १९५०

आत्महत्यांचे प्रकार सुरूच होते. यामुळे ४ डिसेंबर २००६ पासून सुरू झालेल्या नागपूर येथील अधिवेशनात शेतकऱ्यांच्या आत्महत्या प्रकरणी दोन्ही सभागृहात प्रचंड गदारोळ झाला.

या अधिवेशनात आ. संजय पवार (नांदगाव), आ. गुलाबराव पाटील (एरंडेल), आ.आर.ओ. पाटील (पाचोरा), आ. प्रतापराव जाधव (महेकर), आ. विश्वास नांदेकर (वणी), यांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्येबाबत प्रश्न उपस्थित केला, या प्रश्नाला लेखी उत्तर ना. राणे यांनी दिले. त्यात म्हंटले, की, "शेतीसाठी लागणारी बियाणे, खते, किटकनाशके कमी प्रतीची निघाल्यामुळे आत्महत्या वाढल्या आहेत. हे टाळण्यासाठी कृषि उत्पन्नावर आधारित उद्योगधंदे वाढवावे. सेंद्रीय शेती पद्धतीच्या वापराबाबत धोरण निश्चित करावे, भांडवल उभारणी, निधीची परतफेड, मुलींच्या लग्नासाठी सामूहिक विवाह योजना व शेतकऱ्यांसाठी हेल्पलाईन सुरू करणे इ. उपाय योजना राबविण्यात येतील" खानदेशातील आ. सतिश पाटील (पारोळा), मा. गिरीष महाजन (जामनेर), आ. डॉ. बी. एस. पाटील (अमळनेर), आ. गुलाबराव पाटील (एरंडोल), आ. एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर), आ. आर. ओ. पाटील (पाचोरा) यांनी डिसेंबर २००६ च्या नागपूर अधिवेशनात शेतकऱ्यांच्या प्रश्नी जागरूकता ठेवून काळजीपूर्वक व अभ्यासपूर्वक शेतकऱ्यांची बाजू मांडलेली दिसते.

याच अधिवेशनात काही सन्माननीय सदस्यांनी शेतकऱ्यांची प्रतिकात्मक प्रेतयात्रा काढली, तर काही विरोधी सदस्यांनी स्थगन प्रस्ताव मांडण्याचा प्रयत्न केला. विरोधी पक्ष नेते आ. रामदास कदम (शिवसेना), आ. गोपीनाथ मुंडे (भाजप), आ. प्रतापराव जाधव (शिवसेना), आ. श्रीमती शोभाताई फडणवीस (भाजप), आ. ॲड. वामनराव चटप (शेकाप) यांनी विधानसभेत भाषणे करून शेतकऱ्यांची बाजू प्रभावीपणे मांडली तसेच अनेक विधायक सूचना केल्यात.

निष्कर्ष :

शेतकऱ्यांच्या मागे सर्वच पक्षाचे सदस्य ठामपणे उभे आहेत. हे विविध प्रश्न, चर्चा, भाषणे, स्थगन प्रस्ताव यावरून दिसून येते. आमदारांनी अतिशय कळवळीने व अभ्यासपूर्वक सहभाग घेतल्याचे दिसून येते. शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर आत्महत्येला सामोरे जावे लागले. हे वास्तव आहे. सर्वच सदस्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नाला महत्व दिले आहे. अनेक सदस्यांनी आत्महत्या केलेला शेतकऱ्यांसंबंधी अचूक माहिती मिळविलेली दिसून येते. शेतकऱ्यांच्या कर्जमाफी संदर्भात शासनाकडून होणारी टाळाटाळ पाहून संतप्त सदस्यांनी प्रसंगी आपण सत्ताधारी पक्षाचे आहोत हे विसरून, जनता सरकारला धडा शिकवेल असा कडक इशारा द्यायलाही कमी केलेले नाही. महिला सदस्यसुद्धा ह्या प्रश्नात दिसून येतात. १९९७-९८ मध्ये भाजप-शिवसेना युतीचे सरकार होते आणि २००५-२००६ मध्ये काँग्रेस-राष्ट्रवादीची आघाडी सत्तेवर आहे. असे असले तरी शेतकऱ्याच्या प्रश्नावर सर्वच पक्षांच्या सदस्यांनी वेळोवेळी प्रश्न उपस्थित केल्याचे दिसते. आत्महत्येचा आकडा वाढत असल्याचेही दिसून येते. अमळनेरचे आ. डॉ. बी. एस. पाटील यांना दिलेल्या उत्तरात महसूल मंत्री यांनी म्हटले आहे की, ऑक्टोबर २००६ पर्यंत राज्यात १८४३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. यावर असे म्हणावेसे वाटते की १८४३ हा शेवटचा आकडा ठरेल का ? की यातही वाढ होणार ? याचा शासनाला व समाजाला विचार करावाच लागेल. त्याचप्रमाणे केंद्र व राज्य शासनाकडून अनुक्रमे ३७५० कोटी व १०५७ कोटी रूपये मंजूर झालेले असून त्याचा विनियोग विलंब न करता करावा लागेल.

शेतकरीवर्गानेसुद्धा निराश न होता संकटाशी मुकाबला केला पाहिजे. महाराष्ट्राची विधानसभा शेतकऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभी आहे याची खात्री शेतकऱ्यांनी बाळगली पाहिजे. आत्महत्येच्या आहारी न जाता शासनाने सुचविलेल्या उपाय योजना कराव्यात.

शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी उपाय

१) शेतकऱ्यांनी सेंद्रीय शेती पद्धतीचा वापर केला पाहिजे. त्यासाठी शासनाने त्यांना प्रोत्साहन द्यावे.
२) शेतकऱ्यांना शेतीसाठी युरीया, रासायनिक खते, बियाणे यावर पूर्वीप्रमाणे सबसीडी (अनुदान) शासनाने सुरू करावी.
३) बियाणे व रासायनिक खते शासनाने कमी किंमतीत उपलब्ध करून द्यावीत.
४) ना. डॉ. पतंगराव कदम (मंत्री) यांनी म्हटल्याप्रमाणे, 'कमी खर्चात जास्त उत्पादन घेण्यासाठी महापीक अभियान योजना' सुरू करणे.
५) आ. डॉ. सतिश पाटील (पारोळा) यांनी सुचविल्याप्रमाणे, जवाहर विहिरीचा कार्यक्रम विदर्भाबरोबरच खानदेशातही राबवावा.
६) विधान परिषद सदस्य व विधानसभेचे माजी अध्यक्ष श्री. अरूणलाल गुजराथी यांनी सुचविलेल्याप्रमाणे शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र अर्थसंकल्प मांडावा.
७) जलसिंचनाची व्यवस्था करावी.
८) शेतकऱ्यांना भांडवल पुरविणे. शेतकऱ्यांच्या मालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळावा. त्यासाठी कपाशी व इतर पिकांना हमी भाव ठरवून दिले पाहिजेत.
९) धान्याच्या देशांतर्गत किंमत वाढू लागताच सरकार परदेशातून धान्य, कपाशी, कांदा, साखर, आयात करते. हा प्रकार थांबवला पाहिजे किंवा आयातीचा वापर अतिशय जाणीवपूर्वक, विशिष्ट भावपातळीची सीमा गाठल्यावर केला पाहिजे.
१०) शेती मालाला भाव चांगला मिळावा यासाठी कपाशी, ज्वारी, धान्य, कांदा यांच्या निर्यातीवर भर दिला पाहिजे. बाहेरच्या देशातील किंमती कमी असल्यास शासनाने स्वत: तोटा सहन करून निर्यात केली पाहिजे. अनेक प्रगत राष्ट्रात हे तत्व पाळले जाते.
११) योजना आयोगाचे माजी सदस्य डॉ. जयंत पाटील यांनी सुचविल्याप्रमाणे विदर्भातील शेतकऱ्यांना केसर जातीच्या आंब्यांची लागवड करण्यासाठी प्रेरित केले पाहिजे.
१२) शेतकऱ्यांवरील सर्व कर्ज त्वरीत माफ करून यापुढे तो कर्जबाजारी होणार नाही याची काळजी घ्यावी.

प्रा. शरद मधुकर कुळकर्णी
व्याख्याता, राज्यशास्त्र विभाग,
गं.ए.ट्र. चे कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, नगांव, ता. जि. धुळे
वार्ताहर, दैनिक गांवकरी

मदतीसाठी अपात्र ठरलेल्या २० मृत शेतकऱ्यांसाठी अपात्र ठरविण्यात काय निकष लावण्यात आले ? शेतकऱ्यांना आत्महत्यांपासून परावृत्त करण्यासाठी शासनातर्फे काय उपाययोजना करण्यात आली अथवा येत आहे ?"

मा. महसुल मंत्री श्री. नारायण राणे यांनी १३/१२ /२००५ उत्तर दिले की, "यवतमाळ जिल्ह्यात जुलै ते ऑक्टो. २००५ या कालावधीत ४७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे आढळून आले आहे. त्यापैकी ३ प्रकरणे मदतीसाठी पात्र ठरलेली आहेत. या सर्व प्रकरणी मुख्यमंत्री सहाय्यता कक्षाकडून प्रत्येकी रु. १ लाख इतकी मदत मृत शेतकऱ्यांच्या वारसांना देण्यात आली आहे. २० प्रकरणांची विभागीय आयुक्तांच्या स्तरावरून चौकशी चालू आहे. २४ आत्महत्या या कर्जबाजारीपणा, नापिकी व परतफेडीचा तगादा यामुळे झालेल्या नसल्यामुळे या प्रकरणी मदत देण्यात आलेली नाही."

शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या रोखण्यासाठी शासनाने काय उपाय योजना केली ? याचीही माहिती माननीय महसूल मंत्री श्री. नारायण राणे यांनी या प्रश्नाला उत्तर देतांना दिली. या उत्तरात ते पुढे म्हणतात, "राज्यात शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्यांमागे जी परिस्थिती कारणीभूत आहे त्या परिस्थितीची सखोल समीक्षा करण्यासाठी व मागिल मूळ कृषि विषयक, आर्थिक आणि सामाजिक संरचनेतून उपस्थित मुद्यांबाबत सखोल अभ्यास करण्यासाठी केंद्र शासनाच्या नियंत्रणाखालील आणि भारतीय रिझर्व बँकेंच्या अधिपत्याखालील इंदिरा गांधी इन्स्टीट्युट ऑफ डेव्हलपमेंट रिसर्च, मुंबई या संस्थेची नेमणूक करण्यात आली असून या संस्थेचा अंतिम अहवाल नुकताच प्राप्त झाला आहे. या अहवालाची छाननी करून विविध पातळीवर चर्चा करून निश्चित दिशा धोरण आखण्यात येईल."

वर सांगितल्याप्रमाणे यवतमाळ आणि अमरावती जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येबाबत सर्वश्री आ. प्रा. साहेबराव तट्टे, आ. राजकुमार पटेल, आ. मदन येरावार, आ. उत्तम इंगळे, आ. सुधीर मुनगंटीवार यांनी अतिशय जागरुकतेने व अभ्यासपूर्वक प्रश्न विचारलेले दिसतात. काही शेतकरी कुटुंबांना मदत मिळत नाही. त्यांना मदतीसाठी अपात्र ठरविण्यात येते. ही बाब लक्षात घेऊन "अपात्रतेचे निकष काय ?" असा सवाल सन्माननीय सदस्यांनी केलेला दिसून येतो. त्याचबरोबर पुन्हा आत्महत्येचे प्रकार होऊ नये यासाठी शासनाने उपाययोजना करावी अशी मागणीही त्यांनी केलेली दिसते.

दुष्काळी परिस्थितीमुळे कर्जबाजारी झाल्याने जानेवारी २००४ ते ऑक्टोबर २००५ या कालावधीत ५२५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यात. याविषयी सर्वश्री आ. चैनसुख संचेती (मलकापूर), आ. दिनानाथ पडोळे (नागपूर दक्षिण), आ. ॲड. चंद्रकांत छाजेड (बोपोडी), आ. विरेंद्र जगताप (चांदूर), आ. आनंदराव गेडाम (आरमोरी), आ. श्रीमती रेखा खेडकर (चिखली) यांनी विधानसभेत २००५ च्या तिसऱ्या अधिवेशनात तारांकित प्रश्न ८ उपस्थित केला. शासनाच्या वतीने माननीय महसूल मंत्री श्री. नारायण राणे यांनी १३/१२/०५ रोजी या प्रश्नाला उत्तर दिले.

"विदर्भात १ जानेवारी २००४ ते ३१ ऑक्टोबर २००५ या कालावधीत ५२५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. तसेच सन २००१ ते २००३ या तीन वर्षाच्या कालावधीत एकुण ३१४ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत" अशी माहिती ना. नारायण राणे यांनी या उत्तरात दिली.

आत्महत्या रोखण्यासाठी शासन प्रयत्न करीत असते. तरीही २००१ नंतरच्या काळात पुन्हा शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची वेळ आली. या प्रकरणी महाराष्ट्र विधानसभेतील सन्माननीय सदस्यांनी प्रथमपासूनच जागरुकता दाखवून विधानसभेत आवाज उठविलेला दिसतो. आ. चैनसुख संचेती, आ. दिनानाथ पडोळे, आ. ॲड. चंद्रकांत छाजेड, आ. विरेंद्र जगताप, आ. आनंदराव गेडाम, आ. श्रीमती रेखा खेडकर यांनी विधानसभेत शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा प्रश्न विचारून शेतकऱ्यांना दिलासा दिलेला दिसतो. शेतकरी एकटा नाही. त्याच्यामागे कुणीतरी उभे आहे. हा विश्वास यातून जाणवतो तसेच या प्रश्नी सदस्यांची एकात्मता जाणवते.

राज्यात ऑक्टोबर २००६ पर्यंत किती शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. त्यांना शासनाकडून किती रक्कम मंजूर करण्यात आली ? असा प्रश्न आ. डॉ. बी. एस. पाटील (अमळनेर) यांनी केला. नागपूर येथे झालेल्या डिसेंबर २००६ च्या अधिवेशनात पहिल्याच दिवशी दि. ४/१२/०६ रोजी त्यांच्या प्रश्नाला मा. महसूल मंत्री श्री. नारायण राणे यांनी लेखी उत्तर दिले. त्यात म्हटले आहे की, "ऑक्टोबर २००६ पर्यंत राज्यात १८४३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. त्यापैकी नाशिक जिल्ह्यात २६, जळगांव जिल्ह्यात ६३, धुळे जिल्ह्यात ३० व नंदुरबार जिल्ह्यात ५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. शेतकऱ्यांना राज्यशासनाकडून १०५७ कोटी व केंद्राकडून ३७५० कोटी रु. मंजूर करण्यात आले आहेत. त्यापैकी विविध योजनांतर्गत राज्य शासनाकडून ८०१.५३ कोटी व केंद्राकडून १६.९३ कोटी रु. निधी वितरित करण्यात आला आहे."

याच अधिवेशनात ६ डिसेंबर २००६ रोजी शेतकऱ्यांच्या आत्महत्येसंबंधीच्या चर्चेत पारोळ्याचे आ. डॉ. सतिश भास्करराव पाटील सहभागी झाले. आपल्या भाषणात ते म्हणाले की, "केवळ विदर्भातच नव्हे तर खानदेशात ही शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे लोण पोहोचले आहे. माझ्या पारोळा मतदार संघातच २५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. शेतकऱ्यांना कर्जमाफी संदर्भात राज्य सरकार केंद्राकडे व केंद्र सरकार राज्याकडे अशी टोलवाटोलवी सुरू आहे. हे थांबले नाही तर जनता सरकारला धडा शिकवेल. शेतकऱ्यांना मदतीसाठी जाहीर पॅकेजमधून मुलभूत सुविधा निर्माण व्हाव्यात, जवाहर विहिरीचा कार्यक्रम विदर्भाबरोबरच खानदेशातही राबवावा, यंदा चिकुनगुनियाने ग्रस्त झालेल्या शेतकऱ्याने लावलेल्या कापसाला "लाल्या" चा प्रादूर्भाव झाला आहे. अशा शेतकऱ्यांना ५ हजार रुपये एकरी अनुदान द्यावे". सत्ताधारी पक्षाच्या आ. डॉ. सतिश पाटील यांचे हे भाषण महत्वपूर्ण आहे.

शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्यां विषयी वृत्तपत्रातून आणि विधानसभेतून सरकारवर वारंवार टीका करण्यात येत होती. तरीही

केलेल्या व्यक्तींच्या कुटुंबीयांना शासनातर्फे कोणत्या प्रकारची मदत करण्यात आली आहे ? किंवा करण्यात येत आहे ? अद्यापपर्यंत मदत केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ? त्वरीत मदत करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली आहे ? किंवा करण्यात येत आहे ?

भविष्यात असे प्रकार घडू नयेत म्हणून शासनाने कोणती विशेष उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे ?"

वरील तारांकीत प्रश्नाला २३ जुलै, १९९८ रोजी विधानसभेत माननीय कृषीमंत्री श्री. राधाकृष्ण विखे पाटील यांना उत्तर दिले.

काही शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या हे खरे आहे, हे मान्य करून ते म्हणाले की, सन १९९७-९८ या वर्षात गारपीट, अवेळी पाऊस, अतिवृष्टी यासारख्या नैसर्गिक आपत्तींमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्यामुळे कर्जबाजारी झालेले व कर्जफेड न होण्याच्या चिंतेमुळे तसेच पिकांच्या नुकसानीमुळे आर्थिक विवंचनेत सापडलेल्या शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे निष्पन्न झाले आहे. अशा कुटुंबियांना आर्थिक व वस्तु रूपाने मदत देण्यात येत आहे. या प्रकरणी मदत करण्यात कोणताही विलंब होत नसल्याचे सांगून भविष्यात असे प्रकार घडू नयेत यासाठी उपाययोजना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असल्याचे त्यांनी शेवटी सांगितले.

१९९७-९८ या वर्षात प्रथम शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या घटना घडलेल्या दिसून येतात. या प्रकरणी विधानसभेतील सन्माननीय सदस्यांनी जागरुकपणेही हा प्रश्न मोठ्या संख्येने उपस्थित केला. एकच प्रश्न जेव्हा ८४ सन्माननीय सदस्य विचारतात तेव्हा त्यातील गांभीर्य व महत्व समजून येते. विशेष म्हणजे या ८४ सदस्यांत तत्कालीन सत्ताधारी भाजप शिवसेना युतीचे, विरोधी काँग्रेसचे, अपक्ष व नामनियुक्त अशा सर्वच सदस्यांचा समावेश आहे. शेतकऱ्यांसाठी पक्षभेद त्यांनी बाजूला ठेवलेला दिसतो. सन्माननीय महिला सदस्यांनीही यात सहभागी होऊन प्रश्न विचारलेला दिसून येतो. १९९७-९८ मध्ये भाजप शिवसेना युतीची सत्ता होती आणि मा. मुख्यमंत्री श्री. मनोहर जोशी सरकारचे नेतृत्व करीत होते. २००३-०४ पासून पुन्हा शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची वेळ आली. आता सत्तेवर काँग्रेस-राष्ट्रवादी यांच्या आघाडीची सत्ता असून मा. मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख सरकारचे नेतृत्व करीत आहेत. आताही आत्महत्येच्या घटना घडतच आहेत.

टेंभूर्णी, ता. माढा, जि. सोलापूर येथील शेतकरी संतोष बसवेश्वर नष्टे यांनी कर्ज फेडीसाठी सावकाराचा तगादा लागला म्हणून २/११/२००५ रोजी आत्महत्या केली. या प्रकरणी मा. आमदार श्री. गणपतराव देशमुख (सांगोले मतदारसंघ) यांनी तारांकित प्रश्न विचारला होता. मा. सहकार मंत्री डॉ. पतंगराव कदम यांनी १९/१२/२००५ रोजी विधानसभेत या प्रश्नाला उत्तर दिले. कर्जाच्या वसुलीसाठी पतसंस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी केलेल्या दमदाटीमुळे नष्टे यांनी आत्महत्या केली. ते शेतकरी नसल्यामुळे व त्यांनी खाजगी व्यवसायासाठी कर्ज घेतलेले असल्यामुळे त्यांना शासनातर्फे मदत देण्यात आलेली नाही असे ना. कदम यांनी सांगितले.

याच उत्तरात आत्महत्या रोखण्यासाठी केलेल्या उपाययाजनांची माहितीही त्यांनी दिली.

अशाच प्रकारची आत्महत्येची घटना नांदेड जिल्ह्यात घडली. किनवट तालुक्यातील शेतकऱ्याने सावकारी कर्जाला कंटाळून आत्महत्या केली. ही घटना ऑक्टो. २००५ मध्ये झाली. या बाबत मा. आमदार श्री. सुभाष वानखेडे (हदगांव मतदारसंघ) यांनी तारांकित प्रश्न विचारला होता.

तसेच चऱ्हाटा, जि. बीड येथील महादेव नामदेव उबाळे या शेतकऱ्याने १२/९/२००५ रोजी आत्महत्या केली. या विषयी मा. आमदार श्री. अमरसिंग पंडीत (गेवराई मतदारसंघ) यांनी तारांकित प्रश्न याच अधिवेशनात उपस्थित केला. मा. महसूलमंत्री श्री. नारायण राणे यांनी १३/१२/२००५ रोजी विधानसभेत या दोन्ही प्रश्नांना उत्तर दिले. आ. श्री. सुभाष वानखेडे आणि आ. श्री. अमरसिंह पंडीत यांची शेतकऱ्यांविषयी असलेली तळमळ व काळजी यावरून दिसून येते.

अमरावती आणि यवतमाळ जिल्ह्यात ऑगस्ट २००५ मध्ये कर्जबाजारी शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने आत्महत्या केल्या. या प्रकरणी आ. प्रा. साहेबराव तट्टे (तिवसा मतदारसंघ) आणि आ. श्री. राजकुमार पटेल (मेळघाट मतदार संघ) यांनी तारांकित प्रश्न उपस्थित केला. प्रश्न पुढीलप्रमाणे होता.

१) अमरावती व यवतमाळ जिल्ह्यात माहे ऑगस्ट २००५ मध्ये कर्जबाजारी झाल्याने १५ दिवसात एकूण ३७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची नोंद आहे, हे खरे आहे काय ?

२) असल्यास, गेल्या वर्षभरात विदर्भात किती कर्जबाजारी शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत ? तसेच आतापर्यंत शासनाने सुमारे १०० शेतकऱ्यांच्या कुटुंबांना आर्थिक मदत केली आहे हेही खरे आहे काय ?

३) असल्यास, उर्वरित शेतकऱ्यांच्या कुटुंबांना आर्थिक मदत करण्याबाबतच्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे ?

मा. महसुल मंत्री श्री. नारायण राणे यांनी १३/१२/०५ रोजी या प्रश्नाचे विधानसभेत पुढील प्रमाणे उत्तर दिले. ते म्हणतात.

१) माहे जुलै-ऑगस्ट २००५ या कालावधीत यवतमाळ जिल्ह्यात १३ व अमरावती जिल्ह्यात १० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे आढळून आले आहे.

२) सन २००५ मध्ये विदर्भात ११९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. आतापर्यंत (डिसेंबर २००५) शासनाने ७९ मृत शेतकऱ्यांच्या कुटुंबांना आर्थिक मदत केलेली आहे.

३) उर्वरित प्रकरणांची विभागीय आयुक्तांमार्फत सविस्तर चौकशी करण्यात येत आहे. ९ प्रकरणी मृत शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देणार असून काही प्रकरणे मदत मिळण्यास पात्र नसल्याचे चौकशीत आढळून आले आहे."

यवतमाळ जिल्ह्यात ४ महिन्यात ३० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या प्रकरणी सन्माननीय आ. मदन येरावर (यवतमाळ मतदारसंघ), आ. उत्तम इंगळे (उमरखेड मतदार संघ) आणि आ. सुधीर मुनगंटीवार (चंद्रपूर) यांनी तारांकित प्रश्न महसूल मंत्र्यांना विचारला. "४ महिन्यात ३० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. त्यापैकी १० कुटुंबे मदतीसाठी पात्र ठरली, हे खरे आहे काय ? असल्यास पात्र

शेतकऱ्यांच्या आत्महत्या : आमदारांची विधानसभेतील भूमिका-एक चिकित्सक अभ्यास

✦ प्रा. शरद कुळकर्णी

प्रस्तावना : महाराष्ट्रातील कर्जबाजारी शेतकरी मोठ्या संख्येने आत्महत्या करीत आहे. शेतात राबराब राबूनही दोन वेळचे जेवण मिळणे कठीण झाल्यामुळे शेतकरी वर्ग त्रस्त झाला. शेतीसाठी काढलेले कर्ज फिटणे दिवसेंदिवस कठीण होत आहे. बँक आणि खाजगी सावकारांचे तगादे यामुळे तो चिंताग्रस्त झाला आहे. अशा परिस्थितीत केवळ या दोन वर्षातच नव्हे तर गेल्या दहा वर्षात अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून यात दररोज भर पडत आहे. मात्र वृत्तपत्रांनी गेल्या दोन वर्षापासून ही प्रकरणे उचलून धरल्यामुळे ही समस्या या दोन-तीन वर्षांमधील आहे असे वाटते. या दोन वर्षात ऑक्टोबर २००६ पर्यंत आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या १८४३ पर्यंत पोहोचली. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांमधून पुढे आलेल्या विधानसभा सदस्यांनी विधानसभेत ही समस्या कशा प्रकारे मांडली ? या प्रश्नावर चर्चा कशी झाली ? यांची चिकीत्सा या शोधनिबंधातून केली आहे. तसेच शेवटी या प्रश्नावर काही उपाय योजनाही सुचविल्या आहेत.

कालावधी :

जानेवारी १९९७ ते डिसेंबर २००६ हा दहा वर्षांचा कालावधी निवडला आहे. या कालावधीतील निवडक तारांकित प्रश्न, चर्चा, भाषणे, स्थगन प्रस्ताव यांची निवड केली आहे.

क्षेत्र :

ही समस्या केवळ विदर्भातील शेतकऱ्यांपुढे नसून संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांपुढे असल्यामुळे महाराष्ट्र हे क्षेत्र म्हणून निवडले आहे.

उद्देश :

१) शेतकऱ्यांच्या आत्महत्यासंबधी आमदारांनी विधानसभेत घेतलेली भूमिका समाजापुढे मांडणे.

२) शेतकऱ्यांच्या पाठीशी सन्माननीय विधानसभा सदस्य आहेत हे शेतकऱ्यांना दाखवून देणे, आपण एकटे नाहीत हे त्यांना पटवून देणे.

३) आमदारांनी विधानसभेत विचारलेल्या प्रश्नावर सरकारने दिलेल्या उत्तरांची चिकित्सा करणे

४) शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी उपाय सुचविणे

सन्माननीय आमदारांची भूमिका :

महाराष्ट्रात शेतकऱ्यांनी कर्जामुळे व नापिकीमुळे आत्महत्या केल्याच्या घटना १९९७ पासून घडत आहेत. गेल्या दोन-तीन वर्षात यात वाढ झाली. १९९८ मध्ये अतिवृष्टि व गारपिटीमुळे अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यात. त्यावेळी भाजप शिवसेना युतीचे श्री. मनोहर जोशी हे मुख्यमंत्री होते. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची दखल त्यावेळच्या आदरणीय सदस्यांनी घेतली. त्यांनी या प्रकरणी विधानसभेत तारांकित प्रश्न विचारून शासनास उत्तर देण्यास भाग पाडले. एकूण ८४ सन्माननीय सदस्यांनी या प्रश्नात सहभाग घेतला.

आदरणीय सदस्य सर्वश्री आ. जयंत पाटील, आ. दिग्विजय खानविलकर, आ. सुभाष कुल, आ. रोहिदास पाटील, आ. संभाजी पवार, आ. माणिकराव ठाकरे, आ. शहाजी बापू पाटील, आ. लक्ष्मणराव ढोबळे, आ. मधुकरराव पिचड, आ. आर. आर. पाटील, आ. शिवाजीराव मोघे, आ. आनंदराव देवकाते, आ. हर्षवर्धन देशमुख, आ. वसंत पुर्के, आ. पोपटराव गावंडे, आ. डॉ. सतिश पाटील, आ. बबनराव पाचपुते, आ. माधवराव किन्हाळकर, आ. दयाराम कापगते, आ. हेमकृष्ण कापगते, आ. मधुकर कुकडे, आ. भजनदास वैद्य, आ. राम अस्वले, आ. अशोक वाडीभस्मे, आ. किरीट सोमय्या, आ. संपतराव पवार, आ. नामदेवराव भोईटे, आ. श्रीमती मीनाक्षी पाटील, सर्वश्री आ. भानुदास मुरकुटे, आ. पांडुरंग अभंग, आ. बाबासाहेब कुपेकर, आ. सुभाष झनक, आ. प्रकाश आवडे, आ. राजन पाटील, आ. श्रावण पराते, आ. अनिस अहमद, आ. अरुण गुजराथी, आ. कृष्णराव इंगळे, आ. श्रीमती प्रभा राव, सर्वश्री आ. मारोतराव कोवासे, आ. वसंतराव पाटील, आ. हेमेंद्र मेहता, आ. भोला बढेल, आ. मंगल प्रभात लोढा, आ. रमेश गजबे, आ. निहाल अहमद, आ. फैय्याज अहमद, आ. दादा माधवराव, आ. विजयसिंह मोहिते पाटील, आ. प्रमोद शेंडे, आ. सुरेश गंभीर, आ. रामेश्वर कराळे, आ. डेसमंड येट्स (नाम नियुक्त), आ. दिलीप वळसे पाटील, आ. शरद पाटील, आ. सोहेल लोखंडवाला, आ. नवाब मलिक, आ. मोहम्मद अली खान, आ. वामनराव चटप, आ. दिलीप बोरसे, आ. के. पी. बोपचे, आ. संजय बंड, आ. रोहिदास चव्हाण, आ. विजयराव साळवी, आ. अप्पासाहेब राजळे, आ. साहेबराव दरेकर, आ. बाळासाहेब थोरात, आ. विजयराव शिंदे, आ. भगवानराव नागरगोजे, आ. शंकरराव कोल्हे, आ. गिरीश बापट, आ. श्रीमती रुपलेखा ढोरे, सर्वश्री आ. गिरीश महाजन, आ. मोहन रायचूरा, आ. नरेंद्र पाडवी, आ. विष्णू सावरा, आ. दिगंबर विशे, आ. रामकृष्ण मडावी (आरमोरी), आ. हरिश्चंद्र चव्हाण, आ. जनार्दन तुपे, आ. माणिकराव खपले, आ. मनोहर पटवारी, आ. विलासराव पाटील, आ. अब्दुल कादिर देशमुख इ. एकूण ८४ सन्माननीय सदस्यांनी कृषी मंत्र्यांना प्रश्न विचारला. प्रश्न पुढीलप्रमाणे होता.

"सन १९९८ मध्ये राज्यात अतिवृष्टी आणि गारपिटीमुळे नापिक व कर्जबाजारीपणामुळे काही शेतकऱ्यांनी आत्महत्या केली हे खरे आहे काय ? खरे असल्यास, आत्महत्या

आज निर्माण होत आहे. त्याग, सचोटी, देशप्रेम, समाजनिष्ठा, प्रामाणिकपणा, श्रमाची नितांत आवड, मंगलाची कदर, अमंगलाचा त्याग आणि राष्ट्रविकास या इतर शैक्षणिक उद्दिष्टांचे काय झाले आहे. शिक्षणाची गुणवत्ता म्हणजेच शिक्षणातील अंतर्भूत सर्वच गोष्टींचा जो ऱ्हास होत आहे, त्याची कारणे व हिशेब करण्याची आता हीच वेळ आहे. ज्या ज्या वेळी गुणवत्तेच्या बाबतीत ओरड झाली, त्या त्या वेळी समाजान शिक्षणाला, शिक्षकाने विद्यार्थ्यांला, विद्यार्थ्यांने विद्यापीठाला, विद्यापीठांनी महाविद्यालयाला असे अनेक बहुरंगी आरोप, प्रत्यारोप करण्यात आपली ५० वर्षे गेली आणि यात कुणीही दोषी नाही असेच सिध्द झाले. अखेर अशा आरोपांपासून मुक्त होण्याचे खेळ आपण किती दिवस खेळत राहणार हाच मूलभूत प्रश्न आहे.

घ. योग्य पाऊल उचलावे :- शैक्षणिक गुणवत्तेच्या संदर्भात गुणवत्तेचा हिशेब(Quality Audit) मांडण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोग व विद्यापीठे यांच्या संयुक्त विद्यमाने काही योग्य पावले उचलली आहेत. शिक्षण क्षेत्रात हे निश्चितच स्वागतार्ह मानले पाहिजे. गुणवत्तेचे आर्थिक गुंतवणुकीच्या धर्तीवर ज्याप्रमाणे (Audit) हिशेब, ताळेबंद सादर केला जातो, अशाच प्रक्रियेची हालचाल आता विद्यापीठ पातळीवरून सुरू आहे. त्यासाठी विद्यापीठाने अभ्यासक्रमातील आमूलाग्र बदल, अध्यापन पध्दतीतील आवश्यक परिवर्तन, शिक्षकांचे वेळोवेळी मूल्यमापन, महाविद्यालयाचे अत्याधुनिकीकरण, अनुदानांची सोय व व्यवस्थापकीय सोयीसुविधांचा विचार करणे गरजेचे आहे असे समजले आहे. पाश्चात्य देशांच्या धर्तीवर आता विद्यापीठ अनुदान आयोगाकडून देशातील सर्वच विद्यापीठातून गुणवत्तेच्या संदर्भात असे पाऊल उचलले गेले, तर देशाच्या विकासाला वेळ लागणार नाही हे निश्चित.

प्रपाठक व विभागप्रमुख क. का. वाघ कॉलेज, पिंपळगाव (बं) ता. निफाड, जि. नाशिक, पिनं.४२२२०९

(पान क्र. ७९ वरुन)

टाकावी. रस्त्यावर किंवा घराच्या बाजूला ठेवू नये, कारण या ठिकाणीही ह्या डासांची उत्पत्ती होते व वास्तव्य असते.

फॉगींग मशीनव्दारे धूर फवारणी हा सुध्दा प्रभावी उपाय होय, पण त्यासाठी रस्त्यावर, गटारात किंवा कचरा कुंडी या ठिकाणी धूर फवारणीं करून चालणार नाही, तर घरात सर्व ठिकाणी धूर फवारणी करून घेणे अत्यंत आवश्यक आहे. घरातील शंभर टक्के धूर फवारणीमुळेच हा डास मरू शकतो व यांच्या अळ्या नष्ट होऊ शकतात.

छतावर साचलेले पाणी, ट्यूब, टायरमध्ये साचलेले पाणी हीसुध्दा या डासांची वास्तव्ये व उत्पत्तीस्थाने आहेत. या ठिकाणीही पाणी न साचू देणे, टायर, ट्यूब, फुटके माठ त्वरीत निकाली काढणे हा सुध्दा प्रभावी उपाय ठरू शकतो. यामुळे डासांचे व त्यांच्या अळ्यांचे पूर्णपणे निर्मूलन हाऊ शकते. फॉगींग मशीनव्दारे धूर फवारणी ही टप्प्या-टप्प्याने न होता ती संपूर्ण गावात एकाच वेळी व्हावी व एकाच दिवशी व्हावी.

घरातील पाण्याचे साठे दर आठ दिवसांनी एकदा व शक्य झाल्यास दोनदा स्वच्छ जरूर करावे व एडीसपासून आपला बचाव करावा.

चिकुन गुनिया झाल्यास उपचार :- याही उपर एडीस डास चावला व चिकून गुनिया झाला तर घाबरून जाण्याचे कारण नाही. अंगात ताप येणे, हातपाय दुखणे, सांधे ठणकणे, डोकेदुखी व अशक्तपणा जाणवला तर डॉक्टरकडे जावे व ते जे पेनकीलर औषध देतील तेच घ्यावे. इंजेक्शन किंवा सलाईनचा अजिबात हट्ट धरू नये, कारण हया आजारावर प्रभावी औषध नाही. कारण हा व्हायरसने होणारा आजार आहे: त्यामुळे तो २-४ दिवसात निसर्गतच बरा होतो. आपली मानसिकता दृढ ठेवा. दृढविश्वास ठेवा की मी घेतलेल्या पेन कीलर गोळीने व ताप उतरण्याच्या गोळीने हा आजार निश्चित बरा होणार आहे. तो बरा होतो.

विनाकारण डॉक्टरांना इंजेक्शन व सलाईन देण्याचा हट्ट धरू नका. इंजेक्शन सलाईन घेणे म्हणजे दुसरेच आजार ओढवून घेणे होय हे ध्यानात ठेवा. या आजारावर प्रभावी ईलाज म्हणजे मनावर संयम, दृढ मानसिकता, सक्षम व प्रबळ इच्छाशक्ती व प्रखर शारीरिक क्षमता या आधारेच हा आजार पूर्णत: बरा होतो. या आजाराचे जास्त लाड केले व अधिक प्रमाणात गोळ्या-औषधे घेतली तर अन्य आजारांना निमंत्रणाबरोबर मृत्यूलाही पाचारण होय. चिकुन गुनियाने गेल्या शे-सव्वाशे वर्षात कोणीही पेशंट मृत्युमुखी पडलेला नाही. एवढे मात्र निश्चित की जसा हा आजार होतो, तसा ५-६ दिवसात तो बराही होतो. मात्र यासाठी हवी सहनशक्ती, संयमशीलता व सदृढ विश्वास.

अफवा पसरवू नका :- चिकुन गुनिया हा आजार संसर्गजन्य आहे. अमुक डॉक्टरकडे भारी इंजेक्शन आहे. ते घेतले की हा आजार बरा होतो, ही अफवा आहे. सरकारी दवाखान्यातील गोळ्या खाल्ल्या की हा आजार बरा होतो किंवा सलाईन घेतली की आराम मिळतो, हे सर्व धादांत खोटे आहे. मनाचा ब्रेक उत्तम ब्रेक या नीतीने मनातून या आजाराबाबतच्या कल्पना, संकल्पना, समज, गैरसमज दूर करा. स्वच्छता पाळा, कोरडा दिन पाळा, औषध फवारणी करा व जागृती करा. कारण चिकुन गुनिया विना उपचाराने बरा होणारा आजार आहे.

धोंडीरामसिंह ध. राजपूत
१३१०, देशपांडे गल्ली, वैजापूर
जि.औरगाबाद,

घेणे भारतासारख्या देशाच्या हिताचे आहे. आज जेव्हा विकसित देशांकडून प्रस्ताव येतो आणि भारतासारखा देश व विद्यापीठ अनुदान आयोग अशा खाजगीकरणाला होकार देतात तेव्हा हा मुद्दा संविधानात्मकच प्रश्न नसून संपूर्ण राष्ट्रीय स्वरूपाचा, एकूण राष्ट्रीयत्वाचाच प्रश्न निर्माण करू शकेल हे लक्षात घेतले पाहिजे.

क. पदव्यांचे कारखाने :- स्वतंत्र भारतात शिक्षण व्यवस्था उच्च असावी याविषयी शिफारशी करणाऱ्या अनेक आयोगांनी आपआपल्या वकुबानुसार काही नवे प्रयोग, काही नव्या कल्पना राबविण्याच्या शिफारशी केल्या. पुढे तर शिक्षण हा राजकीय स्पर्धेचा विषय झाला. सरकार बदलले की शिक्षणविषयक धोरण वेळोवेळी बदलण्याचा प्रकारही झाला. शिक्षण हे रोजगाराशी जोडले गेले पाहिजे. असा एक सिध्दांत मध्यंतरी रद्द झाला होता. पदवी व व्यवसायरोजगार यांचा मेळ घालण्याच्या या प्रयत्नात बेकारी तर कमी झाली नाहीच, उलट तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणाच्या सोयीसुविधा वाढविण्याच्या नावाखाली शिक्षणाचा बाजार मांडला जाऊ लागला. अन्य कुठल्याही जीवनावश्यक वस्तूप्रमाणेच शिक्षण ही एक वस्तू आहे असे मानले जाऊ लागले. यातूनच शिक्षणाची घसरण सुरू झाली. शाळा आणि महाविद्यालये ज्ञानाची केंद्रे होण्याऐवजी आता पदव्यांचे कारखाने म्हणून ओळखण्याची नवी प्रथा रूढ झाली. उत्कृष्टता आणि गुणवत्ता या दोन्ही गोष्टी बाजूला पडून शिक्षणातील ढिसाळपणा आज सहज लक्षात येऊ लागला. उत्कृष्टतेचा हट्ट कुठेही नाही. ७० टक्के अज्ञान असले तरीही परीक्षा उत्तीर्ण झाल्याचा दाखला मिळण्याची सोय ज्या देशात आहे, तिथे उत्कृष्टता व गुणवत्ता कशी नांदेल. भिकार अभ्यासक्रम, थातूरमातूर अध्ययन, नोट्स लिहून देऊन मोकळे होणार शिक्षक, अशी मानसिक प्रवृत्ती ज्या समाजात बळावत असते त्या समाजाच्या या विनाशाच्या वाटा आहेत, हे कसे लक्षात येईल?

ड. कोणी वाचवू शकणार नाही :- मग हे सारे आहे असेच चालणार, यात काही बदल होणार नाही का? होणार असेल तर मग आपण तो करणार आहोत काय? असे अनेक प्रश्न आज शिक्षणाच्या संदर्भात निर्माण आहेत. यापुढेही जर आपल्याला बदल नको असेल तर मग एकविसाव्या शतकातही आपल्याला अजून एकानव्या एन्रॉनशी वीज निर्मिताबद्दल करार करावे लागतील. अनेक भारतीय कंपन्यांना केवळ तंत्रज्ञानाअभावी विदेशी कंपन्यांपुढे सहकार्यासाठी कोलॅबोरेशन करावे लागेल. मग गॅटसारखे व डंकेलचे प्रस्तावही आपल्याला राहू व केतू सारखे वाटू लागतील. हे आता सगळेच कुठेतरी थांबायला हवे आणि भारताने मागच्या दीडशे वर्षाच्या शिक्षणप्रणालीचा व त्यातून होणाऱ्या विकाराचा, गुणवत्तेचा हिशेब मांडायला हवा. अन्यथा हे सारे इतके बिघडले असतानाही आपण जर सुधारणा केल्या नाही तर एखादा अवतारही आपल्याला जागतिकीकरणाच्या स्पर्धेत वाचवू शकणार नाही. निराशेने ग्रस्त झालेली तरुण पिढी व बेकारांच्या संख्येत हजारोंनी भर पडून वाया चाललेली युवाशक्ती देशाला कधीही माफ करू शकणार नाही.

इ. गुणवत्तेचा ऱ्हास आणि संख्यात्मक वाढ :- महाविद्यालये, विद्यापीठे, विद्यार्थी आणि प्राध्यापक यांचा केवळ संख्येचाच विचार केला तर, भारतीय शिक्षणपध्दती आज जगातील सर्वात मोठी शिक्षण पध्दती आहे, असे मानले जात आहे. आजमितीस देशात अडीचशे विद्यापीठे, १२ हजार महाविद्यालये, ९५ लक्ष विद्यार्थी आणि साडेतीन लाखांच्यावर प्राध्यापक संख्या असलेली शिक्षण व्यवस्था जगात कुठेही अस्तित्वात नाही. स्वातंत्र्याच्या काळात भारतात केवळ १७ विद्यापीठे व ३५० महाविद्यालये इतकीच संख्या असलेल्या देशाने अवघ्या ५० वर्षात लक्षणीय अशी संख्यात्मक वाढ करताना १९५६ साली विद्यापीठ अनुदान आयोगाचे तत्कालीन अध्यक्ष डॉ. सी. डी. देशमुख यांनी संख्यात्मक वाढीने भारताचा विकास होऊ शकणार नाही, असा इशाराही दिला होता. किंबहुना त्यांनी अशा संख्यात्मक वाढीला तीव्र विरोध करून अनेक विद्यापीठे व महाविद्यालयांची परवानगी पण नाकारली होती. परंतु आपल्या देशात राजाश्रय व राजकीय समर्थन मिळाल्याने सगळेच प्रश्न सुटतात, हे तत्त्व मानून शैक्षणिक साम्राज्याच्या विस्तारापुढे शैक्षणिक उद्दिष्टे व गुणवत्ता ही क्षुद्र वाटू लागली. दर्जाही नाही आणि धड विस्तारही नाही अशी अजब कोंडी आज शिक्षण क्षेत्रात निर्माण झाली आहे.

फ. गुणवत्तेचा ध्यास :- शैक्षणिक गुणवत्तेच्या बाबतीत बरेच काही बोलले जाते, लिहिलेही जाते. जेव्हा जेव्हा गुणवत्तेचा प्रश्न निर्माण झाला तेव्हा शासनाने अनेक तज्ज्ञांकडून वेळोवेळी आयोगाची स्थापना करून, त्याचे अहवालही शासनदरबारी वेळोवेळी सादर करण्यात आले. तरीही आज शिक्षणाचा दर्जा सुधारला आहे असे मानायला कोणीही तयार नाही. निरुपयोगी अभ्यासक्रम, कामचलावू अध्ययन आणि येनकेनप्रकारे परीक्षा पास होऊन पदव्या वाटणाऱ्या शिक्षण व्यवस्थेत, नेमकी गुणवत्ता काय याची परिभाषा बदलली की काय असा प्रश्न निर्माण झाला आहे. गुणवत्ता म्हणजे Quality आणि Quality या शब्दाची व्याख्या आज स्पर्धेच्या युगात गोदरेज किंवा हिरो होंडा या कंपन्यांना विचारले तर समजू शकेल. Quality म्हणजे जो माल उत्पादित केला जातो, तो समाजाच्या पसंतीचा व उपयोगांचा असतो असेच तत्त्व शिक्षणाच्या गुणवत्तेच्या बाबत करता येईल. शिक्षण व्यवस्थेतून अनेक कौशल्य व सरकारने घडवलेला विद्यार्थी आज समाजामध्ये निरुपयोगी व बेकार म्हणण्याची वेळ का येते. याचाच अर्थ आजच्या शिक्षणाने त्याला केवळ सरकारी नोकरीव्यतिरिक्त इतर काहीही करता येऊ नये अशी एक पंगू पिढी आपण निर्माण करीत आहोत. म्हणूनच की काय सरकारी नोकरी मिळाली की आयुष्यभराचा प्रश्न सुटतो असे मानणारी पिढी आपण निर्माण करीत आहोत आणि नोकऱ्यांसाठी स्पर्धा दिवसेंदिवस तीव्र होत आहे. इतकी की तो जीवन संघर्ष होऊन बसला आहे. शिक्षणातून स्वावलंबन असे मानणाऱ्या कर्मवीर भाऊराव पाटलांच्या उद्दिष्टाचे काय झाले असाही सवाल

आहे. त्याचबरोबर जगातील संपूर्ण निरक्षरांपैकी ५० टक्के निरक्षर लोक याच देशात आहेत असेही एका पाहणीवरून आढळून आले आहे. अशा परिस्थितीत भारतातील उच्च शिक्षणाचा झालेला तथाकथित विकास हा फोल ठरला आहे असेच म्हणावे लागेल.

अ. शिक्षण व विकास :- १९४५ ला राखरांगोळी झालेल्या जपानसारख्या देशाने आज केवळ ज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या जोरावर बाजारपेठ काबीज करून जगाला दाखवून दिले आहे की, शिक्षणाशिवाय कोणत्याही राष्ट्राचा विकास हा अशक्यच असतो. भारतात मात्र एका बाजूने शिक्षणाचा तथाकथित विकास झाला आणि दुसऱ्या बाजूने आजही विकसनशील राष्ट्र म्हणूनच आपली गणणा होते. गॅट करारानुसार आता जगाची वार्षिक उलाढाल जागतिक पातळीवर होणारा आहे. आणि ही आर्थिक उलाढाल उत्पादकतेशी व उद्योजकतेशी जोडलेल्या त्या त्या देशातील ज्ञान व तंत्रज्ञानाच्या कसोटीवर अवलंबून असणार आहे. जपानसारखी घड्याळे व दूरदर्शन संच किंवा कोरियासारखे कॅमेरे व सूक्ष्मदर्शक यंत्र आणि दुर्बिणी या भारतीय उद्योजकांकडून निर्माण केल्याशिवाय त्यांना भारतीय बाजारपेठेतसुध्दा आपला माल विकता येईल की नाही, हा प्रश्न आज उद्योजकांसमोर आहे, त्यामुळेच आज प्रत्येक उद्योजक व खाजगी कंपन्या अनेक बहुउद्देशी व विदेशी कंपन्यांकडून सहकार्याचा हात मागत आहेत. शिक्षण विकासापासून किंवा उद्योजकता व उत्पादन क्षमतेपासून वेगळे करता येत नाही. अमेरिका व जपानसारख्या देशाचा उद्योग विकासच मुळी शिक्षणातून झाला आहे. उत्पादनाचा दर्जाही त्या त्या देशातील तंत्रज्ञ व कुशल कामगारांवर अवलंबून असतो, असे जपानने अमेरिकेतील बाजारपेठ काबीज करताना दाखवून दिले आहे. अशा परिस्थितीत भारतात आता खऱ्या अर्थाने बाजारपेठ आणि बाजारातील उत्पादित मालाबरोबर स्पर्धा करायची असेल तर त्याला जागतिक पातळीवर लागणारे तंत्रज्ञान व कौशल्य निर्माण करणे अपरिहार्य ठरते. विकसित देशाच्या तुलनेत या स्पर्धेत भारतासारख्या विकसनशील देशाचा टिकाव लागणे कठीण आहे. भारतातील एकूण जनता व मनुष्यबळ लक्षात घेऊन केवळ व्यापार हाच उद्देश ठेवून उद्योजकता, उत्पादकता अशा एका व्यापारी शिक्षणाची नवी पध्दती जगातील उद्योजकांना भारतात निर्माण करावयाची आहे. उत्कृष्ट माल, स्वस्त वस्तू व जास्त नफा असे व्यापाराचे तत्व असते आणि हेच तत्व त्यांना भारतात केवळ व्यापारासाठी लागू करावयाचे आहे. केवळ याच उद्देशाने भारतातील उच्च शिक्षण क्षेत्रातील संबंधितांशी व विद्यापीठ अनुदान आयोगाबरोबर जगातील काही खाजगी कंपन्या शिक्षणाच्या जागतिकीकरणावर विचार करीत आहोत. विद्यापीठ अनुदान आयोगाला आलेले मागच्या ४० वर्षाचे अनुभव व भारतातील शिक्षणाचे होत असलेले राजकीयीकरण हे मुद्दे या संदर्भात महत्वाचे आहेत. तेथील शिक्षणाचा व विकासाचा कधीही थेट सांधा न जोडल्याने विदेशी कंपन्यांबरोबर शिक्षणाचे खाजगीकरण व जागतिकीकरण हे पर्याय आले आहेत. मात्र अशा शिक्षण पध्दतीत भारताला हस्तक्षेप, सूचना करण्याचे किती अधिकार राहणार आहेत हा संविधानात्मक प्रश्न निर्माण झाला आहे.

ब. खाजगी विद्यापीठे :- मार्च २००६ या महिन्यात महाराष्ट्र सरकारने खाजगी विद्यापीठ कायदा एकमताने समंत केला. आता खाजगी विद्यापीठे महाराष्ट्रात येतील. खाजगी विद्यापीठाची रचना कशी असावी व उद्देश काय असावा, यावर अनेकांची मतेही विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मागविण्यात आली आहे. याचाच अर्थ गॅट करारानंतर खाजगीकरणाच्या व जागतिकीकरणाच्या दबावाखाली भारताला दबावे लागणार आहे, असे होईल का? आजच्या भारतातील शिक्षण पध्दतीतील पारंपारिकता किती उपयोगी आहे? चार भिंतीच्या आत खूपच भरलेल्या विद्यार्थ्यांसमोर पुस्तकी ज्ञानाचे केवळ कृतिहीन डोस पाजायचे, नंतर ३ तासात पोपटपंची करून मिळालेल्या माहितीवर प्रश्नपत्रिका देऊन गुणवत्तेचे दाखले देणे बंद केले पाहिजे. शिक्षण हे संपूर्ण शिक्षण, ज्यात बुध्दी (Head) हात (Hand) आणि हृदय (Heart) याचा विकास होईल असे शिक्षण देणे गरजेचे आहे. बुध्दीच्या विकासाने विद्वत्ता, हाताच्या कौशल्याने कुशलता आणि हृदयाच्या विकासाने मानसिकता अशा त्रिस्तरीय शिक्षणाची आज आवश्यकता आहे. ज्ञानाच्या व तंत्रज्ञानाच्या कक्षा वाढत आहेत. कालचे विशेष ज्ञान आजचे सामान्यज्ञान बनत आहे. भारतीय मातीच्या गरजा लक्षात घेऊन शिक्षणाची उद्दिष्टे ठरवून, शिक्षणाला गुंतवणूक मानून, त्याचा उपयोग आर्थिक विकासासाठी आणि एकंदर राष्ट्र उभारणीसाठी करायला हवा होता. तसे मात्र घडू शकत नाही. आजही शिक्षण संस्थांना व विद्यापीठांना त्यांची शैक्षणिक उद्दिष्टे काय आहेत किंवा काय असावी हेही माहिती नाही. शिक्षण अर्थशास्त्राचा येथे कधीही विचार केला गेला नाही. सध्या पदवीधारकांची गरज नसतानाही उच्च पदवीधारक व पदव्युत्तराचे अनियंत्रित तांडे निर्माण करणे हे भारतासारख्या विकसनशील देशाला परवडणारे नाही. या गोष्टींवर आजही एकही विद्यापीठ किंवा शिक्षणसंस्था विचार करायला तयार नाही. विकसित देशामध्ये, विशेषत: भांडवलशाही राष्ट्रांमध्ये, शिक्षण ही गुंतवणूक मानली जाते आणि गुंतवणूक ही नफ्यासाठी असते. व्यापारी शिक्षणाचे तत्व घेऊन भारतातही खाजगी विद्यापीठांचा विचार घेऊन येणाऱ्या राष्ट्रांचाही हाच उद्देश असतो. भारतीय संस्कृती, भारतीय समाज व्यवस्था, भारतीय नागरिकांच्या गरजा व त्यांचा विकास हा काही शिक्षणाच्या जागतिकीकरणाचा उद्देश नाही आणि नसतोही. अमेरिकेसारखा देशात विद्यार्थी हा शिक्षणसंस्थेचा गिऱ्हाईक म्हणून संबोधला जातो. शिक्षणाला निव्वळ गुंतवणूक मानण्याचे अनेक दुष्परिणाम आज विदेशी शिक्षणात दिसत आहेत. अमेरिकेच्या औद्योगिक समाजाला अमेरिकन शिक्षण पध्दती केवळ स्नायू पुरविण्याचे काम करीत असते. असे स्नायू पुरविण्यासाठी भारत हा अत्यंत अनुकूल देश आहे हे विकसित देशांना माहिती आहे. शिक्षणाच्या जागतिकीकरणामुळे यांत्रिक समाज निर्माण होणे अपरिहार्य आहे हेही लक्षात

करणाऱ्या विद्यार्थ्यांना रंगे हात पकडण्यासाठी मोठ्या संख्येने अधिकारी नेमण्यात येत आहेत. मात्र दक्षता पथकाचे होणारे स्वागत अनुभविण्यासारखे आहे. ग्रामीण भागाला कायम बदनाम करण्यात येते, पण अगदी जिल्ह्याच्या ठिकाणीसुध्दा दक्षता पथकाला दगड-विटांचा आहेर देण्यात येतो. वर्गातील कॉपी रोखण्यासाठी मंडळाकडून करण्यात येणाऱ्या प्रयत्नांना यश मिळत असल्याचा दावा करण्यात येत आहे. कॉपी प्रकरणांची वाढलेली संख्या म्हणजे वेगवेगळ्या पथकांच्या प्रभावी उपस्थितीचे निदर्शक आहे. म्हणजे इतक्या प्रमाणात कॉपी प्रकरणे पकडली जात आहेत. वर्गाबाहेरील गैरप्रकार रोखण्याचे आव्हान मात्र मोठे आहे. त्यासाठी समाजाची साथ आवश्यक आहे. किंबहुना, समाजाची साथ हाच त्यावरील निर्णायक उपाय आहे. दहावी-बारावीच्या परीक्षांपूर्वी काळपट अशा कागदावर शासकीय परिपत्रकही जारी करण्यात येते. परीक्षा केंद्राच्या आसपास जमावबंदी लागू करण्यात आली असून झेरॉक्सची दुकाने आदींना मनाई करण्यात आली आहे. परीक्षा केंद्र आणि केंद्राबाहेर होणाऱ्या गैरप्रकारांवर आळा बसावा, या हेतूने शासकीय गैरप्रकार अधिनियम १९८२ अस्तित्वात आहे. गैरप्रकार करणाऱ्यांना किंवा त्यामध्ये सामील होणाऱ्यांना दंड, शिक्षेची तरतूद या अधिनियमानुसार करण्यात आली आहे. त्याची अंमलबजावणी करण्याचा आदेशही देण्यात येतो. पहिली गोष्ट म्हणजे कोणत्याही गैरप्रकारांबाबत कारवाई करण्याचे दंडात्मक अधिकार मंडळाला नाहीत, त्याचप्रमाणे मंडळाचे जे काही अधिकार आहेत, ते केवळ परीक्षा केंद्राच्या चौकटीमध्ये आणि मर्यादित स्वरूपात आहेत. आवाराबाहेरील गैरप्रकारांबाबत मंडळ केवळ तक्रारच करू शकते. दहावी - बारावीच्या परीक्षा मंडळ घेते. प्रश्नपत्रिका काढणे, त्या वितरीत करणे, प्रत्यक्ष परीक्षेची कार्यवाही करणे, उत्तरपत्रिका तपासणे आणि निकाल जाहीर करणे, असा त्याचा आवाका आहे. परीक्षा केंद्रावरील शिक्षक शिक्षकेतर मंडळाच्या आदेशानुसार काम करीत असले तरी ते सेवेत असतात. खासगी शिक्षणसंस्थांच्या वा अधिकाऱ्यांच्या वरदहस्तानेच अनेकदा परीक्षादरम्यान गैरप्रकार केले जातात. संबंधित दोषी कर्मचाऱ्यांवर थेट कारवाई करण्यात मंडळ असमर्थ आहे कारण, हे कर्मचारी शिक्षणसंस्थेचे नोकरदार असतात. त्यामुळे मंडळ संबंधित संस्थेला कारवाई करण्याचा आदेश देऊ शकत नाही, तर केवळ शिफारसच करते. त्यावर त्या संस्थेचे उत्तर येते. संबंधित कर्मचाऱ्याला सक्त ताकीद देण्यात आली आहे! पुढे काय कारवाई होते, हे देवच जाणे. परीक्षांदरम्यान होणारे गैरप्रकार, कॉपी या संदर्भात मराठवाडा, विदर्भ कुख्यात आहे. त्या ठिकाणच्या परीक्षा केंद्राला पडणारा वेढा, चिठ्ठ्यांचा पडणारा खच याची छायाचित्रे, दूरचित्रवाहिनीवरील दृश्ये उभा महाराष्ट्र पाहतो. पण प्रत्यक्षात कारवाई कुणावर आणि कोण करणार? सारे गावच त्यामध्ये सामील झालेले असते. कारण विशेषत: दहावीची परीक्षा हा साऱ्या गावाचा मानबिंदू असतो! पोलिसांकडून कारवाई होत नाही, अशी ओरड केली जाते. पण, कारवाई केली तरी सारे गावच त्याला विरोध करते, असा अनुभव आहे. थोडक्यात आपल्या मुलांना भविष्यात जर उज्ज्वल संधी हवी असेल तर त्यासाठीचा विचार सर्वप्रथम पालकांनीच करायला हवा. मोठमोठ्या कंपन्या त्यांना हव्या असलेल्या उमेदवारांची निवड करण्यासाठी महाविद्यालयांमध्ये किंवा मोठमोठ्या शिक्षणसंस्थांमध्ये कॅंपस् इंटरव्ह्यू आयोजन करू लागलेल्या आहेत. यात जो उमेदवार आपली गुणवत्ता चांगल्याप्रकारे सिध्द करू शकेल त्यालाच चांगल्या रोजगाराची संधी मिळू शकेल. म्हणून पालकांनी याचा अतिशय गांभीर्याने विचार करायला हवा की, आपण आपल्या मुलांसाठी भविष्यात काय वाढून ठेवणार आहोत. परीक्षा केंद्रावर आपल्या पाल्यांना कॉपी पुरविण्यासाठी जमा होणाऱ्या पालकांनी याचा गांभीर्याने विचार केला नाही, तर मुलगा त्या परीक्षेत कदाचित पास होईलही पण जीवनाच्या परीक्षेत गुणवत्ता व कार्यक्षमता प्राप्त करू शकणार नाही.

३. शिक्षणासमोरील नवी आव्हाने :- शिक्षण आणि विकास या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, असे अनेक शिक्षणतज्ज्ञांनी सांगितले आहे. मागच्या ४० वर्षात जेवढा शिक्षणाचा तथाकथित विकास झाला तेवढा इतर कोणत्याही क्षेत्राचा विकास झालेला नाही हेही खरे आहे. ग्रामीण भागातील शिक्षणाचा दर्जा खालावतो आहे. आज आपली जी शिक्षण व्यवस्था आहे तिच्यात खूपच सुधारणा करण्याची गरज आहे. कालबाह्य झालेला अभ्यासक्रम, मुल्यमापनासाठी केवळ परीक्षा व परीक्षांमध्ये मिळणारे गुण एवढेच घटक आजच्या शिक्षणात दिसून येतात. आजची व्यवस्था विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्वाचा विकास घडवू शकणार नाही. आजच्या जागतिकीकरणाच्या व स्पर्धेच्या युगात हे शिक्षण टिकाव धरू शकेल काय? रोजगाराच्या संधी यापुढील काळात व पदवीच्या प्रमाणपत्रावर किती प्रमाणात मिळू शकणार आहेत आता सरकारी नोकरीच्या रूपाने मिळणारा रोजगार ही संकल्पना कालबाह्य होत आहे. सुरक्षित नोकरी हा प्रकारही यापुढील काळात टिकणारा नाही. रोजगार आता स्वप्रयत्नाने मिळवावा लागणार आहे व तो मिळविण्यासाठी वशिला हा घटक उपयुक्त ठरणार नाही. तर त्यासाठी गुणवत्ता आणि कार्यक्षमता हेच घटक सर्वात महत्वाचे ठरणार आहेत. म्हणून गुणवत्ता आणि कार्यक्षमता वाढविण्याचेच शिक्षण यापुढील काळात द्यावे लागणार आहे. जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर मानवी जीवनाचे संदर्भ बदलू लागलेले आहेत. एक नवी समाजव्यवस्था आकार घेत आहे. शिक्षणासारख्या क्षेत्रातही परिवर्तन होत आहे. प्रचलित शिक्षण व्यवस्थेत अनेक त्रुटी आहेत. हे शिक्षण जागतिकीकरणाच्या स्पर्धेत विद्यार्थ्यांना सक्षम बनवू शकेल का? या प्रश्नाच्या पार्श्वभूमीवर आपल्या शिक्षण व्यवस्थेच्या त्रुटी पुढे आलेल्या आहेत. आपण एका बाजूला देशाला आर्थिक महासत्ता बनविण्याची भाषा बोलतो. त्यासाठी मानवी विकासाच्या शिक्षणासह सर्व अंगांचा विकास होणे आवश्यक आहे. आजघडीला भारतातील शिक्षण पध्दती ही जगातील सर्वात मोठी शिक्षण यंत्रणा आहे, असे निदर्शनास आले

एक नवीन शैक्षणिक संस्कृती नव्याने निर्माण होत आहे. हे चित्र निश्चितच भयावह व विदारक आहे.

ड.) अभ्यासक्रम प्रेतासारखा :- आमची विद्यापीठे व महाविद्यालये ज्ञानाचे केंद्र (पॉवर हाऊस ऑफ नॉलेज) होण्याऐवजी केवळ परीक्षा घेण्याचे केंद्र होऊन बसली आहेत. कालबाह्य व विदेशात जे पन्नास ते साठ वर्षापूर्वी शिकविले गेले तेच तेच व जुनाट, अनावश्यक असे अभ्यासक्रम राबविले जात आहेत. त्याच अभ्यासक्रमावर वर्षानुवर्षे तेच तेच प्रश्न विचारून तोंडपाठ उत्तरे लिहिणाऱ्या पोपटपंची व बौध्दिकदृष्ट्या अपंग पिढ्या आपण निर्माण करीत आहोत. आपल्या अभ्यासक्रमाच्या संदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष प्रा. यशपाल म्हणतात की आमचा अभ्यासक्रम एका प्रेतासारखा (डेडबॉडी) झाला आहे. अभ्यासक्रम ज्यांच्या हातात आहे ही मंडळी या मृत अभ्यासक्रमाला थडग्यात नेण्याचे काम करीत आहेत. स्वायत्ततेच्या नावावर अनेक विद्यापीठांनी आपल्या अति उच्च अशा पीएच. डी. पदव्यांचाही व्यापार मांडला आहे. वर्षाला दहा हजार पीएच. डी. पदव्या बहाल करणारा भारत हा देश अद्यापही राष्ट्रसंघाच्या म्हणण्यानुसार तिसऱ्या जगात (थर्ड वर्ल्ड) मोजला जातो. ही विसंगती अन्यन्यसाधारण अशीच आहे. आज महाविद्यालयातून बाहेर पडणारा सामान्य पदवीधर कुचकामी व निकृष्ट दर्जाचा एक बेकार तरुण म्हणून वावरताना दिसतो. ज्या देशातील तरुण व युवा शक्तीचेच पतन होते तो देश कदापि सुधारू शकणार नाही, असे अनेक विचारवंतानी सांगितले आहे. त्याचबरोबर ज्या देशात अडाणी लोकांची लोकशाही असते ती बेबंदशाहीहून अनिष्ट असते, असे राजकारणाच्या ग्रंथात सांगितले गेले आहे.

इ. विद्यार्थी आणि शिक्षक :- जागोजागी शिकवण्याचे दर लावलेले बोर्ड व शिकवणीचा बाजार मांडलेले शिक्षक आज आपल्या विद्यार्थ्यांना काय देणार आहेत याचा प्रश्न पडतो. वर्गामध्ये शिकवण्याचे कष्ट न घेता भले मोठे ग्रंथ वाचून दाखवून किंवा त्यातलेच उतारे लिहून देऊन शिक्षक आज आपल्या शिष्याला काय देणार आहेत? आपल्याच शिकवणी वर्गाला यावे म्हणून विद्यार्थ्यांना त्रास देणारे व सूडबुध्दीने वागविणारे शिक्षकही आज कमी नाहीत. शिक्षणाबद्दल प्रेम, विद्यार्थ्यांबद्दल आपुलकी बाळगणारा शिक्षक आज क्वचितच दिसेल. रशियामध्ये दारिद्रयाला कारणीभूत ठरत असलेली तेथील साम्यवादाला उलटून टाकणारी एक नवी खळबळ जशी उदयाला आली, तशी एखादी चळवळ या देशातील शिक्षणपध्दतीत आमूलाग्र समूळ बदल घडवून आणण्यासाठी आता उभी केली पाहिजे. प्राथमिक शिक्षण किमान चौदा वर्षे वयापर्यंत अनिवार्य केल्याशिवाय येथील लोकशाही खरी व बळकट होऊ शकणार नाही हे लक्षात घेतले पाहिजे. विद्यापीठांची वाढ थांबवून प्राथमिक शाळांचा दर्जा, सुखसोयी निर्माण केल्या पाहिजेत. महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षण हे ठराविक विद्यार्थ्यांची स्पर्धा परीक्षा घेऊन, संख्या ठरवून दिले पाहीजे. येथील अभ्यासक्रम हे समाजोपयोगी, शेती उपयोगी, उद्योगधंद्यांना पूरक ठरतील असेच निर्माण केले पाहिजेत. संपूर्ण परीक्षापध्दती बदलून, ज्यायोगे खरेच विद्वान निर्माण केले जातील अशा मूल्यमापन पध्दतीचा अवलंब केला पाहिजे. प्राध्यापकांच्या नेमणुका ह्या राष्ट्रीय पातळीवरून व स्पर्धात्मक पध्दतीने, प्रत्येकाच्या कला विचारत घेऊनच केल्या पाहिजेत. शिक्षणाचे उद्दिष्ट सफल न झाल्यास त्या त्या शिक्षकाला नोकरीतून कमी केले पाहिजे. असे बदल जो पर्यंत होणार नाहीत तोपर्यंत सर्व अनर्थाचे मूळ कारण एका अविद्येत आहे हे लक्षात घेतले पाहिजे.

२. परीक्षांतील कॉपी :- मानवी विकास प्रक्रियेतील शिक्षण हा एक अतिशय महत्त्वाचा घटक आहे. सुसंस्कृत नागरिक घडविणे हा शिक्षणाचा सर्वात महत्त्वाचा भाग आहे. परंतु शिक्षण घेणे म्हणजे फक्त पदव्या मिळविणे या अर्थानेच शिक्षणाकडे केवळ पाहिले गेल्यामुळे संपूर्ण शिक्षणव्यवस्थेलाच वेगळे वळण लागले. नोकरी मिळविण्यासाठी किंवा रोजगार मिळविण्यासाठी पदवी महत्त्वाची आहे. त्यातही सरकारी नोकरीसाठी तर पदवी फारच महत्त्वाची आहे. तेव्हा काहीही करून पदवी मिळवायचीच, असा दृष्टिकोन बळावला गेला. व्यावसायिक शिक्षणासाठीही चांगले गुण मिळाले पाहिजेत. या दृष्टीने परीक्षांना महत्व प्राप्त झाले. त्यासाठी अभ्यास करणे, ट्युशन लावणे यासारख्या प्रयत्नांबरोबरच परीक्षांमधील गैरमार्गाचे प्रकारही वाढू लागले. शासन, शाळा - महाविद्यालये, बोर्ड किंवा विद्यापीठांनी हे गैरप्रकार रोखण्यासाठी अनेक वेगवेगळ्या उपाययोजना केल्यात. या वर्षीच्या दहावी-बारावीच्या परीक्षा केंद्रांवरील काही दृश्ये दूरदर्शनने दाखविली. काही ठिकाणी पालकच विद्यार्थ्यांना कॉपी करण्यासाठी पवृत्त करीत होते, तर काही ठिकाणी पालक स्वतःच जिवाचा आटापिटा करून कॉपीला प्रोत्साहन देत होते. हे सर्व पाहिल्यानंतर अशा परिस्थितीतून पास होणाऱ्या विद्यार्थ्यांपुढे आपण कोणते भवितव्य वाढून ठेवले आहे? असा प्रश्न पडतो. नवनिर्माणाच्या कार्यासाठी, समाजाच्या व देशाच्या प्रगतीसाठी आणि स्वतःच्याही प्रगतीसाठी, स्वतःचे व्यक्तिमत्व घडविण्यासाठी ही पिढी खरोखरच सक्षम होईल काय? दहावी बारावीच्या परीक्षा म्हटल्या की दोन भिन्न पातळ्यांवरील लढाई सुरू होते. एक म्हणजे अधिकाधिक गुण मिळवून यशाची शिखरे पादाक्रांत करणाऱ्या विद्यार्थ्यांची आणि दुसरी किमान पास होण्यासाठी काहीही करण्याची तयारी असलेल्यांची. परीक्षांमध्ये होणारे गैरप्रकार रोखण्यासाठी राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने गेल्या काही वर्षापासून युध्दपातळीवर उपाययोजना केल्या आहेत. बारकोड पध्दतीच्या माध्यमातून उत्तरपत्रिका तपासण्याची प्रक्रिया सुधारण्यात आली आहे. त्यामध्ये होणाऱ्या मानवी चुका टाळून अचूक निकाल लावण्यासाठी बारकोड उपयुक्त आहे. आता बहुसंची प्रश्नपत्रिकांच्या माध्यमातून वर्गामध्ये होणारी कॉपी रोखण्यासाठी पावले उचलण्यात आली आहेत. बैठी पथके, भरारी पथके, व्हिडीओ चित्रीकरण करणारी पथके अशा उपाययोजना करून गैरप्रकार

शिक्षणाची दुर्दशा, परिक्षेतील कॉपी आणि शिक्षणासमोरील नवी आव्हाने

✦ डॉ. जी. पी. सुर्वे

१. शिक्षणाची दुर्दशा :- १९४७ मध्ये या देशात केवळ २० विद्यापीठे व २९४ महाविद्यालये होती. आज ५५ वर्षानंतर ही संख्या एकूण २५० विद्यापीठे व १२००० महाविद्यालयांपर्यंत येऊन पोचली आहे. वर्षाकाठी ३०० ते ४०० नवीन महाविद्यालये निर्माण होत आहेत. तरी एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीला याच देशात ४५ टक्के लोक निरक्षर असणार आहेत याचे भान कदाचित उच्च शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्यांनाही नसावे. वर्षाकाठी १४०० कोटी रुपये उच्च शिक्षणावर खर्च करून ४ कोटी पदवीधर निर्माण करण्यामागे आमच्या शिक्षण पध्दतीचे नेमके उद्दिष्ट काय? याच्यावर विचार करायला आजतरी कोणी तयार नाही.

अ. उच्च शिक्षणाची दुरवस्था :- देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून उच्च शिक्षणावर अनेक समित्या नेमण्यात आल्या. अनेक अहवालही देण्यात आले. आम्हाला अपेक्षित असलेले उच्च शिक्षण, अपेक्षित असलेला सुशिक्षित माणूस एखादा महाविद्यालय किंवा एखादे विद्यापीठाला निर्माण करता आला नाही, हेच आमचे आज सर्वात मोठे अपयश आहे. २०० विद्यापीठातून, मागच्या शंभर वर्षामध्ये शंभर कोटी लोकसंख्येच्या भारतासारख्या उपखंडातून (पाकिस्तान धरून) केवळ दोनच नोबेल पुरस्कार विजेते आपण निर्माण करावेत (सी. व्ही. रामन व हरगोविंद खोराना) हे कशाचे प्रतीक आहे? केंब्रिज, ऑक्सफर्ड, हारवर्डसारखी विद्यापीठे आजही आपल्याकडे निर्माण होऊ शकली नाहीत. मागच्या ४० वर्षाचा हिशोब मांडला तर असे लक्षात येते की, दरवर्षाला भारतात ५ विद्यापीठे निर्माण झाली. परंतु आजही ६ हजार वेगवेगळ्या औषधांपैकी केवळ १०० प्रकारचीच औषधे आम्ही निर्माण करू शकलो. आजही आपल्या देशातील कच्च्या मालावर प्रक्रिया करण्यासाठी विदेशी कंपन्यांचे सहाय्य घ्यावे लागते. भारतातील तंत्रज्ञान केवळ जुळवाजुळवी (असेंब्लिंग) करण्याइतपतच विकसित झाल्यामुळे अद्यापही या देशाला स्वत:चा रंगीत दूरदर्शन संच निर्माण करता आलेला नाही. भारत हा कृषिप्रधान देश असूनही, अनेक कृषि विद्यापिठे निर्माण करूनही, वर्षाला या देशाला ३० हजार कोटींचे गोडेतेल आयात करावे लागते. रशियाचे दारिद्र्य आज सगळ्यांनाच दिसत असतानाही अद्याप त्या रशियाच्याच मदतीवर आपले संरक्षण अवलंबून राहावे हे सगळे कशाचे द्योतक आहे? आजमितीला जगात सर्वात जास्त पीएच. डी. पदव्या वाटणारा व जगात सर्वात जास्त प्राध्यापक असलेला भारत एकमेव देश आहे हे लक्षात घेण्यासारखे आहे.

ब. राधाकृष्णन यांच्या शैक्षणिक अपेक्षा :- माणसाचे व्यक्तिमत्व घडविणे हा शिक्षणाचा मूळ उद्देश असतो. उच्च शिक्षणाबद्दल राधाकृष्णन यांच्या अहवालानुसार असे सांगण्यात आले की, उच्च शिक्षण हे महाविद्यालयात मिळाले पाहिजे व त्यावर विद्यापीठाची देखरेख असली पाहिजे. बारा वर्षांचा अभ्यासक्रम ज्यांनी पूर्ण केला त्यातील अगदी निवडक विद्यार्थ्यांनाच महाविद्यालयात प्रवेश मिळावा. त्यांची निवड करणारी समिती असावी आणि त्या समितीने न्यायाने, गुणवत्ता पाहूनच, पक्षपात न करता विद्यार्थ्यांची निवड उच्च शिक्षणासाठी करावी. राष्ट्राच्या गरजा लक्षात घेऊन ज्या विषयाचे पदवीधर पाहिजेत, तितक्याच विद्यार्थ्यांना महाविद्यालयात त्या समितीने प्रवेश द्यावा. म्हणजे पुढे बेकारीचा प्रसंग उद्भवणार नाही. बुध्दिवान व गुणवान विद्यार्थी जर गरिब असेल तर त्याचा सर्व खर्च सरकारने करावा. महाविद्यालयात कसून अभ्यास करावा. विद्यार्थांना प्राध्यापकांनी मार्गदर्शन करावे. केवळ व्याख्याने न देता पाठपध्दतीने त्यांना वाचन, लेखन व प्रयोग करावयास शिकवावे. त्यांच्या अभ्यासावर व्यक्तिगत लक्ष ठेवावे. केवळ वार्षिक परीक्षेवर विसंबून न राहता वरचेवर त्यांच्या चाचण्या घ्याव्यात. त्यासाठी महाविद्यालयांची संख्या केवळ ५०० इतकीच असावी. देशातील सर्व विद्यापीठांनी स्वतंत्रपणे आपला कारभार चालवावा व विद्यापीठातील शिक्षणाची गुणवत्ता वाढविणे हे तेथील अधिकाऱ्याच्या हातात असले पाहिजे. शिक्षणाच्या पवित्र क्षेत्रात पक्षपाती राजकारण किंवा समाजकारण आणणे अनिष्ट ठरेल.

क.) आताचे विदारक चित्र :- याउलट, आज विद्यापीठे व महाविद्यालये राजकारण्याचे अड्डे निर्माण झाले आहेत. देशात कोणत्या ना कोणत्या विद्यापीठात किंवा महाविद्यालयात मोर्चा, धरणे, लाठीमार, बंद, जाळपोळ व कर्फ्यू लागलेच पाहिजेत इतकी वाईट अवस्था झाली आहे. एका महाविद्यालयात ५०० च्या संख्येऐवजी दहा ते पंधरा हजारांची विद्यार्थी संख्या संपूर्ण शिक्षणाच्या वातावरणावर एक प्रचंड तणाव निर्माण करीत आहे. शिक्षण संस्थांना व्यापारी व बाजारू स्वरूप आल्यामुळे गुणवान, बुध्दिवान विद्यार्थी निर्माण करण्याऐवजी व्यापारी व बाजारू विचारसरणीच्या नव्या पिढ्या निर्माण होत आहेत. प्रचंड पैसा देऊन शिक्षण खरेदी करणारे ग्राहक प्रवृत्तीचे विद्यार्थी आज निर्माण होत आहेत. देणगीवर आधारीत आपली शिक्षणपध्दती निर्माण होत असल्यामुळे भ्रष्टाचार, राष्ट्रद्रोह व विध्वंसक अशा प्रकारची

तेलबिया, कापूस व ऊस यासारख्या नगदी पिकांच्या सुधारित व संकरित जातींची लागवड करणे, या लागवडीसाठी आवश्यक नत्र, स्फुरद व पालाश या प्रमुख अन्नद्रव्यांच्या शेतजमिनीतील संचयनासाठी जोडखते व रासायनिक खतांच्या आवश्यक तेवढ्याच मात्रा विशिष्ट शास्त्रीय पध्दतीने शेतजमिनीत पुरविणे, सुधारित पीकजातींच्या वाणांवरील रोग व किडींचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी परिणामकारक औषधींची फवारणी करणे, सुधारित शेती अवजारांचा वापर करणे, ओलिताखालील क्षेत्र वाढविणे. तसेच नियंत्रित बाजारपेठांची संस्थापना करून शेतमालाच्या विक्रयी शेषाची विपणन व्यवस्था करणे इ. बाबी आधुनिक शेती व शेतीच्या हरितक्रांतीची वाटचाल या व्यवस्थेशी निगडीत होत्या. विषयाधीन शेती संसाधनांचा वापर करून परिणामकारक शेती व्यवस्थापन झाल्याने, प्रामुख्याने १९६० ते १९९० या तीस वर्षाच्या काळात देश अन्नधान्यदृष्ट्या स्वयंपूर्ण झाला.

तसेच तेलबिया, कापूस, ऊस, इ. नगदी पिकांच्या उत्पादनात व या नगदी पिकांचा विक्रयीशेष शतप्रतिशत असल्याने या नगदी पिकांपासून मिळणारे महसुली उत्पन्नही लक्षणीय वाढले, हे सत्य नाकारणे व आजच्या कृषितंत्राच्या बदलत्या स्थितीत प्रामुख्याने १९९० पर्यंत कार्यरत त्या आधुनिक कृषी तंत्रज्ञानाला रासायनिक शेती हे चुकीचे संबोधन लावून, सदरील कृषितंत्रज्ञान निरूपयोगी ठरले असे म्हणणे, म्हणजे गरज सरो वैद्य मरो असे म्हणण्यासारखे आहे.

१९६० ते १९९० या काळातील आधुनिक शेती तंत्रज्ञानाने समग्र कृषी उत्पादनात आवश्यक विक्रम प्रस्थापित केल्यानंतर, शेती तंत्रज्ञानाचे आधुनिकीकरण जैविक तंत्रज्ञानाच्या आधारे सुरू झाले. तसेच सेंद्रीय शेतीचा सलग विचार सुरू झाला. तथापि आधुनिक शेती संकल्पना, तिच्या उत्पादनाला चालना देणाऱ्या गुणवैशिष्ट्यांमुळे कायम राहिली. या प्रगत कृषी तंत्रज्ञानाचे फलस्वरूप प्रत्यक्ष अनुभवास आले. १९९९-२००० मध्ये २०८.८७ दशलक्ष टन एवढे अन्नधान्याचे विक्रमी उत्पादन झाले. उत्पादनातील हे सातत्य किंचित कमी फरकाने २०००-२००१ मध्येही कायम राहिले. कारण याही वर्षात अन्नधान्याचे उत्पादन १९६.१३ दशलक्ष टन प्राप्त झाले. इतर कृषी उत्पादनातही अपेक्षित पातळीपर्यंत मजल गाठली गेली. यशापयशाच्या संदर्भात आधुनिक कृषितंत्रज्ञान प्रारूपाचे गरजाधिष्ठित मूल्यमापन केले, तर ते संख्यात्मकदृष्ट्या उपकारकच सिध्द झाले. तथापि, या तंत्रज्ञानातील अंतर्भूत रासायनिक खते व कीटकनाशके यांचा असंतुलित, तसेच अनावश्यक वापर झाल्याने, शेतजमिनीची आंतरबाह्य भूपृष्ठीय रचना सुपिकतेच्या संदर्भात बाधित झाली. एवढेच नव्हे, तर शेतीला उपकारक असे नैसर्गिक पर्यावरण प्रदूषित झाले. त्यामुळे समग्र आधुनिक कृषितंत्रज्ञान त्याला रासायनिक तंत्रज्ञान असे चुकीचे हिणवून, ते टाकाऊ असल्याची अप्रस्तुत ओरड सुरू झाली. वास्तविक रासायनिक मूलद्रव्ये व औषधी स्वरूपातील रसायने बेसुमार वापरावी, अशी शिफारस आधुनिक कृषितंत्रज्ञानाने कधीही केली नाही, हे प्रकर्षाने लक्षात घेतले पाहिजे. अंमलबजावणीची सुयोग्य पध्दत विसरल्याने 'अती तिथे माती' होणारच. तथापि ही बाब लक्षात न घेता, आधुनिक कृषितंत्रज्ञानाऐवजी नैसर्गिकशेती, सेंद्रियशेती अशा शेती पध्दतीचा अवलंब करण्याचा एकांगी विचार आज सुरू आहे. तो भौगोलिक खंडप्राय व जैविक विविधता असलेल्या या देशात संख्यात्मक व गुणात्मक दृष्ट्या लाभकारक ठरू शकेल काय? या बाबींचा सर्वकष विचार झाला पाहिजे.

विज्ञानात एकाच उद्दिष्टासाठी विविध चिकित्सापध्दती सांगितल्या आहेत, उदा. मानव आरोग्यशास्त्रात ॲलोपॅथी, आयुर्वेदिक, होमिओपॅथिक, युनानी इ. परंतु एक कोणतीही चिकित्सापध्दती दुसऱ्या चिकित्सा पध्दतीचा शतप्रतिशत पर्याय असल्याचे सिध्द झाले नाही. त्यामुळे कोणत्याही चिकित्सा पध्दतीची निवड ही गुणदोषांच्या अनुभवसिध्दतेच्या आधारे करावी लागते, व हीच सुज्ञपणाची कसोटी असते. शेती व्यवसायही या विश्लेषणाला अपवाद ठरू शकत नाही. म्हणून नैसर्गिक शेती, सेंद्रीय शेती व २१ व्या शतकातील अत्याधुनिक शेती यांच्यातील निवड प्रक्रियेची अप्रस्तुत स्पर्धा होऊ नये, म्हणून कृषी व्यवसायात आता 'भरणपोषण सापेक्ष शेती' तंत्रज्ञान अंमलात आणण्यावर कृषी वैज्ञानिक व कृषी चिकित्सक यांच्यात एकमत आहे; ही सर्वात आनंदाची बाब आहे. कारण भरणपोषण शेतीत संख्यात्मक व गुणात्मकतेचा अत्युत्तम समन्वय आहे. सस्टेन्सस या इंग्रजी नावाचे भरणपोषण हे सुसंगत मराठी नामाविधान सक्षम अस्तित्वाचे सूचक आहे. कारण सस्टेनेबल हा शब्द sustienere या लॅटीन शब्दापासून आला असून, या शब्दाचा अर्थ अस्तित्व टिकवायचे, तर ते दीर्घायुषी व सुदृढ असणे ओघानेच येते.

अस्तित्व ही संकल्पना वास्तवात सापेक्ष बाब असल्याने, ती सर्व जैविक अस्तित्व गृहीत धरते, म्हणून 'जीवश्च जीवनम्' ही धारणा आहे. अधिक विस्ताराने स्पष्ट करावयाचे, तर पूर्ण नैसर्गिक जीवन, ज्यामध्ये वनस्पती जीवन आणि प्राणिजीवन यांचे रक्षण करून, मानव जीवन आरोग्यदृष्ट्या सुरक्षित राखावयाचे आहे. मानवी जीवनाची ही सुरक्षितता त्याला आवश्यक असणाऱ्या ऊर्जेतून प्रदान करावयाची आहे, ज्याकरिता त्याला आता संतुलित आहाराची म्हणजे भरणपोषणसापेक्ष आहाराची गरज आहे. ही गरज भागविणारे कृषी तंत्रज्ञान अनुसरणे याला आता पर्याय नाही. या गरजेच्या पूर्तीसाठी कृषी तंत्रज्ञानाच्या नैसर्गिक शेती, सेंद्रीय शेती व जैवतंत्रज्ञानप्रधान अत्याधुनिक शेतीतील प्रायोगिक सिध्दतेच्या आधारे महत्तम लाभकारी ठरलेल्या बाबींचे एकप्रकारे अनुसर्जन करून, विकसित प्रारूप तयार करणे की, ज्यामध्ये रासायनिक खते केवळ उत्तेजक तर जैविक खते केवळ शत्रुसंहारक म्हणून कार्यरत असतील. हीच आजची शेती तंत्रज्ञानाची दिशा राहील. या दिशेनेच भारतीय शेती उत्पादनाचा वार्षिक दर सध्या प्रस्तावित ४ टक्के व पुढे ६ टक्क्यापर्यंत वाढविता येईल. परिणामी शेती आधारित भारतीय अर्थव्यवस्थेला या दशकाअखेर प्रस्तावित ९.४ टक्के विकासदर गाठण्यात मदत होईल.

प्रा. सुधाकर देशपांडे

द्व्यातील आम्लिक अंशाचे पऱ्हाटीच्या बोंडावर होणाऱ्या अनुकूल परिणामांचे दायित्व दर्शविण्यासाठीच आहे. मित्रकिडींच्या योजकतापूर्वक संगोपनातून वेळोवेळी उपद्रवी ठरणाऱ्या विशिष्ट पिकांवरील शत्रू किडींचा नाश करून कीडनाशक फवारणीपासून निश्चित मुक्ती मिळविता येते. नत्र, स्फुरद व पालाश तथा सूक्ष्म अन्नद्रव्यांचा वापर अत्यंत संतुलित व समयाधिष्ठित असा शेतजमिनीचे माती परीक्षण करून आणि वाढत्या पिकांची सूक्ष्म द्रव्यात्मक गरज शास्त्रीय पध्दतीने निरीक्षण करूनच शास्त्रीय निकषांप्रमाणेच करावा, तसेच विविध पिकांचे वाण निवडताना सतर्क असावे इ. बाबींचे प्रशिक्षणार्थी शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधून अनुभव कथन केले. या समारोपीय कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून जाणीवपूर्वक उपस्थित राहिलेले महाराष्ट्र विपणन महासंघाचे अध्यक्ष व इफकोचे संचालक, मा.श्री.रमेशबाबू हिंगणकर यांनी शेतकऱ्यांच्या हितार्थ वेळोवेळी आयोजित करावयाच्या शिक्षण-प्रशिक्षणादी उपक्रमांना यथोचित साह्य करण्याचे मान्य केले, तसेच इफकोचे राज्यस्तरीय व्यवस्थापकीय संचालक मा.डॉ.वानखडे यांना श्री शिवाजी कृषी महाविद्यालय, अमरावती येथे डॉ.पंजाबराव देशमुख कृषक प्रशिक्षण केंद्र सभागृहात शेतकऱ्यांसाठी दरवर्षी मान्सूनपूर्व परिसंवाद आयोजित करण्याची उपयुक्त सूचना केली. म्हणूनच या लेखाचा समाचार घेताना हे विशद करावेसे वाटते की, भारतीय कृषिधर्माच्या जुन्या निर्णायक वाटांना नवी निर्णायक वळणे देण्याची गरज आता प्रकर्षाने निर्माण झाली आहे.

आता भरणपोषणाची शेती

कृषी आधारित भारतीय अर्थव्यवस्थेची शेतीपासून भौतिक उत्पादन व त्याद्वारे प्राप्त होणारे निव्वळ महसुली उत्पन्न या संबंधातील आजची स्थिती व या स्थितीला आरंभबिंदू समजून, पुढील दशकात भारतीय शेतीपासून निरनिराळ्या पिकांद्वारा प्राप्त करावयाचे महसुली उत्पन्न यांची दिशा कशी असावी ?, हा आता कृषी वैज्ञानिक, शेतकरी व शासन यांच्या चिंतनाचा विषय झाला आहे. आज देशातील १०२ कोटी जनसंख्येसाठी आवश्यक अन्नधान्याची भौतिक उपज करण्याचे लक्ष्य हरितक्रांतीच्या वेगवान वाटचालीने आपण गाठू शकलो. हरितक्रांती बरोबरच श्वेतक्रांतीद्वारे दूध उत्पादन, पिवळ्या क्रांतीद्वारे तेलबियांचे उत्पादन महत्तम करण्यातही लक्षणीय प्रगती झाली आहे. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे, तर भारतीय शेतीने अन्नधान्य, तेलबिया, फळे व भाजीपाला या कृषी उत्पादनात संख्यात्मक प्रगती केली असून, या सर्व शेतमालांची आता गुणात्मक उत्पादन करण्याच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी शेती नियोजनाची नवी धारणा प्रस्थापित होऊ लागली आहे. तात्पर्य प्रचलित दशक, या ठिकाणी गृहीत असल्याने, २०१० पर्यंत उपभोग्य व उत्पादक शेतमालाची या दशकातील अपेक्षित लोकसंख्या आधारभूत मानून उपज करणे व उपजेला गुणात्मक दर्जा प्रदान करणे असे दुहेरी आव्हान भारतीय कृषी व्यवसायाला आता पेलावयाचे आहे. या आव्हानाची प्रतिपूर्ती करण्यासाठी कोणते विकसित कृषी तंत्रज्ञान यथार्थ, उपकारक व महत्तम लाभाचे ठरले, त्याची निवड विविध कसोट्यांच्या निष्कर्षावर निर्भर राहील; हे सत्य कोणताही एकांगी विचार न करता स्वीकारले पाहिजे. म्हणून एकविसाव्या शतकातील आरंभीच्या या दशकात भारतीय कृषी व्यवसायात कालनिहाय अपेक्षित लक्ष्यपूर्तीच्या दिशेने वाटचाल करताना, ज्या कृषी तंत्रज्ञानाचा स्थूलमानाने सार्वत्रिक वापर करावयाचा आहे, ती निवड, निव्वळ तार्किक आधारावर करता येणार नाही. तसेच वापरात असलेल्या विवक्षित कृषितंत्रज्ञानाचे अपवादात्मक यशदेखील भविष्यकालीन कृषितंत्रज्ञानाचा सवंग आधार मानता येणार नाही. म्हणून या दशकातील कृषी तंत्रज्ञानाची दिशा भूतकालीन कृषी तंत्रज्ञानाचा व त्यात काळानुरूप झालेल्या बदलांचा मागोवा घेऊन निश्चित करावी लागेल, कारण इतिहास मग कोणत्याही क्षेत्राचा व स्थितीचा असो, संबंधित बाबीची प्रेरकशक्ती असतो. या पार्श्वभूमीवर गेल्या ५० वर्षातील कृषितंत्रज्ञानाचा मागोवा घेतला असता, भारतीय शेतीला भयानक अग्निदिव्यातून वाटचाल करावी लागली. १९४७ मध्ये देश स्वतंत्र झाल्यानंतर तत्कालीन ४३ कोटी जनतेलाही आवश्यक ते अन्नधान्य निर्माण करण्याची भारतीय शेतीची उत्पादक स्थिती नव्हती. देशाचे लागवडीयोग्य भौगोलिक क्षेत्र आजच्यापेक्षा कमी नव्हते. मग कृषी उत्पादकतेला वर्धिष्णू दिशा का नव्हती ? यामागील कारणमिमांसा असे दर्शविते की, भारतीय शेती व्यवसाय क्रमशः कालबाह्य ठरत गेलेल्या पारंपरिक शेतीतंत्राच्या सापळ्यात बंदिस्त झाला असल्याने, या क्षेत्रात आर्थिक, सामाजिक व कृषी संशोधनात्मक अनुशेष निर्माण झाला होता. अव्यवस्थेच्या चक्रव्यूहातून कृषिव्यवसाय मुक्त करणे व भारतीय जनतेच्या गरजापूर्तीच्या दिशेने त्याचे पुनरुज्जीवन करणे, याकरिता शासन व कृषी वैज्ञानिक तथा कृषी क्षेत्राशी संबंधितांनी कृषी नियोजनाची जी दिशा निश्चित केली, ती खालील हेतूंशी निगडीत होती.

१. भुकेल्यांसाठी अन्न
२. अधिक धान्य पिकवा मोहीम
३. स्वयंपूर्णत्वाकडे वाटचाल
४. असंख्यांसाठी अन्न

या चार हेतूंपैकी असंख्यांसाठी अन्न या योजनेचे, जिला लक्षभोजनाची योजना असेही नामकरण होते, तिचे खुद्द डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख केंद्रीय कृषिमंत्री या नात्याने आद्यप्रवर्तक होते, तर भुकेल्यांना अन्न ही वैराग्यमूर्ती संत गाडगेबाबांची आंतरिक तळमळ होती. हे दोन्ही संदर्भ या लेखप्रपंचाला बौध्दिक बळ प्राप्त व्हावे म्हणून नमूद केले नसून, संबंधित कालखंडात अन्नाचे जे भीषण दुर्भिक्ष होते, त्याची वास्तविकता ध्यानी घेण्याच्या प्रामाणिक हेतूपोटी विशद केले आहेत. तात्पर्य भुकेवर विजय ही स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय कृषी व्यवसायातील प्राथम्य क्रमाची संकल्पना होती.

सदरील संकल्पना प्रत्यक्षात उतरविण्यासाठी आधुनिक शेती या संकल्पसिध्दीसाठी उपयुक्त कृषी नियोजन सर्व पातळ्यांवरून करण्यात आले. कारण कृषी नियोजन हे कृषीच्या सर्व व्याधींवरील सर्वौषधी होय, हे निःसंदिग्ध मानण्यात येते. तेव्हा आधुनिक शेतीच्या या नियोजनात अधिकाधिक लागवडीयोग्य कृषिक्षेत्र लागवडीखाली आणणे, जमिनीची धूप थांबविण्यासाठी मृदसंरक्षण करणे, कडधान्ये,

व चंद्रपूर हे भात उत्पादक जिल्हे वगळून इतर सर्व जिल्ह्यातील निवडक प्रगतिशील शेतकरी या एक प्रकारे नवी प्रेरणा देणाऱ्या अभियानात सामील झाले होते. शतप्रतिशत फक्त भारतीय शेतकऱ्यांच्या भागभांडवलावर आज कार्यरत असलेली व १९६७ मध्ये संस्थापित झालेली, इफको ही एकमात्र रासायनिक खत कंपनी म्हणता येईल, असे तिचे सकृत स्वरूप आहे. त्यामुळे स्वाभाविकच तिच्या सकृताची दिशाही शेतकऱ्यांना केंद्रीकृत करूनच प्राधान्याने ठरत असावी, याचा अदमास या कार्यशाळेच्या निमित्ताने आला. कारण या कार्यशाळेच्या उद्‌घाटनापासून तिच्या समारोपापर्यंत शेतकऱ्यांच्या भाषेत व सर्वार्थाने त्यांच्या समस्यांचा वेध घेऊ शकतील, अशाच मंडळींचा सहयोग होता. कुठलाही हायफाय धर्तीचा गाजावाजा नसलेला व शेतकऱ्यांना बोलते करणारा हा कार्यक्रम होता.

११ जानेवारी, २००५ रोजी प्रत्यक्ष मातीशी ज्यांची जन्मजात नाळ जुळली आहे, ते श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष, मा. प्रा. आबासाहेब बुरघाटे यांच्या अध्यक्षतेखाली व संस्था कार्यकारिणीचे सदस्य, मा.श्री. सुमंतराव देशमुख यांच्या उद्‌घाटनपर भाषणाने या कार्यशाळेचा आरंभ झाला. शेतकरी म्हणून प्रत्यक्ष स्वानुभवातून अलीकडच्या काळात अस्मानी व सुलतानी संकटाने एकेकाळी गांजलेला शेतकरी आज सततच्या गांजवणुकीने कसा त्रस्त झाला आहे, ही बाब त्यांनी शेती या व्यवसायासंबंधी अंतर्मुख होऊन स्पष्ट केली. त्यानंतरच्या पुढील तीन दिवसात, इफकोचे महाराष्ट्राचे प्रादेशिक प्रबंधक, श्री काझी व वैदर्भीय क्षेत्रीय प्रबंधक, श्री.नायब यांनी शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर मार्गदर्शनपर विविध क्षेत्रातील अभ्यासकांद्वारा उद्‌बोधन वर्गाचे आयोजन योजनापूर्वक केले. या वर्गात भारतीय शेती व खुली अर्थव्यवस्था, कृषी तंत्रज्ञान जागृती अभियान, कमी खर्चाचे सोयाबीन तंत्रज्ञान, रासायनिक खतांचा फायदेशीर वापर, शाश्वत शेतीतंत्रज्ञान, हरितगृहातील फुलांची लागवड, इ. विषयांवर उद्‌बोधन झाले. याशिवाय श्री शिवाजी कृषी महाविद्यालय, कृषिप्रक्षेत्र तथा डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, प्रादेशिक संशोधन केंद्र प्रक्षेत्र, अमरावती येथील पिके व त्यांची शास्त्रीय लागवड आणि काही प्रगतिशील शेतकऱ्यांच्या शेतीवरील पांढऱ्या मुसळीसारख्या पिकांचे निरीक्षण इ. साठी प्रशिक्षणार्थी शेतकऱ्यांच्या भेटीचेही आयोजन करण्यात आले.

सर्वसाधारणपणे शेतकरी शिक्षण-प्रशिक्षणादी उपक्रमात वरील प्रकारच्या कृती कार्यक्रमाचे नियोजनात्मक आयोजन होणे यात तसे नाविन्य नाही. तथापि, स्वखर्चाने एखादी स्वायत्त यंत्रणा अशा लोकोपयोगी उपक्रमाचे आयोजन करते, तेव्हा विशेष करून, स्वतःच्या उत्पादनांची जाहिरात करून ग्राहकी वाढविण्याचा प्रयत्न करीत असते आणि असा प्रयत्न करणे ही कोणत्याही व्यावसायिक प्रतिष्ठानाची विक्रय व्यवस्थेची रीतच आहे. या व्यावसायिक विक्रयवृध्दी पध्दतीचा विचार केला, तर इफकोद्वारा आयोजित विषयाधीन कार्यशाळेत इफको निर्मित विविध रासायनिक खतांची जाहिरातबाजी, संबंधितांना वेगवेगळी दृक्‌श्राव्य साधने वापरून व तिखटमीठ लावून सात हात लाकूड पण नऊ हात झिलपी ही तऱ्हा वापरून करता आली असती. परंतु इफकोद्वारा आयोजित या कार्यशाळेत इफको निर्माण करीत असलेल्या व विविध मात्रा धारण करीत असलेल्या नत्र, स्फुरद व पालाशयुक्त रासायनिक खतांची माहिती व शेतकऱ्यांचे इफको व्यवस्थापनाद्वारे राबविले जाणारे प्रकल्प व उपक्रम यांची माहिती तेवढी देण्यात आली. इफकोचीच रासायनिक खते वापरा, हीच रासायनिक खते गुणधर्माच्या तौलनिक पार्श्वभूमीवर इतर तत्सम औद्योगिक प्रतिष्ठानांमार्फत निर्मित रासायनिक खतापेक्षा सर्वोत्तम आहेत, तसेच जैविक व जोरखतांना इफकोचीच खते पर्यायी आहेत. इ.बाबींचे, कटाक्षाने म्हटले तरी चालेल; अजिबात उदबोधन नव्हते, तर सेंद्रीय शेतीच्या आजच्या वाढत्या शेती प्रकाराच्या काळात केवळ गरजेपोटी युक्त रासायनिक खतांचा समयप्रधान, केवळ नियंत्रित व संतुलित वापर कृषी उत्पादनांची मूल्यवर्धितता बाधित न करता वृध्दी घडवून आणण्यासाठी कसा श्रेयस्कर ठरू शकतो! याचे पूर्वग्रहदूषित न होता, यथार्थ शोधन झाले पाहिजे, या बाबींवर या कार्यशाळेत सकारात्मक जोर देण्यात आला, व त्याचे स्वाभाविक पुष्टीकरण दि. १४ जानेवारी, २००५ रोजी, या कार्यशाळेचा खुलामंच स्वरूप, जो समारोप झाला त्यावेळी झाले. कारण या समारोपीय कार्यक्रमात, भारतात परंपरेने जी ऋषीशेतीची संकल्पना रूढ आहे, ती ऋषीशेती व सद्य:स्थितीत, जी शाश्वत शेती स्वीकाराई मानली गेली आहे, या दोन्ही प्रकारांच्या शेतीच्या यथार्थ समन्वयावर या समारंभात उपस्थित अनुभवींच्या वाणीतून जणू शिक्कामोर्तबच झाले. म्हणून हा एकूण इफकोद्वारा आयोजित शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम कृषिधर्माचा सत्संग वाटला, ज्यात कृषिक्षेत्रात होत असलेल्या नवतंत्रज्ञानाच्या परिवर्तनाच्या दिशेचा मार्ग बऱ्याच अंशी प्राचीन परंपरेच्या ऋषिशेतीद्वारा निर्धारित होतो, हे अनुभवसिध्दतेने सांगितले गेले. तात्पर्य, इफकोने आयोजित केलेल्या या कार्यशाळेत, स्वतःचे उदात्तीकरण न करता, स्वानुभवींच्या कृषिक्षेत्रातील विविध अनुभवांचे कथन प्रशिक्षणार्थी शेतकऱ्यांना ऐकवून, त्यांनी विभागनिहाय योग्य, सिध्द झालेल्या पीक पध्दतीच्या नियोजनात काही खास दक्षता घेण्याचा बहुमोल सल्ला दिला, ही या कार्यशाळेची खरी उपलब्धी होय. या उपलब्धीची धारणा आमच्या वाचकांना ज्ञात व्हावी म्हणून हा लेख प्रपंच साधला.

वर उल्लेखित ऋषी व शाश्वत शेतीच्या संयुक्त समन्वयाची अप्रत्यक्ष भूमिका विशद करताना, विषयाधीन कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी अकोट तालुक्यातील राज्य कृषिनिष्ठ पुरस्कार प्राप्त प्रगतीशील शेतकरी, श्री.केशवराव मेतकर यांनी भारतातील भूमिपूजन ही पवित्र संकल्पना, शेत जमिनीला भूमाता संबोधण्याच्या भारतीय ऋषीधारणेचे बळकटीकरण करते, विविध धार्मिक विधींचे वेळी कलशाचे प्रस्तुतीकरण, कृषिक्षेत्रातील पाण्याच्या आवश्यकतेचे सूचक होय, भर उन्हाळ्यात आम्रवृक्षाखाली जाणवणारा गारवा हवेतील सुक्ष्म जीवाणू आम्रवृक्षांच्या पर्णात आर्द्रता निर्माण करीत असल्याने जाणवते, पहिल्या कापूस वेचाईचे वेळी केली जाणारी सीतादही,

सूक्तातील तेराव्या ऋचेत, कवष-ऐलूष ऋषींनी 'शेती व संपत्ती' यांच्या योगदायी स्वरूपावर प्रभारी विवेचन केले आहे. अथर्ववेदातही शेतीविषयक साधन सामुग्रीचे संदर्भ आहेत.

एकंदरीने वेदवाङ्मयात शेतीविषयक, ज्या संकल्पना व संसाधनांचे उल्लेख आहेत, त्यांचा आजही प्रत्यक्षाप्रत्यक्ष वापर होताना दिसतो.

वेदकालीन संकल्पनात, सीता म्हणजे जमीन, लाङ्गल म्हणजे नांगर, सिरा अर्थात सऱ्या, वरत्र अर्थात मोट असे उल्लेख आहेत. बीजपेरणीसाठी नांगराने जमीन भुसभुशीत करणे, त्यात वनस्पती अवशेष मिसळणे, तेजस बी पेरणीसाठी वापरणे, जलसंचय करणे इ. बाबी प्रकर्षाने सांगितल्या आहेत. तात्पर्य, पारंपारिक शेतीचे उगमज्ञान प्राचीन काळापासून भारतात झिरपले, या बाबींची खात्री वेदवाङ्मयात विपुलतेने उद्धृत केलेल्या कृषी संकल्पनांवरून पटते.

तात्पर्य, प्राचीन काळापासून अर्थात परंपरेने शेतीचा वरदानात्मक वारसा भारतवर्षाला प्राप्त असून, ऋषीमुनींच्या वेदवाङ्मयातील वैचारिक वचनांनी भारतीय कृषी व्यवसायाचे प्रक्रियात्मक सिंचन झाले आहे. म्हणून भारतातील प्राचीन शेतील 'ऋषी शेती' हे संबोधन यथार्थ ठरते. या ऋषी शेतीच्या औचित्याचा विसाव्या शतकात देशातील कृषी उत्पादनाच्या संख्यात्मक वाढीला चालना देण्याच्या मानसिकतेपोटी संकोच झाला होता, हे नाकबूल करता येणार नाही. मूलभूत आवश्यकता म्हणून, आपण यशस्वी केलेल्या हरितक्रांतिपर्वात रासायनिक संसाधनांच्या अतिरंजित वापरामुळे नैसर्गिक संसाधनाच्या वापराकडे एक प्रकारे, किंबहुना मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष झाले. परिणामी कृषिउपजेच्या गुणात्मक निर्मितीचा संकोच झाला आणि आता ज्यावेळी जागतिकीकरण व खुली अर्थव्यवस्था यांना भारताने अधिस्वीकृती देऊन भागीदारी अनुग्रहित केली, तेव्हा सेंद्रिय शेतीची धारण शक्ती अंगभूत असणाऱ्या कृषी गुणात्मक ऋषिशेतीचे सातत्य कायम करण्याला पर्याय राहिलेला नाही.

ऋषी शेती बरोबरच भारतातील कृषी व उद्यानवर्गीय पिकोत्पादनाचा वार्षिक वाढदर ३.५ ते ४ टक्केपर्यंत वाढवून, राष्ट्रीय सकल उत्पादन वाढीच्या उद्याच्या १०.४ टक्के दरात सातत्य राखणे, एवढेच नव्हे, तर तो क्रमश: वाढविणे ही एकविसाव्या शतकातील २०२० मधील प्रस्तावित कृषिभारत निर्मितीच्या स्वप्नपूर्तीची पायाभूत गरज आहे. म्हणूनच कृषी क्षेत्रातील महर्षींच्या वैज्ञानिकदृष्टीने आता संबंधित प्रशासन व्यवस्थेकडून मान्यता घेऊन, कृषी नियोजनाची प्रवेगशील दिशा निश्चित केली आहे. या नियोजनांतर्गत आता दुसऱ्या हरितक्रांतीची पूर्तता करण्यास भारत सज्ज होत आहे. या हरितक्रांतीच्या अंमलबजावणीत, ज्याला शाश्वत शेतीचे अनुसरण म्हणता येईल, त्या वाटेने निर्धाराने वाटचाल करावयाची आहे. ही दुसरी हरितक्रांती म्हणजे महर्षी शेतीचे वास्तविक वैज्ञानिक प्रारूप असेल. सबब 'ऋषी शेतीची व महर्षी शेतीची' सांगड घालणे, हाच आजचा भारतीय कृषीचा धर्म झाला आहे. या कृषी धर्माची धारणा फलद्रूप करीत, कृषी क्षेत्रातील संख्यात्मक तथा गुणात्मक अनुरूप उपलब्धी साकार करून, २०२० चा विकसित कृषिभारत निश्चित उदयास येईल ह्यात संदेह नाही.

कृषिधर्माच्या जुन्या वाटावरील नवी वळणे

श्री शिवाजी कृषी, उद्यानविद्या व जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, अमरावती येथे डॉ. पंजाबराव देशमुख कृषक प्रशिक्षण केंद्र संस्थापित झाल्यापासून, या महाविद्यालयाद्वारा तसेच कृषी व संलग्न क्षेत्राशी संबंधित विभाग, जसे कृषिविभाग, महाराष्ट्र शासन, आत्मा, जिल्हा परिषद, ग्रामीण विकास यंत्रणा, अमरावती विभाग आणि कृषिविषयक संसाधने निर्माण करणाऱ्या यंत्रणा तथा प्रसार माध्यमांद्वारा, शेतकऱ्यांसाठी कार्यशाळा, प्रशिक्षण वर्ग, चर्चासत्रे, परिसंवाद इ. चे सतत आयोजन होत आहे. भारतीय शेतकऱ्यांनी नवनवीन उपयुक्त कृषितंत्रज्ञान, जे नियामक कसोटीवर उतरले असेल, ते केवळ सैध्दांतिकच नव्हे, तर प्रायोगिक सिध्दतेच्या पार्श्वभूमीवर खात्री पटवून घेऊन आत्मसात केले पाहिजे. हा डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचा तहह्यात त्यांना हितोपदेश होता. त्यादृष्टीने त्यांनी केंद्र सरकारात कृषिमंत्री असताना उपयुक्त कृषी संशोधन, जे ज्या भौगोलिक विभागात संबंधित शेतकऱ्यांना अधिक फायदेशीर ठरेल, त्यांच्यापर्यंत पोचविण्यासाठी कृषिविस्तार कार्य या माध्यमाला प्रभावी गती दिली. डॉ भाऊसाहेबांच्या या कृषिकार्याला कायम दिशा देण्यासाठी, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीचे अध्यक्ष मा. श्री वसंतराव धोत्रे व त्यांच्या नेतृत्वात कार्यरत कार्यकारिणीने वर उल्लेखित डॉ. पंजाबराव देशमुख कृषक प्रशिक्षण केंद्राची संस्थापना करून, शेतकऱ्यांना प्रगत कृषितंत्रज्ञानाच्या प्रत्यक्ष संपर्कात आणले. परिणामी विविध प्रशासनाखाली कार्यरत संपर्क माध्यमे सदरील कृषक केंद्रातील सुसज्ज सुविधांचा लाभ घेत, शेतकऱ्यांना संबंधित प्रगत कृषितंत्रज्ञान व कृषिविकासाच्या विविध योजनांमध्ये सहभागी करून घेत आहेत.

शेतकऱ्यांचाही या ठिकाणी राबविल्या जाणाऱ्या वैविध्यपूर्ण व उपयुक्त उपक्रमांना वाढता प्रतिसाद मिळतो. या कृषी व संलग्न क्षेत्रातील उपक्रमांमुळे शेतकऱ्यांच्या व्यथा, त्यांचे कृषिविषयक प्रश्न, त्या प्रश्नांच्या अनुषंगाने त्यांचे केले जाणारे शंकानिरसन आणि प्रगत कृषितंत्रज्ञानाची नवी दिशा, व हे तंत्रज्ञान वापरात आणतांना कृषिभौगोलिक दृष्ट्या प्राकृतिक मर्यादा, तसेच भारतीय कृषिधर्माची प्राकृतिक चिकित्सा इ. बाबींसंबंधी उद्बोधन, चिंतन तथा मनन करण्यासाठी सुसंगत व्यवस्था निर्माण झाली आहे. आध्यात्मिक भाषेत सांगायचे, तर हे सर्व उपक्रम म्हणजे कृषिधर्माचा सत्संगच म्हणता येईल. असाच एक आगळ्या-वेगळ्या स्वरूपाचा कृषिधर्म सत्संग, श्री शिवाजी कृषी, उद्यानविद्या व जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, अमरावती येथे दि. ११ ते १४ जानेवारी, २००५ या काळात सोत्साह संपन्न झाला. निमित्त होते, भारतातील अग्रणी अशा इफको (IFFCO) या रासायनिक खत व शेतकऱ्यांसाठी विविध उपयुक्त उपक्रम राबविणाऱ्या कंपनीद्वारा आयोजित, वरील काळातील शेतकरी प्रशिक्षण व भेट कार्यक्रमाचे. विदर्भातील भंडारा, गडचिरोली

भारतीय कृषिधर्म म्हणजे ऋषी शेती व महर्षी शेती

✦ प्रा. सुधाकर देशपांडे

शिक्षणमहर्षि तथा कृषिरत्न डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा १० एप्रिल, २००४ रोजी संपन्न झालेल्या ३९ व्या पुण्यतिथी समारोहात, जागतिक कीर्तीचे भारतीय संगणक तज्ज्ञ, विदर्भाचे सुपुत्र, डॉ. विजयराव भटकर यांचे प्रमुख भाषण झाले. या पुण्यतिथी समारोहानंतर, त्यांच्याच हस्ते डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या मूळ इंग्रजीतील 'The Origin and Development of Religion in Vedic Literature' या प्रबंधाच्या अमरावती विद्यापीठाद्वारा **'वैदिक वाङ्मयात वैदिक धर्माचा उद्गम व विकास'** या शीर्षकाखाली करण्यात आलेल्या मराठी अनुवादीत प्रारूपग्रंथाचे अमरावती विद्यापीठाद्वारे आयोजित कार्यक्रमात विमोचन व्हायचे होते. स्वाभाविकच क्रमशः होणाऱ्या प्रस्तुत दोन्ही कार्यक्रमातील त्यांच्या भाषणांचे स्वरूप भिन्न असणार, हे अभिप्रेतच होते. डॉ. भटकरांनीही सदरील पुण्यतिथी कार्यक्रमात त्यांच्या प्रमुख भाषणाच्या प्रारंभीच, श्रोत्यांना अभिप्रेत असणाऱ्या दोन व्यासपीठांवरून, ते विषयानुरूप वेगवेगळे विचार मांडणार असल्याची जाणीव करून दिली.

या जाणीवेची समग्र जाण ठेवून, डॉ. भटकरांनी डॉ. भाऊसाहेबांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन करून, त्यांच्या विदर्भातील शैक्षणिक क्रांतीवर तसेच त्यांनी स्वतंत्र भारताचे पहिले कृषिमंत्री म्हणून केलेल्या तत्कालीन जागतिक कीर्तीच्या कृषी कार्याचा यथोचित वेध घेत, त्यावर समर्पक भाष्य केले. डॉ. भटकर 'परम' संगणकाचे निर्माते म्हणून जसे तांत्रिक युगधर्मी आहेत; तसेच ते भारतीय वेदवाङ्मयाचे गाढे अभ्यासक असल्याने, आध्यात्मिक अभ्यासक म्हणून ख्यातनाम आहेत. या त्यांच्या दुहेरी अध्ययन व संगणकाच्या प्रायोगिक क्षेत्रातील इष्टापत्तीमुळेच, अध्यात्म आणि विज्ञान यांची सिध्दहस्त सांगड घालताना, त्यांनी काळाची गरज म्हणून १०२ कोटीपेक्षा अधिक जनसंख्या असलेल्या भारत या खंडप्राय देशात, सध्याच्या १०.४ टक्के सकल राष्ट्रीय उत्पन्नदरात सातत्य राखण्यासाठी 'ऋषी शेती' व 'अत्याधुनिक शेती' या विकल्पांना स्पष्ट करताना, त्यांनी भारतीय राष्ट्रीय सकल उत्पादनाचा प्रधान स्त्रोत कृषी हाच असल्याचे स्पष्ट केले.

डॉ. भटकरांनी ज्या 'ऋषी शेतीचा' विग्रह केला, तो शेतीप्रकार म्हणजे भारतीय भूभागाला प्राप्त झालेली देणगी होय. कुठल्याही प्रकारच्या कृषी शिक्षण-प्रशिक्षणाच्या पाठशाळा वा सुविधा उपलब्ध नसताना, स्वत:च्या सद्सद्विवेकबुध्दीने नैसर्गिक उपलब्ध साधनांचा वापर करून,शेतीतून धनधान्याची उपज करण्याची कला मानवाने वैदिक काळापासून आत्मसात केली. कुठल्याही कृत्रिम संसाधनांची उपलब्धता त्यावेळी नव्हती. ऋषीमुनींच्या मार्गदर्शक आशीर्वचनाने सदरील शेतीचे कार्यान्वयन होत असे, म्हणून या शेतीला 'ऋषी शेती' असे संबोधन प्राप्त झाले असे मानण्यास हरकत नसावे. तर आधुनिक वा अत्याधुनिक शेतीची पायाभरणी व प्रागैतिक संरचना ही संबंधित क्षेत्रातील जाणकार समाजसेवक, समाजसुधारक, जनकल्याणकारी प्रशासक, कृषिनियोजक तथा सिध्दहस्त कृषिशास्त्रज्ञ इत्यादींनी केली. विशिष्ट क्षेत्रातील व्यक्तिविशेषांनी केलेल्या अपूर्व योगदानास्तव, जनता जनार्दन अशा तपस्वीस्वरूप महानुभावांना उत्स्फूर्तपणे योगदानसापेक्ष लोकमहर्षी, कृषिमहर्षी अशा उपाख्यांनी गौरवितात. यादृष्टीने विचार करता, कृषी क्षेत्रात भारतातील अनुभवसिध्द व वैज्ञानिक उपलब्धीच्या आधारे, ज्या महामानवांनी कृषिक्रांतीचे बीजारोपण केले, ते सर्व आम्हाला कृषिक्षेत्रातील महर्षी वाटतात, असा डॉ. भटकरांचा निखळ युक्तिवाद होता. सबब डॉ. भटकरांनी भारतीय कृषीच्या उन्नयनासाठी, येत्या काळात 'ऋषीशेती व अत्याधुनिक शेतीची' सांगड घालण्यासंबंधात जे प्रबोधन केले, त्याचा सुचारु अर्थ 'ऋषी शेती व महर्षी शेती' यांचाच समन्वय होय, असे प्रांजळ अभिमत व्हावे! भारतीय कृषी क्षेत्रात 'ऋषी व महर्षी शेतीचा मेळ' घालण्यासाठी जी योजकता अभिप्रेत आहे, त्यासंबंधी पुढील अल्पस्वल्प विवेचन आहे.

ज्या ऋषी शेतीचा विग्रह डॉ. भटकरांनी केला आहे, ती संकल्पना नवाश्मयुगकालीन म्हणजे, इ.स.पूर्व २५०० ते १००० या काळातील आहे. वास्तवात वैदिक संस्कृतीचा कालखंड हा उपलब्ध वैदिक संदर्भाच्या आधारे इ.स.पूर्व १५०० ते १००० असा आहे. म्हणजेच नवाश्मयुग व वैदिक संस्कृतीचा कालखंड यांचा सरासरी अंदाजानुसार व संशोधनात्मक संकेतावरून संगम झालेला दिसतो. वैदिक वाङमयात मानवाच्या भौतिक अभ्युदयाचे विपुल संदर्भ आढळतात. तसेच हा भौतिक अभ्युदय कृषिकेंद्रित होता, असेही संदर्भ मिळतात. पंचमहाभुते व प्रकर्षाने 'वीज-वायू-भूमी-जल-आकाश' या आदिदैविक शक्ती मानव कल्याणार्थ कार्यरत असतात. परिणामी या शक्तीच्या उपकारक कृतीशीलतेनेच मानवी जीवन सुसह्य होऊ शकते. स्वाभाविकच या सर्व शक्ती कृषिउपजेचे प्रेरक स्त्रोत असल्याने, या स्त्रोतांचा महत्तम वापर करण्याचे तंत्र शेती व्यवसायात गुंतलेल्या समुदायाने स्वयंप्रेरणेने आत्मसात केले पाहिजे, अशी मार्गदर्शक वचने वेदवाङ्मयात अंतर्भूत आहेत. प्रामुख्याने ऋग्वेदातील चौथ्या मंडलातील सत्तावन्नावे सूक्त, तसेच दहाव्या मंडलातील चौतिसाव्या

माहितीचा अधिकार-गरज, स्वरूप, व्याप्ती व उपयुक्तता

अभि. श्रीकृष्ण लांडे

पार्श्वभूमी :-

नव्या युगात माहिती म्हणजे सामर्थ्य nformation is power) ही मार्शल मॅकलुहान यांची उक्ती आहे. माहितीला आधुनिक जगात महत्वाचे स्थान आहे. ज्याचे जवळ माहिती तोच सर्वजगावर आपले नियंत्रण ठेवू शकतो. ह्या संगणकीय माहिती युगात माहिती हे एक महत्त्वाचे अस्त्र आहे. आपल्याला स्वातंत्र्य मिळून ५८ वर्ष झाली. साक्षरतेचा प्रसार वाढविण्यासाठी शासनाने विविध योजना राबविल्या. प्रसार माध्यमे, दृक -श्राव्य माध्यमे व इतर प्रबोधन होऊनही सामान्य माणूस आवश्यक त्या कार्यालयीन माहितीपासून सतत वंचित ठेवला गेला. लोकशाही प्रशासन व्यवस्थेत प्रशासन लोकाभिमुख करण्यासाठी अनेक कायदे केले. सेवाशर्तीत कर्मचाऱ्यांची सचोटी, कार्यतत्परता विविध पारितोषिके जाहीर करूनही प्रशासनातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची लालफितीची मानसिकता वाढतच गेली. कार्यालयीन काम करून आणणे म्हणजे जनसामान्यांना एक संकटच वाटते, परंतु कार्यालयीन गोपनीयतेचा आधार घेऊन लोकांना माहिती दिली जात नव्हती. काही दक्ष संघटनांनी माहितीच्या अधिकाराच्या मागणीचा पाठपुरवा करून तो संमत करून घेतला. महाराष्ट्रासारख्या पुरोगामी शासनाने माहितीचा कायदा हा २००२ मध्ये संमत केला व त्याची प्रभावी अंमलबजावणी केली. त्यानंतर देशभरातील संघटनांच्या मागणीनुसार भारतीय घटनेला अभिप्रेत असलेला "माहितीचा अधिकार कायदा २००५ हा केंद्रसरकारने १२ ऑक्टोबर २००५" पासून देशभरात लागू केला आहे.

गरज :-

शासकीय, निमशासकीय व अनुदानित व्यवस्थापनातील माहितीची वेळोवेळी लोकांना गरज पडते, परंतु अर्ज, विनंत्या व घालून ही माहिती वेळेवर मिळणे दुरापास्त होते. कधी कार्यालयाची गोपनीयता, तर काही चिरीमिरीची मानसिकता ह्यामुळे सामान्य माणूस माहितीपासून वंचित राहत होता. प्रशासनाच्या विविध विभागातील माहिती, राबवित असलेल्या योजना, लाभार्थी, खर्च, निवड प्रक्रिया इत्यादी माहिती दिल्याने योजना व प्रशासनाची पारदर्शकता दिसते. प्रशासन लोकाभिमुख असल्याचा जनतेला विश्वास होणे गरजेचे आहे. माहितीच्या ह्या युगात प्रत्येकाला प्रशासनातील कार्यभाराच्या पद्धतीची माहिती मिळणे आवश्यक आहे. माहितीच्या आधिकाराद्वारे माहिती मागितल्यानंतर प्रशासनातील अधिकाऱ्यांना मागील तारखेत नोंदी करणे, आपले दोष लपविण्यासाठी खोडाखोड करणे, भ्रष्टाचार करणे इत्यादी प्रकाराला ह्यामुळे आळा बसेल. माहितीकरिता अर्ज करूनही वर्षोगणती माहिती पुरविली जात नव्हती. त्यामुळे विहित मुदतीत देणे, आवश्यक ती देणे, उपलब्ध नसल्यास इतर कार्यालयातून उपलब्ध करून देणे, दिरंगाई करणाऱ्यांची कानउघाडणी, पत्र, इत्यादी जुजबी कार्यवाही न करता व्यक्तीगत दंडाच्या कार्यवाहीची आवश्यकता होती. तसेच वरिष्ठाकडे दाद मागण्याचा कायदेशीर अधिकार आवश्यक होता. एकूण एक आवश्यक माहिती वेळेवर मिळणे, दप्तरदिरंगाईला, भ्रष्टाचाराला आळा व प्रशासकीय लोकाभिमुखता त्याकरिता माहितीचा अधिकार, जो भारतीय घटनेला अभिप्रेत आहे, लोकांना असणे गरजेचे होते.

व्याप्ती :- हा कायदा महाराष्ट्रासह देशातील केंद्रशासकीय, राज्य शासकीय, निमशासकीय, जि. प., महापालिका, नगरपालिका, शासन अनूदानित संस्था इत्यादींना लागू आहे. खाजगी शाळा, ग्रंथालये, खाजगी वसतिगृहे, ज्यांना शासकीय अनुदान किंवा भरीव मदत मिळते अशी व्यवस्थापने ह्या कायद्याअंतर्गत येतात. सामान्य जनतेच्या कररूपी पैशातून ही अनुदाने दिली जातात. खऱ्या अर्थाने ह्या संस्थेचे विश्वस्त कर्मचारी अधिकारी हे सामान्य जनतेचे सेवक आहेत. परंतु परिस्थिती अगदी उलटी आहे. ह्याकरिता माहितीच्या अधिकाराची व्याप्ती मोठी आहे. संगणकासारखे प्रभावी संपर्क माध्यम असतांना माहिती तात्काळ देणे काही कठीण नाही. माहिती पुरविण्याची इच्छाशक्ती, मानसिकता, लोकाभिमुखता महत्त्वाची आहे. प्रसार माध्यमांनी ह्या कायद्याचा जास्तीत जास्त प्रचार आणि प्रसार करणे गरजेचे आहे.

कार्यपद्धती :- माहितीच्या अधिकाराचा वापर कसा करावा ? हा सर्वच नागरिकांसमोर महत्त्वाचा प्रश्न आहे. माहितीच्या अधिकाराकरिता करावयाच्या अर्जाचा नमुना विहित केला आहे. तसेच माहिती अधिकाऱ्याने माहिती नाकारली तर वरिष्ठांकडे अपिल करण्याचा अर्जाचा नमुना वेगळा दिला आहे. माहितीची काय गरज आहे असे विचारण्याचा अधिकार संबंधित अधिकाऱ्याला नाही. त्यांनी फक्त अर्जदाराचा पूर्ण पत्ता जाणून घ्यायचा आहे. अर्ज स्वीकारून त्याने पांच दिवसात संबंधितांकडे तो पाठवून आवश्यक ती माहिती मागणाऱ्यास कळविणे बंधनकारक आहे. अर्ज सादर करून आवश्यक त्या शुल्काचा भरणा केल्यापासून तीस दिवसाच्या मुदतीत माहिती देणे त्या अधिकाऱ्यांना बंधनकारक आहे.

(उर्वरित पान क्र. १६ वर)

चिकुन गुनिया : विना उपचाराने बरा होणारा आजार

✦ **धोंडीरामसिंह ध. राजपूत**

संपूर्ण महाराष्ट्रात पाय रोवून बसलेला चिकुन गुनिया हा आजार म्हणजे महाभयानक असा रोग, असा समज राज्यातील सर्व लोकांचा झालेला दिसतो. हा आजार महिना दोन महिने बरा होत नाही. हातपाय दुखले तरी चिकुन गुनियाच आहे, सांधेदुखी म्हणजे चिकुन गुनियाच आहे, कोणताही ताप आला तरी चिकुन गुनियाच आहे, असा गैरसमज मोठ्या प्रमाणात समाजात पसरत चाललेला असून जे सक्षम, सुदृढ, निरोगी आहेत तेही या गैरसमजाने चिकुन गुनिया म्हणून आजारी पडत आहेत व अपप्रचार वाढवत आहेत.

आज समाजातील नागरिकांची मानसिकता इतकी खालावलेली आहे की, ते कोणत्याही दुखण्याला व कोणत्याही आजाराला चिकुन गुनिया म्हणू लागलेले आहेत. घरातील एकाला झाला की, तो सर्वांना होतो, हा सुध्दा मोठा गैरसमज समाजात पसरत चालला आहे. चिकुन गुनिया संसर्गजन्य आजार असून त्यावर सलाईन, इंजेक्शन हे प्रभावी औषध आहे, हा फार मोठा गैरसमज या आजाराने पछाडलेल्यांचा आहे. हे सर्व गैरसमज समाजात पसरत असल्यामुळे समाज धास्तावलेला आहे. चिकुन गुनियाने पेशंट मृत्यू पावतात, हातपाय कायमचे अधू बनतात हाही एक गैरसमज समाजात लहानांपासूनमोठ्यांपर्यंत मनात घर करून बसलेला आहे.

वास्तविक चिकुन गुनिया बाबतचे वरील सर्व समज गैरसमजुतीने झालेले आहेत. चिकुन गुनियाचा बागुलबुवा केल्याने हा आजार वाढत आहे. वास्तविक चित्र असे आहे की, चिकुन गुनिया हा औषधांनी बरा होणारा आजार नसून तो नैसर्गिकरीत्या बरा होणारा आजार आहे. सलाईन व इंजेक्शनने तर अजिबात बरा होत नाही, उलट सलाईन, इंजेक्शनने व जास्तीच्या गोळ्या खाल्याने मृत्यू येण्याची दाट शक्यता आहे. यावर इलाज म्हणजे निसर्ग. यापेक्षा दुसरे औषध नाही. मनाचा धीटपणा, प्रचंड आत्मविश्वास, स्वच्छता, पुरेसे व नियमित अन्न, थोडासा आराम हेच या आजारावरचे प्रभावी औषध आहे. चिकुन गुनियासाठी दुसरे औषध नाही. डॉक्टर मंडळी ज्या गोळ्या देतात त्या वेदनाशामक गोळ्या आहेत चिकुन गुनिया बरा होण्यासाठीच्या नाहीत. चिकुन गुनियाची सखोल माहिती मिळविणे व त्याप्रमाणे वागणे व उपचार होणे हेच प्रभावी औषध होय. यावर अद्यापही औषध नाही, लस नाही, उपचार नाही. सलाईन, इंजेक्शन तर मुळीच नाही. प्रथम हा आजार कोणत्या डासाने होतो ते पाहू या.

एडिस इजिप्तीडासांकडून :- डास तीन प्रकारचे असतात. ॲनॉफीलीस, क्युलेक्स व एडीस. यातील एडीस डास चावल्याने हा आजार होतो. हा आजार जास्तीत जास्त ५-६ दिवसच राहतो. ताप येणे, हातापायाचे सांधे दुखणे, अशक्तपणा वाटणे ही लक्षणे म्हणजे चिकुन गुनिया होय. पण ५-६ दिवस आराम केल्यास व तापाच्या गोळ्या व पेन किलर गोळ्या घेतल्या की हा आजार बरा होतो. एडीस हा डास दिवसाच चावतो (रात्री चावत नाही). एडीस हा डास घरातील स्वच्छ पाण्याच्या ठिकाणी वास्तव्य करतो. पिण्याच्या पाण्याचे माठ, रांजण, हौद, पाण्याच्या टाक्या या ठिकाणी हा डास राहतो. एडीस डासाचे आयुष्य फक्त एक महिन्याचे आहे. मात्र हा डास माठ, रांजण, हौद या ठिकाणी २०० ते ३०० अंडी घालतो व या महिन्याभरात हजारो एडीस डास उत्पन्न होतात.

या डासांचे वास्तव्य, घरातील पडद्यांच्या मागे, कपड्याच्या मागे व कोंदट ठिकाणी आहे. हा डास भिंतीवर बसत नाही. या डासांनी घातलेली अंडी वर्षभर जिवंत राहतात. हा डास एकापेक्षा अनेक व्यक्तींना चावतो, त्यामुळे या रोगाचा प्रसार होतो. हा संसर्गजन्य आजार नाही. मलेरियाचा डास एकदाच एका व्यक्तीला चावतो, मात्र एडीस डास दिवसातून कित्येकांना चावतो. हा डास जीप, बस व इतर वाहनांतून गावोगावी जातो व चिकुन गुनिया पसरत जातो.

या डासांना नष्ट करण्यासाठी काय करावे :- या डासांना नष्ट करण्यासाठी सर्वात प्रभावीशाली उपाय म्हणजे दर दोन दिवसांनी कोरडा दिन पाळणे. या कोरडादिनी आपल्या घरातील माठ, रांजण, हौद, पाण्याच्या टाक्या दर दोन दिवसानंतर चांगल्या घासून, स्वच्छ धुवून कोरड्या करणे व पाच सहा तास उन्हात कोरड्या होऊ देणे व नंतर त्यात पाणी भरणे. अशाने त्याठिकाणच्या एडीसच्या अळ्या नष्ट होतील व उत्पत्तीला आळा बसेल.

तसेच घरात स्वच्छता, अंगणात स्वच्छता व परिसरात स्वच्छता पाळणे हा प्रभावी उपाय होय. नारळाच्या कवट्या, केळ्यांची साले, घरातील घाण ही पालिकेच्या कचरा गाडीत

(उर्वरित पान क्र. ११ वर)

५. जागतिक दर्जाचे उद्योगक्षम वातावरण निर्माण करण्याच्या दृष्टीने या क्षेत्रातील उद्योगांमध्ये कामगार कयद्यासंदर्भात शिथिलता दिली जाणार असल्यामुळे मूलभूत हक्कांवर, संप करण्यावर प्रतिबंध येऊन कामगारांची आर्थिक पिळवणूक होईल.

६. सेझअंर्तगत कायदा व सुव्यवस्था टिकवण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था कार्यान्वीत केली जाणार आहे. त्याचे नेमके स्वरूप स्पष्ट नसल्यामुळे विविध समस्या निर्माण होतील.

७. सेझमधील उद्योगांना विविध करातून सूट देणे जर प्रस्थापित कर-व्यवस्थेच्या बधंनामुळे शक्य झाले नाही, तर अशा परिस्थितीत या क्षेत्रातील उद्योगांनी कर भरल्यास ती रक्कम परत करणे राज्यसरकारवर बधंनकारक असल्यामुळे कर्जबाजारी राज्य सरकारांना त्यासाठी स्वतंत्र तरतूद करणे शक्य होईलच असे नाही.

८. सेझमधील उद्योगांना लघुउद्योगांसाठी राखीव असलेल्या वस्तूंचे उत्पादन हे कायद्यातील तरतुदीमुळे करता येणार असल्यामुळे या क्षेत्राबाहेरील लघुउद्योग मोडकळीस येतील/ बंद पडण्याची शक्यताच अधिक आहे,

९. सदर विशेष आर्थिक क्षेत्रात ज्यांच्या जमिनी गेल्या, उदरनिर्वाहाचे साधन गेले, अशा व्यक्तींना पर्यायी रोजगारांच्या संधी मिळणार नसल्यामुळे बेकारीत भर पडेल.

१०. विशेष आर्थिक क्षेत्राच्या एकूणच कारभारावर सपूंर्ण नियंत्रण ठेवणे सरकारला शक्य होणार नसल्याचे सरकारने जाहीर केले आहे. देशातील सेझची सात कार्यक्षेत्र वगळता इतर सर्व विशेष आर्थिक क्षेत्रातील कारभाराचे देखरेख व नियंत्रण कार्याचे खाजगीकरण केले जाणार असल्यामुळे व्यावसायिक रीतीने सरंक्षण करतांना सामाजिक व राष्ट्रीय हिताकडे दुर्लक्ष केले जाऊन व्यक्तिगत हितसबंध मोठ्या प्रमाणावर जोपासले जातील व त्यातून विविध समस्या निर्माण होतील.

उपसंहार :- विशेष आर्थिक क्षेत्रामुळे देशाच्या विकासाला गती मिळेल ही बाब योग्य असली, तरी सेझरूपाने देशातील भांडवलदार वर्गास आर्थिक संपत्ती मिळवून देण्यासाठी मोकळे रान उपलब्ध करून दिले आहे. सरकारने या क्षेत्रात प्रचंड सवलती दिल्यात, प्रसंगी अनेक कायद्यात बदल केले, आदिवासी व कामगारांना सरंक्षण देणाऱ्या तरतुदीत बदल करण्यास सरकारला २/३ वर्ष वेळ मिळत नाही, परंतु सेझसाठी रातोरात कायद्यात बदल करून कॉर्पोरेट सेक्टर पुढे सरकारने गुडघे टेकले आहेत. सरकारने या विशेष क्षेत्रासाठी प्रचंड प्रमाणात सवलती दिल्यात, त्यामुळे नेमके किती फायदे मिळणार याबद्दल सर्वांच्याच मनात साशंकता आहे. ज्या चीन देशाकडून आपण ही सकंल्पना स्वीकारली आहे त्यांचा याबद्दलचा अनुभव फारसा चांगला नाही. विकासाच्या नावाखाली प्रादेशिक विषमता अधिक निर्माण झाली. चीनने सपंत्ती निर्माण केली परंतु तिचे वाटप केले नाही. आज चीनमधील १०टक्के लोकांकडे ४५ टक्के संपत्ती आहे, याचा अर्थ ९० टक्के जनता गरिब आहे. वरील बाब लक्षात आल्यावर चीनने सुध्दा गेल्या ५ वर्षात शेती, शेतकरी व ग्रामीण विकास या तीन सूत्रांवर भर देण्याचे ठरविले असतांना, आपण आता विशेष आर्थिक क्षेत्र निर्मिती करीत आहोत ही बाब गंभीर आहे. या विशेष क्षेत्रातील उद्योगांना सर्व प्रकारचा नफा मिळवण्याची संधी नव्हे तर, खात्री असतांनासुध्दा त्यांना विविध सवलती का? यातून नेमका नवश्रीमंताचा विकास होईल की शेतकरी, शेतमजूर, कामगारांचा, याबद्दल चिंतन करण्याची, त्यासोबतच आर्थिक सुधारणांची अशी समांतर योजना तयार करावी ज्यामुळे आर्थिक व औद्योगिक भरभराट होत असतांना समाजातल्या तळागाळातील लोकांना रोजगारांच्या संधी मिळून दारिद्य निर्मूलनावर योग्य उपाय करता येतील.

संदर्भ

१. विशेष आर्थिक विभाग की विकासाची बेटे - महेश सरलष्कर

(लोकसत्ता १० एप्रिल २००६)

२. नवी, नवी मुबंई - जयराज साळ गावकर, लोकसत्ता २ जुलै ०६

३. आर्थिक चित्र पालटणारे सेझ - जयराज साळ गावकर - लोकसत्ता ९ जुलै ०६

४. विशेष आर्थिक विभाग - बिल्डरचे उखळ पांढरे - डॉक्टर भ. रा. सावडे

लोकसत्ता १९ जुलै ०६

५. विकासाचे पुंजके - आंदोलन - जुलै २००६

६. एसईझेड - अरजकाची नांदी - उस्का महाजन - आंदोलन ऑगस्ट ०६

७. कंपनी सरकार - समप्रित सिंग, आंदोलन ऑगस्ट ०६

८. महाराष्ट्र शासन विशेष आर्थिक क्षेत्र विषयक धोरण

९. www financemin.nic. in

१०. www sez. india. nic. in

१) प्रा. डॉ. दीपक भामरे, प्रपाठक व व्यवसाय प्रशासन विभाग प्रमुख एस. एस. व्ही. पी एस. आर्टस व कॉमर्स कॉलेज - धुळे

२) प्रा. प्रल्हाद. एस. गोविंद एम. जे. विद्यामंदीर आर्ट व कॉमर्स कॉलेज येवला (नाशिक)

भागातून जॉब-वर्क करता येईल, तसेच देता येईल.

२०. या क्षेत्रात परदेशी बॅंकाना शाखा सुरू करता येतील, अशा बॅंकांना नफ्यावर तिनवर्षासाठी १००टक्के सूट मिळेल.

२१. आयातीसाठी घेतलेल्या वित्ताला व्याज अधिभरापासून सूट मिळेल.

२२. आयात-निर्यात मालाची वेळोवेळी होणारी जाचक तपासणी कस्टमला सेझसाठी करता येणार नाही.

२३. या क्षेत्रातून उत्पादित वस्तूंच्या प्रत्यक्ष निर्यातीवर पहिल्या पाच वर्षासाठी १००टक्के सूट, पुढच्या पाच वर्षात ५०टक्के सूट दिली जाईल, तसेच नफ्याच्या फेरगुतवणुकीवर सवलत देण्यात येईल,

२४. या क्षेत्रातील उद्योगांना लघुद्योगासाठी आराक्षत ठेवण्यात आलेली उत्पादने घेण्यास मज्जाव केला जाणार नाही.

२५. या क्षेत्रातील उद्योगांना लागू असणारा औद्योगिक कलह कायदा व इतर कामगार कायद्यासबंधीच्या तरतुदी शिथील केल्या आहेत.

थोडक्यात विशेष आर्थिक क्षेत्रात उद्योगव्यवसाय सुरू करण्यासाठी कुठल्याही परवान्याचीअनुमतीपत्राची गरज नसेल त्यांना स्वायत्त परकीय मुलुख (Deemed foregin teritory) चा दर्जा मिळेल. त्यामुळे या विभागातील औद्योगिक विकासाला चालना मिळेल ही बाब सत्य असली तरी या क्षेत्रात पुढील आव्हानांचा मुकाबला करावा लागेल.

इ) विशेष आर्थिक क्षेत्रासमोरील आव्हाने :- विशेष आर्थिक क्षेत्रामुळे विकासास चालना मिळेल, निर्यात वाढेल, या भागात दळणवळण व दूर-संचाराच्या सेवा जागतिक दर्जाच्या उपलब्ध होतील, सोबतच खेळाची मैदाने, शाळा, कॉलेजे, नॉलेज पार्क, पचंतारांकित हॉटेल्स, सुसज्ज मॉल्स या सर्वामुळे रोजगाराच्या व्यापक संधी मिळतील असे गुलाबी चित्र रंगविले जात आहे. वस्तुस्थिती तशी असेल का? याबद्दल शंका आहे. भारतात जशी जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरू झाली तेव्हांपासून (९१) काही क्षेत्रात विकास झाला, आर्थिक विकासाचा दर वाढला, परंतु दुसऱ्या बाजूला रोजगाराच्या संधी कमी कमी झाल्या. समाजातील कामगार, शेतकरी, शेतमजूर यांच्यापर्यंत विकासाची फळे खऱ्या अर्थाने पोहचली नाहीत. तशीच परिस्थिती आर्थिक विकास क्षेत्राबद्दल निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सेझकडे आर्थिक विकासाचा मार्ग म्हणून पहिले जात असले तरी या विकासाच्या मार्गात पुढील अडचणी/ समस्या/ आव्हाने निर्माण होऊ घातली आहे. त्यामुळे त्याचा विचार करणे जरूरीचे ठरते.

१. सेझसाठी प्रचंड प्रमाणावर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करांची सूट देण्यात येणार असल्यामुळे येत्या ४-५ वर्षात देशाला या करांच्या रूपाने मिळणाऱ्या उत्पन्नावर पाणी सोडावे लागणार असल्याचा अहवाल वित्तमंत्रालयाअंतर्गत अंदाजपत्रक समितीने व्यक्त केला आहे. अशा परिस्थितीत इतके उत्पन्न प्राप्त करण्यासाठी सरकार कराच्यादरात, रचनेत बदल करेल व त्याचा परिणाम सपूंर्ण समाजावर होण्याची शक्यता आहे.

२. सेझसाठी जवळपास एक लाख चाळीस हजार हेक्टर जमीन ताब्यात घेतली जाणार आहे. इतक्या प्रचंड प्रमाणावर जमीन ताब्यात घेतल्यावर तिच्याशी निगडीत शेतकरी, शेतमजूर व जमिनीशी सबंधित शेकडो गांवे व या गावांतील हजारो व्यक्तींना उपजीविकेसाठी सरकार कोणते साधन उपलब्ध करून देणार याबद्दल कोणताही कृती कार्यक्रम सरकारने घोषित केलेला नाही.

३. सरकारने एकीकडे खुली अर्थव्यवस्था जाहीर केली, त्यानुसार बाजारात खुल्या किमतीस वस्तूंची विक्री केली जाते, मात्र हेच सूत्र जमिनीच्या किमंतीबाबत लागू नाही. सरकार भांडवलशाही मालक वर्गासाठी स्वत: शेतकऱ्यांची जमीन सरकारी किमतीने खरेदी करून शेतकरी वर्गाची आर्थिक पिळवणूक करीत असल्यामुळे, शेतकरी वर्गाकडून जमीन संपादनासाठी मोठ्या प्रमाणावर विरोध होत आहे.

४. सेझअंतर्गत क्षेत्र पर्यावरण झोनमधून वगळण्यात येणार असल्यामुळे उद्योगातून तयार होणाऱ्या वेस्टेजच्या संदर्भात विविध समस्या निर्माण होऊन स्थानिक व सभोवतालच्या परिसरातील पर्यावरणावर प्रतिकूल परिणाम होण्याची समस्या नाकारता येणार नाही.



करून युरोप, अमेरिका व जपान देशामधील भांडवल आपणांकडे वळविण्यासाठी आपल्या देशात सेझ (विशेष आर्थिक क्षेत्र) सुरू करण्याची कल्पना चीन देशापासून घेऊन त्यात काहीप्रमाणात बदल केलेत. उदा:- चीन देशात सरकार स्वत: पुढाकार घेऊन विशेष आर्थिक क्षेत्र म्हणून नवीन शहर व त्या सभोवतालचा हजारो एकर भूप्रदेश स्वत: विकसित करीत आहे. आपणाकडे मात्र भांडवलाचा तुटवडा असल्यामुळे सेझ चा प्रयोग खासगी विकासक, खाजगी कंपनी, सार्वजनिक कंपनी, परदेशी कपंनी, राज्य सरकार किंवा त्यांची एजन्सी मार्फत करण्यात येत आहे.

सन १९९७-२००२ मधील आयात-निर्यात धोरणामध्ये सुधारणा करून सन २००४ मध्ये भारत सरकारने विशेष आर्थिक विभागाची सकल्पना स्वीकृत केली. दरमान्यच्या काळात भारतीय निर्यातदारांचा व्यापार सुरक्षित होण्यासाठी, व्यापारी वर्गाचा सतत होणारा दबाब व मागणी लक्षात घेऊन, भारत सरकारने सन २००५ मध्ये स्पेशल इकॉनॉमिक् झोन कायदा पास केला. संसदेने हा कायदा पारित करून राष्ट्रपतींकडे पाठविला, त्यानी २३जून २००५रोजी स्वाक्षरी केली व १०फ्रेबुवारी२००६ पासून सपूर्ण भारतात हा कायदा लागू करण्यात आला. या विशेष कायद्यानुसार देशातर्गत विशेष आर्थिक क्षेत्र उभारण्याची जबाबदारी खासगी / सार्वजनिक / परदेशी कंपनी सोबत काही ठिकाणी एम्.आय.डी.सी. सारख्या महामंडळावर टाकण्यात आली आहे.

देशाच्या आर्थिक विकासाचा चेहरा बदलणाऱ्या या क्षेत्राच्या उभारणीसाठी केंद्र सरकारकडे २० जून २००६ पर्यंत देशभरातून १११ प्रस्ताव दाखल झालेले आहेत. वरील विविध प्रस्तावांपैकी सर्वात अधिक प्रस्ताव ५९ हे आय. टी सबंधित सेवा व उत्पादनांशी सबंधित असून उर्वरित प्रस्ताव हे प्रामुख्याने औषधे, रसायने, तयार कपडे, जडजवाहीर, वित्तीय व बहुद्देशीय सेवा व उत्पादनाशी सबंधित रूपये आहेत. येत्या पाच वर्षात युपीए सरकार सेझसाठी ९५००० हजार कोटा गुंतवणूक करेल व त्यामुळे देशांतर्गत २५ लाख व्यक्तींना प्रत्यक्ष व १० लाखांना अप्रत्यक्ष रोजगार मिळण्याची शक्यता आहे. देशभरातून सेझच्या उभारणीसाठी जे प्रस्ताव आले आहेत त्यापैकी सर्वात जास्त म्हणजे प्रत्येकी १६ प्रस्ताव महाराष्ट्र राज्य व राष्ट्रीय राजधानी क्षेत्र (जी), १५ प्रस्ताव आध्रं प्रदेशातून, १४ कर्नाटकातून, १२ तामिळनाडू राज्यातून, ९ प्रस्ताव हरियाणातून, प्रत्येकी २ प्रस्ताव केरळ, ओरीसा, बंगाल राज्यातून, तर औद्योगीक दृष्टया प्रगत समजल्या जाणाऱ्या गुजराजमधून १ प्रस्ताव असून, बिमारू म्हणून औद्योगिक जगतात ओळखण्यात येत असलेल्या बिहार, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेशातून एकही अर्ज आला नाही ही वस्तुस्थिती आहे.

विशेष आर्थिक क्षेत्रास मिळणाऱ्या सवलती :- देशातील औद्योगिक प्रगती वेगाने होऊन रोजगाराच्या व्यापक संधी प्राप्त करून घेण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने विशेष आर्थिक क्षेत्र कायदा - २००५ लागू केला आहे. या कायद्याअंतर्गत सेझ क्षेत्रातील उद्योगधंद्यांना पुढील सवलती या कायद्यानुसार मिळणार आहेत.

१. या क्षेत्रातील उद्योगांना १००टक्के थेट परदेशी गुतंवणुकीची अनुमती असते.
२. सेझ क्षेत्र पर्यावरणीय निर्बधांपासून मुक्त ठेवण्यात आल्यामुळे वेस्टेज व इनपुटच्या नियमांपासून येथील उद्योग मुक्त असतील.
३. या क्षेत्रातील उद्योगांना पाणी, वीज व इतर सेवा अग्रक्रमाने व करमुक्त पध्दतीने पुरविण्यात येतील.
४. या क्षेत्रात वीज-निर्मिती, वहन व वितरणास अनुमती असते.
५. या क्षेत्रातील उद्योगांना वीजभारापासून संपूर्ण सूट तर मिळेलच परंतु त्यासोबत स्वत: निर्माण केलेल्या व खरेदी केलेल्या विजेवरील करापासून सूट देण्यात आली आहे.
६. या क्षेत्रातील उद्योगांना राज्य सरकारच्या सर्व प्रकारच्या करांपासून उदा:- जकात कर, विक्रीकर, बाजार कर, उलाढालकर व इतर करांपासून सूट देण्यात आली आहे.
७. या क्षेत्रातील वस्तूंच्या देशांतर्गत विक्रीवर एसएडी लागू नसतो.
८. या क्षेत्रातील उद्योगांना सेवाकर व केंद्रीय विक्रीकरातून सूट आहे.
९. या क्षेत्रातील उद्योगांनी पायाभूत संरचनेवर खर्च केलेल्या निधीवर व त्यापासून प्राप्त उत्पन्नावर आयकर माफ आहे.
१०. पंधरा वर्षाच्या काळात कुठल्याही दहा वर्षाच्या कालखंडासाठी या उद्योगाना कॉर्पोरेट करावर सवलत लागू आहे.
११. सेझ मध्ये व्यक्तिगत पातळीवर गुतंवणूक आयकर कलम ८८ नुसार माफ केली आहे.
१२. सेझ मधील मोकळी जागा, बांधकाम करण्याची जागा याचा व्यापारी तत्वावर वापर करण्यात मुक्तसंमती असेल.
१३. सेझ मध्ये सुरक्षा, उपाहारगृहे, हॉटेल, मनोरंजन वगैरे सेवा व्यापारी तत्वावर देण्याचा व चालविण्याचा अधिकार उद्योगांना असेल.
१४. या क्षेत्रातील उद्योगांना देण्यात येणारे सर्व प्रकारचे परवाने/ अनुमती एकांक समितीद्वारे कमी कालावधीत उपलब्ध करून देण्यात येणार असल्यामुळे वेळेत बचत होईल.
१५. या अंतर्गत उद्योगांना आयातीसाठी परवाना लागणार नाही.
१६. अशा क्षेत्रातील उपक्रमांना आवश्यक ती भांडवली साधनसामुग्री, कच्चा माल, उपभोग वस्तु, सुटे भाग, पॅकींग सामुग्री वगैरे सामुग्री विशिष्ट संमतीशिवाय कोणताही कर न लावता देशातून प्राप्त करता येईल.
१७. वरील पध्दतीने प्राप्त साधनसामुग्री खरेदीपासून ५वर्षात वापरता येईल.
१८. देशाच्या इतर भागातून सेझमध्ये आलेला माल निर्यात म्हणून धरला जाईल व त्यावर भरलेला विक्रीकर परत मिळेल.
१९. सेझमधील उद्योगांना देशाच्या इतर

विकासाचा नवा मार्ग विशेष आर्थिक क्षेत्र

प्रा. डॉ. दीपक भामरे / प्रा. प्रल्हाद. एस. गोविंद

प्रास्ताविक :- जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत टिकून रहाण्यासाठी देशाच्या औद्योगिक विकासाचा वेग वाढवून आणणे आवश्यक आहे. उद्योग हे एक असे आर्थिक विकासक्षेत्र आहे की, उद्योगाचा विकास व विस्तार झाल्यावरच राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय स्तरावर व्यापारात वृध्दी होऊन, देशाच्या विकासाला गती मिळेल याची जाणीव ठेवून जगातील विविध लहान मोठे, विकसित अविकसित, समाजवादी साम्राज्यवादी राष्ट्रे जाणीवपूर्वक प्रयत्न करीत आहेत. या प्रयत्नाचा एक भाग म्हणजे विशेष आर्थिक क्षेत्रांची (एर्जम्ति ाम्द-हदस्म् २ दहा) सेझ् निर्मिती करणे होय. विशेष आथिक क्षेत्र हे असे एक क्षेत्र आहे की, ज्यामुळे देशातील उद्योगक्षेत्राचा, विशेषत: निर्यातभिमुख उद्योगाच्या विकासाला मोठ्या प्रमाणावर चालना मिळते. त्यामुळे आज सर्वदूर विशेष आर्थिक क्षेत्र -विकासाचा एक नवा मार्ग म्हणून ओळखला जात आहे. या पार्श्वभूमिवर सदर लेखात-जगतिकीकरण व विशेष आर्थिक क्षेत्र, विशेष आर्थिक क्षेत्रांमागील तत्वज्ञान, भारत व सेझ्, विशेष आर्थिक क्षेत्रास मिळणाऱ्या सवलती व विशेष क्षेत्रासमोरिल आव्हाने इ. मुद्यांवर चर्चा केली आहे.

अ) जागतिकीकरण व विशेष आर्थिक क्षेत्र :- जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरू होऊन जवळपास आपल्यासाठी १५/१६ वर्षाचा कालावधी लोटला, तर विकसित देशांसाठी जवळपास २०/२५ वर्षाचा कालावधी पूर्ण झाला आहे. या कालावधीत जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत टिकून रहाण्यासाठी विविध प्रकारचे प्रयत्न (उदा:- आर्थिक उदारीकरण, खाजगीकरणाला चालना, मक्तेदारी कायद्याचे पुनरावलोकन, पायाभूत क्षेत्राचा विकास, रुपयाची परिवर्तनीयता, उद्योगांसाठी परवानामुक्त धोरण, निर्गुंतवणुकीचा निर्णय) विविध राष्ट्रानी केले. त्या सर्वाचा एक हेतू म्हणजे देशातील निर्यातीला उत्तेजन देऊन परकीय चलन प्राप्त करणे होय. त्यासाठी इयूटी फ्री झोन सुरू करून उद्योग व्यवसायाला विविध सेवा, सवलती व सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विशेष आर्थिक क्षेत्र (एर्जम्ति ाम्दहदस्म् २ दहा) विविध देशामध्ये सुरू करण्यात आले. विशेषत: सिंगापूर, दक्षिण कोरिया, तैवान व हाँगकाँग इ. राष्ट्रांची औद्योगिक प्रगती सेझ मुळे झाली. या देशांनी आपल्या देशात निर्यातीभिमुख विशेष आर्थिक विभाग स्थापन करून तेथे उद्योगांना भरमसाट सवलती देऊन, परदेशी गुतंवणूक आकर्षून प्रगत तंत्रज्ञानाच्या जोरावर प्रगती करून आयातीभिमुख अर्थव्यवस्थेचा चेहरा निर्यातीभिमुख करून सर्व जगाचे लक्ष ८५च्या सुमारास आपणांकडे केंद्रित केले.

आशियाई देशांच्या या प्रगतीकडे साशंकतने पहाणाऱ्या चीनने निद्रिस्त अवस्था सोडून, प्रगतीच्या या नव्या प्रारूपाचे स्वागत करून चीनचे प्रमुख दंग-शिओ-पिगं यांनी विशेष आर्थिक क्षेत्राच्या उभारणीसाठी चालना देण्यासाठी परकीय गुतंवणुकीस प्रवेश दिला. चीनमध्ये एकाच वेळी सर्व विभागात वाहतुक, रस्ते, पाणीपुरवठा, वीजपुरवठा इ. सोयी उपलब्ध करून देणे शक्य होणार नाही हे लक्षात घेऊन चिनच्या पूर्व व दक्षिण समुद्र किनाऱ्यावर पाच विशेष आर्थिक क्षेत्र (बीजीगं, शांघाय, तायनजीन, शेन्झेन, डालीयन) जाणीवपूर्वक उभारून तेथे आतंरराष्ट्रीय दर्जाच्या प्रचंड सोयी, सुविधा व सेवा उपलब्ध करून सोबत कायद्यातील किचकट कलमे, लालफित कमी करून परकीय गुतंवणुकदारांना सरंक्षण दिले. त्यामुळे या क्षेत्रात उद्योगांची प्रचंड वाढ झाली. म्हणूनच जगभरातील अनेक राष्ट्रांनी आपल्या देशात विशेष आर्थिक क्षेत्र सुरू करून जागतिकीकरणाच्या आव्हानाचा मुकाबला केला.

ब) विशेष आर्थिक क्षेत्राचे तत्वज्ञान :- विशेष आर्थिक क्षेत्र सुरू करण्यामागे एक तत्वज्ञान असून त्याचा स्वीकार जागतिक बँक व आतंरराष्ट्रीय नाणेनिधी या संस्थानी केला आहे. त्यानुसार विकसनशील देशांमध्ये स्ट्रक्चर व अॅडजेस्टमेन्ट कार्यक्रम राबविला. त्यानुसार विकसनशील देशांच्या विकास प्रक्रियेत आर्थिक विषमता येणारच, सपूंर्ण देशाची प्रगती, विकास सारख्या गतीने करता येणार नाही अशा परिस्थितीत विशेष आर्थिक विभाग सुरू करणे अपरिहार्य आहे असे तत्वज्ञान यामागे आहे. तसेच विषमता असल्याशिवाय वेगाने विकास घडवून आणता येणार नाही, ही बाबसुध्दा लक्षात ठेवणे जरूरीचे आहे. वरील भूमिकेमुळेच देशात विकासाची प्रक्रिया दोन स्तरांवर सुरु होऊन विशेष विभागाची प्रगती एकीकडे झपाट्याने होते, तर सामान्य विभागाची मात्र फारशा वेगाने प्रगती न होऊन त्या विभागाच्या विकासाची गती कमी होते. परंतु स्पर्धेच्या काळात टिकून राहण्यासाठी या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करून चीनप्रमाणेच भारताने सुध्दा द्विस्तराय विकासाची प्रक्रिया आत्मसात करण्याचे ठरविले.

क) भारत व विशेष आर्थिक क्षेत्र :- पाश्चिमात्य देशांकडे ज्या प्रकारचे मुक्त वातावरण उद्योग क्षेत्राकडे आहे, तसे आपणाकडे उपलब्ध

चन्द्रशेखर आझाद

क्रांतिकारक तरुंण चन्द्रशेखर आझाद फरारी झाले होते. ब्रिटिश सरकारने त्यांना पकडण्यासाठी रोख ५ हजार रुपये पारितोषिक जाहीर केले होते. परंतु आझाद पोलिसांच्या जाळ्यात सापडतच नव्हते. कसेतरी लपत छपत एक दिवस ते एका घरासमोर पोचले. त्यांनी दरवाजावर टकटक केले. त्या घरात एक वृध्द स्त्री आपल्या मुलीसह रहात होती. आझाद म्हणाले मी चन्द्रशेखर आझाद आहे. कसेही करून आजची रात्र मी तुमच्याकडे लपून राहू इच्छितो.

चन्द्रशेखर आझादांचे नाव ऐकूनच वृध्दा खूष झाली. त्यांना छातीशी कवटाळून मुलासारखे लाड केले, आशीर्वाद दिले आणि मुलीला त्यांना जेवण वाढायला सांगितले. ती मुलगी जेवण वाढून घेऊन आली. तेव्हा, बोलता बोलता आझादांनी विचारले आई, आमचे मेव्हणे कोणत्या गावी रहातात? कधी वेळ मिळाला तर त्यांचीही आम्ही भेट घेऊ.

हे ऐकून वृध्द स्त्री हसली, परंतु दुसऱ्या क्षणी तिचा चेहरा निराशेने काळवंडला. ती म्हणाली- मुला, गरिबांचा वाली परमेश्वर! हुंड्यासाठी रकम जमवते आहे. हुंडण्यासाठी भरपूर रक्कम जमा झाली तरच तिचे लग्न करू शकेन. हो, जिवंत राहिलेच तर कधी तुझी तुझ्या मेव्हण्याशी गाठ घालून देईन.

आझाद थोडा विचार करून म्हणाले, आई, सरकारने माझ्या अटकेसाठी ५ हजार रुपयांचे बक्षीस जाहीर केले आहे. उद्या तुम्ही माझ्याजवळची रक्कम माझ्या एका क्रांतिकारक मित्राकडे पोचवा आणि मग मला पोलिसांच्या ताब्यात द्या. तुम्हाला बक्षिसाची जी रक्कम मिळेल त्यात माझ्या बहिणीचे लग्न मोठ्या थाटामाटात होईल. तुमच्या डोक्यावरचा भार पण कमी होईल व या भावालाही आनंद होईल.

वृध्द स्त्री म्हणाली, अरे बाळा! पाच हजारच काय पण पाच लाख रुपये कोणी देऊ केले तरी असा देशद्रोह मी करणार नाही. तुला तर मी माझा मुलगा मानले आहे. ईश्वर सर्वांचे ऐकत असतो, आमचे पण गाऱ्हाणे कधी तरी ऐकेल.

एवढे बोलून त्या स्त्रीने आझादांसाठी अंथरुण घातले व स्वत: मुलीला घेऊन दुसऱ्या खोलीत झोपली.

दुसरे दिवशी त्या दोघी उठल्या तेव्हा बाजेवर आझाद नव्हते, परंतु पैशांचा एक ढीग होता. शेजारीच त्या वृध्द स्त्रीसाठी एक पत्र लिहून ठेवलेले होते. ते चन्द्रशेखर आझादानी लिहिले होते. त्यात म्हटले होते :-

आदरणीय माताजी,

सादर नमस्कार,

गुपचूप निघून गेल्याबद्दल क्षमा करा. माझा प्रस्ताव तुम्ही मान्य केला नाहीत, तुमची इच्छा। परंतु आता तुमचा नाही तर तुमच्या मुलाच्या इच्छेप्रमाणे होईल. ह्या पत्रासोबत ठेवलेल्या पैशातून माझ्या बहिणीचे लग्न शक्य तितक्या लौकर करा. विवाहप्रसंगी बहिणीजवळ असावे अशी माझीही खूप इच्छा आहे. परंतु काय माहीत कोठे असेन? आई, एक फरारी भाऊ आपल्या बहिणीसाठी यापेक्षा जास्त काय करू शकतो? दैवात असेल तर कधी मेव्हण्यांना भेटीन आणि बहिणीला आशीर्वाद द्यायला येईन. आता तर मी जात आहे.

बहिणीला शुभाशीर्वाद सांगा,

आपला पुत्र

चन्द्रशेखर

(पान क्र. ५२ वरुन)

कसं होऊ शकेल? दोन पक्षात झालेला करार एका पक्षाने पाळायचा आणि दुसऱ्या पक्षाने आपल्या सोयीनुसार तो मोडायचा हे न्यायाचं कसं होऊ शकेल?

नानासाहेबांतर्फे इंग्रजांना पाठवलेल्या पत्रात त्यांनी हेहि लिहिलं होतं की, पेन्शन न देण्याकरीता कंपनी सरकारने एक निमित्त शोधून काढलं आहे. ते असं की दुसऱ्या बाजीरावांनी खूप पैसे साठवले आहेत, परंतु पेन्शन ज्या अटीवर दिलं गेलं त्या अटीत पेन्शन घेणाऱ्याने त्याचा खर्च कसा करावा याचा उल्लेख नव्हता! शिवाय पेन्शन राज्याच्या बदल्यात दिलं गेलं होतं. बाजीरावांनी आपलं सर्वच्या सर्व पेन्शन साठवून ठेवलं असतं तरीसुध्दा हरकत नव्हती. आम्ही विचारू इच्छितो की, पेन्शन कशाप्रकारे खर्च करावं हे विचारण्याचा कंपनीला अधिकार काय? साध्या नोकरालासुध्दा कंपनी असा प्रश्न विचारीत नाही याचा अर्थ असा की कंपनी केलेल्या कराराचा भंग करायला प्रवृत्त झाली आहे.

या पत्रातील युक्तिवादावरून अजीमुल्लाखांच्या बुध्दिमत्तेचा प्रत्यय येतो. या संदर्भातली त्याची परदेशवारी सफल होऊ शकली नाही! परंतु तिचा दुसरा एक फायदा झाला. लंडनमध्ये त्यांना साताऱ्याचे रंगोबापूजी भेटले. त्याचं संघटन वाढलं! त्या दोघांमधे नानासाहेबांच्या संदर्भात भारताला स्वतंत्र करण्याबद्दल विचारविमर्श सुरू झाला.

१८५७ साली भारतात जे युध्द झालं त्याची योजना अजीमुल्लाखांच्या तल्लख डोक्यातून निघाली होती. या योजनेनुसार ३१ मे ला स्वातंत्र्ययुध्द सुरू झालं असतं तर भारताच्या इतिहासाला वेगळे वळण लागलं असतं आणि अजीमुल्लाखाचं नांवही विसरलं गेलं नसतं. ज्यांनी आपलं तनमन वेचून देशाच्या स्वातंत्र्याकरिता प्रयत्न केला, त्या सुपुत्रांमधे अजीमुल्लाखांच नाव प्रामुख्यानं घ्यावं लागेल.

यतीन्द्रनाथ दास

(सम्राट विरुध्द यतीन्द्रनाथ ३ जुलै १९२९)

क्रांतिकारकावरचे खटले कशा प्रकारे चालवले जात आणि ब्रिटिश न्याय म्हणजे कसे थोतांड होते हे यतीन्द्रनाथ दास यांनी मॅजिस्ट्रेटच्या नावे लिहिलेल्या पत्रावरून स्पष्ट होते.

हुतात्मा यतीन्द्रनाथ दास यांनी ब्रिटिश न्यायव्यवस्थेविरुध्द मॅजिस्ट्रेटला खालील पत्र लिहिले होते :-

महाशय,

आपला आज्ञाधारक अत्यंत नम्रपणे विनंती करत आहे की-

क) मला रेल्वे स्टेशन पोलीस ठाण्यात बंदीत ठेवण्यापूर्वीचार-पाच दिवस आधी कोठडीत ओळख परेड करवण्यात आली.

ख)अतिशय घाणेरडे कपडे घातलेले आणि तीस ते पंचेचाळीस वयोगटातील काही पंजाबी भंगी व हमाल स्टेशवरून आणण्यात आले. ह्या व्यक्तींना एका गल्लीतून लॉकअपमध्ये आणण्यात आले. गल्लीजवळ मॅजिस्ट्रेटच्या गाडीत ओळख करवणारा बसला होता. मला जेव्हा या सहा व्यक्तींमध्ये उभे करण्यात आले. अशा असंबद्ध ओळख परेडबद्दल मी मॅजिस्ट्रेटजवळ रोषही प्रकट केला, कारण हे पंजाबी उंचेपुरे, धष्टपुष्ट होते. त्यांच्या चेहऱ्यावरूनच ते बंगाली नाहीत हे कोणीही सांगू शकले असते. परंतु माझ्या आक्षेपांकडे कोणीही लक्ष दिले नाही. खरे पहाता मी मॅजिस्ट्रेटना पुन्हा पुन्हा सांगितले होते की, मला माझ्याशी मिळत्याजुळत्या बंगाल्यांमध्ये उभे केले जावे कारण पोलिसांजवळ माझा फोटो, माझे हस्ताक्षर इत्यादि होते. त्या गोष्टी ते माझी ओळख पटवण्यासाठी आलेल्या व्यक्तीला दाखवू शकले असते.

ग) जी व्यक्ती माझी ओळख पटवण्यासाठी आणण्यात आली होती, तिला मी ज्या तारखेला, ज्या रूपात तिने मला पाहिले होते त्याबद्दल प्रश्न विचारू इच्छित होतो, परंतु माझी विनंती मान्य करण्यात तर आलीच नाही, पण तेथे असलेल्या पालीस अधिकाऱ्यांनी त्या व्यक्तीला फरपटत नेले.

घ) ही कारवाई व गुप्तपणे केली गेली. म्हणून त्यात काही नियमबाध्य असलेच पाहिजे असे मला वाटते. त्यामुळे मला माझा बचाव करणे फार कठीण जाईल.

यतीन्द्रनाथ दास

३ जुलै १९२९

दु. २ वा. १० मि.

लाहोर कट खटल्याची सुनावणी जुलै १९२९ ला सुरू झाली. त्याआधी यतीन्द्रनाथ दासना अटक करून ४ जून १९२९ रोजी लाहोर तुरुंगात पोचवण्यात आले होते. तेथे लाहोर कट प्रकरणातील सर्व कैद्यांनी तुरुंगाच्या व्यवस्थेत सुधारणांची मागणी केली होती आणि मागण्यांच्या समर्थनार्थ उपोषण सुरू केले होते. हे उपोषण दीर्घ काळ चालले. यतीन्द्रनाथ दास ६३ दिवसांच्या उपोषणानंतर १३ सप्टेंबर १९२९ रोजी निधन पावले, हुतात्मा झाले.

रोशन सिंह

ठाकूर रोशनसिंह शाहजहाँपुर जिल्हातील नवादा गावचे रहिवासी होते. ते पंडित रामप्रसाद बिस्मिल यांचे सच्चे अनुयायी होते. बिस्मिलनी लखनौ तुरुंगात १६ दिवस उपोषण केले तेव्हा रोशनसिंहही १६ दिवस उपाशी राहिले.

काकोरी प्रकरणाच्या खटल्यादरम्यान रामप्रसाद बिस्मिल यांच्याबरोबर ठाकूर रोशन सिंहानाही फाशीची शिक्षा दिली जाईल अशी कोणाला शंकाही आली नाही. १९ डिसेंबर १९२७ रोजी हाताता गीता घेऊन ते वंदे मातरम् चा घोष करत झपाट्याने फाशीच्या तख्ताकडे चालत गेले.

फाशीपूर्वी ६ दिवस म्हणजे १३ डिसेंबर १९२७ रोजी रोशनसिंहानी आपल्या एका मित्राला एक पत्र लिहिले होते. या पत्रावरून त्यांच्या धार्मिक विचारांप्रमाणेच धैर्य आणि साहसाबद्दलही माहिती मिळते. पत्र असे -

ह्या आठवड्यातच फाशी होईल. तुमच्या प्रेमाचे बक्षीस ईश्वराने तुम्हाला द्यावे अशी मी प्रार्थना करतो. तुम्ही माझ्यासाठी मुळीच कष्टी होऊ नका. मृत्यू मी आनंदाने कवटाळीन. जगात जन्म घेतला की केव्हा ना केव्हा मरायचे आहेच. माणसाने जगात कुकर्म करून बदनाम होऊ नये, मरणसमयी ईश्वराचे स्मरण करावे. ह्याच गोष्टी व्हायच्या असतात त्या दोन्ही माझ्यापाशी आहेत मृत्यू व परमेश्वराचे स्मरण! ईश्वराचीच ही कृपा! म्हणूनच माझा मृत्यू दु:ख करण्याजोगा नाही. दोन वर्षापासून माझी मुलाबाळापासून फारकतच झालेली आहे. या काळात ईश्वर भजन, चिंतनाची खूप संधी मिळाली. त्यामुळे माझा मोह संपला आहे, काही वासनाही शिल्लक राहिलेली नाही. या जगातील कष्टप्रद जीवनयात्रा संपवून मी आता चिरंतन शांत जीवनाच्या दिशेने जात आहे. जंगलात तपश्चर्या करणाऱ्याला जी गती मिळते तीच धर्मयुध्दात प्राणाहुती देणाऱ्याला मिळते असे आपल्या शास्त्रात लिहिले आहे.

जीवन आनंदाने जगाल तर सर्वत्र प्रकाश पसरवाल!

नाही तर कितीतरी जन्मतात-मरताती! अखेरचा नमस्कार!

आपला

रोशन

आम्ही स्वखुशीने कैद स्वीकारली आहे.

चहुकडे बहर असूनही त्याचे सुख-दु:ख नाही

कैदेत राहणेच आमच्या नशिबात आहे.

न्यायाधीशांनी आम्हाला निर्दयी, रानटी, मानवतेवरील कलंक इत्यादि विशषणे दिली आहेत. आमच्या शासक देशाच्या जनरल डायरने नि:शस्त्र लोकांवर गोळ्या झाडल्या होत्या-लहान मुले, वृध्द, स्त्री, पुरुष सर्वांवर! न्यायाचे मक्तेदार समजणाऱ्या या शासकांनी आपल्या या अधिकाऱ्यांना कोणती विशेषणे दिली होती? मग आमच्याशीच ही वर्तणूक का?

हिंदी बंधूनो, तुम्ही कोणत्याही धर्माचे वा संप्रदायाचे असा, देशकार्यात योगदान द्या. आपसात निरर्थक भांडणे करू नका. मार्ग भिन्न असले तरी सर्वांचे उद्दिष्ट एकच आहे ना? सर्व कार्य एकाच उद्दिष्टपूर्तीची साधने आहेत. मग ही निरर्थक भांडणे, झगडे कशासाठी? ऐक्यबद्ध होऊन देशाच्या नोकरशाहीचा सामना करा, आपल्या देशाला स्वतंत्र करा! देशातल्या ७ कोटी मुसलमानांपैकी मी पहिला मुसलमान आहे। जो देशाच्या स्वातंत्र्यासाठी फासावर चढत आहे, याचा मला अभिमान वाटतो.

माझा सर्वांना अखेरचा सलाम!
हिन्दुस्तान स्वतंत्र होवो!
माझे देशबंधू सुखी राहोत!
आपला बंधू
अशफाक.

वर्गणीदारांसाठी सूचना

१. योजना वार्षिक वर्गणी १०० रुपये असून द्वैवार्षिक वर्गणी १८० रुपये तर त्रैवार्षिक वर्गणी २५० रुपयेआहे.

२. आपण कोणत्याही महिन्यापासून वर्गणीदार होऊ शकता.

३. आपणास सर्व विशेषांक त्यात मिळतात.

४. वर्गणी मनिऑर्डर अथवा डिमांड ड्राफ्टमार्फत स्वीकारली जाते.

५. योजना कार्यालयात प्रत्यक्ष आल्यास रोख रक्कम भरूनही वर्गणीदार होता येते.

६. वर्गणी भरताना सोबत स्वत:चा संपूर्ण पत्ता सुवाच्य अक्षरात देणे. ही वर्गणीदाराची जबाबदारी आहे.

७. मनिऑर्डर स्लीप भरताना स्लीपवर संपूर्ण नाव आणि पत्ता लिहावा.

८. योजना कार्यालयात वर्गणी प्राप्त झाल्यानंतर उशिरात उशिरा २ महिन्यांच्या आत आपला अंक सुरू करण्यात येतो. काही कारणास्तव आपल्याला तो मिळाला नाही तर वर्गणीच्या पावती/पोचपावतीच्या प्रतीसह लेखी तक्रार करावी.

९. योजनाचे सर्व अंक दर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात, बहुधा १ तारखेलाच पोस्टात टाकण्यात येतात. तेव्हा २० तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास, पुढील महिन्याच्या १ तारखेपूर्वी स्थानिक टपाल कचेरीत तक्रार नोंदवून त्या तक्रारीच्या प्रतीसह योजना कार्यालयास कळवावे. अंक अवश्य पाठवण्यात येईल.

१०. तक्रारीत वर्गणीदार क्रमांक कळविणे आवश्यक आहे.

११. एक महिना उलटून गेल्यावर आलेल्या तक्रारी, टपाल कचेरीत तक्रार न नोंदवता आलेल्या तक्रारी, दूरध्वनीवरील तोंडी तक्रारी यांची दखल घेतली जाणार नाही.

१२. लेखी तक्रार नोंदवूनही दखल घेतली नाही, वारंवार कळवूनही पत्ता चुकीचा आहे, वर्गणीची मुदत संपण्यापूर्वीच अंक बंद झाला, अशा स्वरूपाच्या तक्रारी आपण संपादकांकडे दूरध्वनीद्वारे अवश्य करू शकता. त्यांची अवश्य दखल घेण्यात येईल.

१३. अपूर्ण पत्यामुळे बऱ्याच वर्गणीदारांचे अंक परत येतात असे आढळून आले आहे. यापुढे सलग तीन महिने ज्यांचे अंक परत येतील त्यांची वर्गणी संबंधित वर्गणीदार जोपर्यंत लेखी तक्रार नोंदवून पूर्ण पत्ता कळवित नाही तोपर्यंत स्थगित ठेवण्यात येईल.

१४. योजनाचे अंक किरकोळ विक्रीसाठी योजना कार्यालयात उपलब्ध असतात, याची नोंद घ्यावी.

संपर्कासाठी पत्ता

योजना मासिक कार्यालय

७०१, "सी" (७ वा मजला),
केन्द्रीय सदन, C.B.D. बेलापूर,
नवी मुंबई - ४०० ६१४.

अशफाक उल्ला खां

अशफाक उल्ला खां शाहपुरचे रहाणारे होते. ते शालेय विद्यार्थी होते तेव्हा त्यांची रामप्रसाद बिस्मिल यांच्याशी ओळख झाली. अशफाकचे थोरले बंधू बिस्मिलचे वर्गमित्र होते. त्यांची घनिष्ट मैत्री होती.

बिस्मिल प्रथम अशफाकना लहान भाऊच मानत होते. हळूहळू ते बिस्मिलचे सहकारी व पुढे तर मित्रच बनले. काही दिवसांनी तर दोघे एकरूपच झाले.

काकोरी कटाच्या संदर्भात चन्द्रशेखर आझाद, शचीन्द्रनाथ बक्षी, अशफाक उल्ला खां पकडले गेले नव्हते. सरुवातीपासूनच ते फरार झाले होते. आझाद तर पकडलेच जाऊ शकले नाहीत. बक्षी व अशफाक मात्र नंतर पकडले गेले. त्यांच्यावर निराळा खटला चालवण्यात आला. बक्षीना काळ्या पाण्याची तर अशफाकना फाशीची शिक्षा देण्यात आली. फाशीची शिक्षा कमी करून घेण्यासाठी प्रिव्ही कौन्सिलकडे क्षमायाचना करावी अशी अशफाक यांची मुळीच इच्छा नव्हती. बिस्मिल यांच्या इच्छेवरून त्यांनी अपील केले होते. अशफाकचा सल्ला मानला नाही याचे नंतर बिस्मिलना दुःख झाले. त्यांनी गोरखपुरच्या तुरुंगातून अशफाकना एक पत्र लिहून खेदही व्यक्त केला होता.

अशफाक उल्ला खां याच्यांसबंधी भगतसिंहनी लिहिले होते :-

हा बेफिकिर शायर आश्चर्य वाटावे इतक्या खुषीने फासावर चढला. अतिशय उंचापुरा व देखणा तरुण होता. तुरुंगात मात्र थोडा अशक्त झाला होता. भेटीच्या वेळी ते म्हणाले होते की, अशक्त होण्याचे कारण दुःख हे नसून ईश्वरचिंतनात मग्न झाल्याने जेवण कमी जेवले जाते. फाशीच्या एकच दिवस आधी त्यांची भेट झाली होती. ते खूप नटूनसजून बसले होते. लांब लांब वाढलेले केस त्यांना शोभून दिसत होते. हसून गप्पागोष्टी करत होते. ते म्हणाले की, उद्या माझा विवाह होणार आहे. दुसरे दिवशी सकाळी ६ वाजता त्यांना फाशी देण्यात आली. कुराणाचा ग्रंथ काखेत घेऊन हाज यात्रेकरूच्या थाटात दमदार पावले टाकीत चालत गेले. पुढे जाऊन तख्तावरच्या दोराचे चुंबन घेतले. तेथे ते म्हणाले.

माझे हात कधी कोणाच्या रक्ताने माखलेले नाहीत, माझा न्यायनिवाडा ईश्वरापुढे होईल. माझ्यावरचे सर्व आरोप चुकीचे आहेत.

त्यांनी परमेश्वराचे नाव घेताच दोर ओढला गेला आणि ते अनंताच्या प्रवासाला निघून गेले. त्यांच्या नातेवाईकांनी असंख्य विनंत्या करून, खुशामत करून त्यांचा पार्थिव देह मिळवला व तो शाहजहाँपुरला नेला. मालगाडीच्या एका डब्यात ठेवलेला मृतदेह पाहण्याची काहीना संधी मिळाली. फाशी दिल्यावर १० तासानंतरही चेहऱ्यावर प्रसन्नता होती. ते जणू झोपलेच आहेत असे वाटत होते. परंतु ते काळझोपेत होते, ती कधीच उघडणार नव्हती. अशफाक शायर होते व त्याचे टोपणनाव हसरत असे होते. मरण्यापूर्वी त्यांनी दोन शेर म्हटले होते :

नाशिवंत सर्वच आहेत, आम्ही एकटेच थोडे नष्ट होत आहोत? एक परमात्मा तेवढा अमर आहे!

दुसरा शेर असा होता :

त्यांच्या जुलमाने, अंदाधुंद कारभाराने आम्ही त्रासलो।

फैजाबादच्या तरुंगातून आम्ही यमलोकी रवाना झालो।

फाशीच्या तख्तावर चढण्यापूर्वी केवळ तीन दिवस आधी, १६ डिसेंबर १९२७ रोजी अशफाक उल्ला खांनी देशवासियांना उद्देशून एक संदेश पाठवला.

भारतमातेच्या रंगमंचावर आम्ही आमची भूमिका केली आहे. चुक की बरोबर ते माहीत नाही. परंतु स्वातंत्र्य मिळवण्याच्या भावनेने प्रेरित होऊनच काम केले. आमचे लोक आमची निंदा करोत वा प्रशंसा करोत, परंतु आमच्या शत्रूंना आमची हिंमत आणि शौर्य यांची प्रशंसाच करावी लागली आहे. लोक म्हणतात आम्ही देशात दहशतवाद निर्माण करायचा प्रयत्न केला, हे मात्र चुकीचे आहे. कित्येक दिवस खटला चालू राहिला. आमच्या पैकी बरेच लोक बरेच दिवस मोकळे राहिले आणि अद्यापही काही मोकळे आहेत. तरीही आम्ही किंवा आमच्या सहकाऱ्यांनी आमचे नुकसान करणाऱ्यांवर गोळी झाडलेली नाही, आमचा उद्देश हा नव्हताच. स्वातंत्र्य मिळवण्याकरता देशभर क्रांती करण्याचा आमचा विचार होता.

बागेत बहर आला आहे, तो उत्साह देऊ शकत नाही.

बुलबुलचे उडणे बागेच्या हद्दीपर्यंतच

प्रेमाच्या वाटेवर ज्याचा अंत झाला, त्वे

तो अंत होऊनही अनंत आहे.

आम्ही निरपराध आहोत ह्या कैदेचीही चूक नाही.

राजेन्द्रनाथ लाहिडी

काकोरी कट खटल्यात ज्यांना फाशीची शिक्षा झाली त्यांची नावे अशी, रामप्रसाद बिस्मिल, राजेन्द्रनाथ लाहिडी, रोशनसिंह आणि अशफाक उल्ला खां.

यापैकी राजेन्द्रनाथ लाहिडी एम. ए. चे विद्यार्थी होते. ते बनारस हिन्दू विद्यापीठात शिकत होते. ते १९२५ मध्ये पकडले गेले. त्यांचे अपील व दयेचा अर्ज दोन्ही नामंजूर झाले.

राजेन्द्रनाथ लाहिडींनी आपल्या थोरल्या बन्धूंना एक पत्र लिहिले होते, ते असे :-

प्रिय बन्धू,

माझा दयेचा अर्ज व्हॉईसरॉयने फेटाळला असल्याचे आज मला सुपरिटेंडंटने सांगितले. तुरुंगाच्या नियमानुसार मला एक आठवड्याच्या आत फासावर लटकावले जाईल. तुम्ही माझ्यासाठी दु:ख करू नका, कारण, मी जुना देह सोडून नवा जन्म घेत आहे. तुम्ही नुकतीच माझी भेट घेतली आहे, तेव्हा पुन्हा भेटायला येण्याची गरज नाही. मी लखनौमध्ये होतो तेव्हा बहीण दोन वेळा भेटायला आली होती. सर्वांना माझा नमस्कार व मुलांना आशीर्वाद.

आपला प्रिय

राजेन्दनाथ लाहिडी

काकोरीचे हुतात्मा राजेन्द्रनाथ लाहिडी यांचा भगतसिंहावर इतका प्रभाव पडला की १९२७ साली जन्मलेल्या आपल्या धाकट्या भावाचे नाव त्यांनी राजेन्द्र ठेवले. वैचारिकदृष्ट्या ते आपल्या साथीदारांच्या बरेच पुढे होते हे याचे कारण आहे.

१९२८ च्या जानेवारीत किरती मध्ये भगतसिंहाने विद्रोही या नावाने काकोरीच्या हुतात्म्यांवर एक लेख लिहिला होता. त्यात राजेन्द्रनाथ लाहिडीविषयी लिहिताना त्यांनी त्यांची दोन पत्रेही उद्धृत केली होती. लेखाचा एक भाग असा आहे :-

ते बनारसच्या हिन्दू विद्यापीठाचे विद्यार्थी होते. १९२५ मध्ये कलकत्याच्या जवळ दक्षिणेश्वर बॉम्ब कारखाना पकडला गेला तेव्हा त्यांनाही अटक झाली. तेथून त्यांना लखनौला नेण्यात आले व काकोरी कटाच्या खटल्यात फाशीची शिक्षा देण्यात आली. लाहिडींना बाराबंकी आणि गोंडा तुरुंगात ठेवण्यात आले होते. समोर मृत्यूला पाहून ते घाबरत नव्हते, तर हसत असत. त्यांची दोन पत्रे आपल्यासमोर आहेत. व्हॉइसरॉयने ६ ऑक्टोबरला दयेचा अर्ज फेटाळला तेव्हा एक लिहिलेले आहे ते असे -

सहा महीने बारांबकी आणि गोंडाच्या काळकोठडीत राहिल्यानंतर मला सांगण्यात आले की, व्हॉईसरॉयने माझा दयेचा अर्ज फेटाळला असल्याने मला एक आठवड्याच्या आत फाशी दिले जाईल, माझ्यासाठी खूप प्रयत्न करणाऱ्या मित्राचे (येथे त्यांची नावे आहेत) आभार मानणे मी माझे कर्तव्य समजतो. तुम्ही माझा अखेरचा नमस्कार स्वीकारा. आम्हाला जगणे-मरणे म्हणजे विशेष काही नाही, कपडे बदलण्यासारखे आहे. (येथे तुरुंगाच्या अधिकाऱ्यांनी काही खाडाखोड केली आहे. अजिबात वाचता येत नाही) मृत्यू येत आहे-त्याला खुषीने, आवडीने व जोराने मिठी मारीन. तुरुंगाच्या नियमांमुळे जास्त काही लिहू शकत नाही. तुम्हाला नमस्कार, देशवासियांना नमस्कार, वन्दे मातरम् !

आपला

राजेन्द्रनाथ लाहिडी

दया पत्रानंतर फाशी झाली नव्हती, कारण प्रिव्ही कौन्सिलकडे अपील करण्यात आले होते. त्यांनी १४ डिसेंबला एका मित्राच्या नावे एक पत्र लिहिले :

प्रिव्ही कौन्सिलने माझे अपील फेटाळल्याचे काल मला समजले. तुम्ही लोकांनी आम्हाला वाचवायचा खूप प्रयत्न केला, पण असे वाटते की देशाच्या यज्ञकुंडात आमच्या प्राणांची आहुती आवश्यक आहे. मृत्यू काय आहे! जीवनाची दुसरी दिशा इतकेच! यापेक्षा जास्त काही नाही. मग घाबरायचे काय कारण! हे नैसर्गिक आहे. सूर्योदय जितका नैसर्गिक तितकेच! इतिहासाची पुनरावृत्ती होते हे आमचे म्हणणे खरे असेल, तर आमचे बलिदान व्यर्थ जायचे नाही.

माझा नमस्कार! सर्वांना अखेरचा नमस्कार

आपला

राजेन्द्रनाथ लाहिडी

किती सरळ साधेभोळे, सुंदर आणि निर्भय असे हे पत्र आहे! त्याचे लेखनही किती साधे आहे. त्यांना इतरापेक्षा दोन दिवस आधीच फाशी देण्यात आले. फाशीच्या वेळी हातकड्या घातल्या जात होत्या तेव्हा ते म्हणाले की काय जरूर आहे! तुम्ही मला रस्ता दाखवा, मी स्वत:च त्या दिशेने जाईन. पार्थिव देहाची मिरवणूक काढण्यात आली आणि मोठ्या सन्मानाने अन्त्यसंस्कार करण्यात आले. तेथेच स्मारक करण्याचा सल्ला देण्यात येत आहे.

क्रांतिकारी आंदोलनात भाग घेण्यापूर्वी राजेन्द्र लाहिडी शचीन्द्रनाथ सान्याल यांच्या पक्षात होते. क्रांतिकारी आंदोलनात सामील झाल्यानंतर त्यांच्यावर बनारसमध्ये संघटना उभारण्याचे काम सोपविण्यात आले. त्यांच्या देखरेखीखाली बनारसमधील संघटना बरीच भक्कम झाली. त्यांच्या कार्यपध्दतीने सर्वजणच प्रभावित झाले होते. काही दिवसानंतर लाहिडींना प्रांतीय समितीतही घेण्यात आले. बनारसमध्ये शचीन्द्रनाथ बक्षी पक्षाचे प्रमुख कार्यकर्ता होते. त्यांना काकोरी खटल्यांत आजन्म काळ्या पाण्याची शिक्षा झाली होती.

राजेन्द्रनाथ लाहिडी आणि त्यांचे साथीदार निर्भय होते. त्यांची कोणाबद्दल कसलीही तक्रार नव्हती. देशाच्या स्वातंत्र्यासाठी त्यांनी सहजपणे प्राणार्पण केले. आपले बलिदान व्यर्थ जाणार नाही असा राजेन्द्रनाथ लाहिडींना दृढ विश्वास होता.

की आमच्या या पतित समाजात अशा तऱ्हेचे मित्र पुरेशा संख्येने मिळत नाहीत.

रेल्वे युनियनची मी घटना लिहावी अशी रेल्वेच्या लोकांनी मला विनंती केली आहे. तुम्ही एखाद्या रेल्वे युनियनची नियमावली मला पाठवू शकलात तर मी तुमचा आभारी होईन, तसेच मला दर महिना तुम्ही एक पुस्तक पाठवले तर मी ऋणी होईन. एखादी क्रांतिकारकाविषयीची किंवा राजकीय कादंबरी, राजकारणी आंदोलनाचा इतिहास वा एखादा राष्ट्रवाद्याचे चरित्र अशाप्रकारचे कोठलेही पुस्तक चालेल. राजकारणाविषयी सत्य विचार असलेली पुस्तके येथील विद्यार्थ्यांना देण्यासाठी, श्यामजींची (कृष्ण वर्मा) इच्छा असेल, आपला थोडा पैसा खर्च करू शकतील तर मुलांना उत्तमोत्तम साहित्य दिले तर त्यांचे परिणाम फार चांगले दिसून येतील अशी मला खात्री आहे.

श्यामजींनी राजकारणी मिशनऱ्यांना दहा हजार रुपये दान दिले आहेत. हे पैसे ते कसे खर्च करू इच्छितात? या पैशातील काही भाग ते आम्हाला देऊ शकतात! त्यांना विचारून तर पहा आणि मला कळवा. पंजाबी वरच्या खटल्याबाबत लंडनमध्ये राहाणाऱ्या भारतीयांचे मत काय आहे? तेथील जनमानसावर याचा काय परिणाम झाला आह? श्री व श्रीमती श्यामजी यांना माझी आठवण करून द्या. परंतु हे पत्र अतिशय गुप्त आहे. कोणालाही दाखवू नका.

इंग्लडमध्ये रहाणाऱ्या भारतीयांच्या जीवनाविषयी कृपया मला आणखी माहिती द्या.

आपला

लाजपत राय

लालाजींच्या अटकेची व स्थानबध्दतेची बातमी लंडनला पोचली तेव्हा परमानंदांना साहजिकच फार दु:ख झाले. यासंबंधी लंडनमध्ये बऱ्याच जाहीर सभा झाल्या, त्यात भाई परमानंदांनी भाषणे केली होती.

तुम्ही सांगू शकाल काय ?

आपल्या सामान्यज्ञानाची चाचणी आपणच करा

पुढील प्रश्नांची उत्तरे द्या

शेवटच्या पानावरील उत्तरांशी ताडून पहा

		गुण
१.	ईस्ट इंडिया कंपनीचा भारतातील कारभार कधी संपुष्टात आला ?	२
२.	भारतीय राष्ट्रीय काँग्रेस कधी अस्तित्वात आली ?	२
३.	काँग्रेसची सूत्रे १९२० साली हातात आल्यानंतर महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली कोणती पहिली चळवळ झाली ?	२
४.	नागरी असहकार आंदोलनांतर्गत राबवल्या गेलेल्या मिठाच्या सत्याग्रहाच्या दांडी यात्रेला महात्मा गांधींनी कोठून सुरुवात केली ?	२
५.	१९२९ च्या लोहार इथं भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात अंतिम ध्येय म्हणून कोणती घोषणा झाली ?	२
६.	१९४२ साली इंग्रजांना चले जाव सांगणारी मोहीम कोणत्या शहरातून सुरू झाली ?	२
७.	स्वतंत्र भारताचे पहिले हेड ऑफ स्टेट कोण ?	२
८.	विद्यमान भारतीय घटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष कोण ?	२
९.	कोणत्या दिवशी भारतीय घटना अमलात आली ?	२
१०.	राष्ट्रगीत म्हणून रवींद्रनाथ टागोरांचे 'जनगण मन' हे गीत कधी स्वीकारले गले.	२

(योग्य उत्तरांसाठी शेवटचे पान पाहा)

लाला लाजपत राय

पंजाब केसरी लाला लाजपत राय यांनी स्वातंत्र्य चळवळीत महत्वपूर्ण भूमिका निभावली होती. कठोर इंग्रज पोलिसांच्या निर्दय लाठीमारामुळे त्यांना अखेरीस इस्पितळात दाखल करण्यात आले. तेथेच काही दिवसांनंतर त्यांचे निधन झाले.

लाला लाजपत राय यांचा भाई परमानंद यांच्याशी घनिष्ठ संबंध होता. कधी कधी लालाजी लाहोरहून लंडनला त्याना पत्रे पाठवून देशाच्या राजकीय परिस्थितीची माहिती देत. २८ फेब्रुवारी १९०५ रोजी त्यांनी भाई परमानंद यांना लिहिलेले एक पत्र पुढे दिले आहे त्यावरून हे सिध्द होते :

लाहोर

२८ फेब्रुवारी १९०७

प्रिय भाई जी,

तुमचे आधीचे पत्र मला वेळेवर मिळाले होते. इतके दिवस मी तुम्हाला उत्तर पाठवू शकलो नाही याचा मला खेद वाटतो. मी तुमचे पत्र लाला हंसराज वा इतर कोणालाही दाखवलेले नाही. कारण तुम्ही पदवी घेतल्याशिवाय इकडे येऊ नये असे मला वाटते. दयानंद अँग्लो वैदिक कॉलेजची व्यवस्थापन समिती तुमच्या तेथे रहाण्याची व्यवस्था करण्याची जबाबदारी घेत नसली, तर ती मी घेतो. व्यवस्थापन समितीला पैसा पुरवता येईल इतका निधी आहे. आणखी सहा महिने राहू इच्छित असाल तर खरे पहाता अडचण येऊ नये, हे पैसे पाठवता येतील. काम अर्धवट सोडण्यात काय अर्थ आहे? पदवीशिवाय परत येणे सामाजिक दृष्टीने पहाता मूर्खपणाचे ठरेल असे माझे मत आहे. या विषयासंबंधी माझे हे म्हणणे अखेरचे समजावे.

आर्यसमाजाच्या आवेशपूर्ण कामापासून मी पाय मागे घेत आहे हे कळून तुम्हाला खेद होईल. काही काळापासून मी द्विधा मनःस्थितित आहे. लाला हंसराज दुसऱ्या कार्यकर्त्यांना विश्वासात घेत नाहीत हे याचे कारण आहे. दुसरे म्हणजे इतरांना पसंत नसलेल्या कामांवर ते भर देतात. अमिरचंद आणि बधावाराम यांच्याबरोबर राय मूलराज आपला पक्ष बनवायच्या प्रयत्न करत आहेत. जवळजवळ सर्व पथगुरू त्यांच्या बाजूचे आहेत. लाला हंसराज राय मूलराज यांचे कट्टर विरोधी आहेत आणि त्यांच्या प्रेरणादायी हेतूंना बेईमानी म्हणतात. माझ्या आवेशपूर्ण राजकारणामुळे ते माझ्याविरुध्द आहेत. ते ठाकुरदत्त धवन, रामभज दत्त, रलाराम इत्यादीना व्यवस्थापन समितीत घेण्याचा प्रयत्न करत आहेत. दिवसरात्र ते याच कामात मग्न असतात, त्यांच्याविरूध्द कोणी काही बोलत नाही, कोणी काही करत नाही खोडसाळपणा खेरीज त्यांचा दुसरा काही हेतू नाही. राय मूलराज लाला हंसराज यांचे स्थान व सत्ता पाडण्याची इच्छा धरून आहेत. लाला रामप्रसाद खन्ना मध्ये आपली फॅक्टरी उघडण्याची व्यवस्था करण्यात गुंग आहेत.

आर्यसमाज आणि दयानंद कॉलेजच्या व्यवस्थापनात भाग घेणे मी सोडून दिले आहे. लाला हंसराज यांच्या नेतृत्वाला हानी पोचेल असा कोणताही विचार मी करू शकत नाही. केवळ त्यांनाचा मी आर्यसमाजाचा नेता मानतो. तरीही त्यांच्याबरोबर काम करणे मला जमणार नाही. लाला हंसराज यांनी मला साथ दिली नाही. मी काही फायदेशीर काम आता करू शकत नाही असे ते समजतात. असा विचार करण्यात माझी चूक होतही असेल आणि तो निराधार असावा अशीच माझी इच्छा आहे. कधी कधी मला स्वतःचीच घृणा वाटते. मी अशा प्रकारचे विचार का करतो? यापेक्षा जास्त उदार वृत्ती अंगी बाणवण्याचा प्रयत्न का करत नाही! संशय आणि अविश्वास या दोन भावनांपुढे मी स्वतःला असहाय्य समजतो.

माझी पुस्तके व पत्रांसमवेत माझा मी एकटाच असतो. लाला साईदास मला क्वचित भेटतात. मीही लाला हंसराज आणि इतरांना खूपच दिवसात आमंत्रण दिलेले नाही. आम्ही एकमेकांना फार कमी भेटतो. आणि भेटलोच तर अगदीच औपचारिकपणे! व्यवस्थापन समितीच्या अधिकाऱ्यांच्या निवडणुकीसंबंधी आपण वृत्तपत्रात वाचलेच असेल.

दैनिक पंजाबीच्यात्यासंबंधी दिल्या गेलेल्या निर्णयामुळे माझ्या अडचणीत वाढच झाली आहे. व्यापक दृष्टीने पहाता निर्णयाने आश्चर्यजनक कार्य केले आहे असे वाटून मला संतोष होत आहे. त्यामुळे इतके परिवर्तन झाले आहे की जे आम्ही दहाबारा वर्षाच्या प्रचार कार्यानेही करू शकलो नसतो. परन्तु जसवंतराय यांच्या अडचणी किंवा दुःखांसाठी लोक मला जबाबदार धरतात, तेव्हा मला दुःख होते. ह्या आरोपातुन मुक्त ठरावे यासाठी हे दुःख नाही, तर जसवंतराय यांच्यावर दुःखाचा, अडचणीचा डोंगरच कोसळला आहे. येथे युरोपीयन लोक फारच घाबरलेले आहेत. जसवंतराव यांना शिक्षा सुनावण्यात आली त्यादिवशी विद्यार्थी, मुलांनी फार गैरवर्तणूक केली. त्यांनी श्रीमती रेवाज यांच्या गाडीवर चिखल फेकला व धिक्काराच्या घोषणा दिल्या, त्यांना अपमानित केले. अशा आणखीही गोष्टी झाल्या. काहीही असो, जसवंतराय दिसायला तरी दृढ दिसतात, खंबीर दिसतात, कदाचित् दीर्घ कैद भोगतीलही. हीच स्थिती संपादकांचीही आहे. परंतु हे दैनिक चालू ठेवायची जबाबदारी माझ्यावर येऊन पडली आहे. स्पेन्सरच्या बाजूने अपमानाचा दिवाणी खटला भरला जाण्याची भीती आहेच.

हे जणू पुरेसे नव्हते. म्हणूनच माझी कंबर खचावी यासाठी माझे जावई जयचंद मृत्यू शय्येवर आहेत. तरीही माझा ईश्वरांच्या विवेकावर आणि दयाळूपणावर विश्वास आहे. हाच ईश्वर आपला भाग्यविधाता असतो. म्हणून त्याच्या आदेशानुसारच आपल्याला काम केले पाहिजे. कोणत्याही कारणाने माझ्या मनातील सत्य आणि राष्ट्रभक्तीचा प्रकाश कमी न होवो अशी मी रात्रंदिवस प्रार्थना करत असतो. ईश्वराने मला दिलेले धैर्य आणि साहसी वृत्ती कायम राहो कारण माझ्या ध्येयाशी दृढ राहीन आणि शौर्याने कर्तव्य निभावीन. अशाच वेळेला माणसाला वाटते की आपल्या कार्याला नैतिक बळ देण्यासाठी सच्चे आणि प्रोत्साहन देणारे मित्र असावेत. परंतु दुर्दैवाची गोष्ट अशी आहे

अहमद अली खान

देशातील इंग्रजी सत्ता नष्ट करण्यासाठी १०मे १८५७ रोजी युध्दाला सुरुवात झाली आणि दिल्लीत मोगल बादशहाच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र सरकार स्थापन झाले, तेव्हा फरूखनगरच्या संस्थानानेही मोठ्या उत्साहाने युध्दात भाग घेतला. इंग्रजी सत्तेचे ध्वज नष्ट केले, त्यांच्या डॉक्टरांबरोबरचे संबंध तोडले आणि बादशाह तसेच हिन्दुस्थानी फौजेला साथ देण्याची घोषणा केली.

उठावाच्या दिवसात फरूखनगरचे नबाब मुहम्मद अहमद अली खान आणि मोगल बादशाह दरम्यान् निकटचा संबंध प्रस्थापित झाला होता, ते एकमेकांशी संपर्क साधून असत. ज्या ज्या वेळी आवश्यकता निर्माण झाली त्या त्या वेळी बादशाहने नबाबाकडे रोख रक्कम, शस्त्रे आणि रसदीची मागणी केली आणि नबाबांनी ती तत्परतेने पूर्ण केली. त्यांच्या पत्रव्यवहारांवरून त्या काळच्या हकिकती, घटनांवर प्रकाश पडतो. फरूखनगरचे नबाब अहमद अली खान बहादूर यांनी बहादूरशाह जफरला २ सप्टेंबर १८५७ ला एक पत्र लिहिले होते:

बादशहांच्या हुकुमाप्रमाणे या गुलामाने बंदुकींची मागणी पूर्ण केली आहे. हुजुरांचे सामर्थ्य आणि सन्मान, अब्रू नेहमीकरता सुखरूप राहो आणि आमच्या मस्तकावर त्यांचे छत्र राहो. आपला पिढ्यान् पिढ्याचा चाकर आणि जुना निष्ठावान या नात्याने मी इच्छा व्यक्त करतो की, शाही फौजांच्या मार्फत बादशाहांच्या शत्रूंचा नि:पात होत रहावा व बादशहांचे राज्य आणि यश सदैव दुमदुमत राहो. हुजुरांची प्रजा व इतर समर्थकांना वाचवण्यासाठी आणि हुजुरांची सेना सुसज्ज ठेवण्यासाठी येथेही बंदुकीची अतोनात गरज भासत आहे, म्हणून जास्त प्रमाणात बंदुका उपलब्ध करून देता येत नाहीत. तरीही जितक्या जास्तीत बंदुका मी जमवू शकलो आहे त्या इब्राहीम अली खानच्या हाती पाठवत आहे. ह्याचबरोबर मी फरूखनगरच्या सर्व लाहोरांना हुकूम दिला आहे की त्यांनी तयार केलेल्या बंदुका शाही फौजेशिवाय इतर कोणालाही विकू नयेत; बंदुका जशाजशा तयार होत जातील तशा त्या त्वरित शाही फौजेकडे रवाना करण्यात येतील. हुजुरांना हे सांगणे जरूरीचे होते म्हणून हे निवेदन करीत आहे. बादशाहांच्या राज्यासाठी ईश्वराकडे प्रार्थना करतो.

दुसऱ्या एका पत्रात नबाबांनी बहादुरशाह जफरला लिहिले.

साऱ्या जगाचे सम्राट माझे अभिवादन. सम्राटांनी आपल्या कनिष्ठांना शानदार किताब दिले आहेत, परन्तु या कमनशिबी नबाबाचे नशीब अद्याप उघडलेले नाही, मला कोणताही किताब मिलालेला नाही. ईश्वराने बादशाहांना पुन्हा संपूर्ण हिन्दुस्थानचा राजा बनवले आहे. मी आपला गुलाम व माझे पूर्वज आपले परंपरागत चाकर. म्हणून मी निवेदन करतो की मलाही काही किताब मिळावा म्हणजे माझ्या बरोबरीच्या लोकात माझा मान वाढेल, अब्रू वाढेल. आवश्यक वाटल्याने मी हे निवेदन केले आहे. बादशाहांच्या राज्याच्या खुशालीची कामना करून स्वत:चा शिक्का मारून आणि सही करून गुलाम हे निवेदन पाठवत आहे.

दिल्लीत हिन्दुस्थानी फौजांचा पराभव आणि बादशाहाची अटक यामुळे सर्वत्र नैराश्य पसरले. सहा महिने गोरी पलटण फरूखनगरमध्ये प्रवेशही करू शकली नव्हती, परंतु आता ती सरळ मार्च करत तेथे पोचली. गोऱ्या पलटणीने फरूखनगरला वेढा घातला, दिल्ली गेटवर गोळीबार झाला. झज्जरी गेट म्हणजेच घुग्घसवरून नबाबाची फौज तीन दिवस आणि रात्री गोळ्यांचा वर्षाव करत राहिली. परंतु दिल्लीचा पराभव झाल्याने नबाबाच्या फौजेचे धैर्य खचले होते. त्यामुळे गोरी फौज शहर तुडवत, लुटमार करत, लाल दरवाजा तोडून शीशमहालात घुसली. तोपर्यंत बादशाहाच्या आत्मसमर्पणाची वार्ता घेऊन एक निरोप्या दिल्लीहून आला होता. सल्लामसलत झाल्यानंतर नबाबानेही आत्मसमर्पण केले. हातकड्या घालून शहरातील मुख्य रस्त्यावरून दिल्लीला नेण्यांत आले तिथे त्याच्यावर खटला भरण्याचे नाटक करण्यात आले. हा खटला ११ दिवस चालला. याच लाल किल्ल्यातील एका कोठडीत बादशाहाला कैदेत ठेवण्यात आले होते, त्याच्याजवळच नबाबही कैदेत होता. हातकड्या घालून रोजच नबाबाला कचेरीत नेले जाई. शेवटी २३ जानेवारी १८५८ रोजी निर्णय सुनावण्यांत आला.

त्यानुसार २४ जानेवारी १८५८ रोजी नबाबाला चांदणी चौकात-जेथे आता कारंजे आहे, फाशी देण्यात आले. त्यानंतर त्याचे शव लाल किल्ल्याच्या खंदकात फेकून देण्यात आले.

संतोष झाला. आपण, आम्ही, शाहगढ आणि तात्या टोपे यांच्यात जी सल्लामसलत झाली होती, त्यावेळी आपले राज्य असावे असेच मत प्रकट झाले होते...हा देश आमचाच आहे आणि बानपुर...... आम्ही तोफा आणि तोफे-गोळे तयार केले आहेत. ही गोष्ट गुप्तच रहावी, बाहेर पडू नये. कारण टीकमगढ.....राणी लड़ई सरकार आणि नत्थे दिवाण परकीयांच्या गोष्टींकडे खास लक्ष ठेवतात आणि ही गोष्ट जाहीर झाली तर ही बाब लक्षात ठेवावी.)

राणी लक्ष्मीबाई आणि मर्दनसिंह हे दोघे मिळून क्रांतीचे आयोजन, संचालन करत होते. मर्दनसिंहानी खिसलाचा, खुरई, विनेका, बरोदिया या किलल्यांचा ताबा घेतला होता आणि संपूर्ण सागर वेढले होते. तेथे तुंबळ युध्द झाले आणि मर्दनसिंहानी सागर जिल्हा काबीज केला यानंतर सर ह्यूज रोझ पाठीमागून पळून गेला, परन्तु त्याच वेळेस जबलपूरहून इंग्लिश फौज आली. इंग्रजांचे सामर्थ्य पाहून मर्दनसिंहानी मदनपूर घाटीतील सैन्य उठवून अमझरा घाटीकडे कूच केले. याचा फायदा घेऊन ह्यूज रोझ मदनपूर घाटीतून निघून बानपूरला पोचला. तेथील किल्ला उद्ध्वस्त करून तो भरतगडला (ताल-बेहट) पोचला व तो आपल्या ताब्यात घेतला. नंतर भरतगडहून ह्यूज रोझ थेट झाशीला गेला आणि झाशीचा किल्ला जिंकण्यातही त्याला यश मिळाले. मर्दनसिहाना ही बातमी समजली तेव्हा ते हताश झाले. राणी लक्ष्मीबाई झाशीहून निघून काल्पीला पोचल्या. काल्पीहून त्यांनी महाराजा मर्दनसिंहांना खालील पत्र लिहिले :

मूळ पत्र

(श्रावण शुध्द १४ सोम. संवत् १९१४, मुक्काम काल्पी)

(महाराणी लक्ष्मीबाई महाराजाधिराज मर्दनसिंह यांचे क्षेमकुशल चिंतितात. महाराजा शाहगढ यांच्या पत्रावरून समजले, म्हणून आम्ही येथून लिहितो की, आपण सागरकडे कूच करावे. आम्ही, तात्या टोपे आणि नानासाहेब फौजेची तयारी करत आहोत. आपण नौट घाटहून ह्यूज रोझला पळवून लावत, दौड करून काल्पीला कूच करावे. तेथे आपण सर्वजण एकत्र होऊ आणि मिळून ग्वाल्हेरमध्ये इंग्रजांवर हल्ला करू. आता याला थोडाही विलंब होता कामा नये. पत्रास त्वरित उत्तर लिहिणे.)



Yojana : Published in Hindi, English, Urdu, Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Punjabi, Bengali, Assamese & Oriya

Send your subscription by DD/MO in the name of Director, Publications Division, addressed to:

Advertisement & Circulation Manager, Publications Division, East Block-IV, Level VII,

R.K. Puram, New Delhi 110 066. Tel. 6105590; Fax : 6175516 / 6193012
Subscriptions will also be accepted at our sales emporia :

• Patiala House, Tilak Marg, **New Delhi**, Ph. 011 -3387983; • Super Bazar, Connaught Circus, **New Delhi**, Ph. 011-3313308; • Hall No.196, Old Secretariat, **Delhi**, Ph. 011-3968906; • Rajaji Bhavan, Besant Nagar, **Chennai**, Ph. 044-4917673; • 8, Esplanade East, **Calcutta**, Ph. 033-2488030; • Bihar State Cooperative Bank Building, Ashoka Rajpath, **Patna**, Ph. 0612-653823; • Press Road, **Thiruvananthapuram**, Ph. 0471-330650: I 27/6, Ram Mohan Rai Marg, **Lucknow**, Ph. 0522-208004; • C-701 Kendriya Sadan C.B.D. Belapur **New Mumbai** • State Archaeological Museum Building, Public Gardens, **Hyderabad**, Ph. 040-236393; • 1st Floor, F-Wing, Kendriya Sadan, Koramangala, **Bangalore**, Ph. 080-5537244; • CGO Bhavan, A Wing, A.B.Road, **Indore**; • 80, Malviya Nagar, **Bhopal**; • B-7/B Bhawani Singh Road, **Jaipur.**

For Yojana Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Bengali and Assamese, please enrol yourself with Editors of the respective magazines at the addresses given below :

Editor, Yojana (Marathi), B-701 Kendriya Sadan C.B.D. Belapur New Mumbai
Editor, Yojana (Gujarati), Ambika Complex, 1st Floor, Above UCO Bank, Paldi, Ahmedabad, Ph. 079-6638670
Editor, Yojana (Assamese), Naujan Road, Uzan Bazar, Guwahati, Ph. 0361-516792
Editor, Yojana (Bengali), 8, Esplanade East, Ground Floor, Calcutta, Ph. 033-2482576
Editor, Yojana (Tamil), 'A' Wing, Ground Floor, Shastri Bhavan, Chennai, Ph. 044-8272382
Editor, Yojana (Telugu), 10-2-1, F.D.C. Complex, AC Guards, Hyderabad, Ph. 040-236579
Editor, Yojana (Malayalam), 'Reshmi', 14/916, Vazhuthacadu, Thiruvananthapuram, Ph. 0471-63826
Editor, Yojana (Kannada), 1st Floor, 'F' Wing, Kendriya Sadan, Koramangala, Bangalore, Ph. 080-5537244.

राणी लक्ष्मीबाई

इंग्रजी राज्याविरुध्दचे पहिले बंड इ.स. १८५७ मध्ये झाले. हा पहिला स्वातंत्र्य संग्राम होता. यात अखेरचा मोगल बहादुरशाह जफरच्या नेतृत्वाखाली देशभरातील अनेक राजा-महाराजांनी भाग घेतला होता. राणी लक्ष्मीबाईचे नाव त्यात अग्रणी आहे. अतिशय कोवळ्या वयातच त्या हुतात्मा झाल्या. येथे त्यांची तीन पत्रे दिली आहेत. ती त्यांनी आपले सहकारी महाराजा मर्दनसिंह यांना लिहिली होती.

नवी दिल्लीतील राष्ट्रीय संग्रहालयात सुरक्षित असलेल्या या पत्रांवरून असे दिसून येते की, झाशीच्या राणी लक्ष्मीबाई आणि महाराजा मर्दनसिंग यांनी भरतगड (तालबेहट) किल्यात बसून १८५७ च्या क्रांतीची योजना तयार केली होती. महाराजा मर्दनसिंह यांना लिहिलेले हे ऐतिहासिक पत्र अशा प्रकारचे आहे :

(महाराजाधिराज श्री महाराजा श्री मर्दनसिंहजी यांचे महाराणी लक्ष्मीबाई कुशल समाचार चाहतात. येथे सर्व क्षेमकुशल आहे. आपण आला होतात तेव्हा आपल्याला सांगितले होते की, दामोदररावांना दत्तक घेण्याची कारवाई चालू आहे; परंतु इंग्रजांची त्याला संमती दिसत नाही. हे परकी लोक कोणाचेच मित्र नाहीत. अशाच प्रकारची बातचीत आपण तालबेहट किलल्यांत केली होती. आपण बुंदेल्यांच्या सर्वात उच्च गादीवर विराजमान आहात, म्हणून आम्हाला भरवसा वाटतो, म्हणून प्रत्येक वेळी आपल्याशी सल्लामसलत करायची आहे. पत्र वाचताच उत्तर पाठवावे.)

एवढ्यातच १८५६ चा संग्राम सुरू झाला व ४ जून १८५७ पर्यंत त्याचा वणवा सर्वत्र पसरला. ही बातमी बुंदेलखंडला पोचली तेव्हा सागर आणि ललितपूरच्या राजांनी इंग्रजांचा पराभव करून राजा मर्दनसिंह यांना सेनापती केले. याचवेळी राणी लक्ष्मीबाईंना महाराजा मर्दनसिंह यांनी एक निरोप पाठवला होता. त्या पत्राच्या उत्तरात राणीने त्यांना लिहिले होते की :

मूळ पत्र

पाती बातमी. (संवत् १९१४ मोहर)

(महाराणी लक्ष्मीबाईंच्या वतीने महाराजा राजा मर्दनसिंह यांचे क्षेमकुशल इच्छितात. येथे सर्वकुशल आहे. याआधी दिवाण गौस जे पत्र घेऊन आले त्यामुळे

Subscription Coupon

[For New Membership / Renewal / Change of Address]

I want to subscribe to :

Yojana : 1Yr. Rs. ***100/-;*** 2 Yrs. Rs. **180/-;** 3 Yrs. Rs. **250/-**

(Circle the period of suscription)

DD/MO No.__________ date__________

Name (In block letters) : __________

Subscriber profile : Student / Academician / Institution / Others

Address : __________

PIN : ☐☐☐☐☐☐

Please allow us 4 to 6 weeks for the despatch of the first issue.
P.S. : For Renewal/change in address, please quote your subscription number ☐

हुतात्म्यांची पत्रे

बटुकेश्वर दत्त

भगतसिंग आणि बटुकेश्वर दत्त यांनी राजकीय कैद्यांना देण्यात येणाऱ्या वागणुकीत सुधारणा करण्याच्या मागणीसाठी उपोषणाची योजना आखली होती. उपोषणाची नाटीस देताना बटुकेश्वर दत्त यांनी लाहोर तरुंगाच्या अधीक्षकांना खालील पत्र लिहिले होते.

अधीक्षक, सेंट्रल जेल, लाहोर,

१७ जुन १९२९

मी तुम्हाला आणि उच्च अधिकाऱ्यांना हे सांगू इच्छितो की, राजकीय बंदी या नात्याने मी खालील सोयींची मागणी करू शकतो. असेब्लीत बॉम्ब फेकण्यात आल्यानंतर लॉर्ड आयर्विन यांनी आपल्या अखेरच्या भाषणात म्हटले होते की, हा बॉम्ब कोणा एका व्यक्तीवर नव्हे, तर एका संस्थेवर टाकण्यात अला आहे. नंतर श्री मिडलटन यांनी आपला निर्णय देताना म्हटले होते की, हे लोक (भगतसिंग आणि दत्त) न्यायालयात इन्किलाब जिंदाबाद, सर्वहारा जिंदाबाद अशा घोषणा देत येत असत, त्यावरुन ते कोणत्या राजकीय विचारांचे आहेत हे कळत होते. ह्या विचारांच्या प्रसाराला आळा बसावा म्हणून मी त्यांना जन्मठेपेची शिक्षा देत आहे.

मी पुन्हा हे सांगू इच्छितो की, कोणीही युरोपियन मनुष्य स्वार्थाकरता कायद्याचा भंग करतो आणि तुरुंगात जातो तेव्हा त्याला तुरुंगात सर्व तऱ्हेच्या सुखसोयी मिळतात. त्याला वीज असलेली हवेशीर खोली, उत्तम आहार (दूध, लोणी, पाव, मांस.....इ.) आणि चांगले कपडे मिळतात. परंतु आम्ही राजकीय कैद्यांना या सोयी उपलब्ध करून दिल्या जात नाहीत. लॉर्ड आयर्विन आणि श्रीयुत मिडलटन यांच्या टिपणीवरून हे सिध्द होते की त्यांनीही



(सौजन्य : - ओसियन्स)

आम्हाला राजकीय कैदीच म्हटले आहे. त्याच्याच आधारे आम्हाला राजकीय कैद्यांची वागणूक द्यावी अशी मागणी करतो. मला चांगला आहार मिळाला पाहिजे, माणसाच्या आरोग्याला आवश्यक असतो तसा! त्याचबरोबर राजकारणावर विचार करण्यासाठी मला सर्वप्रकारचे साहित्य आणि वर्तमानपत्रे मिळाली पाहिजेत. लोक आम्हाला हटवादी, दिशाभूल झालेले आणि अधीर नवतरुण म्हणतात. म्हणून मला वेगवेगळी पुस्तके वाचायची संधी मिळाली पाहिजे, आम्ही खरेच असे तरुण आहोत का हे आम्हाला अजमावता येईल. आमचे काम योग्य की अयोग्य हे ठरवता येईल. माझ्या मागण्या अशा आहेत :-

१) चांगला आहार, सकाळी दूध आणि पाव, दुपारी डाळ, भात, तूप, भाजी आणि साखर, तर रात्री पाव, मटण आणि चटणी

२) अंगमेहनतीची कामे करायला न लावणे.

३) वर्तमानपत्रे आणि सर्व प्रकारचे साहित्य उपलब्ध करून देणे.

४) आंघोळीची व्यवस्था, साबण, तेल, कंगवा आणि दाढीचे सामान याची व्यवस्था करणे.

५) चांगली खोली देणे.

६) स्वतःचे कपडे

शिक्षा मिळण्यापूर्वी आणि नंतरही मला या गोष्टी तुरुंगाच्या खर्चाने मिळत होत्या; पण येथे यापैकी काहीच मिळत नाही. म्हणून मी १४ जून १९२९ पासून उपोषण सुरू केले आहे. याच कारणांसाठी माझे सहकारी भगतसिंग यांनी मियांवाली तुरुंगात उपोषण सरू केले आहे. सरकार आमच्या मागण्या पूर्ण करत नाही तोपर्यंत मी उपोषण सोडणार नाही. त्वरित उत्तराची मी आशा करतो. कोणीही सरकारी अधिकारी आला तरी त्याच्याशी या विषयांवर विचारविनिमय करायला मी तयार आहे.

बी. के. दत्त
कैदी, असेंब्ली बॉम्ब प्रकरण

क्रांतीचा जयजयकार

गर्जा जयजयकार, क्रांतिचा गर्जा जयजयकार
अन् वज्रांचे छातीवरती घ्या झेलून प्रहार !
खळखळूं द्या या अदय श्रृंखला हातापाया
पोलादाची काय तमा मरणाच्या दारांत?
सर्पांनो उद्दाम, आवळा कसूनिया पाश
पिचेल मनगट परी उरांतिल अभंग आवेश
तडिता घाते कोसळेल का तारांचा संभार
कधीही तारांचा संभार
गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार!

नाचवितां ध्वज तुझा गुंतले श्रृंखलेत हात
तुझ्या यशाचे पवाड गातां गळ्यांत ये तात
चरणांचे तव पूजन केले म्हणुनि गुन्हेगार
देतां जीवन —- अर्घ्य तुला ठरलो वेडेपीर
देशिल ना पण तुझ्या कुशीचा वेड्यांना आधार
आई, वेड्यांना आधार
गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार !

कशास आई, भिजविसि डोळे उजळ तुझें भाल
रात्रीच्या गर्भात उद्यांचा असे उषःकाल
सरणावरतीं आज आमुचीं पेटतांच प्रेते
उठतिल त्या ज्वालांतुन भावी क्रांतीचे नेते
लोहदण्ड तव पायामधले खळाखळा तुटणार
आई, खळाखळा तुटणार
गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार !

वि. वा. शिरवाडकर
'कुसुमाग्रज'

Victory be to the Revolution

Let us sing a victory song to the revolution (and for so doing) we shall take blows of thunderbolt ('vajra') on our chests. Let these heavy iron chains clatter in our legs and wrists. What do we care for them while we are at the threshold of death? O Tyrant! What though you tighten this noose around us? our wrists may break, but the spirit in us shall not diminish. can a bolt cause the downfall of a cluster of stars in the sky?

Our hands are chained because we waved your flags. We are being sent to the gallows, because we sang of your success. We are branded criminals because we offered worship at your feet. They call us mad because we are prepared to sacrifice our lives at your altar. O Mother! Will not you (at least) take your 'mad' sons to your bosom?

O Mother! Let not your eyes moisten with tears for your future is very bright. The darknesss of night conceals the dawn of tomorrow. While our dead bodies burn on the pyre, a thousand leaders of future revolution would spring up. And (as a result of their efforts) your shackles, O Mother, shall break with a clanging sound.

V.V. Shirvadkar
'Kusumagraja'

स्रोत - एन. सी. ई. आर. टी च्या 'स्ट्रगल फॉर इंडिपेन्डन्स' मधून विशेष करारानुसार)

तयाला तुरुंग भिवविल किती?

मातृभूमिच्या उध्दारास्तव देह दिला करवतीं
तयाला तुरुंग भिवविल किती ? ।। धृ।।

शुभमालेसम लोहशृंखला मानित जो सर्वदा ।
तयाला काय करिल कायदा ।।

प्राण पणाला लावुन प्रेमें राजकारणी उडी ।
घेइ जो सत्याचा सवंगडी ।।

स्वार्थत्यागी विषयविरागी मर्द मानधन असा ।
शत्रुला शिर नमविल तो कसा ।।

देशास्तव सर्वस्व समर्पिन ध्येय जयाचे निकें ।
तया गृह कारागृहसारिखे ।।

कलाकुशल कल्पनाविलासी प्रयत्नवादी मुनी ।
जनांच्या स्तुतिसुमनांचा धनी ।।

अंतरी श्रीहरी सदोदीत करितो मज प्रेरणा ।
म्हणे लव गर्व न ज्याच्या मना ।।

त्रस्त जिवाच्या मुप्त भावना व्यक्त करुनि दाखवी ।
प्रतापी हा पुण्यात्मा कवी ।
स्वातंत्र्यस्फूर्तिचे सिंचुनि अमृतकण ।
मृत मानवतेला आणितसंजीवन ।
तो सेनापति कवि साहिल का बंधन?

अरिशिबिरीं क्षण विश्रांतीस्तव जात सुखे संप्रती ।
तयाला तुरुंग भिववील किती ? ।।१।।

हरिहर गुरुनाथ सालगरकर
'कुंजविहारी'

स्रोत - एन. सी. ई. आर. टी च्या 'स्ट्रगल फॉर इंडिपेन्डन्स' मधून विशेष करारानुसार)

How can the prison walls frighten Him

How can the prison walls frighten Him (a patriot)
Who has knowingly dedicated his self unto his motherland?
How can the laws (of foreign rulers) deter him
Who always regards iron chains as flower garlands?

He Who is the lover of truth who takes a leap (into freedom movement) caring little for his own life.
He who is selfless and brave and has given up lust
Will he bow down ever to the enemy?

One whose pure aim is to devote everything to the motherland
To him, iron bars are like a sweet home.

A dreamer of dreams yet exerting like a saint
People shower praises on him
'What I do is inspired by God,' says he.
For he never boasts.

Like a poet, he gives expression to people's predicament.
He inspires them with thoughts of freedom.
He awakens them from their slumber.
Will such lieutenant (people's leader) ever accept any restrictions?

He is going to the enemy-camp for a while to rest.
How can the prison walls frighten him ?

Harihar Gurunath Salgarkar
'Kunjaviharil'

की, तिथली काही ब्राह्मण मंडळी नैमिषारण्य आणि अयोध्येच्या यात्रेला निघाली आहेत. तेव्हा या दोघांनीही त्यांच्यासोबत जाण्याचा निर्णय घेतला.

हे प्रवासी आधी लखनौला गेले. तिथून निमिषारण्यात पोहोचले वाटेत त्यांना अनेक ठिकाणी क्रांतिकारक आणि इंग्रजांमधल्या संघर्षाचे दर्शन झाले. नैमिषारण्यात आठ दिवस काढून हे प्रवासी अयोध्येकडे निघाले. तिथल्या विविध मंदिराचे दर्शन घेऊन काका-पुतणे लखनौमार्गे काशीला पोहोचले. तिथे त्यांची वरसईहून तीर्थयात्रेसाठी आलेल्या नाना रहाळकरांशी गाठ पडली काशी यात्रा पूर्ण करून दोघेही प्रयागला पोहचले तिथे देवदर्शन धर्मकृत्ये करताना एक दिवस त्यांनी पुरूषोत्तम बाबांचे प्रवचन ऐकले. त्यांच्या प्रवचनात गंगेची कावड नेऊन माता-पित्यांना स्नान घालण्याने होणाऱ्या पुण्याचे वर्णन होते विष्णुभटांनीही प्रयागहून गंगेची कावड भरून वरसईला नेण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर काका-पुतणे विंध्यवासिनी देवीच्या दर्शनाला निघाले. तिथून प्रयागला परतल्यावर विष्णुभटांनी कावड खरेदी केली. दोन रुद्र म्हणजेच चामड्याच्या २२ छोट्या कुप्या भरून विधिवत गंगाजल घेतले कावडीत गवत लावून ती बंद केली. आता पुढच्या प्रवासात श्राद्ध संस्काराचे अन्न ग्रहण न करणे, शुद्ध परान्न ग्रहण करणे, पादात्राणांचा उपयोग न करणे, पगडी न वापरणे इत्यादी नियमाचे पालन करणे त्यांना आवश्यक होते.

१९५८ मध्ये एका शुभदिनी जुलै महिन्यात विष्णुभट आपले काका आणि नाना रहाळकर यांच्यासोबत खांद्यावर कावड घेऊन प्रयाग बघून ब्रह्मावर्ताकडे निघाले. चार पाच दिवस ब्रह्मवर्तात राहून ग्वाल्हेरकडे रवाना झाले. वाटेत पुन्हा झाशी लागली. तिथे ते आठ दिवस राहिले. बऱ्याचशा पूर्वपरिचिताना भेटले. ऑगस्ट महिन्यात पावसाळ्यातच ते झाशीहून सागरकडे निघाले इंग्रजांनी झाशी पासून सागरपर्यंत नवीन रस्ता बांधून जागोजाग चौक्या उभारल्या होत्या अशी नोंद त्यांनी या प्रवासात केली आहे. त्या रस्त्याने वाटचाल करत मंडळी १९५८ च्या सप्टेंबर महिन्याच्या प्रारंभी जन्माष्टमीला सागरमध्ये पोहोचली तिथे हे तिन्ही प्रवासी आठ दिवस राहिले या काळात विष्णुभटांनी विचार केला की , आपण शांडिल्य गोत्री आहोत, तेव्हा सागरहून गावी जाताना नर्मदाकिनारी शांडिल्य तीर्थाची यात्रा करूनच जावे. त्यामुळे ही मंडळी आधी तिकडे वळली. शांडिल्य ऋषींच्या आश्रमाच्या ठिकाणी वसलेल्या या तीर्थक्षेत्राला भेट दिली.

याच सुमारास तात्या टोपे नवी रसद मिळविण्याच्या हेतूने महाराष्ट्राच्या दिशेने कूच करत होते. विष्णुभटांच्या नोंदीनुसार तात्यांनी शांडिल्यतीर्थाच्या आसपास नर्मदा पार केली. बैतुल जिल्ह्यातला मुलताई येथून आगेकूट करत ते विदर्भातल्या अमरावती जिल्ह्यातल्या मेळघाटात पोहोचले होते. इंग्रज त्यांच्या मागावर होतेच. तसंच दक्षिणेत त्यांना पुढे जाता येऊ नये, म्हणून इंग्रजांनी मोर्चेबांधणीही केली होती. तात्यांना अखेर विवश होत पुन्हा नर्मदा पार करून राजस्थानकडे कूच करणे भाग पडले.

दरम्यान, आपले प्रवासी हुशंगाबाद येथे पोहोचल्यावर विष्णुभटांना एका संकटाचा सामना करावा लागला. तिथल्या पोलिसांना ते क्रांतिकारक असावेत असा संशय आला. त्यांना चौकीवर नेऊन विचारपूस करण्यात आली, पण कावड बघून त्यांची खात्री पटली की हे खरेच यात्रेकरु आहेत तेव्हा त्यांना सोडून दिले, सोबत सुरक्षित यात्रे साठी प्रमाणपत्रही दिले. इथून पुढे हे प्रवासी नेमावर मार्गे इंदूरला पोहोचले. तिथे होळकरांच्या एका सरदाराने आयोजित केलेल्या अनुष्ठानात सहभागी झाले. थोडीफार द्रव्यप्राप्ती झाली. विष्णुभटांनी इथेही नोंदवून ठेवले की, ग्वाल्हेरच्या शिद्यांप्रमाणेच इंदूरचे होळकरही इंग्रजांचीच तरफदारी करीत होते.

इंदूरहून परतीचा प्रवास सुरू झाला. येताना बैलगाडी होती. आताही काका आणि रहाळकर बैलगाडीतूनच सातपुडा ओलांडत होते, विष्णुभटांच्या खांद्यावर मात्र कावड होती. प्रयाग ते वरसई पायी प्रवास त्यांना अनिवार्य होता. पादत्राणेही नाहीत, तळवे फाटले पायाला फडकी बांधली, यात्रा नेटाने सुरू ठेवली. त्र्यंबकेश्वर, पंचवटी, सप्तश्रृंगीचे दर्शन घेत पुणे गाठले, घाट पार करून माझा प्रवासाचे प्रवासी वरसईत पोहोचले. अडीच वर्षांचा प्रवास संपला.

प्रवासवर्णनाच्या शेवटी विष्णुभट लिहितात या प्रवासाने कळले की द्रव्य मिळवणे कठीण आहेच पण ते सांभाळून ठेवणे जास्त कठीण. कर्ज फेडावे म्हणून प्रवास केला एवढे कष्ट झेलून परतलो तरी कफल्लकच, पण ५७ च्या बंडाची जी काही आठवण मनात राहिली ती सगळी लिहून काढली, हीच या प्रवासाची कमाई !

विष्णुभट गोडसेंच्या या प्रवासवर्णनात १८५७ च्या संघर्षाव्यतिरिक्त इतरही आठवणी आहेत. झाशीच्या धर्माचार्य नारायण शास्त्रींचे मेहेतर समाजाच्या कन्येवर मोहित होणे, तिच्याशी अनैतिक संबंध ठेवणे, नंतर तिलाच इतर ब्राह्मणांकडे जाण्यास परवानगी देत. त्यांचे पितळे उघडे पाडणे, अखेर हद्‌पारी झाली तरी तिच्याशीच विवाह करणे. प्रयागच्या गंगेतील नग्न स्नान व इतर मनोरंजक प्रथांचे वर्णन त्यात आहे. पण हे वर्णन करतानाही विष्णुभट आपण क्रांतीचे कथन करतो आहोत हे विसरत नाहीत, मात्र त्यामुळेच हे पुस्तक १८५७ च्या क्रांतीबरोबरच त्या काळातील सामाजिक आणि सांस्कृतिक परिस्थितीवर प्रकाश टाकणारे पुस्तक ठरले आहे.

आणि त्यांच्या काकांनी ब्रह्मवर्तास जाण्याचा निर्णय घेतला वाटेत काल्पीच्या थोडे अलिकडे त्यांची पुरूषवेषातल्या राणी लक्ष्मीबाईंची गाठ पडली त्याही काल्पीकडेच जात होत्या त्यांच्या सोबतच ही मंडळी काल्पीत पोहोचली तिथे त्यांची तात्या टोपे आणि नानासाहेब पेशव्यांचे पुतणे रावसाहेब यांची भेट झाली. तिथेच त्यांना कळले की काल्पीतही येत्या एक दोन दिवसात घनघोर संर्घष अपेक्षित आहे. राणी लक्ष्मीबाईनीही त्यांना सल्ला दिला की, इथे थांबू नका आणि मुख्य रस्ता चाटून दुसऱ्या वाटेने ब्रह्मावर्ताकडे निघा.

विष्णु आणि त्यांचे काका काल्पीमधून निघाले त्याच दिवशी काल्पीमध्ये युद्ध सुरू झाले. या युद्धात क्रांतिकारकांचा पराभव झाला आणि ते जंगलात विखुरले. विष्णुभट लिहीतात की, एका दक्षिण भारतीय ज्योतिषाचा सल्ला ऐकून तात्या टोपे, रावसाहेब आणि लक्ष्मीबाई ग्वाल्हेरकडे निघाले. तिथे त्यांनी शिंद्यावर विजय मिळवून भरपूर धन आणि कुमक प्राप्त केली.

(सौजन्य : - ओसियन्स)

पण थोड्याच दिवसात ग्वाल्हेरजवळ इंग्रजांच्या फौजेशी झालेल्या लढाईत लक्ष्मीबाई शहीद झाल्या विष्णुभटांनी या घटनेची नोंदही आपल्या पुस्तकात केली आहे.

लढाईत झाशीच्या राणीला बंदुकीची गोळी लागली तरी तिचे लढणे थांबले नाही, नंतर तिच्यावर तलवारीचा वार झाला आणि ती घोड्यावरुन कोसळली, राणीचे पार्थिव शरीर तात्या टोपेंनी पुढे होत उचलले, रणभूमीबाहेर एके ठिकाणी अग्नी दिला, दत्तकपुत्र दामोदरला नेपाळच्या सरहद्दीवर नानासाहेबांकडे पाठवण्याचा निर्णय घेतला.

काल्पीहून निघालेले विष्णुभट आणि त्यांचे काका ब्रह्मावर्तात पोहोचले. आयुष्यात प्रथमच गंगेचे दर्शन झाल्याने संतुष्ट झाले. ते ब्रह्मावर्तात राहिले सगळी तीर्थक्षेत्रे पाहिली. धर्मकार्ये केली ब्रह्मावर्तातच त्यांना कळले की, श्रीमंत नारायणराव आणि माधवराव पेशव्यांनी चित्रकूट येथे अनुष्ठान सुरू केले आहे. ब्रह्मावर्तातून काही ब्राह्मण तिथे जाताहेत. विष्णुभटांना पुन्हा आशा वाटली की, तिथे काही द्रव्य मिळेल. त्यामुळे त्यांनी ठरवले की आधी चित्रकूटला जाऊ तिथून काशीयात्रेला जाऊ. काकापुतणे चित्रकूटला पोहोचले, चित्रकूट पर्वताची यात्रा केली.

विष्णुभटांनी आपल्या पुस्तकात चित्रकूट मधल्या एका महत्त्वाच्या घटनेची नोंद घेतली आहे. ते म्हणतात की, नारायणराव आणि माधवराव पेशव्यांचे इंग्रजांशी सलोख्याचे संबंध होते. पण त्यांचे दिवाण राधाकिसन बंडखोर होते. त्यांनी क्रांतिकारकांशी संधान साधून लढाईची तयारी केली होती. इंग्रज कलेक्टरला हे कळताच तो घाबरला, आपली कागदपत्रे व खजिना नारायणराव पेशव्यांकडे सोपवून तो चित्रकूटमधून निघून गेला. काही दिवसानंतर गोऱ्यांच्या दोन पलटणी आल्या. त्यांनी शहराबाहेर डेरा टाकला. त्यांच्या कॅप्टनने पेशव्यांना निरोप पाठवला की इकडे या आणि भेटा. दिवाणाने खूप समजावले की यात धोका संभावतो, जाऊ नका. पण पेशव्यांनी ऐकले नाही. दुसऱ्या दिवशी ते इंग्रज कॅप्टनला भेटायला गेले. तिथे पेशव्यांना अटक करण्यात आली. त्यानंतर १५० शिपायांना शहरात पाठवून पेशव्यांच्या महालातल्या सर्व किंमती चीजवस्तू नेण्यात आल्या खजीना घेऊन गेले चित्रकूट मधल्या अनेक लोकांनी आपला पैसाअडका, चीजवस्तू सुरक्षितेसाठी पेशव्यांकडे ठेवल्या होत्या त्याही इंग्रजांच्या घशात गेल्या. चित्रकूटची ही दुर्दशा पाहून विष्णुभटांना फार दु:ख झाले गावातली दंगलीची स्थिती बघुन दोघेही काका-पुतणे पुन्हा ब्रह्मावर्ताकडे निघाले.



(सौजन्य : - ओसियन्स)

वाटेत त्यांना अनेक संकटांचा सामना करावा लागला. उन्हाळ्याचे दिवस होते. काकांना लू लागली. रस्त्यात मदतीला कोणीच भेटले नाही. विष्णुभटांना नारू लागला. पाय सुजले, चालणे कठीण झाले. मुश्किलीने प्राण वाचले. एका बैराग्याने औषधपाणी केले, त्याने थोडे बरे वाटले. दोघेही ब्रह्मावर्तात पोहोचले तिथे महिनाभर मुक्काम केला. नंतर कळले

विष्णुभटांनी 'माझा' प्रवास मधल्या एका स्वतंत्र प्रकरणात कानपूरची क्रांती, तिथले युद्ध, सतीचौऱ्याची घटना, ब्रह्मावर्तातला विध्वंस नानासाहेबांचे अयोध्येकडे निघून जाणे इत्यादि घटनांचे सविस्तर वर्णन केले आहे.

सन् १८५३ मध्ये गंगाधरराव यांचे देहावसन झाले. त्यानंतर राणी लक्ष्मीबाई यांनी आपला दत्तक पुत्र दामोदरराव याला कंपनी सरकारने राजा म्हणून मान्यता द्यावी, याकरता बरेच प्रयत्न केले. पण लॉर्ड डलहौसीने तिच्या प्रयत्नांना अजिबात दाद दिली नाही. झाशी संस्थान इंग्रजांच्या राजवटीत सामील करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. राणी लक्ष्मीबाई हा फैसला करताच संतापल्या, म्हणाल्या 'मेरी झाँसी नही दूँगी.'

देशात ठिकठिकाणी इंग्रजांच्या विरुद्ध संघर्षाची तयारी सुरू होती. आतल्या आत क्रांतीची आग भडकत होती. राणी लक्ष्मीबाई सुद्धा क्रांतिकारकांच्या नेत्यांशी संपर्कात होत्या. कानपुरात ४ जून १८५७ रोजी क्रांतीचा शुभारंभ झाला त्याच दिवशी झाशीत क्रांतीचा उद्रेक झाला. त्यानंतर चारच दिवसात झाशीत घोषणा झाली 'खल्क खुदा का, मुल्क बादशाह का, हुकूमत महारानी लक्ष्मीबाई की', राणी लक्ष्मीबाई शहरातला आपला राणी महाल सोडून किल्ल्यात रहायला गेली. त्यांनी झाशी सरकारची सूत्रे स्वतःच्या हाती घेतली. १४ हजार सैनिकांची सेना उभी केली. तोफांची दुरूस्ती किल्ल्याची डागडूजी करवून घेतली, नवे बुरूज उभारले. या सगळ्या घटनांची सविस्तर माहिती 'माझा प्रवास' मध्ये देण्यात आली आहे.

ऑक्टोबर १८५७ मध्ये विष्णुभट आपल्या काकांसह झाशीत पोहोचले. तिथे ते केशवभट मांडवगणे यांच्याकडे उतरले होते. तिथे ते लक्ष्मीबाईंचे वडील मोरोपंत तांबे यांनाही भेटले. काका रामभट यांचा मोरोपंताशी ब्रह्मवर्तात पूर्वीच परिचय झाला होता. त्यामुळे या काका-पुतण्यांचे झाशीत चांगलेच स्वागत झाले. दोघांनी किल्ल्यात जाऊन राणी लक्ष्मीबाईंचीही भेट घेतली. त्यांनी संस्थानातर्फे दोघांच्याही निवासाची उदरनिर्वाहाची व्यवस्था केली.

'माझा प्रवास' मधले चौथे प्रकरण आहे झाशी वर्णन. यात विष्णुभटांनी झाशी आणि लक्ष्मीबाईबद्दल विस्तृत आणि महत्त्वाची अशी माहिती दिली आहे. दत्तक प्रकरण, लक्ष्मीबाईंची दिनचर्या, दानशूरता, राणीची अश्वपरीक्षा इत्यादिं माहिती आहे. याच प्रकरणामध्ये झाशीमध्ये इंग्रजी सैन्याशी झालेला युद्धाचे प्रत्यक्षदर्शी वर्णन आहे. विष्णुभटांनी स्वतः पाहिलेल्या आणि अनुभवलेल्या या युद्धाचे प्रत्येक दिवसाचे विस्तृत विवरण दिले आहे. विष्णुभटांच्या म्हणण्यानुसार इंग्रज कॅप्टन ह्यु रोज आपली फौज घेऊन झाशीच्या पश्चिमेला दीड कोसांवर पोहोचला. तिथूनच त्याने राणी लक्ष्मीबाईंना खलिता धाडून आत्मसपर्मण करण्यास फर्मािवले त्यावर राणी लक्ष्मीबाईंनी आपल्या सरदारांशी विचार विनिमय करून उत्तर धाडले, त्याला कळवले, आमचा युद्धाचा काही इरादा नाही. राज्य रक्षणासाठी केवळ तीन-चार तोफा आणि काही सैनिक तयार केले आहेत. उत्तर मिळाल्यानंतर ह्यु रोजने दतियाच्या राजाकडून मदत मिळवली आणि २२ मार्च रोजी झाशीवर हल्ला केला. राणी लक्ष्मीबाईंनी त्याला चोख उत्तर दिले. तोफेला पहिली बत्ती स्वतः राणीसरकारांनी दिली. झाशीच्या मदतीला या असा निरोप तात्या टोपे आणि रावसाहेबांना काल्पिला धाडला

विष्णुभट आणि त्यांचे काका युद्धकाळात किल्ल्यातच राहत होते. अधुनमधुन बुरुजांवर चढून प्रत्यक्ष लढाई बघत होते. विष्णुभट 'माझा प्रवास' मध्ये लिहितात, 'आठव्या दिवशी ३० मार्चला धमासान युद्ध झाले. बंदुका आणि तोफांच्या आवाजाशिवाय दुसरे काहीही ऐकू येत नव्हते. सर्वत्र धुरळा माजला होता, धुराचे लोट उठले. स्फोटांच्या आवाजांसोबतच नगारे बिगुल वाजत होते. त्यातही माणसांच्या किंकाळ्या-आरोळ्या कानावर पडत होत्या. इंग्रजी फौजांनी मोठाच विध्वंस केला. संपूर्ण शहरांवर लालभडक तोफगोळ्यांचा अग्निवर्षाव होत होता. तटबंदीवरचे शिपाई, गोलंदाज एकापाठोपाठ धराशायी होत होते, नवे त्यांची जागा घेत होते. लक्ष्मीबाईंचा सतत सर्वत्र संचार होता. त्या जातीने परिस्थितीवर नजर ठेवून होत्या. त्यांना एकच चिंता सतत सतावत होती. पेशवे अजूनपर्यंत आपल्या फौजेसह पोहोचले का नाही, तात्या टोपेंच्या नेतृत्वाखाली पेशव्यांची फौज पोहोचेपर्यंत काहीही करून किल्ला लढवायचा होता ?

प्रत्यक्षात तात्या टोपे २० हजार सैनिकांची फौज घेऊन झाशीच्या जवळ बेतव्यापर्यंत पोहोचले होते. ह्यु रोजला ही बातमी कळताच त्याने तात्यांना तिथेच रोखून धरले. विष्णुभट लिहीतात की, बैतव्यातली लढाई समोरा - समोरची लढाई होती. झाशीच्या राणीचे सरदारही दुर्बिणीतून या संघर्षाची पाहणी करीत असत झाशीचे दुर्भाग्य म्हणा किंवा तात्यांच्या अकुशलतेनं, तात्या टोपेंच्या फौजेची वाताहत होऊ लागली. या विजयामुळे इंग्रजांची हिम्मत वाढली. ह्यु रोजने एका घरभेद्याच्या मदतीने किल्ल्यात प्रवेशाचा मार्ग शोधला. विष्णुभटांच्या अनुसार या घरभेद्याचे नाव दुलाजीसिंग होते. तो झाशीत चार हजार सैनिकांचा सरदार होता. त्याने सांगितलेल्या ठिकाणी तटबंदी फोडून इंग्रज फौजा शहरात घुसल्या. आता शहरातच युद्ध सुरू झाले. लूटालूट आणि हत्याकांडाने झाशी शहर हादरून गेले.

प्रजेचे हाल राणीला बघवत नव्हते. तिने ज्येष्ठांशी विचारविनिमय करून झांशी सोडण्याचा निर्णय घेतला. वडील मोरोपंत तांबे आणि इतर निकटवर्तीय यांना सोबत घेऊन एका रात्री राणी लक्ष्मीबाईंनी पुरुष वेशात दत्तकपुत्र दामोदरला पाठीवर बांधून झाशी सोडली, काल्पीच्या दिशेने प्रस्थान ठेवले. तो दिवस होता ४ एप्रिल १८५८. त्यानंतरही इंग्रजी फौजेने झाशीत बरेच दिवस लूटालूट चालवली होती. विष्णुभट आणि त्यांचे काका आता किल्ला सोडून पुन्हा शहरात रहायला आले होते. पण आता दिवस फिरले होते, अन्नान्न दशा झाली होती. अनेकदा लपून छपून रहावे लागत होते. सदैव मरणाची भीती होती.

झाशीतले कष्ट असह्य झाल्यावर विष्णुभट

खजीना लूटून क्रांतिकारी सैनिक छावणीबाहेर पडत होते. त्यांनी विष्णुभट आणि त्यांच्या सहयोगी प्रवाशांना पाहिले. शंभर दोनशे सैनिकांनी या भिक्षुकांना घेरले भिक्षुकांनी आपल्या पोथ्या दाखवत सांगितले की, बायजाबाई शिंदे यज्ञ करताहेत त्यासाठी आम्ही चाललो आहोत. सैनिकांचा विश्वास बसला त्यांनी या प्रवाशांनाही आपल्या आश्रयाखाली घेतले. त्याचवेळी टपाल घेऊन येणारी गाडी तिथे पोहोचली. सैनिकांनी टपाल घेऊन आलेल्या माणसाला मारून उपयुक्त माल ताब्यात घेतला. पत्रे मैदानात फेकून दिली.

दुपारी विष्णुभट आपल्या काकांसमवेत जळून खाक झालेली छावणी बघायला गेले. तिथे गोऱ्यांबरोबरच २०-२५ काळ्यांचीही प्रेत त्यांना दिसली. महू इथे तीन दिवस मुक्काम केल्यानंतर समस्त भिक्षुक क्रांतिकारी सैनिकांच्या आश्रयानेच पुढच्या प्रवासाला निघाले. विष्णुभटांना सैनिकांसोबत प्रवास फारसा रुचला नाही. आपण स्वतंत्रपणे प्रवास करू या असा आग्रह ते धरत होते. त्यांची विनंती सुभेदाराने ऐकली. इंदोरला पोहोचल्यावर ठरल्याप्रमाणे विष्णुभट आणि मंडळींना पुण्याहून घेऊन आलेली बैलगाडी परत पाठवावी लागली, पण क्रांतिकारकांच्या सुभेदाराने या मंडळींना उज्जैन पर्यंतच्या प्रवासासाठी नव्या बैलगाडीची व्यवस्था करून दिली, सोबत पहारेकरीही दिले. वर प्रत्येक ब्राह्मणांला २-२ रुपये दक्षिणाही दिली. प्रवासी उज्जैनच्या दिशेने मार्गस्थ झाले. उज्जैनला गोडसे काका-पुतणे आणि कर्वे कुटुंब ज्या घरी उतरले होते तिथे ग्वाल्हेरहून वैशंपायन यांचे पत्र आले. त्यात त्यांनी स्पष्ट लिहिले होते की, सध्या सर्वत्र हिसांचार माजला आहे. दंगे होताहेत म्हणून गोडसे-कर्वे मंडळींनी ग्वाल्हेरकडे येऊ नये उज्जैनमध्येच थांबावे शातता प्रस्थापित झाल्यावर पत्र टाकतो, नंतरच ग्वाल्हेरला यावे. हे पत्र वाचल्यानंतर काही दिवस उज्जैनमध्येच काढायचे ठरले चार-पाच दिवस उज्जैनदर्शन आणि धर्म-कर्म केल्यावर विष्णुभट आणि त्यांचे काका धारानगरीच्या दिशेने निघाले. तिथले महाराजा पवार यांचे निधन झाले होते. उत्तर क्रियेवर बराच खर्च होणार होता. आपल्यालाही चांगली दान-दक्षिणा मिळेल या आशेने हे दोन्ही भिक्षुक धारानगरीत दाखल झाले. तिथला महादान समारंभ बघितला, त्यातही दक्षिणा मिळाली.

काही दिवस धारानगरीत काढून काका-पूतणे उज्जैनला परतले. तिथे वैशंपायन यांचे पत्र आले होते. आता थोडी बहुत शांतता आहे, ग्वाल्हेरला यायाला हरकत नाही. शिंदे सरकारांचे २५ शिपाई उज्जैनहून ग्वाल्हेरला येताहेत. त्यांच्या सोबतीने या असे त्यांनी कळविले होते. त्यानुसार उज्जैन येथे नवी बैलगाडी भाड्याने घेऊन मंडळी निघाली, सारंगपूर सिप्री मार्गे ग्वाल्हेर मध्ये वैशंपायन यांच्याकडे सुखरुप पोहोचली. पण चहुकडे दंगे भडकल्याने बायजाबाईचा यज्ञ स्थगित करण्यात आला होता. तरीही दक्षिणेतून ग्वाल्हेरमध्ये पोहोचलेल्या ब्राह्मणांचा सत्कार करून त्यांच्या निर्वाहाची व्यवस्था करण्यात आली. विष्णुभट आणि त्यांचे काका काही दिवस ग्वाल्हेरच्या किल्ल्यात राहिले. 'माझा प्रवास' या पुस्तकात जवळचे तत्कालीन ग्वाल्हेर गाव आणि महादजी शिंद्यानी जवळच वसवलेली लष्करी छावणी याबाबत विस्ताराने माहिती दिली आहे. विष्णुभटांच्या मतानुसार तेव्हा ग्वाल्हेर छावणीत मोठे बंड दिसले नाही, मात्र क्रांतिकारकांबद्दलची सहानुभूती जाणवत होती.

जिवाजीराव शिंदे यांच्याकडून धन आणि युद्ध सामग्रीची कुमक मिळवण्याकरीता तात्या टोपे ऑक्टोबर १८५७ मध्ये आपली पलटण घेऊन ग्वाल्हेरला पोहोचले. तेव्हा विष्णुभट गोडसे ग्वाल्हेरमध्येच होते. त्यांनी स्वत: तात्या टोपे यांना पाहिले 'माझा प्रवास' मध्ये गोडसे लिहितात "गेल्या भाद्रपद महिन्यात तात्या टोपे २५ हजार सैनिक घेऊन मुरार (ग्वाल्हेर) छावणीत आले. तिथल्या ४ पलटणींना त्यांनी आपल्या बाजूने वळवून घेतले. नंतर त्यांनी शिंदे सरकारांना निरोप पाठविला की, आम्ही इतके दिवस इथे राहिलो पण तुमच्या मुलुखाला अजिबात त्रास दिला नाही, काही नुकसान केले नाही. आता आम्ही निघतो पण तुम्हाला उंट, घोडे, गाड्यांची व्यवस्था करावी लागेल. तात्या टोपेंचा निरोप मिळाल्यानंतर जिवाजीराव शिंदे आणि त्यांचे दिवाणजी दिनकरराव मुरार छावणीत त्यांना भेटायला गेले. छावणी शहरापासून तीन कोसांवर नदीकिनारी होती. तिथे तात्या टोपेंना भेटून शिंद्यांनी सांगितले की, तुम्हाला जे हवे ते देतो पण माझ्या मुलुखात अजिबात नुकसानी न करता येथून निघून जा. त्यानंतर शिंदे सरकार तात्यांना घेऊन किल्ल्यात आले. त्यावेळी तासभर तात्या किल्ल्यात होते. संध्याकाळी तात्या छावणीकडे गेले. दुसऱ्या दिवसी शिंदे सरकारांनी शेकडो गाड्या, उंट, हत्ती, बैल, खेचरे, गाढवे आणि माणसे तात्यांकडे रवाना केली.

या घटनेनंतर विष्णुभट आपल्या काकांशी सल्लामसलत करून झाशीकडे निघाले. त्यांनी काही महिने झाशीतच रहावे असा निर्णय घेतला होता. विष्णुभटांचे काका रामभट यापूर्वीही उत्तरेत गेले होते. त्यांनी छबेली (राणी लक्ष्मीबाई) आणि नानासाहेब पेशव्यांचे बालपण स्वत:च्या डोळ्यांनी पाहिले होते. त्याच आधारावर विष्णुभटांनी 'माझा प्रवास' मध्ये त्याकाळाचे विस्तृत वर्णन केले आहे. त्यांनी झाशीचे राजे गंगाधरराव यांच्याशी लक्ष्मीबाईचा विवाह झाला त्या प्रसंगाचे विवरणही दिले आहे. विष्णुभटांच्या विवेचनात सडेतोड सुस्पष्टता आहे. ते थोडक्यात झाशी संस्थानाचा इतिहास मांडतात. झाशी संस्थानात सर्वत्र चर्चा होती की, गंगाधरराव बायकी वागतात. पण ते नपुंसक नव्हते. त्यांना पहिल्या पत्नीपासून एक संतान होते. लक्ष्मीबाईनाही एक पुत्र झाला होता, पण तो लगेचच वारला.

१८५७ च्या अखेरीस विष्णुभट व त्यांचे काका झाशीला पोहोचले. तोपर्यंत १८५७ च्या क्रांतीतील बऱ्याचशा घटना घडून गेल्या होत्या. ब्रह्मावर्ताहून आलेल्या दोन प्रवाशांकडून विष्णुभटांना या घटना कळल्या त्यांची नोंदही त्यांनी 'माझा प्रवास' मध्ये घेतली आहे. त्यावरून बऱ्याच गोष्टी कळतात.

१८५७-५८ चा 'माझा प्रवास'
वरसईच्या भिक्षुकाचे ऐतिहासिक प्रवासवर्णन

✦ नीतिन केळकर

द्रव्य प्राप्तीच्या हेतून उत्तरेच्या यात्रेवर निघालेल्या रायगड जिल्ह्यातला पेण तालुक्यातल्या वरसई गावच्या विष्णुभट गोडसेंना, आपला हा प्रवास एका ज्वलंत इतिहासाचा साक्षीदार ठरेल असे स्वप्नातही वाटले नसेल. 'ग्वाल्हेरचे शिंदे यज्ञ करताहेत, जाऊ या दक्षिणा बरी मिळेल!' असा विचार करत उत्तरेकडे कूच करणारे विष्णुभट १८५७ च्या झंझावातात अडकले. पहिल्या भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे साक्षीदार बनले. प्रत्यक्ष पाहिलेल्या आठवणी लिहून काढल्या. ग्वाल्हेरचा यज्ञ बारगला पण या स्वातंत्र्य समराच्या धगधगत्या यज्ञकुंडात नवचेतनेचा अग्नी फुलला त्याचीच साक्ष देतो विष्णुभटांचा 'माझा प्रवास'

रायगड जिल्ह्यातला पेण तालुक्यात सह्याद्रीच्या कुशीत नदीच्या किनारी वसलं आहे छोटंसं वरसई दिडशे वर्षांपूर्वी या गावात ब्राह्मणांची ७५ घरे होती यातच होता एक गोडसे भट परिवार बाळकृष्ण भट या कुटुंबाचे प्रमुख त्याना दोन लहान भाऊ होते. केशवभट आणि रामभट बाळकृष्णभटांना तीन मुले आणि एक मुलगी मोठे चिरंजीव होते विष्णुभट, 'माझा प्रवास' चे लेखक गोडसे कुटुंबाची थोडीफार शेती होती पण उत्पन्नचं प्रमुख साधन होतं भिक्षुकी त्यावर निर्वाह करणं तसं कठीणच जात होतं. बरंच कर्जही झालं होतं.

१८५७ च्या फेब्रुवारी महिन्यात २९ वर्षांचे विष्णुभट पुण्यात एका घरी अनुष्ठानासाठी गेले होते. तिथे त्याना माहिती मिळाली की, ग्वाल्हेरचे महाराज जिवाजीराव शिंदे यांच्या मातु:श्री बायजाबाई शिंदे, मथुरा इथे मोठ्या यज्ञ समारंभाचे आयोजन करताहेत. पुणे, नाशिक वाई इथल्या ब्राह्मणांना यज्ञाची निमंत्रणे आली आहेत. त्यांना हेही कळले की, यज्ञातल्या दान-दक्षिणांचे अधिकार त्यांचे एक नातेवाईक बाळकृष्ण वैशंपायन यांचेकडे आहेत. विष्णुभटांना ही माहिती कळल्यानंतर त्यांनी आपले चुलते रामभट यांच्यासह द्रव्यार्जनासाठी उत्तरेकडे जाण्याचा निर्णय घेतला. बाळकृष्ण वैशंपायन यांना तसे पत्रही पाठवून दिले.

१८५७ च्या मार्च महिन्यात विष्णुभटांचा आपले चुलते रामभट, तसेच वरसईच्या कर्वे परिवारासोबत प्रवास सुरू झाला. खोपोलीत पहिला मुक्काम. नंतर घाट ओलांडून त्यांनी पुणे गाठले. वरसईहून आणलेली बैलगाडी पुण्याहून परत पाठवून दिली पुण्यात त्यांनी इंदौरपर्यंत जाण्यासाठी भाड्याने बैलगाडी ठरवली. इथे आणखी एक ब्राह्मण वरसईच्या या प्रवाशांमध्ये सामील झाला. मंडळी पुण्याहून अहमदनगरला पोहोचली. तिथे तीन दिवस मुक्काम केला. तिथे उत्तरेकडे यज्ञासाठी जाणाऱ्या ब्राह्मणांच्या आणखी काही बैलगाड्या त्यांना भेटल्या. या सगळ्या मंडळींनी आता एकमेकांच्या सोबतीने उत्तरेकडे मार्गक्रमण सुरू केले. सगळे प्रवासी धुळ्याला पोहोचले. नंतर सातपुडा पार केले. एका डाकबंगल्यात विश्रांतीला थांबले तिथून मध्यप्रांतातल्या महूची लष्करी छावणी २/३ दिवसांच्या अंतरावर होती.

विष्णुभट आणि त्यांचे सहकारी ज्या डाकबंगल्यात उतरले होते, तिथेच उत्तरेकडून आलेले दोन सैनिकही थांबले होते. ते आधी मुंबईत जाऊन नंतर आपल्या गावी गोव्यात जाणार होते. विष्णुभटांना नव्या ओळखी करून घेण्याची आवड होती. तसे ते चांगलेच गप्पीष्ट होते. रात्री गप्पा मारताना त्या शिपायांनी विष्णुभटांना सांगितले की, येत्या तीन दिवसात राज्यक्रांती होणार आहे. मोठा हिंसाचार होईल, लूटमार होईल, त्यामुळे तुम्ही पुढील प्रवासाचा विचार सोडा आणि घराकडे परता. विष्णुभटांची उत्सुकता चाळवली. ते शिपायांना अधिक माहिती खोदून खोदून विचारीत होते. त्यावर त्या शिपायांनी विष्णुभटांना सांगितले की, सैनिकांच्या नव्या बंदुकामध्ये वापरण्यात येणाऱ्या गोळ्यांना गाय आणि डुकरांची चरबी लावली आहे. त्यामुळे सैनिक चिडले आहेत. कोलकत्याच्या दमदम इथे तर या गोळ्यांवरून भांडणेही झाली आहेत. १० जूनला नव्या बंदुकीच्या गोळ्या वितरीत करण्याचा आदेश आहे. क्रांतिकारकांनी सगळ्या छावण्यांमध्ये गुप्त संदेश पाठवले आहेत की, सक्तीने नव्या गोळ्या वापरायला लावल्या तर उठाव करा, छावणी ताब्यात घ्या, गोऱ्यांना ठार मारा, गोळाबारूद, खजीना ताब्यात घेऊन छावणी पेटवून घ्या. उठावाची शक्यता वर्तविणारी बातमी ऐकल्यावरही विष्णुभट आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी इंदौरच्या दिशेनेच पुढे जाण्याचे ठरविले. १० जूनला ते महूच्या छावणीजवळ पोहोचले. अचानक तोफा आणि बंदुकांचे आवाज कानावर पडू लागले. धुरांचे लोट उठले सगळेच प्रवासी प्रचंड घाबरले होते. धडधडत्या काळजावर हात ठेवीतच ते छावणीच्या दिशेने चालत होते. त्यांनी पाह्यलं संपूर्ण छावणी पेटवून देण्यात आली होती. सोसाटयाच्या वाऱ्याने आग चांगलीच भडकली होती. काळे सोजीर नारे लावत होते छावणीतल्या दीडशेच्या आसपास गोऱ्या सोजीरांना कंठस्नान घालून, दारू-गोळा,

बलिदान कथा - ३

अजीजनचे बलिदान

हिंदुस्थान काही एका दिवसात स्वतंत्र झाला नाही. त्याकरीता प्रचंड बलिदान करावं लागलं. कित्येक मातांनी आपल्या कोवळ्या मुलांचे बळी दिले. कित्येक स्त्रियांनी आपल्या सौभाग्याचं बलिदान केलं. १८५७ च्या स्वातंत्र्य युध्दाबद्दल आपण ऐकलंच असेल. त्यालाच हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याची पहिली लढाई मानावी लागेल. आपण या लढाईत पराभूत झालो असलो तरी ती लढाई अलौकिक होती. या लढाईत मोठमोठ्या राजांनी, नवाबांनी, सैनिकांनी, तर भाग घेतलाच, पण एक नर्तकीही स्वातंत्र्याची तुतारी ऐकून प्रभावित झाली आणि तिने स्वातंत्र्य संग्रामात उडी घेतली.

त्यावेळी कानपूर हे स्वातंत्र्य आंदोलनाचं केंद्र बनलं होतं. तिथूनच स्वातंत्र्य लढ्याच्या योजना देशात पसरविल्या जात. कानपूरमध्ये अजीजन नावाची एक नर्तकी होती. ती खूप सुंदर तर होतीच पण तिचा आवाजही गोड होता. मोठमोठ्या लोकांपर्यंत आणि अधिकाऱ्यापर्यंत तिचं येणंजाणं होतं. देशातली इंग्रजांची गुलामगिरी झुगारून देण्याकरता काही योजना आखल्या जात आहेत अशी बातमी उडतउडत तिच्या कानी आली. हे गोरे अधिकारी आपल्या देशातलं सोनं, चांदी ब्रिटनला पाठवून देशाला कंगाल करताहेत, भारताच्या संस्कृतीवर घाला घालताहेत. त्यांना देशातून हाकलून दिलं पाहिजे. अजीजनने विचार केला की ज्या देशात आपण जन्मलो, ज्या हवेत श्वास घेतला, ज्या भूमीतल्या अन्नपाण्यावर आपण पोसलो, त्या देशाचं ऋण फेडणं हे आपलं कर्तव्य आहे. देशप्रेमाच्या भावनेनं प्रेरित होऊन स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होण्याकरिता अजीजन अत्यंत उत्सुक झाली.

एके दिवशी संधी साधून ती स्वातंत्र्य लढ्याचे सेनापती तात्या टोपे यांना भेटली. एका नर्तकीनं एका सेनापतीला भेटणं हे तात्यांना थोडं अवघड वाटलं! ते तिच्याकडे आश्चर्याने पाहातच राहिले. अजीजनने त्यांना आपल्या येण्याचा हेतू सांगितला व स्वातंत्र्यलढ्यात आपल्याला सहभाग द्यावा अशी विनंती केली. ते ऐकून तात्या म्हणाले अजीजन, तुला माझं एक काम करावं लागेल.

'तुम्ही नुसती आज्ञा करा. मी देशाकरीता वाटेल ते करायला तयार आहे' अजीजन अत्यानंदाने म्हणाली.

तात्यांनी तिला सांगितलं — गोऱ्या अधिकाऱ्यांच्या छावणीत जाऊन तू त्यांची मैत्री वाढव आणि तिथल्या गुप्त बातम्या मला येऊन सांग! जर हे महत्त्वाचं काम तू करु शकलीस तर यापेक्षा मोठी देशाची सेवा असूच शकत नाही!

अजीजनला ते काम तेवढंसं पसंत नव्हतं तिला वाटत होतं की, हातात तलवार घेऊन इंग्रजांना कंठस्नान घालण्याचं काम सेनापती आपल्याला सांगितील. ती इंग्रजांचा तिरस्कार निश्चितच करीत होती. क्षणभर विचार करून ती म्हणाली, 'तुम्ही सांगाल ते करायला मी सर्वस्वी तयार आहे.'

या कामाकरिता इंग्रज अधिकाऱ्यांच्या कोणत्या इच्छा पुरवाव्या लागतील हे अजीजनला माहीत होतं. परंतु तिनं सेनापतीची आज्ञा प्रमाण मानली होती, म्हणूनच हेरगिरीचं काम तिनं हसत हसत स्वीकारलं आणि ती आपल्या घरी आली.

ठरल्याप्रमाणे अजीजनने दुहेरी महत्त्वाचं काम केलं. एकीकडे तिने कानपूरच्या गोऱ्या अधिकाऱ्यांना गाणं-बजावणं, ऐषआराम, यांच्यात गुंतवून ठेवलं आणि दुसरीकडे क्रांतिकारकांना महत्त्वाच्या गुप्त बातम्या पुरवल्या. बातम्या इकडून तिकडे पोचविण्याचं काम तिनं मोठ्या हिंमतहुशारीनं केलं. याचा परिणाम असा झाला की कानपूर छावणीतले अधिकारी चैन विलासात गुंतले आणि तात्यांनी कानपूरमधून त्यांची साफ हकालपट्टी केली.

परंतु नशीब इंग्रजांच्या बाजूला होतं. तात्या टोपे आपल्या कामात संपूर्णपणे सफल होऊ शकले नाहीत. कसा कोण जाणे, पण अजीजनच्या हेरगिरीचा सुगावा गोऱ्या अधिकाऱ्यांना लागला. मग काय विचारता? इंग्रजांनी त्या बिचारीवर पुरता सूड उगवला. संगिनीच्या पात्यानं टोचून त्यांनी तिला घायाळ केलं. हाल-हाल करून तिचे प्राण घेतले अजीजनने हे सारं हसत हसत सहन केलं. केवळ देशाकरीता! तिच्या या कर्तबगारीची नोंद इतिहासाच्या पानावर सोन्याच्या अक्षरात झाली आहे.

समानता, सहभाग, संवाद आणि टिकाव यांचा अर्थ काय ? वैविध्याचा अर्थ हा की, शाळेचे नागरिक असलेले विद्यार्थी आणि शिक्षक यांच्या रूपाने सध्याच्या समाजातील लोकवैविध्य त्यांच्यावरील गरिब श्रीमंत, हिंदू, मुस्लिम, उंच, बुटका, अपंग, दु:खी, आनंदी, चपळ, तरुण, वृद्ध वगैरे यासारख्या सर्व शिक्क्यांसह दिसायला हवे.

या रंगसंगतीत आपल्याला समानतेची स्थिती आणावी लागेल. तुम्ही कोणीही असलात तरी शाळेच्या भिंतीआड कोणीही लहान किंवा मोठा ठरणार नाही. विद्यार्थी शिक्षकापेक्षा हीन ठरायला नको, गणितात हुशार असलेला कोणीही विद्यार्थी कलेतील निष्णातापेक्षा सरस ठरणार नाही.

यावर संवाद प्रक्रियेचे गोंदण घातले तर नवीन अध्यापनशास्त्र साकारेल जेथे विद्यार्थी आणि शिक्षक एकत्रितपणे स्वत:चा आणि आपल्या आसपासच्या जगाचा ऊहापोह करण्यासोबतच त्याचा शोध घेतील. शाळांना पर्यावरण आणि जैववैविध्याशी समन्वयाने कसे राहता येईल, हे दाखवून देता आले तर, आदर्श शाळा त्यापेक्षा वेगळी ती कुठली ?

डोळे उघडून नीट पाहिले तर मी वर्णन केलेली ही शाळा म्हणजे केवळ माझा कल्पनाविष्कार नाही. खरेतर आपले विश्व आणि आपल्या स्फूर्तीतील आदर्श शाळेची ती फेररचनाच आहे. त्यातील काही रवींद्रनाथ टागोरांचे शांतीनिकेतन आणि गांधीजींच्या पायाभूत शाळा महान आहेत. त्यांनी समाजाला दिशा दाखवणाऱ्या इतर ही अनेक शाळांना स्फूर्ती दिली आहे. राजस्थानातील दिगंतर केरळातील कनावू आणि अनेक शाळा याच मार्गाने आस्तित्वात येत आहेत.

महान भारतीय पीक

काही अपवाद असले तरी आपल्यापैकी बहुतेकांनी भारतीय शिक्षण व्यवस्थेवर प्रभाव टाकण्यासाठी फारच थोडे कार्य केले आहे. आपल्यापैकी प्रत्येकाने शिक्षक म्हणून पालक आणि समाजाचे घटक म्हणून बदलाची मागणी आणि कृती केल्याशिवाय परिस्थिती सुधारणार नाही. केवळ अकर्मक दर्शक बनून किंवा आपल्यावर आणि आपल्या कृतीवर परिस्थितीला नियंत्रण मिळवू देऊन आपण केवळ परिस्थिती कायम राहू देत नाही तर त्यास हातभार लावत आहोत, हे जाणून घेणे आवश्यक आहे.

आपणच आपल्या वातावरणासाठी जबाबदार आहोत. मी आणि तुम्ही मिळून फरक घडवून आणण्यासाठी जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतली नाही तर भविष्यात स्थिती बदलेल तरी कशी ? आज आपल्याला शैक्षणिक क्रांती पहायला मिळाली तर मला आशा आहे की आपल्याला भविष्यात वेगळा भारत पहायला मिळेल. आपण ज्या उदात्त तत्त्वांसह जन्माला आलो आहोत, त्या तत्त्वांना पात्र भारत पहायला मिळेल. उभे राहून गणले जाण्याचा क्षण आपल्या सर्वांसाठी येऊन ठेपला आहे. तसे झाले तर लवकरच मग महान आणि अनोखे पीक घेण्याची वेळ येईल !

अनुवाद : - कांचन चौधरी

(पान क्र, ३४ वरुन)

निशाणबाजीत सुद्धा त्या मागे नव्हत्या निर्भयता त्यांच्या रक्तातच होती. भयंकर हिंसक जनावरांचीसुद्धा त्यांना भीती वाटत एखाद्या शूर आणि कुशल शिकाऱ्याप्रमाणे भयंकर जनावराची त्या सहज शिकार करत.

परंतु ज्या घटनेनं त्यांना वीरांगनांच्या श्रेणीमध्ये नेऊन बसवलं, ज्या घटनेनं त्यांना अमरत्व प्रदान केलं, ती घटना म्हणजे गोव्याचा सत्याग्रह. त्यावेळचे पोर्तुगीज शासक सत्याग्रह्यांवर जो पाशवी अत्याचार करीत होते तो केवळ अमानुष होता, अंगावर शहारे आणणारा होता. तरीसुद्धा सहोदराबाईंनी आपल नांव सत्याग्रह्यांच्या यादीत दाखल केलं. १५ ऑगस्ट १९५५ ला जो सत्याग्रह झाला तो त्यापूर्वीच्या सर्व सत्याग्रहांपेक्षा तीव्र होता. पोर्तुगीजांनी गोव्याच्या सीमेवर फौज उभी केली आणि नि:शस्त्र तसेच अहिंसक सत्याग्रहांवर गोळ्या चालवण्याचा हुकूम दिला होता. गोव्यामध्ये सत्याग्रह्यांवर गोळ्या चालवल्या जाणार आहेत ही बातमी सत्याग्रहापूर्वीच भारतभर पसरली होती. अशा अवस्थेत सत्याग्रहात सामील होणं म्हणजे मरणाला सामोरं जाण्यासारखं होतं. परंतु ही सर्व विरोधी, धोकादायक परिस्थिति पाहूनसुद्धा सहोदराबाईंचं धैर्य डगमगलं नाही. त्या सत्याग्रह करायला पूर्वीच्याच उत्साहाने तयार झाल्या.

ठरलेल्या दिवशी सत्याग्रह्यांनी गोव्याच्या हद्दीत प्रवेश केला. आज्ञेनुसार पोर्तुगीज पोलिसांनी गोळ्या चालवल्या. सत्याग्रही जमिनीवर कोसळले. पुढे जाण्याचा वेग खुंटला. परंतु क्षणार्धात त्या तुकडीच्या नेत्याकडून भारतीय तिरंगी झेंडा हातात घेऊन सहोदराबाईंनी 'भारत माता की जय' अशी घोषणा दिली आणि पुढे झाल्या. क्रूर पोर्तुगीज सैनिकांनी एका स्त्रीचीसुद्धा पर्वा केली नाही. सरळ गोळी चालवली. गोळ्यांच्या वर्षावाने सहोदराबाई घायाळ झाल्या, परंतु एका सच्च्या देशसेविकाचे प्राण घेण्याची शक्ती त्या गोळ्यांमध्ये कुठे होती? सहोदराबाईंना दवाखान्यात नेण्यात आलं. अंगावरच्या जखमा सहन करीत त्या म्हणाल्या 'यातून बरी होताच मी पुन्हा सत्याग्रहात उडी घेईन.'

श्रीमती सहोदराबाईंच्या शौर्याची प्रशंसा करावी तेवढी थोडीच आहे. सत्याग्रहात भाग घेण्यासाठी त्या जेव्हा आपल्या गावातून निघाल्या तेव्हा जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष त्यांना उद्देशून म्हणाले 'या तिरंगा ध्वजाची लाज तुमच्या हाती आहे' आणि खरोखरीच त्या वीर रमणीने जगाला दाखवून दिलं राष्ट्रीय ध्वजांचं रक्षण कशा प्रकारे केलं जात ते!

आपले प्राण पणाला लावून सहोदराबाईंनी भारताचा सन्मान वाढवला. हे त्यांचं कृत्य निश्चितच स्तुतीला आणि गौरवाला पात्र आहे. पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी सहोदराबाईंच्या कार्याचा गौरव केला आणि ते म्हणाले, 'या महिलेने देशाकरिता जे काही केलं त्याचा आम्हां भारतवासीयांनाच काय परंतु जगातल्या कुणाही व्यक्तीला अभिमानत वाटेल. तिचं कार्य चिरस्मरणीय राहील.'

गुंतागुंतीचे कार्य, राष्ट्रउभारणीच्या कार्यात प्रत्येक भारतीय नागरिकाने हिरीरीने भाग घेतला तरच शक्य होईल. असे राष्ट्र घडवण्याच्या प्रक्रियेत प्रत्येक नागरिक म्हणजे केवळ अकर्मक निरिक्षण नाही किंवा फक्त स्वतंत्रपणे योगदान देणारा नाही तर, त्याने जबाबदारीही स्वीकारायला हवी आणि प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यायला हवा.

भारताला आवश्यक नागरिकत्व समजण्यासाठी आपल्याला राज्यघटनेपलीकडे पाहण्याची गरजच नाही. बोजड आणि अरुंद व्याख्यांचे गुणधर्म दर्शवण्याऐवजी भारतीय राज्यघटनेत व्यापक आदर्श नागरिक अपेक्षिण्यात आला आहे. नागरिकांची घटनेत नमूद काही कर्तव्ये मला आपल्यापुढे मांडायची आहेत :

-लोकांमध्ये सामाईक बंधुत्त्वाची भावना आणि स्फूर्तीचा पुरस्कार करणे

नैसर्गिक पर्यावरणाची जतन व संवर्धन करणे ... आणि सर्व सजिवांप्रती भुतदया दाखवणे.

वैद्यानिक दृष्टिकोन, मानवतावाद आणि तर्कबुद्धी आणि सुधारणेची भावना विकसित करणे.

-व्यक्तिगत आणि सामुदायिक स्वरूपातील सर्व क्षेत्रात आघाडी मिळवण्याचा प्रयत्न करणे जेणेकरुन राष्ट्राचा दर्जा सातत्याने उंचावत राहील.

प्रत्येक नागरिकाची ही कर्तव्ये आपण न्याय, स्वातंत्र्य, समानता आणि बंधुत्वाचे तत्व किंवा समानतेचा अधिकार, स्वातंत्र्याचा अधिकार शोषणाविरुद्धचा अधिकार यांच्याशी ताडून पाहिली तर आपल्याला जाणवते की, ही तत्त्वं अधिकार आणि कर्तव्यं केवळ भारत आणि भारतीय नागरिक यांच्यातील नाते स्पष्ट करणारी नाहीत, तर त्यातून व्यक्त होते की भारताची संकल्पना आदर्श नागरिकाच्या संकल्पनेतून वेगळे नाही. एका विशिष्ट प्रकारचे नागरिकत्व सार्वत्रिक बनले म्हणजे ती तत्त्वं, अधिकार आणि कर्तव्यांची जाण असलेला समाज निर्माण होईल, असा संदेश त्यातून देण्यात आला आहे. अंतिमत: भारतीय राज्यघटना, राष्ट्र आणि त्यातील नागरिक स्वतंत्र घटक असल्याचा आधुनिक राष्ट्रांचा गैरसमज त्यातून दूर करण्यात आला आहे. राष्ट्रं घडविणे गुंतागुंतीची आणि अनेकविध घटकांनी असामन्य कार्य करण्याची गरज असलेली अव्यक्त प्रक्रिया आहे. तरीही तिच्या मुळाशी राष्ट्राला घडवण्यात त्यातील नागरिक आणि नागरिकत्व घडवणेच अपेक्षित आहे.

नागरिकत्त्व घडवणे :

आतापर्यंत पुढे आलेल्या अनेक दृष्टिकोनांचा विचार करुन नागरिकाची एकात्मिक कल्पना साकारण्याची वेळ आता येऊन ठेपली आहे. त्यातून निष्कर्ष काढता जो स्फूर्तीने धैर्यशील आणि सुधाराणावादी आहे. विचाराने निर्मितीक्षम आणि टीकात्मक आणि कृतीने सुस्पष्ट व मानवी आहे, अशा व्यक्तीला आदर्श नागरिक म्हणता येईल.

भारतीय राष्ट्रीयत्व आणि नागरिकत्वाच्या उंच संकल्पना विचारात घेता आपण त्यापुढे तोकडे पडणे स्वाभाविक आहे. त्यामुळे समकालीन समाज अशा नागरिकत्वाच्या घडवणुकीसाठी योग्य संधी देवू शकणार नाही अशा परिस्थितीत आपल्यापुढे एकमेव पर्याय म्हणजे आपल्या शाळांमधून काळजीपूर्वक असा समाज घडवणे हा होय. म्हणूनच शाळांना सामाजिकदृष्ट्या पवित्र मानले जाते कारण तीच अशी जागा आहे की जेथे कोणत्याही राष्ट्राचे भवितव्य घडत असते. असे असेल तर शाळांमधील वातावरण आणि पद्धतीतून आपल्या राष्ट्रीय तत्वांचे प्रतिबिंब उमटले पाहिजे आणि मला वाटते की एखाद्या राष्ट्राचा अंदाज घेण्यासाठी त्यातील शाळांचे विश्लेषण करण्याएवढा योग्य मार्ग दुसरा नाही. आपणही तेच करायला हवे.

धोक्याची सूचना :

आपण सारे लोकशाही आणि समानतेचा समाज अपेक्षित असताना आपणा सर्वांच्या मुलांना, मग त्यांची सामाजिक, आर्थिक पार्श्वभूमी काहीही असली तरी आणि बौद्धिक क्षमता काहीही असली तरी त्या सर्वांना दर्जेदार शिक्षण मिळाले पाहिजे असे सर्वानाच वाटत असावे. उलटपक्षी आज समाजात दिसत असलेला भेदभाव आज आपल्याला शाळांमध्ये पहायला मिळत आहे. माझ्या कार्यालयापासून दोनच किलोमीटरच्या परिघात अनेक मुले शाळेत जातात, पण त्या शाळा म्हणजे पत्र्याचे शेड, शिक्षकांविना भरणारे वर्ग अशा अवस्थेत आहेत, कारण ती सर्व मुले बांधकामांठिकाणी काम करणाऱ्या मजूरांची मुले आहेत महापालिका शाळा आहेत. पण तेथे शिक्षण व वर्गांची उणीव विद्यार्थ्यांना शिक्षा करुन भरून काढली जाते. एक इंग्रजी माध्यमाची शाळाही आहे ती आपल्याकडील जबाबदार बससेवेच्या खासीयतीची जाहिरात करीत असते. अपंग मुलांसाठी एक पर्यायी शाळाही आहे. आणि एक आंतरराष्ट्रीय शाळाही आहे, जी उद्याच्या नेतृत्वाली अत्याधुनिक व्यायामशाळा आणि घोडेस्वारीचे धडे देते. ही धक्कादायक असमानता असूनही या सर्व शाळांमध्ये एक घटक सामाईक आहे. मुलांची आणि शिकण्या -शिकवण्याची त्यांची संकल्पना. मुलांना ते मातीचे गोळे समजतात, त्यामुळे शिक्षक आणि विद्यार्थ्यांमधील नाते कुंभार आणि मडके यांच्यातील नात्यासारखे राहते. त्यातूनच मग शब्द, आकडे, सूत्रं आणि व्याख्यांचा यांत्रिक मारा विद्यार्थ्यांवर केला जातो. घोकलेली उत्तरं कशी मांडता येतात याच निकषांवर मग विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता ठरत जाते. या संपूर्ण प्रक्रियेवर मग केवळ घोकंपट्टीवर व पाठांतर तपासणाऱ्या बोर्डाच्या परीक्षांनी, शिक्कामोर्तब केले जाते.

भारतीय शिक्षण व्यवस्थेचे हे वास्तव आहे. आपल्याला त्यातून धोक्याचे संकेत स्वीकारून कृती करण्याची गरज आहे.

चांगली शाळा :

नेमकी आवश्यक कृती समजण्यासाठी आपल्याल नेमक्या कशा शाळा हव्या आहेत, हे पाहूया

स्वाभाविकणे आपली सामाजिक तत्त्वं शालेय वर्गांपर्यंत नेणे यातील पहिले पाऊल राहील, एखाद्या शाळेच्या संदर्भाने वैविध्य,

भारतीय भूमीतले अनोखे पीक

✦ **अझीम प्रेमजी**

स्वातंत्र्य मिळेपर्यंत अनेक शतकांच्या राजवटींनी भारतीय भूमीची प्रचंड नासधूस केली होती, परिणामी ती रुक्ष आणि निष्प्राण बनली होती. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपण या भूमीला तीन प्रमुख तत्वानी समृद्ध करायची निर्णय घेतला, त्याचा मला अभिमान आहे.

त्यातील पहिले तत्त्व होते वैविध्य. आपल्या वेगवेगळ्या श्रद्धा, तत्त्वज्ञान आणि परंपरा हाच आपल्याल एकत्र बांधणारा धागा आहे आणि त्यातूनच आपल्याला आपले अस्तित्व मिळाले आहे. दुसरे तत्व होते लोकशाहीचे ज्यात आपण अशा राष्ट्राचे घटक आहोत की जेथे कोणीही नागरिक दुसऱ्या नागरिकापेक्षा मोठा नाही आणि तिसरे तत्त्व होते अलिप्ततावादाचे, मध्यममार्गाने जाण्याचे शहाणपण स्वीकारून डाव्या अवव्यांना दुभागणारी रेषा धुसर करीत जाण्याचे तत्त्व.

जगाने तोपर्यंत पाहिलेल्यांपैकी सर्वात उदात्त अशी ही राष्ट्रवादाची तत्वं होती. युद्ध महत्त्वाकांक्षा आणि पूर्वग्रहदूषित जगाला आव्हान देत संपत्तीची संकल्पना त्या तत्वांनी बदलली. कोणत्याही राष्ट्राची ओळख, त्याच्या आर्थिक किंवा लष्करी सामर्थ्याने नाही, तर त्याच्या मानवतेप्रति असलेल्या एकत्रित दृष्टिकोनातून व्यक्त होते.

तेव्हापासून आपण न थकता संवाद आणि मनोधैर्याच्या माध्यमातून भारतभूमीची मशागत करीत आलो आहोत आणि सुपीक बनलेली भूमी आता पीक घेण्यासाठी तयार झाली आहे.

पण राष्ट्राचे पीक कसे घ्यायचे ? सहा दशकांची मशागत आपल्या स्थापनेच्या तत्त्वांना पात्र असा नवा, टिकावंशाली समाज निर्माण करू शकेल, याची खातरजमा कशी करायची ? सर्व चांगले शेतकरी जमीन समजून घेण्यापासून कामाला प्रारंभ करतो कोणते पीक घ्यायचे याचा निर्णय घेण्यापूर्वी मातीचे परीक्षण, हवामानाचा अभ्यास, स्थानिक स्त्रोत आणि मागणीचा अंदाज घेणे यासारख्या बऱ्याच गोष्टी तो करतो. पण ही पद्धत आपल्याला चालणार नाही. त्याऐवजी आपल्याला आधी पिकाची निश्चिती करावी लागेल आणि त्या अनुषंगाने जमिनीची मशागत कशी करायची हे ठरवावे लागेल.

पिकाची निवड

परंपरागत विकास व्यवस्था सुचवते की, भारतीय पिकामध्ये किमान दोन घटक असायला हवेत : आर्थिक क्षमता आणि मानवी विकास. आर्थिक क्षमता म्हणजे राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचे आकारमान वाढीची शक्यता, स्थितीस्थापकता आणि प्रभाव. मानवी विकास म्हणजे प्रत्येक नागरिकाला अन्न, निवारा, वाहतूक, शिक्षण वगैरे यांच्या उपलब्धतेचे परिमाण. सध्याच्या मतप्रवाह असा की, आपण जगातील सर्वात बलवान अर्थव्यवस्था बनण्याच्या मार्गावर असताना मानवी विकासाच्या बाबतीत मात्र मागे पडत आहोत.

पण असे पीक, आपल्या घटनात्मक अपेक्षा आणि वैविध्य आणि समानतेच्या पायाभूत तत्त्वांची पूर्तता करण्यासाठी पुरेसे आहे काय ? त्याखेरीज भारताने राष्ट्र आणि श्रद्धांमधील खालावलेले सामंजस्य आणि जैववैविध्यावर मानवी कृत्यांचा विपरीत परिणाम रोखण्यासाठी जबाबदारीने कर्तव्य बजावायलाच नको काय ?

हे मनात ठेवून मला असे सुचवायचे आहे की, राष्ट्र घडवण्यात तीन घटक असायलाच हवेत, पहिला घटक सहभाग देशाच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्याची आणि तिच्यावर प्रभाव टाकण्याची प्रत्येक नागरिकाला मिळणारी संधी. दुसरा घटक टीकाऊपणा. जैववैविध्य जतन करण्याची आणि जैविक प्रक्रियांवरील आपला प्रभाव कमी करण्याची क्षमता. तिसरा घटक : दृढ संवाद : व्यक्ती, समूह समाज आणि राष्ट्र यांच्यात समन्वय साधणारी प्राथमिक प्रक्रिया

आपण आता महत्त्वाच्या प्रश्नावर येतो आपल्याला ज्या प्रकारचे राष्ट्र हवे आहे त्याकडे आपल्या कल जाणवतो, इतिहास आणि अनुभवातूनही आपल्याला त्याच्या घटकांची जाण आहे. पण हे सर्व घडवून आणण्याची जबाबदारी कोणाची ? आपली उद्दिष्टे राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या मर्यादेत किंवा प्रत्येक नागरिकाला मूलभूत अधिकार मिळण्यापर्यंत राहतील, तोपर्यंत राष्ट्र घडवणाऱ्यांचा समुदाय धोरणे आणि कृतीवर प्रभाव टाकणाऱ्यांपर्यंत मर्यादित राहील, हे वाक्य मी पहिल्यांदाच एका सार्वजनिक सभेत ऐकले, जेथे त्या वक्ताने नमूद केले की, राजकीय नेते नोकरशहा न्यायाधीश, उद्योजक, कामगार नेते वगैरे यासारख्या तथागत नेतृत्त्वातील लोकांची संख्या मोजली तर ती दोन-पाच हजारांपेक्षा अधिक नसेल, ते म्हणाले, कल्पना करा की आपल्या संपूर्ण देशाचे भवितव्य अवघ्या दोन हजार लोकांच्या हाती आहे ! मग अशा दोन हजार लोकांनी संपूर्ण देशावर नियंत्रण ठेवणे योग्य आहे काय ? ज्या क्षणी आपण या व्यक्तींची निवड करतो त्या क्षणीच आपण आपली जबाबदारी त्यांच्यावर सोपवून मोकळे व्हावे काय ?

ज्या क्षणी आपण लोकसहभाग, टिकावू कृती आणि संवादाच्या व्यापक पद्धतींची अपेक्षा बाळगतो त्याक्षणी वर्चस्वाची कोणतीही कल्पना केवळ विपर्यस्त ठरेल. मला तुम्हाला असे सुचवायचे आहे की, एवढे अवाढव्य आणि

बलिदान कथा - २

अजीमुल्ला खां

१८५७ चा स्वातंत्र्यसंग्राम सर्व भारतवासीयांना माहीत आहे. परंतु या संग्रामाच्या योजना तयार करण्यात आणि परदेशात जाऊन त्याकरिता कारवाया करण्यात एका मुसलमान परिवारातील मुलाचा फार मोठा भाग होता, हे थोड्याच लोकांना माहीत असेल. या मुलाने इंग्रजांकडे सामान्य दर्जाची नोकरी करण्यापासून आपल्या जीवनाला सरुवात केली. त्याचं नाव अजीमुल्ला खां. गरिबाच्या पोटी जन्माला आल्यामुळे त्याच्यासंबंधी फारच थोडी माहिती उपलब्ध आहे.

असं म्हणतात की, गरिबीमुळे बालवयात त्याला शिक्षण मिळू शकलं नाही. लहान वयातच उदरनिर्वाहाकरीता त्याला एका इंग्रजी साहेबाच्या घरी स्वयंपाक्याची नोकरी लागली. मुलाचे पाय पाळण्यात दिसतात अशी एक म्हण आहे ना? त्या म्हणीनुसार या महत्त्वाकांक्षी मुलाचं भवितव्य फार उज्ज्वल होतं. साहेबाच्या घरी नोकरी करता करता तो लिहायला वाचायला शिकला. एवढंच नव्हे तर त्यानं इंग्रजी भाषेचाही अभ्यास केला. अल्पावधींतच त्यानं इंग्रजी, फ्रेंच, हिंदी आणि उर्दू या भाषा उत्तम तऱ्हेने आत्मसात केल्या.

इंग्रजी आणि फ्रेंच भाषेच्या अधिक अभ्यासकरिता त्यानं नोकरी सोडली आणि कानपुरच्या एका शाळेत तो नियमितपणे अध्ययन करू लागला. विद्यार्जनाची ज्याला उत्कट इच्छा असते त्याच्यावर सरस्वती प्रसन्न होते. कुशाग्र बुद्धीच्या अजीमुल्लाखांवर सरस्वती प्रसन्न झाली. उत्तम तऱ्हेने अध्ययन पार पाडल्यावर त्याने स्वत:ची शाळा स्थापन केली. त्याच्या अध्यापनाचा दर्जा पाहून लवकरच त्याला सरकारी शाळेतून बोलावणं आलं. तिथ तो सर्वोत्तम अध्यापक म्हणून प्रसिद्ध झाला. त्याच्या योग्यतेची किर्ती ब्रह्मावर्ताच्या दरबारात नानासाहेबांच्या पर्यंत जाऊन पोहोचली. नानासाहेबांना विद्वानांची कदर होती. त्यांनी अजीमुल्लाखांला आपल्या दरबारात बोलावून घेतलं. त्याची कुशाग्र बुद्धि पाहून नानासाहेब आणि त्यांचे साथीदार प्रभावित झाले. लवकरच त्यांना नानासाहेबांच्या निकट परिवारात स्थान मिळालं. पुढे पुढे तर अजीमुल्लाखांचा सल्ला घेतल्याशिवाय नानासाहेबांच्या कुठल्याही कार्याचा प्रारंभ नसे.

सन १८५४ मधे नानासाहेबांचे मुख्य प्रतिनिधि म्हणून त्यांची बाजू मांडण्याकरीता अजीमुल्लाखां ब्रिटनला गेला. एका इंग्रजी लेखकानं, 'त्याच्या व्यक्तिमत्वाविषयी लिहून ठेवलं आहे. त्याचा चेहरा सुसंस्कृत होता आणि वाणी गोड व रसाळ होती. साहेबाकडे नोकरी केल्यामुळे त्याला इंग्रजी रीतिरिवाज चांगले परिचित होते. त्यामुळे लंडनमध्ये त्याला चांगली प्रसिद्धि मिळाली. भारतीय पोषाख परिधान करून तो जिथे जाईल तिथे त्याभोवती गर्दी जमत असे.' अजीमुल्लाखां भारतात परतल्यावरसुद्धा काही प्रतिष्ठित कुटुंबातल्या स्त्रियांनी त्याला स्नेहपूर्वक पत्र पाठवली होती. ब्रह्मावर्त इंग्रजांच्या ताब्यात आल्यावर ही प्रत हॅवलॉक साहबांच्या हाती पडली.

एक प्रतिनिधि म्हणून करता येईल ती सर्व खटपट अज़ीमुल्लाखांनी केली. परंतु ईस्ट इंडिया कंपनीने सडेतोडे उत्तर पाठवलं की, याबाबतीत आम्हाला काही करता येणार नाही. गव्हर्नर जनरलने घेतलेला निर्णय योग्यच आहे. बाजीरावांच्या दत्तक पुत्राला पित्याच्या पेन्शनवर अधिकार सांगता येणार नाही.

वास्तवात दुसरे बाजीराव पेशवे १८५१ मध्ये मरण पावले. त्यांना आठ लाख रुपये पेन्शन मिळत होतं. त्या पैशातून बचत करून बाजीरावांनी अधिकच पैसे ईस्ट इंडिया कंपनीला दिले. इंग्रजांचं अफ़गाणिस्तानाशी युद्ध झालं. त्यावेळी त्यांनी ५० लाख रुपये युद्धाच्या साहाय्यार्थ दिले. इंग्रजांची शिखांशी लढाई जुंपली तेव्हा मराठे शिखांना मदत करतील असं वाटलं होते. पण तसं झालं नाही. बाज़ीराव पेशव्यांनी एक हजार सैनिकांची कुमक पाठवून इंग्रजांना मदत केली. अशी त्यांची इंग्रजांशी प्रामाणिक मैत्री होती. मृत्यूपूर्वी त्यांनी आपलं मृत्यु पत्र लिहून ठेवलं. त्यात आपले दत्तक पुत्र नानासाहेब यांना सर्व संपत्तीचे आणि अधिकारांचे वारसदार ठरवले होते. परंतु पेशव्यांचा मृत्यू होताच इंग्रजांची चाल बदलली. आश्चर्य म्हणजे पेशव्यांच्या मृत्यूनंतर लगेच ब्रिटिश सरकारने घोषणा केली की, नानासाहेब हे आठ लाख पेन्शनचे अधिकारी होऊ शकत नाहीत. अजीमुल्लाखांने या प्रश्नावर खूप विचार केला आणि जाहीर केलं की इंग्रजांचं हे कृत्य नितांत अन्यायाचं आहे. पेशव्यांसारख्या प्रतिष्ठित घराण्याशी असा अपमानास्पद व्यवहार करणं हे निखालस अयोग्य आहे. श्रीमंत बाजीराव पेशव्यांनी आपली गादी आणि राज्य कंपनी सरकारच्या हवाली केलं आणि त्याच्या बदल्यात आठ लाख रूपये तनखा मिळाला पाहिजे अशी अट घातली होती. जर इंग्रज सरकारला पेन्शन देता येत नसेल तर त्या त्या बदल्यात दिलेलं राज्य त्यांच्या मालकीचं

(उर्वरित पान क्र. ७४ वर)

प्रमाणावर रोजगार तर निर्माण होईल पण उत्पन्नातही वाढ होईल, त्याचा सकारात्मक परिणाम आपल्यासारखा विकसनशील अर्थव्यवस्थेवर होईल.

सरकारची भूमिका

सरकारने सहाय्यक किंवा आव्हान भूमिका बजावायला हवी. कंपन्यांना उच्च दर्जाच्या स्पर्धात्मक परिस्थितीशी जुळवून घेण्यास प्रोत्साहन द्यायला हवे.

सरकारने अनुदानासारख्या दीर्घकालीन. स्पर्धात्मकतेवर विपरित परिणाम करणाऱ्या संस्कृतीपासून दूर रहायला हवे. १९८० पासूनच्या अनुदानांचा परिणाम म्हणून १९९१ ची दिवाळखोरीची परिस्थिती उद्‌भवली, त्यामुळे स्पर्धात्मकतेला प्रोत्साहन गरजेचे आहे. करांत सवलतीऐवजी व्यवसायातील अनेक अडचणी दूर व्हायला हव्यात

पुरवठा साखळीतील सुधारणा :-

रस्त्यांची, बंदरांची आणि ऊर्जा क्षेत्राची दुरवस्था आपल्याला नऊ टक्क्यांपेक्षा आधिक विकासदर गाठण्यातील अडचण आहे. जागतिक बाजारपेठेशी स्पर्धा करण्यासाठी उत्पादनासाठी लागणारा खर्च आणि प्रक्रियेवरील खर्च कमी करून, पुरवठा साखळी कार्यक्षम करणे गरजेचे आहे. चीनच्या यशाचे इंगित हेच आहे की, त्यांना बंदरे आणि रस्ते वाहतुकीचा खर्च कमी येतो

विजेच्या तुटवड्याने आपल्या देशात उत्पादन करणाऱ्या कंपन्यांना आठ टक्के नुकसान होत असल्याचा अंदाज आहे. चीनमध्ये राष्ट्रीय उत्पन्नाच्या नऊ टक्के रक्कम तर भारतात चार टक्के रक्कम पायाभूत सुविधांवर खर्च होते.

ग्रामीण आणि शहरी भागात पायाभूत सुविधांचा दर्जा सुधारणे गरजेचे आहे. जागतिक बँकेनुसार सार्वजनिक बांधकाम विभागाचा पाच टक्के निधी रस्त्यांच्या देखभालीवर खर्च होतो. आर्थिक विकासाशी समन्वय साधण्यासाठी गावांशी उत्तम संपर्क असावा. नुकत्याच प्रकाशित झालेल्या भारतीय ग्रामीण पायाभूत सुविधा अहवालानुसार १९९० ते १९९७ या काळात ग्रामीण भागातील रस्त्यांची लांबी अवघी १५ टक्क्यांनी वाढली. राज्य सरकारांचा बहुतेक निधी राज्य महामार्गांची देखभाल आणि जिल्हे मार्गांच्या देखभालीवर, तसेच कामगारांच्या वेतनावर खर्च झाला

आपले रस्ते आणि विमानतळ उभारण्यासाठी जागतिक स्तरावरील स्पर्धक आणि यशस्वी संस्थांना निमंत्रण द्यायला हवे चांगल्या पद्धती समजण्यासाठी आपल्या कंपन्यांनी सर्वोत्तम पायाभूत सुविधा क्षेत्रातील सल्लागार आणि संघटनांसोबत काम करणे गरजेचे आहे. याबाबत फ्रान्सचे उदाहरण देता येईल. त्यांना विमानतळ उभारणीसाठी स्वत:च्या देशातील कंपन्यांना जागतिक दर्जाच्या कंपन्यांसोबत काम करण्याची संधी दिली.

सरकारची कार्यक्षमता वाढवण्यासाठी खाजगी आणि सरकारी क्षेत्राच्या सहकार्याची गरज आहे. सरकारने सार्वजनिक बाबींवर लक्ष देताना खाजगी क्षेत्र कार्यक्षमता, परिणामकारकता आणि जबाबदारीवर लक्ष देतील. इंदिरा गांधींनी खाजगी क्षेत्रातील तज्ज्ञांना सरकारमध्ये आणण्याचा केलेला प्रयत्न नंतरच्या सरकारांनी केला नाही. तो करायला हवा.

निकड तत्परतेची

तत्परतेची गरज देशातील लोकांना पटवून देणे आवश्यक आहे. आपल्या देशाच्या धिम्या विकासाला येथील प्रशासकीय यंत्रणा जबाबदार आहे. तसेच त्याला राजकीय यंत्रणाही जबाबदार आहे. त्यामुळे निर्णयक्षमता, कार्यक्षमता आणि त्याला पारितोषिक याबाबत साखळी निर्माण करायला हवी. कोणतीही बाब स्थगित करणारी आपली प्रशासकीय विचार प्रणाली बदलायला हवी. ती विकासाभिमुख आणि व्यवस्थापकीय पद्धतीची हवी. दिलेले काम विहित वेळेत, तरतुदीत पूर्ण करून ग्राहकांना समाधानदेणारी वृत्ती असावी

सारांश :-

आपल्या आतापर्यंतच्या प्रगतीत खूप कमी झाले तर बरेच निसटले आहे. आपल्याला आर्थिक प्रगती आणि वित्तीय समृद्धी या क्षेत्रात अद्याप बरीच मजल गाठायची आहे. सिंहावलोकन केले तर विविध संधींच्या सागरात आपण मध्यभागी असल्याचे दिसते. भारत आणि भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम करणाऱ्या बदलत्या जगाला आपण सध्या आहोत. देश सध्या आर्थिक वाढीचा वधारलेला दर, जागतिक अर्थव्यवस्थेशी एकरूपता जागतिक पातळीवर स्पर्धात्मक कंपन्याचा प्रवेश, भारताची जोखलेली क्षमता अशा स्थानी आपण आहोत. आपल्याकडे विकसित राष्ट्रांच्या बरोबरीला येण्याची सर्व शस्त्र आहेत. प्रभावी नेते, कार्यक्षम संस्था आणि लोकशाही राज्यव्यवस्था आहे सर्व विकासित राष्ट्रांमध्ये लोकशाही आहे सर्वांना शिक्षण, रोजगार देणे यावर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे. तत्परता दर्शवून कामे पूर्ण करण्याचा ध्यास हवा. ही संधी गमावणे अक्षम्य आहे.

सर्व विकास कार्यक्रम प्रभावीपणे राबवल्यानंतर त्याचे परिणाम प्रशंसनीय आले आहेत. या योजना केवळ कागदावर न रहाता सर्वांच्या सहकार्याने पूर्ण व्हायला हव्यात त्यामुळे अशा योजनांसाठी व्यक्तिगतरीत्या स्वारस्य दाखवून भावी पिढीचा भविष्यकाळ उज्ज्वल करता येईल.

'शक्य तितके मागे पहा. त्यानंतर त्यातून बोध घेऊन पुढे आगेकूच करा भारताला तेजस्वी' महान आणि अभूतपूर्व प्रगतिपथावर न्या :- स्वामी विवेकानंद

अनुवाद : - *नितीन सावं*

निर्माण करावी लागते - मायकेल पोर्टर

एखाद्या राष्ट्राची समृद्धी त्या देशाच्या अर्थव्यवस्थेच्या स्पर्धाशीलतेवर अवलंबून असते. ही अर्थव्यवस्था वेगळी निर्माण करता येत नाही, तर योग्य नियोजनातून निर्माण होते. देशातील कोट्यवधी जनतेला उच्च दर्जाचे शिक्षण आणि रोजगार देऊन, त्यांचे दारिद्र्य हटवून राष्ट्रविकास करता येईल. गुंतवणुकदारांचे दृष्टीने सहकार्याचे आणि मुक्त वातावरण निर्माण करून आपल्याकडेही जागतिक दर्जाची सेवा आणि उत्पादने निर्माण करता येतात, हे दर्शवता येईल.

शिक्षण

शिक्षणाच्या माध्यमातून रोजगार मिळवून दारिद्र्यात घट करता येते व त्यातून आर्थिक प्रगती साधता येते हे सार्वत्रिक वास्तव आहे. भारतीय घटनेनेही चौदा वर्षांपर्यंतच्या मुलांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण देण्यासाठी, घटना अमलात आल्यानंतर दहा वर्षांत प्रयत्न व्हायला हवेत असे नमूद केले आहे. घटना अमलात येऊन ५० वर्षे झाली तरी आपण या क्षेत्रात प्रगती केलेली नाही संयुक्त राष्ट्रांच्या विकास कार्यक्रमांच्या अहवालानुसार प्राथमिक, दुय्यम आणि तृतीय श्रेणीच्या शाळांमध्ये नावनोंदणीचे प्रमाण ६० टक्के आहे.

शिक्षण घेण्यासाठी प्रयत्न हवेत

भारताची लोकसंख्या पाहिल्यास ४०० दशलक्ष जनता १५ वर्षांपेक्षा कमी वयाची आहे. यात दरवर्षी १० दशलक्षांची वाढ होते. यापैकी ७० टक्के जनता शिक्षणाच्या अभावाने दारिद्र्याच्या गर्तेत सापडली आहे. गरिब विद्यार्थ्यांना प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण देताना मूलभूत पोषण तरी मिळणे गरजेचे आहे. त्यांचे शारीरिक आरोग्य अबाधित राखण्यासाठी दुपारचे भोजन मिळणे आवश्यक आहे. प्राथमिक शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी विद्यार्थीकेंद्रित अभ्यासक्रम हवेत, त्यासाठी शिक्षकही प्राशिक्षित आणि ध्येयाने प्रेरित हवेत.

नोकऱ्यांची उपलब्धता

रोजगार उपलब्ध करण्यासाठी व्यापक कार्यक्रम राबविण्याची गरज आहे. भारतातील दारिद्र्याचे प्रमाण विविध अंदाजांनुसार २५० ते ३०० दशलक्ष आहे यात दरवर्षी ३५ ते ४० दशलक्षांची भर पडते. यातील सुमारे ७० टक्के युवक अशिक्षत अथवा अल्पशिक्षित आहेत. याच्या विरुद्ध देशात दरसाल केवळ २० ते ३० लाख नोकऱ्या निर्माण होऊ शकतात

देशातील बेरोजगारांपैकी एक तृतियांश बेरोजगारांना रोजगार उपलब्ध झाला आणि दरवर्षी ३०० डॉलर्स राष्ट्रीय उत्पन्नात योगदान दिले तर दरवर्षी राष्ट्रीय उत्पन्नात ३० अब्जांची भर पडेल. ग्रामीण भागातून प्रत्येक व्यक्ती राष्ट्रीय उत्पन्नात ३०० डॉलर्स जोडते. त्यामुळे या भागावर विशेष लक्ष द्यायला हवे. ३५ टक्के व्यक्ती आपल्या येथे प्रतिदिन अवघा एक डॉलर मिळवत असल्याने, कमी दर्जाच्या तांत्रिक नोकऱ्या उपलब्ध व्हायला हव्यात. चीनने या क्षेत्रात १५० दशलक्ष रोजगार उपलब्ध केले आहेत.

कामगारांच्या सहभाग दरात वाढ करणेही गरजेचे आहे. चीनमध्ये हा दर ८२ तर आपल्याकडे अवघा ६१ टक्के असल्याचे आयएलओ अहवाल सांगतो. त्यासाठी रोजगार वाढीचा दर वाढवणे आवश्यक आहे.

असंघटित क्षेत्रात देशातील कामगारांपैकी ९२ टक्के कामगार आहेत. आणि ते राष्ट्रीय उत्पन्नाच्या ६० टक्के उत्पादन तयार करतात. पाच पटीने त्यांना कमी भांडवल लागते त्यामुळे संघटित क्षेत्राच्या तुलनेत क्षेत्रात रोजगार वाढीचा दर अधिक असल्याने कौशल्याचा विकास करण्यासाठी त्यांना मदतीचा हात द्यायला हवा.

कमी शिकलेल्या मंडळींना कौशल्य प्रदान करणारे अभ्यासक्रम करणे शक्य नसते, त्यामुळे त्यांच्यासाठी सरकारने १९६० सालापासून व्यावसायिक अभ्यासक्रम शिकवणाऱ्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था आयटीआयची स्थापना केली.

आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या (आयएलओ) २००३ च्या अहवालानुसार देशात साडेचार हजार आयटीआय असून यात ६ लाख ७८ हजार जागा आहेत, मात्र अर्थसंकल्पातील त्यांच्यासाठीची ७७ टक्के तरतूद पगारावरच खर्च होते त्यामुळे या संस्थांना मूलभूत पायाभूत सुविधा उभारता येत नाहीत. ५१ टक्के संस्थामधील जागा भरत नाहीत असेही एका अहवालात म्हटले आहे. औद्योगिक प्रशिक्षण संस्था कौशल्य देणाऱ्या अभ्यासक्रमांसाठी तयार करून त्यामार्फत असंघटित क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होऊ शकते. त्याचा परिणाम आर्थिक विकासावर होईल.

थेट परकीय गुंतवणुकीला प्रोत्साहन

अर्थतज्ज्ञांच्या मते चीन किंवा इतर उद्योन्मुख अर्थव्यवस्थेच्या तुलनेत भारत अल्प मुदतीच्या भांडवलावर थेट परकीय गुंतवणुकीपेक्षा अधिक अवलंबून आहे. हे भांडवल गेल्या तीन-साडेतीन वर्षांमध्ये चार पंचमांश आले आहे. आर्थिक धक्के सहन करण्याच्या दृष्टीने भारतीय अर्थव्यवस्था नाजूक झाली आहे.

चीन, ब्राझिल, मेक्सिको आणि पूर्व आशियाई राष्ट्रे निर्यातीतून राष्ट्रीय उत्पन्नाच्या ३० टक्के योगदान देतात. आपले प्रमाण अवघे १५ टक्के आहे. त्यामुळे आपली निर्यात राष्ट्रीय उत्पन्नाच्या ३० ते ४० टक्के व्हायला हवी. त्यासाठी उत्पादने आणि प्रगत राष्ट्रांच्या गरजेवर ध्यान देऊन चीनप्रमाणे जगाचा कारखाना व्हायला हवे

परदेशी कंपन्यांना प्रोत्साहक वातावरण निर्माण करुन निर्यातक्षम उद्योगांमध्ये १०० टक्के गुंतवणूक करण्यासाठी प्रोत्साहन द्यायला हवे. या उद्योगांतून कुशल कामगारांना रोजगार देऊन जागतिक दर्जाची उत्पादने अल्पकिंमतीत निर्माण होतील, अधिक निर्यातीतून मोठ्या

हे धोरण चांगले असले तरी अनुदानांचा वेग अनियंत्रित रीतीने वाढू लागला. १९८७-८८ मध्ये केंद्र सरकारकडून आर्थिक सेवांवर राष्ट्रीय उत्पन्नाच्या साडेचार टक्के अनुदान दिले जात होते. तर राज्य सरकारांकडून चार टक्के दिले जात होते एकूण अनुदान राष्ट्रीय उत्पन्नाच्या आठ टक्के होते. शेजारच्या राष्ट्रांशी होणाऱ्या सततच्या लढायांमुळे संरक्षण क्षेत्रावर अधिक खर्च केला जात असे. निर्यातीतून अत्यल्प उत्पन्न मिळत असे. सरकार सर्वात मोठा संघटित रोजगार पुरवठादार होते आणि सरकारी उपक्रमांना होणारा तोटा आणि वेतन आयोगांमुळे परिस्थिती अधिक बिघडली. देशांतर्गत आणि परदेशी कर्जाचा प्रचंड डोंगर उभा राहिला होता, आर्थिक तूट बळावली होती याशिवाय खनिज तेलाची बिलंही प्रचंड वाढली होती. या सर्व परिस्थितीमुळे अभूतपूर्व आर्थिक संकट देशासमोर उभे राहिले.

१९९१ पर्यंत भारतीय अर्थव्यवस्था विदेशी चलनाच्या खडखडाटामुळे दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर आली.

१९९१ आर्थिक क्रांतीच्या दृष्टीने परिवर्तनीय टप्पा

अर्थव्यवस्थेसमोरील दृष्ट्या संकट गंभीर आणि सखोल असे आहे, स्वतंत्र भारताच्या इतिहासात अशी परिस्थिती उद्‌भवली नव्हती -अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग जुलै मध्ये १९९१ चा अर्थसंकल्प मांडताना या दिवाळखोरीच्या पार्श्वभूमीवर सरकारने आयातीवरील बंधने शिथिल करणे आणि महत्त्वाच्या उद्योगांवरील सरकारी नियंत्रणे संपवणे, अशा उपाययोजना केल्या. १९९१ साली दोनशे टक्के असणारे सीमाशुल्क त्या दशकाच्या मध्यात ४० टक्क्यांवर आले आणि १९९१ सालचे ५६ टक्के करांचे प्रमाण १९९३ मध्ये ४० तर १९९७ साली ३० टक्के झाले १९९१ नंतर आयातीत सातपटीने वाढ झाली राष्ट्रीय उत्पन्नाच्या तुलनेत निर्यातीतूनही १९९०-९१ च्या सहा टक्क्यांपासून २००५-०६ पर्यंत १३ टक्क्यांपर्यंत वाढ झाली.

१९९१ नंतर सत्तेत आलेल्या अनेक सरकारांनी आर्थिक सुधारणांसाठी अनेक पावले उचलली त्याचे परिणामही चांगले दिसून आले गेल्या चार वर्षांपासून अर्थव्यवस्था आठ टक्के वेगाने प्रगती करीत आहे. याशिवाय अर्थव्यवस्थेत विविधता येत आहे. टेलिकॉम, हवाई उद्योग आणि वित्तीय सेवांसारखी काही क्षेत्र- सरकारी जोखडाखालून मुक्त होत आहेत. या सेवांच्या आणि उत्पादनांच्या बाजारपेठा विस्तारात आहेत.

या सुधारणांमुळे व्यापार आणि गुंतवणुकीला प्रोत्साहन मिळत आहे भांडवलावरील नियंत्रणात सवलत समभागांची किंमत ठरविण्याचे स्वातंत्र्य सेबी सारखा संस्थांची स्थापना यासारख्या उपाययोजनांमुळे भारतीय चलन बाजार विकसित देशांच्या बाजारपेठेस तोडीस तोड ठरत आहे. ग्लोबल डिपॉझिटरी रिसिटच्या माध्यमातून भारतीय कंपन्याना परदेशी बाजारातून भांडवल उभारणीचे स्वातंत्र्य मिळाले व्यवसायासाठीचे वातावरण अधिक मुक्त आणि सौहार्दाचे झाल्याने उद्योजकांना प्रोत्साहन मिळाले, रोजगाराच्या अधिक संधी उपलब्ध झाल्या, इंफोसिस, टीसीएस आणि विप्रो या देशातील प्रमुख तीन माहिती तंत्रज्ञान कंपन्यांनी ३१ मार्च २००७ च्या आकडेवारीनुसार अडीच लाख रोजगार निर्माण केले ग्राहकांनाही निवडीच्या अधिक संधी उपलब्ध झाल्या दूरध्वनी किंवा दुचाकी घेण्यासाठी महिने महिने ताटकळत रहावे लागे, तो काळ मागे पडला आहे.

जागतिक अर्थव्यवस्थेशी झालेली एकरुपताही अर्थव्यवस्थेची कामगिरी प्रभावित करणारी आहे. १९९१ साली थेट परकीय गुंतवणुकीचे १०० दशलक्ष अमेरिकी डॉलर्सचे प्रमाण २००५-०६ मध्ये ७.७ अब्ज डॉलर्सवर पोहोचले भांडवली बाजाराच्या मदतीने उद्योग क्षेत्रातील खाजगी क्षेत्राचे प्रमाण १९९१ च्या १३ टक्क्यांवरून आता ८० टक्क्यांवर गेले आहे.

गेल्या १५ वर्षांमध्ये देशाने मनुष्यबळ विकास निर्देशांकातही लक्षणीय प्रगती केली. दरडोई उत्पन्नात झालेल्या वाढीमुळे दारिद्र्याचे प्रमाणही कमी झाले. मानवी आयुर्मानही १९९० च्या ६० वर्षांवरुन आता ६५ वर गेले आहे. १९९१ चा ५२ टक्क्यांचा साक्षरता दर २००६ मध्ये ६५ टक्के झाला आहे.

या सुधारणांचा आणखी एक लाभ म्हणजे विविध क्षेत्रांनी स्वत:ची करून घेतलेली नवीन रचना. १९९०-९१ मध्ये सेवा क्षेत्रांचे राष्ट्रीय उत्पन्नातील योगदान ४१ टक्के होते, ते २००७ मध्ये ५६ टक्के झाले. ४९७ दशलक्ष रोजगारांपैकी २३ टक्के रोजगार सेवा क्षेत्र पुरवित आहे. तरीही कृषी क्षेत्राने ६० टक्के रोजगार पुरवून आपले योगदान कायम ठेवले आहे. **ही आशा कायम राहिल ?**

देशाच्या अर्थव्यवस्थेबद्दल सध्या सर्वत्र आशादायक वातावरण आहे. एकीकडे देश प्रगतीपथावर वाटचाल करीत असतानाची आकडेवारी येत असताना काही त्रुटीही दिसून येत आहेत. देशातील ३५० दशलक्षाहून अधिक लोकांचे दिवसाचे उत्पन्न एका डॉलरपेक्षाही कमी आहे. १९४७ च्या लोकसंख्येपेक्षा हे प्रमाण अधिक आहे. प्रौढांमधील साक्षरतेचे प्रमाण ६१ टक्के आहे. १५० दशलक्ष लोक स्वच्छ पेयजलापासून वंचित आहेत. देशातील पाच वर्षाखालील निम्मी बालके कुपोषित (कमी वजनाची) आहेत. भ्रष्टाचारात आपला देश आघाडीवर आहे. गोल्डमन सॅशताज्यायांच्या सर्वेक्षणातून दिसले आहे की, २०२० पर्यंत देशाचा आठ टक्के विकासदर कायम राहिला उत्तम शिक्षण आणि लालफितीचा कमी वापर आवश्यक असल्याचे यावरुन सूचित होते.

स्पर्धात्मक अर्थव्यवस्थेची निर्मिती

राष्ट्रांची समृद्धी हा वारसा नव्हे तर तो

समिती आणि १९४० ची मुंबई योजना जलद औद्योगिकीकरणासाठी मध्यस्थीची मागणी करत होती. स्वातंत्र्य मिळाले तेव्हा भारत ही प्रामुख्याने कृषीआधारीत अर्थव्यवस्था होती, राष्ट्रीय उत्पन्नाच्या अवघे दहा टक्के गुंतवणुकीचे प्रमाण होते. औद्योगिक विकासासाठी बचतीला वळवण्याची जबाबदारी प्रामुख्याने सरकारवर येऊन पडली होती.

पंचवार्षिक योजनांच्य माध्यमांतून विकासाचे नियोजन

आम्ही प्रगती वेगाने साधण्यास उत्सुक आहोत. मात्र त्यासाठी कोणत्याही विचाराशिवाय पूर्वतयारीशिवाय आणि नियोजनाशिवाय प्रगतिपथावर वेगाने मार्गक्रमणा करणे आणि काही प्रमाणात धोका स्वीकारणे म्हणजे मूर्खपणा नव्हे-पंडित नेहरू या वक्तव्यावरून नियोजनाचे महत्त्व नेहरूंनी कसे ओळखले होते, हे स्पष्ट होते. औद्योगिकीकरण आणि वाढत्या गुंतवणुकीसाठी सक्षम सरकारी हस्तक्षेपाची आवश्यकता होती. नेहरूंना नियोजनाविषयी जबरदस्त आकर्षण होते, आणि सोव्हिएट रशियाने समान आर्थिक रचनेवर साधलेल्या नियोजना त्यांना प्रभावित केले होते. सरकारी पुढाकाराने नियोजनबद्ध अर्थव्यवस्थेच्या माध्यमातून विकास साधण्याची गरज त्यांनी वर्तवली होती याचा परिपाक म्हणून पंचवार्षिक योजनांच्या प्रक्रियेला सुरुवात झाली.

विकासाच्या जलद मार्गावर भारताला आणणे आणि औद्योगिकीकरणात मोठी झेप घेणे, त्यासाठी या प्रक्रियेत सरकारांची भूमिका महत्त्वाची ठरणे, या दृष्टीने पंचवार्षिक योजनांची आखणी केली गेली. सरकारकडून गुंतवणुकीचे वचन घेऊन प्रगतीचा वेग पाच टक्क्यांपेक्षा अधिक राखणे हे या योजनांचे ध्येय होते गुंतवणुकीतून उभ्या राहणाऱ्या विविध विकास प्रकल्पांसाठी निधी उपलब्ध करून देण्यासाठी आर्थिक धोरणांमार्फत बचतीचे प्रमाण आवश्यक तितके ठेवण्यासाठीही सरकार वचनबद्ध होते. या उपाययोजनांच्या माध्यमातून विकास प्रक्रियेला सन्मान मिळवून देण्याबरोबरच अर्थव्यवस्थेत खाजगी गुंतवणुकीला निमंत्रित करणेही अपेक्षित होते.

१९५१ - ५६ या पहिल्या पंचवार्षिक योजनेचे, आगामी २७ वर्षात दरडोई उत्पन्न दुपटीने वाढवण्याचे उद्दिष्ट होते. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेने (१९५६-६१) एकंदर औद्योगिकीकरणाचे घोटाळे विशद करायचे होते, यालाच महानालोबीस योजना असेही म्हणतात. या योजनेत अवजड उद्योगांना केंद्रस्थान होते. कृषी क्षेत्राच्या विकासाच्या सहाय्याने ही योजना राबवली जाणार होती. कृषी उत्पनात वाढ होऊन उद्योगांना त्यातून कच्चा माल मिळेलच, पण उद्योगांसाठी लागणाऱ्या वाढत्या कर्मचारीवर्गाची गरजही पूर्ण होईल अशी धारणा होती. तिहेरी परिणाम घडवून आणणारी ही पद्धत होती.

१९५१-५२ मध्ये देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात २ पूर्णांक ३ टक्के अशी मध्यम स्वरूपाची वाढ होत होती. पहिल्या पंचवार्षिक योजनेत (१९५१-५६) ३.७ टक्के वाढ होऊन ४.२ टक्क्यांपर्यंत पोहोचली. दीर्घकालीन विचार केला तर १९७०-७२ आणि १९८०-८२ मध्ये ती ३.२ टक्के होती १९८०-८१ ते १९९०-९१ मध्ये त्यात वाढ होऊन ती ५.७ टक्के झाली.

संरक्षणाचा कालावधी :-

नेहरू महानाबोलीस यांची औद्योगिकीकरणाची संरचना अवजड उद्योगांना केंद्रस्थानी मानून आखली होती. मात्र भारताने अवजड आणि मूलभूत उद्योगांकडे ध्यान न दिल्याने उत्पादनाची किंमत आंतरराष्ट्रीय स्पर्धेनुरूप नव्हती. उद्योगांना स्पर्धात्मकता जोपासण्याऐवजी विविध नियंत्रणाच्या माध्यमातून संरक्षण देण्यावर लक्ष दिले गेले, त्यामुळे मागणी आणि पुरवठा या दोन्ही बाबींमध्ये त्रुटी राहिल्या, स्पर्धात्मकतेऐवजी परवाने मिळावण्यावर व्यवस्थापन अधिक वेळ खर्च करत होते. या अकार्यक्षमतेचा परिणाम म्हणून ग्राहकांना मोठी किंमत मोजून उत्पादने आणि सेवा घ्याव्या लागत.

या काळातील औद्योगिक रचना अतिशय अकार्यक्षम होती आणि त्यांना विविध संरक्षणात्मक धोरणांची आवश्यकता भासायची. बऱ्याचदा तर त्यांना आवश्यकता ते संरक्षण पुरवूनही ही वेळ यायची (अहलुवालिया २००२). आयातीला पर्याय अशा प्रकारची देशांतर्गत धोरणे राबवत असल्याने त्यावेळेस निर्यातीतून मिळणाऱ्या उत्पन्नाकडे दुलर्क्ष केले जात असे. जागतिक व्यापारातला १९५१ चा भारताचा दोन टक्के वाटा १९६० साली घसरून एका टक्क्यांवर आला होता. १९८० सालात तो ०.४२ टक्के तर १९९० मध्ये अर्धा टक्का झाला होता. याच काळात पूर्व आशियाई राष्ट्रे निर्यातीला पोषक धोरणे राबवित होती.

नेहरुंचे निधन आणि आर्थिक विकासाची संयगती

नेहरुंच्या निधनानंतर भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास मंदावला स्वातंत्र्यानंतर १९६६ ते १९८० हा भारतीय अर्थव्यवस्थेसाठीचा काळाकुट्ट कालावधी होता, असे डॉ बिमल जालान यांनी त्यांच्या पुस्तकात म्हटले आहे. या काळात अर्थव्यवस्था सरासरी तीन टक्क्यांपेक्षा कमी वेगाने प्रगती करीत होती, तर लोकसंख्या दरसाल दोन टक्क्यांनी वाढत होती. दरडोई उत्पन्नातील वाढ लोकसंख्यावाढीच्या निम्मी होती. औद्योगिकीकरणाचा वेगही मंदावला होता. १९५० ते १९६५ या काळातील ७.८ टक्क्यांचे औद्योगिक उत्पादन १९६५ ते १९८० या काळात चार टक्के झाले होते.

आर्थिक उधळपट्टी आणि बँकांची दिवाळखोरी

नंतरच्या काळात केंद्र आणि राज्य सरकारांनी अनुदाने देण्याचे धोरण राबविले.

स्त्रोतांची मोठ्या प्रमाणावर इंग्लडकडे गळती झाली. राष्ट्रीय उत्पन्नाच्या ती एक के एक पूर्णांक तीन टक्के होती. याशिवाय येथील ब्रिटिशांनी राष्ट्रीय उत्पन्नाच्या पाच टक्के स्त्रोत स्वतः हडप केले, ज्यांचा उपयोग देशाच्या विकासाला होऊ शकला असता इंग्लड आणि भारताच्या उत्पन्नाचे प्रमाण पाहिले तर १८५७ मध्ये ते २० टक्के होते, जे १९४७ मध्ये १२ टक्क्यांवर आले.

उत्पन्नातील निष्क्रियता आणि दारिद्र्य

१८७० ते १९१४ या काळात निव्वळ कृषी उत्पादनात ३३ टक्क्यांनी वाढ झाली. मात्र नंतरच्या ३० वर्षांत ती तीन टक्क्यांपेक्षा कमी होती. १९३० च्या प्रारंभी मंदीचा परिणाम म्हणून शेतकरी कर्जबाजारी झाले व त्यांना कर्ज चुकती करण्यासाठी आपली संपत्ती विकावी लागली. १९०० ते १९३० ते काळात शेतकऱ्यांना मिळणाऱ्या मजुरीत अवघी चार टक्कयांनी वाढ झाली. अन्न सुरक्षितेतही भारत गरिबच झाला. १८७०, १८७८, १८८९, १८९७ आणि १९०० सालात आलेल्या दुष्काळांनी दीड कोटी जनतेचा बळी घेतला, सरकारच्या महसूलवसुलीच्या ताठर भूमिकेमुळे शेतकरी सावकारांच्या कर्जाच्या पाशात अडकला.

१८५७ ते १९१४ या काळात लोकसंख्या वाढीचादर ० पूर्णांक पाच आणि ० पूर्णांक ७ टक्के होता. त्या तुलनेत दरडोई उत्पन्नात ० पूर्णांक ६ टक्के वाढ झाली. याशिवाय लागवडीखालील जमिनीचे प्रमाण वाढण्याचे प्रमाणही शून्य होते. त्यामुळे दरडोई अन्न उपलब्धतेतही घट झाली.

वसाहतीच्या साम्राज्याचा अंत

ब्रिटिशांच्या राजवटीचा अंत होताना भारत कृषिआधारित अर्थव्यवस्था असणारा देश होता. भारतात उत्पादित होणाऱ्या वस्तूंवर लावलेल्या करांमधून आर्थिक अन्याय करून जनतेला शेतीकडे वळणे भाग पाडले गेले. कृषीवर आधारित लोकांची संख्या वाढल्याने उत्पन्नाच्या पातळीत घट झाली १८७० साली असणारी ४७ टक्के कामगारांची संख्या १९४७ साली ३७ टक्के झाली होती. औद्योगिकीकरण सुरू झाले नव्हते ब्रिटिशकाळात काही उद्योगधंदे सुरू झाले होते, पण विकास प्रक्रियेत त्यांचे मोलाचे योगदान राहिले नव्हते. ब्रिटिशांनी तांत्रिक शिक्षणाकडे जसे दुर्लक्ष केले, तसेच प्रशिक्षण आणि व्यवस्थापन यांचे ज्ञान देण्यासही पुढाकार घेतला नाही, त्याचा परिणाम म्हणून भारतीय उद्योगधंद्यांना कुशल कामगारापासून वंचित रहावे लागले, त्याचा परिणाम भारतीय उद्योगांच्या उत्पादन क्षमतेत आणि स्पर्धात्मक किंमतीवर झाला. स्वातंत्र्योत्तर काळातही हा परिणाम दिसून आला. १९०० ते १९४७ या काळात गुंतवणुकीचे प्रमाण राष्ट्रीय उत्पन्नाच्या सात टक्के ते साडे नऊ टक्के इतके अल्प राहिले.

आघाडीमुळे वाटचाल (१९४७ ते १९९१)

भारत आता सामर्थ्य आणि परिणाम घडवू शकणाऱ्या राष्ट्राची जागा घेतल असून राष्ट्रांच्या संघटनेत योग्य जागा प्राप्त करेल लॉर्ड माऊंटबॅटन संसदेतील भाषण १९४७

भारत स्वतंत्र झाला त्यावेळी पुरेसे औद्योगिकीकरण झाले होते. उत्तम पायाभूत सुविधांबरोबरच नागरी आणि प्रशासकीय संरचना, परिणामकारक कायदेयंत्रणा अस्तित्वात होती. याशिवाय इंग्रजीवर आधारित शिक्षणव्यवस्था आणि जागतिक अर्थव्यवस्थेशी दृढ संबंधही होते. तरीही दारिद्र्य अस्तित्वात होते. व साक्षरतेचे प्रमाणही कमी होते उद्योगांचे राष्ट्रीय उत्पन्नातील योगदान कमी होते. १९५० ते ५१ या काळात राष्ट्रीय उत्पन्नात प्राथमिक क्षेत्राचा वाटा ५७ टक्के इतका मोठा होता. त्याखालोखाल दुय्यम क्षेत्र १४ टक्के आणि तृतीय क्षेत्राचा २९ टक्के होता.

१९४७ नंतर ५० वर्षांच्या काळात भारताने परावलंबी वसाहत ते लोकशाहीवादी विकसनशील राष्ट्र या प्रवासात विविध क्षेत्रांमध्ये प्रगती केली. आर्थिक धोरणांचा केंद्रबिंदू राष्ट्र विकासहाच होता. लोकसंख्येत दुपटीने वाढ होत असताना कृषी उत्पादनात तिपटीने वाढ झाली वाढत्या लोकसंख्येच्या अन्नाची गरज त्यातून भागली उद्योधंद्यांचा पाया विस्तारत असताना औद्योगिक उत्पादनात पंधरा पटीने वाढ झाली. १९४७-४८ नंतर दरडोई उत्पन्नात दुपटीने वाढ झाली. काही मूलभूत धोरणांमुळे समाज कल्याण मानांकातही वाढ झाली. मृत्युदरात दोन तृतियांशाने घट झाली याशिवाय बालमृत्यूचे प्रमाणही लक्षणीयरीत्या कमी होऊन साक्षरतेचे प्रमाणही तिपटीने वाढले. १९४७ ते १९९७ या काळात झालेली प्रगती आधीच्या अर्धशतकाहून मोठी होती. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात भारतीयांच्या दरडोई उत्पन्नात असणारी अर्ध्या टक्क्यांची वाढ १९५० नंतर दोन टक्के झाली.

प्रगतीसाठी पायाभरणी :-

स्वातंत्र्यानंतर पहिल्या सरकारचे उद्दिष्ट विकासाचा वेग वाढविणे हे होते. त्या दृष्टीने योजनांची आखणी केली गेली. वाढत्या विकासामुळे बेरोजगारीचा प्रश्न सुटेल अशी सरकारची अपेक्षा होती. उत्पन्नवाढीमुळे जीवनमान वाढेलच, पण त्याचबरोबर सरकारचा महसूलही वाढेल असे सरकारला वाटत होते.

औद्योगिकीकरणाचा वेग वाढल्यास त्याचा परिणाम विकासाचा वेग वाढण्यात होईल. अशी सरकारची धारणा होती. अधिक गुंतवणूक लागणारे खाजगी क्षेत्र मात्र औद्योगिकीकरणाची जबाबदारी पेलवण्यास तयार नव्हते. चालू बाजारभावांप्रमाणे १९५० साली सकल देशांतर्गत बचतीचे प्रमाण राष्ट्रीय उत्पन्नाच्या तुलनेत १० टक्के होते. ही बाब ध्यानात घेऊन अकराव्या पंचवार्षिक योजनेत सकल देशांतर्गत बचतीचा दर ३३.४ टक्के ते ३४.७ टक्के ठेवण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. १९३० ची राष्ट्रीय नियोजन

आशियाई आणि युरोपातील बाजारपेठांचा मोठा पुरवठादार होता. मात्र ब्रिटिश संसदेच्या अधिपत्याखालील ईस्ट इंडिया कंपनीने भारतात उत्पादित झालेल्या उच्च दर्जाच्या उत्पादनांवर मोठे कर लादले. त्याचवेळी ब्रिटनमध्ये तयार झालेल्या वस्तूंचे आयातशुल्क कमी केले ब्रिटनमधील सूतगिरण्या आणि कारखान्यांसाठी कच्चा माल पुरवणारा स्रोत म्हणून भारत राहिला. इंग्लडहून आलेल्या स्वस्त कापडामुळे भारतातील वस्त्रोद्योगावर मोठा परिणाम झाला या धोरणामुळे देशाच्या एकूण व्यापारी संरचनेवर परिणाम घडून आला. १८११ साली भारतातून कापड (एकूण निर्यातीच्या ३३ टक्के किंमत), त्याखालोखाल अफू (२४ टक्के), नीळ (१८ टक्के), कच्चे रेशमी आणि कच्चे सूत एकूण निर्यातीच्या १३ टक्के प्रमाण अशी निर्यात व्हायची. मात्र १८५० साली भारतातून अफू (३० टक्के प्रमाण), कच्चे सूत (१९ टक्के) आणि नीळ (११ टक्के) असे निर्यात होणाऱ्या वस्तूंचे प्रमाण झाले. या काळात उद्योगक्षेत्रांवरून कृषी उद्योगांकडे स्थलांतराचे प्रमाण वाढले. या बंधनकारक धोरणांमुळे लक्षावधी भारतीयांवर बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळली, कारण त्यांची उत्पादने बाजारपेठेनुरूप तसेच वाजवी ठरली नाहीत.

नंतरच्या काळात राज्यकर्त्यांची निष्क्रियता आणि ब्रिटिशांची चतुर राजनीती आणि शक्ती याच्या जोरावर ब्रिटिशांनी आणखी भूमी थेट आपल्या अधिपत्याखाली आणली. १८५७ पर्यंत आताच्या भारत पाकिस्तान आणि बांग्लादेशची ६० टक्क्यांहून अधिक भूमी त्यांनी आपल्या पंखाखाली घेतली होती. ईस्ट इंडिया कंपनीमुळे भारतीय अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेशी वाढत्या व्यापार संबंधामुळे एकरूप होऊ लागली होती. युरोपमध्ये त्यावेळेस वेग धरू लागलेल्या औद्योगिकीकरणासाठी कच्चा माल पुरवण्यासाठी इंग्लडच्या विविध वसाहती मुख्य स्रोत बनल्या

१८५७ पर्यंत व्यापार आणि अर्थव्यवस्थेवर ब्रिटिशांनी आपला अंमल प्रस्थापित केला होता युरोपातील उद्योग आणि कापड गिरण्यांना भारतातून मोठ्या प्रमाणावर कच्चा माल इतर वसाहतींप्रमाणे निर्यात होऊ लागला होता. भारतातील जनतेच्या दृष्टीने शेती हा अपरिहार्य पर्याय ठरला.

आर्थिक पुनर्रचना व राष्ट्रविकास (१८५७ ते १९४७)

भारताच्या पहिल्या स्वातंत्र्यलढ्याने येथील जनतेच्या मनात राष्ट्रीयतेच्या भावनेचे बीजारोपण झाले, व त्याची परिणती १९४७ साली स्वातंत्र्य मिळण्यात झाली. या काळात तीन महत्त्वपूर्ण घडामोडी घडल्या. सर्वप्रथम आर्थिक एकात्मता -ब्रिटिशांच्या गरजेनुरूप घडलेली, त्यानंतर संरक्षण तसेच व्यापार आणि प्रशासनाच्या दृष्टीने उभारण्यात आलेल्या पायाभूत सुविधा आणि त्यानंतर उत्पन्नात घट होऊन दारिद्र्याचे प्रमाण वाढले. याचा परिणाम देशाच्या स्वातंत्र्याचे महत्त्व जनतेच्या मनात ठसवण्यात झाला उत्पन्नात घट होत असल्याने या काळात गरिब अधिकच गरिब झाले. राष्ट्रीय स्रोतांची गळती होण्यबरोबरच अर्थव्यवस्थेचा विकासही मंदावला. याच काळात जगाने जागतिक महायुद्ध पाहिली देशाची व जनतेची पिळवणूक यावेळीच वाढीला लागली. ब्रिटिश तंत्रज्ञान, भौतिक आणि प्रशासकीय पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक वाढवत होते. मात्र या सुविधांचा परिणाम राष्ट्राच्या विकासावर होत नव्हता

व्यापार :-

भारताचे जगाशी दृढ व्यापारी संबंध होते, मात्र नंतर ते युरोपातील निवडक राष्ट्रांपुरतेच सीमित राहिले.

अठराव्या शतकाआधीच भारताचे जगाशी व्यापारी संबंध असले, तरी त्यात १८५७ नंतर मोठी वाढ होऊ लागली. १८५७ ते पहिले महायुद्ध या काळात भारताचा विदेश व्यापार स्फोटक म्हणता येईल इतका होता. घरगुती उत्पादनांच्या तुलनेत झालेली ही वाढ १८०० साली एक ते दोन टक्के होती ती १८६० मध्ये १० टक्के झाली व १९१४ मध्ये २० टक्क्यांवर पोहोचली.

पायाभूत सुविधा :

ब्रिटिशांनी पायाभूत सुविधांच्या उभारणीवर प्रचंड खर्च केला. १९५७ ते १९४७ या काळात ब्रिटिशांनी त्याच्याकडील पायाभूत सेवांच्या क्षेत्रातील तज्ज्ञ आणि पुढारलेले तंत्रज्ञान भारतात उपलब्ध करुन दिले. ब्रिटिश राजवटीचा सर्वात मोठा लाभ म्हणजे त्यांनी येथे उभारलेल्या पायाभूत सुविधा होय स्वतंत्र भारताला त्यांची ही भेट म्हणता येईल, मात्र त्यांनी राष्ट्राच्या विकासासाठी हे केले नव्हते हे नक्की. उदाहरण द्यायचे तर भारतात रेल्वेचे जाळे उभारण्याचा त्यांचा निर्णय हा देशाच्या अंतर्गत भागातून कच्चा माल बंदरापर्यंत पोहोचवण्याच्या गरजेतून घेतला होता. किनारपट्टीवर वसलेल्या मद्रास, मुंबई आणि कलकत्ता या शहरांना रेल्वेमुळे आधुनिक बंदराचे रूप प्राप्त झाले. १९४७ पर्यंत भारतीय रेल्वे हे जगातील एक मोठे रेल्वे जाळे म्हणून उदयास आले. रेल्वेचे रूळ १९४७ साली तब्बल ४२ हजार झाले होते. आणि १८७० साली असणारी ५० दशलक्ष प्रवासीसंख्या १९४७ साली ६०० दशलक्षांहून अधिक झाली होती. रेल्वेमुळे स्थानिक व्यापाराला प्रोत्साहन मिळालेच पण बाजारपेठांचे एकत्रीकरण आणि देशभरात विविध वस्तूंची वाहतूक शक्य झाली सर्वात महत्त्वाचे म्हणजे वेळ आणि पैसा यांची बचत करुन पुरवठा प्रणालीत सुधारणा झाली.

पायाभूत सुविधांची उभारणी मात्र निवडक भागातच झाली. रस्ते बांधणीपेक्षा रेल्वेला प्राधान्य दिले गेले, तसेच पूर्व भारतापेक्षा दक्षिण आणि पश्चिम भारतावर या सुविधांची उभारणी करताना प्राधान्य दिले गेले.

राष्ट्रीय स्रोतांची गळती :-

१८६७ ते १९३० या काळात भारतीय

आर्थिक विकासाची १५० वर्षे

✦ एन्. आर. नारायणमूर्ती

पहिल्या स्वातंत्र्ययुद्धाचा शतकोत्तर सुवर्णमहोत्सव साजरा करीत असताना या युद्धात सहभागी झालेल्यांच्या आशा आकांक्षांना पुन्हा एकदा उजाळा देण्याची सुवर्णसंधी आपल्याला प्राप्त झाली आहे. या युद्धाला आणि युद्धात सहभागी झालेल्या नेत्यांच्या लोकशाहीवाही नैतिकतावादी आणि मुक्त समाजजीवनाच्या कल्पनांसमोर आपण नतमस्तक होत असतानाच संपूर्ण जगाने भारताची स्वातंत्र्य लढाई एका प्रचंड अशा मुक्ती चळवळीच्या रूपाने अनुभवली. याबाबत १५ ऑगस्ट १९४७ रोजीच्या 'हिंदू' मध्ये पुढीलप्रमाणे वर्णन केले होते. 'या देशाच्या नागरिकांमध्ये सत्याची प्रतिष्ठापना होईल असा दृढ विश्वास होता. त्यांना कोणत्याही सैन्याचा पाठिंबा नसला तरी आपल्या शत्रूचाही आदर करून त्याच्यातील चांगल्या गोष्टींवर विश्वास ठेवून आणि या कारणासाठी लढा दिला हेच या देशाचे मोठे आश्चर्य किंवा सौंदर्य म्हणता येईल.'

६० वर्षांपूर्वी वसाहतवादी सत्ताधाऱ्यांच्या जोखडातून मुक्त झाल्यानंतर सध्याच्या काळात विकसनशील राष्ट्रांमध्ये भारत एक प्रागतिक लोकशाही म्हणून उदयाला आले आहे. फाळणीचे दुःख पचविल्यानंतर आणि नंतरच्या काळातील उद्भवलेल्या काही घटनांमध्ये भारत सापडला असण्याचं भाकीत वर्तवले गेले होते. त्यानंतर लोकशाही आणि राष्ट्र उभारणीचे निष्फळ प्रयत्न केले जात असल्याच्या टीकेनंतर भारताने आजचे हे स्वरूप प्राप्त केले आहे. भारतीय लोकशाहीने त्यानंतरही अनेक धक्के पचवले असून, येथील जनतेनेही राष्ट्रीयत्वाची प्रखर भावना दर्शवत राष्ट्रउभारणीच्या कामात मोलाचे योगदान दिले आहे. भारत जगातील इतर राष्ट्रांपुढे विविधतेत एकता आणि संघराज्यीय लोकशाहीचे एक उत्तम उदाहरण म्हणून उभा आहे.

देशाच्या आर्थिक विकासाचे विविध टप्पे आणि राजकारणाची संरचना या दोन बाबींवर कोणत्याही राष्ट्रा प्रगल्भता जोखली जाते. या लेखात देशाच्या आर्थिक विकासाचे विविध टप्पे विशद करण्याचा प्रयत्न केला आहे. भारतीय अर्थकारणाचे मूळ ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या भारतातील प्रवेशापासून, म्हणजेच इ. स. १६०० मध्ये आहे. थोडक्यात या लेखात १७५७ पासूनचा भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासाचा मागोवा घेतला जाणार आहे.

भारताच्या आर्थिक विकासाचे स्वातंत्र्यापूर्वीचे आणि स्वातंत्र्यानंतरचे प्रत्येकी दोन टप्पे असे एकूण चार टप्पे येथे विचारात घेतले आहेत. पहिल्या भागात १७५७ ते १८५७ या काळाचा विचार केला आहे. त्यानंतर १८५७ ते १९४७ असा दुसरा टप्पा आहे. त्यानंतरचे दोन टप्पे भारताने स्वातंत्र्य मिळवल्यानंतरचे आहेत. लेखाचा समारोप आर्थिक विकासाच्या दृष्टीने स्पर्धात्मक अर्थव्यवस्थेचे महत्त्व स्पष्ट करुन होतो.

वसाहतींचा काळ (१७५७ ते १८५७)

१८५७ नंतरच्या भारतीय अर्थव्यवस्थेच्या प्रगतीचा विचार करताना त्याआधीच्या शतकापूर्वीचा अभ्यास करावा लागेल. १७५७ साली प्लासीच्या लढाईत विजयी झाल्याने ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचा अंमल देशावर सुरू झाला.

भारत त्यावेळी विविध राजेरजवाड्यांचा अंमल असणाऱ्या राज्यांचा समूह होता. कोणत्याही प्रकारे समान राजकीय अथवा प्रशासकीय यंत्रणा अस्तित्वात नव्हती. यावेळी कोणत्याही प्रकारची आर्थिक धोरणे अस्तित्वात नव्हती. प्रत्येक राज्यांमध्ये वेगवेगळे कायदे होते. मोठ्या प्रमाणावर महसुलात गळती होती, तसेच तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादन वाढीबद्दलही कोणी आग्रही नव्हते. नैसर्गिक स्त्रोतांच्या व्यावसायीकरणाचा मुद्दा तर कोणाच्या गावीही नव्हता. ईस्ट इंडिया कंपनी आणि त्यानंतर ब्रिटिशांच्या आगमनाने भारताच्या राजकीय, सामाजिक आणि आर्थिक संरचनेत मोठा बदल घडवला.

सर्वात प्रथम येथील अर्थव्यवस्थेवर परिणाम असणाऱ्या मुघल साम्राज्याचा नाश झाला. १७५० च्या दरम्यान मुघल साम्राज्य लयाला जात असताना, केवळ नावाचे उरलेले राजे दिल्लीच्या न्यायालयासमोर धाव घेऊन आतापर्यंत त्यांच्या नियंत्रणाबाहेर असणाऱ्या घटनांसाठी दाद मागू लागले. १७५७ ते १८५७ या काळात ब्रिटिशांनी मुघल साम्राज्यातील सरंजामशाही नष्ट केली. या प्रकारच्या राजकीय आणि सामाजिक बदलांमुळे सुमारे तीन चतुर्थांश उंची हस्तकौशल्याच्या वस्तूंची मागणी नष्ट झाली. याचा परिणाम उंची मलमल, तलवारी, सुशोभित शस्त्रास्त्रे, दागिने, उंची कपडे आणि पादत्राणे तयार करणाऱ्या उत्पादकांवर झाला. अशा वस्तूंची बाजारपेठ नष्ट झाल्याने लाखो लोक दारिद्र्याच्या गर्तेत ढकलले गेले.

अठराव्या शतकात भारत उत्पादित वस्तू आणि कृषी क्षेत्रातील अग्रगण्य देश होता.

या उपाययोजनांमुळे उपखंडात भारतीय बँकींग व्यवस्था सध्या सर्वाधिक मजबूत व्यवस्था आहे.

वित्तीय क्षेत्रातील पहिल्या टप्प्यातल्या बदलांना लगेचच अनुभवता आले. या काळात खाजगी बँकांच्या नफ्यात वाढ होऊन त्यांच्या थकित कर्जात घट झाली.

सध्या सुरू असलेल्या बदलांमुळे भारतातील बँकांसमोर काही आव्हाने उभी राहिली आहेत. यातील प्रमुख म्हणजे खाजगी तसेच परदेशी बँकांच्या आगमनामुळे बँकींग उद्योगात स्पर्धात्मक वातावरण निर्माण झाले आहे. मजबूत भांडवल, आधुनिक तंत्रज्ञान, चांगले जाळे याबरोबरच आपले ध्येय निश्चित करून, देशी बाजारात उतरलेल्या कंपन्या आपले जाळे देशभर उभारत आहेत. मध्यवर्ती कार्यालयाशी जोडलेल्या या बँका मध्ये बाजारपेठेतील उत्तम कामगारांना उत्तम वेतनावर नेमले जाते. या बँकांची सरकारी क्षेत्रातील बँकांशी थेट स्पर्धा आहे.

बदलत्या काळाबरोबर सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना आव्हानेच आता संधी म्हणून स्वीकारावी लागणार आहेत. खाजगी बँकानी उभ्या केलेल्या जाळ्याचा सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी आदर्श ठेवायला हवा. सध्या सर्व सार्वजनिक बँकांचे केवळ संगणकीकरणच झालेले नाही तर त्यांनी खाजगी बँकांप्रमाणे जाळी उभारली आहेत. स्टेट बँकेच्या सात सहकारी बँकांनी देशात प्रथम सार्वजत्रिक जाळी उभारली आहेत.

संगणकीकरण आणि आपले जाळे उभारण्याबरोबरच एटीएमसारख्या आणि इंटरनेट बँकींगसारख्या सुविधा उभारण्यासाठी या स्पर्धेतून प्रोत्साहन मिळाले. या सुविधांमुळे ग्राहकांना कायम सेवा मिळतेच पण बँकेचा आर्थिक ताणही कमी होतो. माहिती तंत्रज्ञान आणि ग्राहक सेवा देण्यासाठीही बँका प्रयत्नशील आहेत.

सुरुवातीला केवळ कृषी आणि उत्पादन क्षेत्राकडेच लक्ष देणाऱ्या बँकांनी आता किरकोळ वित्तपुरवठ्यावरही लक्ष दिले आहे. बड्या उत्पादकांना कर्जपुरवठ्यासाठी इतर माध्यमे उपलब्ध झाल्याने बँकांनी किरकोळ वित्तपुरवठ्याकडे लक्ष केंद्रित केले आहे. बँकेकडे असलेल्या गंगाजळीचा २५ टक्के भाग सध्या किरकोळ वित्तपुरवठा गुंतला आहे. गृह आणि वाहन उद्योगातही सध्या दिसत असलेली तेजी आणि बँकेकडील उपलब्ध कर्जाऊ निधी यांचा एकमेकाशी संबंध आहे.

भारतीय आर्थिक क्षेत्र सरकारने खुले केल्याने बँकाना त्यांच्या व्यापारासाठी नवी क्षितिजे पारंगत करणे शक्य झाले आहे. याचा परिणाम लहान बँकांच्या स्पर्धात्मकतेवर होऊ शकतो. जागतिक व्यापार संघटनेच्या नियमावलीवरून २००९ साली भारतीय अर्थव्यवस्था आणखी खुली होत असल्याने सार्वजनिक क्षेत्रातील लहान बँका स्पर्धेत टिकू शकत नाहीत, त्यामुळे जागतिक स्तरावरील घडोमोडींप्रमाणे या बँकांना बड्या बँकांमध्ये विलीनीकरण करावे लागले.

वाढती अर्थव्यवस्था आणि बँकेच्या पतपुरवठ्यातील वाढीच्या पार्श्वभूमीवर ५८ टक्के शेतकरी आणि ७० टक्के बिगरशेतकरी अद्यापही बँकींग सेवांपासून वंचित आहेत. बँकांमधील ठेवींचे प्रमाण चीनच्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या १९० टक्क्यांच्या तर जपानच्या १४२ टक्क्यांच्या तुलनेत आपल्याकडे अवघे ६० टक्के आहे. वाढत्या अर्थव्यवस्थेवर गरिब अधिकच गरिब तर श्रीमंत अधिक श्रीमंत होत आहेत. त्यामुळे योग्य समतोल साधण्यासाठी पावले उचलणे गरजेचे आहे. प्रा. सी. के. प्रल्हाद यांच्या सिद्धांताप्रमाणे जगातील सर्वाधिक आकर्षक, प्रगतिशील बाजारपेठेत आपण किमान पिरॅमिडच्या पायथ्याशी तरी असावे, हे मत प्रत्यक्षात यायला हवे. भारतीय बँकांनी ग्रामीण भागावर आता लक्ष वळवले आहे. या बँका ई-किओस्क आणि मध्यस्थांच्या मार्फत ग्रामीण भागात सेवा देत आहेत. सहा लाख भारतीय खेड्यांना या सुविधांचा लाभ मिळेल ती सुदिन जवळच आहे.

भारतीय बँकींग यंत्रणेत वसाहतींच्या काळापासून बदल घडलेला नाही. त्यामुळे सध्या घडत असलेल्या परिवर्तनासाठी जागतिक अर्थव्यवस्था, विस्तारित तंत्रज्ञान आणि बदलत्या मनोवृत्तीचे धन्यवाद मानायला हवेत. जुने तंत्रज्ञान सोडून ही व्यवस्था नव्याने झेप घेत आहे. सर्वत्र उत्सुकता भरून राहिली आहे.

अनुवाद - नितीन सावंत

(पान क्र. ४० वरुन)

आयसीटीच्या या दृष्टीने चाललेल्या कामाचे सकारात्मक परिणाम येत्या दोन तीन वर्षात दिसून येतील.

सारांश :-

अनेकांच्या दृष्टीने या सेवा ग्रामीण भागात पोहचवणे म्हणजेच संगणक आज्ञावली तयार करणे असा समज आहे. हे महत्त्वाचे असले तरी ती सेवा नव्हे. प्रत्येक सेवेचा ग्रामीण भागातील जनतेवर परिणाम घडायला हवा.

एखाद्या शेतकऱ्याला आपल्या प्रश्नांसाठी तज्ज्ञ ओळखणे आणि या कार्यक्रमात सहभागी करण्यासाठी प्रयत्न करणे आणि हे ठराविक कालावधीत करणे म्हणजेच सेवा होय. या सेवांसाठी शेतकऱ्यांना पैसे मोजावे लागणार असाही एक समज आहे. परंतु जोवर पैशाचा प्रवाह योग्य दिशेन होत नाही. तोवर या सेवांचे मुल्यमापन होणार नाही.

शेवटी, माहिती तंत्रज्ञान आणि दळणवळण क्षेत्रातील क्रांतीने भारताला गेल्या १५ वर्षात एका नव्या वळणावर आणले आहे, केवळ संपत्तीच नव्हे देशाबद्दल आत्मविश्वास निर्माण केला आहे. तरुणांच्या मनातील न्यूनगंड दूर होऊ लागला आहे. शहरी भागातील तरुणांमध्ये उद्योजकतेबद्दल सकारात्मक भावना निर्माण होऊ लागली आहे. मात्र, जोवर ग्रामीण भागात या विकासाची फळे पोहचत नाहीत तोवर हा विकास अपूर्ण आहे. आयसीटी त्यासाठी प्रयत्न करु शकते. या चांगल्या हत्याराचा आपल्या लाभासाठी उपयोग करुन घ्यायला हवा.

अनुवाद :- नितीन सावंत

त्यानंतर लगेचच फेब्रुवारी १९६९ साली आर. जी. सरय्या यांच्या अध्यक्षतेखाली एका बँकींग आयोगाची स्थापना करण्यात आली. बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँकेचे ते अध्यक्ष होते. या समितीला भारतीय बँकींग प्रणालीची संरचना, कार्यप्रणाली आणि धोरणे यांचा सर्वसमावेशक अभ्यास करून बदल सुचवणाऱ्या शिफारशी करायच्या होत्या. या समितीने व्यावसायिक आणि सहकारी बँकांची संरचना बदलणे, त्यांच्या कार्यकक्षेत वाढ करणे, कार्यक्षमता वाढवणे, कायदेशीर बदल आणि भविष्यकालीन संशोधन आणि अभ्यास याबाबतच्या काही शिफारशी सुचविल्या. त्यातील बहुतांश शिफारशी अंमलात आल्याच नाहीत.

बँकींग व्यवस्थेत त्यानंतर आमूलाग्र परिवर्तन घडवून आणणारी घटना जुलै १९६९ मध्ये घडली. सरकारने एका अध्यादेशाद्वारे देशातील १४ प्रमुख अनुसूचित (शेडयूल्ड) बँकांचे ५० कोटी रुपयांच्या ठेवींसह एकीकरण केले. त्यामुळे वित्तीय विकासात एका नवीन पर्वाला प्रारंभ झाला. याबाबत पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी आपल्या भाषणात सांगितले की 'बँकींगसारख्या यंत्रणेने लक्षावधी जीवनांना स्पर्श करायला हवा. त्यांनी सामाजिक जाणीवेतून काम करून विस्तृत प्रमाणातील सामाजिक हेतूंनी काम करून राष्ट्रीय महत्त्व आणि उद्दिष्ट पूर्ण करायला हवीत. त्यामुळे या बँका केवळ सार्वजनिक नियंत्रणाखालीच नव्हेत तर सरकारी मालकीच्या व्हाव्यात, ही सार्वजनिक मागणी आहे.'

या राष्ट्रीयीकरणाबाबतच्या कायद्याच्या मसुद्यात अर्थव्यवस्थेची उंची नियंत्रणात आणून विकासाच्या गरजांची पूर्तता करणे नमूद केले होते. कर्जदार, विशेषत: शेतकरी, लघुउद्योजक, स्वतंत्र व्यवसाय करणारे व्यावसायिक गट यांच्या गरजा-या मंडळींचा सामाजिक दर्जा विशेष लक्ष न देता पुरवणे, हे राष्ट्रीयीकृत बँकांचे उद्दिष्ट बनले. या बँकांनी नवीन आणि प्रगतिशील उद्योजकांना प्रोत्साहन देण्याबरोबरच मागास भागात उद्योग व्यवसायांच्या नवीन संधी निर्माण करण्यासाठी प्रोत्साहन देण्यास सुरुवात केली. ग्रामीण आणि निमशहरी भागात आपल्या शाखांचे जाळे विस्तारण्याबरोबरच त्यांच्याकडील ठेवींचा योग्य वापर करण्यावरही भर दिला. त्यानंतर निर्माण झालेल्या योजनेनुसार या बँका त्यांना नेमून दिलेल्या जिल्ह्यांमध्ये एकात्मिक बँकिंग सुविधा पुरवठ्याचा वेग वाढवू लागल्या. या बँका त्याशिवाय कर्जाशी संबंधित दारिद्र्य निर्मूलनाच्या कार्यातही सहभागी होऊ लागल्या.

१९८० साली २०० कोटीहून अधिक ठेवी असणाऱ्या अन्य सहा बँकांचे राष्ट्रीयीकरण झाले. भविष्यकाळातही अर्थव्यवस्थेवर नियंत्रण मिळवणे आणि अर्थव्यवस्थेच्या विकासाबरोबर जनतेचे हित साधण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले. याबरोबरच भारतीय स्टेट बँक आणि तिच्या सात सहकारी बँकांसोबत सरकारी बँकांची संख्या २८ झाली. देशातील व्यावसायिक बँकांच्या एकूण ९१ टक्के ठेवी आणि कर्जे सरकारी बँकांच्या नियंत्रणाखाली आली. खाजगी बँका केवळ उद्योगक्षेत्राच्या आधारे तगून होत्या.

राष्ट्रीयीकरणाबरोबर भारतीय बँकींग क्षेत्रात महत्त्वपूर्ण बदल झाले. ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर शाखांचे जाळे विणले गेले. रिझर्व्ह बँकेनेही बँका नसलेल्या भागात तसेच कमी शाखा असणाऱ्या भागात आणि शहरांसह महानगरांमध्ये बँकांची जाळी उभारण्यासाठी परवाने देण्याचे धोरण राबवले. जून १९६९ ते मार्च १९९० या काळात व्यावसायिक बँकांच्या शाखा ८ हजार २६२ वरून ६० हजार २९४ वर पोहोचल्या. ग्रामीण भागातील शाखाही १,८३३ वरून ३४,९४० वर गेल्या. हे प्रमाण १९६९ च्या २२ टक्क्यांवरून १९९० साली ५४ टक्क्यांपेक्षा अधिक आहे. या काळात प्रत्येक बँकेच्या कार्यालयातील लोकसंख्येची घनताही ६५ हजारांवरून १२ हजारांवर आली.

सामाजिक बँकींगच्या या काळात मोठ्या प्रमाणावर दर्जात्मक सुधारणाही घडून आल्या. या काळात कोणतीही कार्यपद्धती अथवा मार्गदर्शक तत्वे जगातील इतर कोणत्याही राष्ट्रापेक्षा उत्तम होती. प्राथमिक क्षेत्राला कर्जपुरवठा करण्याचे प्रमाण १९६९च्या १४ टक्क्यांवरून मार्च १९९० मध्ये ४३ टक्के झाले.

१९७० आणि १९८० या काळात बँकिंग क्षेत्रात झालेल्या सुधारणांबरोबरच व्याजदराबाबत काहीशी गुंतागुंतीची स्थिती निर्माण झाली. आर्थिक आणि सामाजिक जबाबदारीच्या भावनेतून आकारल्या जाणाऱ्या सवलतीच्या व्याजदरांमुळे व्याजदराची यंत्रणा तर बिघडलीच पण बँकांच्या नफा मिळवण्याच्या क्षमतेवरही परिणाम झाला. पारदर्शकता, जबाबदारी आणि महत्त्वाचे कायदे यांची परिणामकारक अंमलबजावणी करण्याचे मापदंड नसल्याने बँकेच्या बुडीत कर्जात (NPA) वाढ होऊ लागली. त्याचबरोबर ताळेबंदातील त्रुटी आणि ग्राहकांना असमाधानकारक वागणूक याचाही वित्तव्यवस्थेचा परिणाम झाला.

बॅलन्स ऑफ पेमेंटच्या विपरीत स्थितीमुळे देशासमोर आर्थिक संकटे निर्माण झाली. त्यामुळे १९९१ साली सरकारने अर्थव्यवस्थेला स्थैर्य देण्याचा आणि पायाभूत क्षेत्रात बदल घडवण्याचा निर्णय घेतला. पायाभूत बदलांचे ध्येय अर्थव्यवस्थेची कार्यक्षमता वाढवण्याबरोबरच जागतिक स्पर्धेला तोंड देण्याचे होते. त्यानुसार नरसिंहन समितीच्या शिफारसी दोन टप्प्यांत राबवण्याचे ठरवण्यात आले. यानुसार अनावश्यक / राखीव चलनासाठा कमी करणे, व्याजदराचे प्रशासानिक स्वरूप बदलणे, उत्पन्न ठरवण्यासाठी आंतरराष्ट्रीय मानके ठरवणे, खाजगी बँकांना परवाने देणे, परदेशी बँकांना खुले वातावरण निर्माण करणे यांसारखी काही पावलं पहिल्या टप्प्यात, तर बँकींग यंत्रणेचा पाया मजबूत करणे, बँकेच्या जोखीम पत्करण्याच्या यंत्रणेबाबत मार्गदर्शक तत्वे आखणे बँका दत्तक घेणे यांसारख्या काही उपाययोजना दुसऱ्या टप्प्यात राबवण्यात आल्या.

ग्रामीण भागातील वित्तपुरवठ्यात सुमारे ७० टक्के वाटा या खाजगी वित्तपुरवठादारांचा असतो हे या समितीला दिसून आले. यात सरकार, सहकारी संस्था आणि व्यावसायिक बँकांचा हिस्सा केवळ ७ पूर्णांक तीन टक्के आहे. यातीलही सर्वात धक्कादायक बाब म्हणजे या अगदी थोड्या हिश्यातीलही मोठा वाटा बड्या शेतकऱ्यांच्याच हाती जातो. सामान्य शेतकऱ्याच्या हिश्श्यात त्यातील क्षुल्लक वाटा येतो, असेही दिसले.

ग्रामीण भागाच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने भारतातील बँका कमी पडत असल्याचे दिसून आल्यानंतर, सरकारने व्यावसायिक बँकांमध्ये सरकारी सहभागाची संकल्पना राबवण्याचा निर्णय घेतला. AIRCS शिफारशीवरून ग्रामीण भागात बँकिंग सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी देशातील सर्वात मोठी व्यावसायिक बँक असणाऱ्या इम्पीरीयल बँकेचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. या राष्ट्रीयीकरणाचा हेतू शेती क्षेत्राबरोबरच लघुउद्योगांनाही वित्तपुरवठा करण्याचा होता.

संसदेने एक जुलै १९५५ रोजी कायदान्वये भारतीय स्टेट बँकेची निर्मिती केल्यानंतर भारतीय बँकींग प्रणालीतील एक चतुर्थांशाहून अधिक स्रोत थेट सरकारी अधिपत्याखाली आले. त्यानंतर स्टेट बँक ऑफ इंडिया (सबसिडीअरी बँक) ॲक्टच्या स्थापनेनंतर चारच वर्षांनी सरकारी अधिपत्याखालील आठ बँकांना आपल्या नियंत्रणाखाली आणले.

स्टेट बँकेच्या आगमनाने बँकींग क्षेत्रात मूलभूत बदल घडू लागले. यात सुरक्षाविषयक दृष्टिकोनाऐवजी गरजेनुरूप वित्तपुरवठा, शहरी भागाऐवजी ग्रामीण भागाकडे लक्ष देणे, उच्च वर्गाऐवजी सर्वसामान्यांना केंद्र मानणे आणि बँकेच्या व्यावसायिक ध्येयधोरणांसोबतच सामाजिक हितही जपणे यासारख्या बाबी महत्त्वाच्या आहेत. नफ्याला प्राथमिकता देणाऱ्या या बँकांसाठी आता राष्ट्रीय महत्त्वाच्या संस्था बनून सार्वजनिक जबाबदारी स्वीकारणे तसे अवघड होते. या बँकांना आपली संस्थात्मक उभारणीची फेरमांडणी आणि नव्या गरजांप्रमाणे स्वत:ची ओळख तयार करणे, महत्त्वाचे होते. यात बँकेच्या धोरणांमधील बदलांबरोबरच, व्यवसायाची रीत बदलणे आणि कर्मचाऱ्यांच्या मनोवृत्तीत बदल घडवून आणणेही अभिप्रेत होते.

स्टेट बँकेने त्यानंतरच्या काळात दुहेरी भूमिका बजावण्यास सुरुवात केली. सर्वसामान्यांचे हित जपून व्यावसायिक बँक म्हणून काम करतानाच, विविध उद्योगधंदे आणि व्यापार क्षेत्राला वित्तपुरवठा ही बँक करत असे. याशिवाय अगदी दुर्गम भागापर्यंत राष्ट्रीय संस्था म्हणून आपल्या शाखांचे जाळे उभारून विकासात्मक कामेही केली. याबरोबरच लघुउद्योगांना वित्तपुरवठा करण्यासाठी विविध योजना राबविल्या. सहकार संस्थाना विपणन आणि प्रक्रियेसाठी वित्तसहाय्य करण्याबरोबरच देशाच्या परदेश व्यापाराला चालना देण्याचे मोलाचे काम केले. देशाच्या नियोजनबद्ध आर्थिक विकासाबरोबर अर्थव्यवस्थेला लागणाऱ्या वित्तपुरवठ्याच्या गरजेशी या बँकेने स्वत:ला जुळवून घेतले. सरकारने १९६८ साली सार्वजनिक बंधने लादण्याचा निर्णय घेण्याआधीच, स्टेट बँकेने सर्व शेती प्रक्रियांसाठी विविध योजना राबवण्यास सुरुवात केली होती. याशिवाय कृषिविषयक विविध प्रक्रियांचे यांत्रिकीकरण, आधुनिकीकरण आणि जमिनींसाठी सिंचन व्यवस्था आणि विकासासाठीही योजना राबवायला सुरुवात केली होती. कृषी उत्पादनात वाढ, कुटिरोद्योग, लघुउद्योग, कला आणि हस्तकारागिरीला प्रोत्साहन देऊन ग्रामीण भागात वेगवान आर्थिक विकास घडवून दारिद्र्य निर्मूलन आणि रोजगार निर्मितीचे सरकारचे ध्येय गाठण्यासाठी नाविन्यपूर्ण आणि सुनियोजित योजना तयार केल्या. यात ग्रामीण भागात अर्थपुरवठा करण्याबरोबरच, ग्रामीण भागात आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्राच्या विकासाच्या दृष्टीने एकात्मिक गरजांचाही विचार केला गेला.

स्टेट बँक ऑफ इंडियाच्या स्थापनेबरोबरच भारतीय औद्योगिक वित्त महामंडळ (IFCI) १९४८ साली, १९६३ साली कृषी पुनर्वित्तपुरवठा महामंडळ (ARC), १९६४ साली भारतीय औद्योगिक विकास बँक (IDBI) आणि राज्य वित्त महामंडळाची स्थापना करण्यात आली. कृषी आणि उद्योगधंद्यांना दीर्घ मुदतीची कर्जे उपलब्ध करून देण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले.

कृषी, कुटीर आणि लघुउद्योगांचा विकास साधण्याकडे लक्ष देण्याबरोबरच देशातील सर्व बँकांनी अधिक परिणामकारक रीतीने वित्तपुरवठा करणे, अधिक गरजेचे ठरवण्यात आले. आर्थिक नियोजनाच्या गरजा लक्षात घेऊन सरकारने सामाजिक नियंत्रणाच्या दृष्टीने १९६८ साली पावले उचलण्यास सुरुवात केली. बँकींग प्रणालीतील काही त्रुटींबाबतच्या तक्रारींनंतर वित्तपुरवठा करताना एखाद्या समभागधारकाचा बँकेतील हिस्सा महत्त्वाचा ठरणार नाही, या दृष्टीने संचालक मंडळाची रचना करण्याबरोबरच ही कर्जे मंजूर करताना त्याबाबत विविध स्तरावर निर्णय घेतला जाणे गरजेचे झाले. आर्थिक नियोजनाबरोबरच पतनियोजन करणे आणि प्राथमिक महत्त्वाच्या क्षेत्रात कर्जपुरवठा करण्याच्या दृष्टीने सामाजिक नियंत्रणाच्या योजनेतून राष्ट्रीय पतपुरवठा परिषद फेब्रुवारी १९६८ मध्ये स्थापन करण्यात आली. त्यामुळे राष्ट्रीय जबाबदारीच्या भावनेतून बडे उद्योग आणि व्यापाराला कर्जपुरवठा करण्यापेक्षा, कृषी आणि लघुउद्योगांना कर्जपुरवठा करणे बँकांना महत्त्वाचे बनले. त्याच वर्षी संसदेने बँकींग कायदा दुरूस्ती विधेयक संमत करून बँकींगला विशेषताप्राप्त व्यवसायाचे रूप दिले. यानुसार भारतीय व्यावसायिक बँकाना त्यांच्या संचालक मंडळाची फेररचना करता यावी तसेच व्यावसायिक बँकींग तज्ज्ञांची नेमणूक आणि वित्तक्षेत्रातील तज्ज्ञांना अध्यक्षपदी नेमण्याची व अध्यक्षांना कर्जे आणि उचल घेण्यापासून रोखण्याची तरतूद करण्यात आली.

भारतातील बँकींग यंत्रणा

✦ ओ. पी. भट्ट

भारतात बँकींगची सुरुवात होऊन अगदी थोडाच काळ उलटला आहे. सुरूवातीला याचे स्वरुप केवळ पैसे कर्जाऊ देण्यापुरतेच मर्यादित होते. त्याचबरोबर या रकमेवरील व्याज दर व्यवहाराऐवजी पैसे उधार घेणाऱ्याच्या जातीवर अवलंबून असत. ठेवीच्या स्वरूपातील बँकींग त्यांच्यासाठी पूर्णत: अनभिज्ञ होते. युरोपीयनांच्या आगमनासोबत भारतातील बँकींग व्यवस्था संघटित होण्यास सुरुवात झाली. या व्यवस्थेतील अनेक व्यावसायिकांचे उपखंडात कोठी अथवा एजन्सीच्या माध्यमातून विविध विभागांत संबंध प्रस्थापित झाले होते. हे व्यावसायिक इतर बँकर, जमीनदार, व्यापारी आणि राजेरजवाड्यांना अर्थपुरवठा करीत असत. याशिवाय त्यांचे विविध राजघराण्यांशी घनिष्ठ संबंध होते.

ब्रिटिशांनी भारतात संयुक्त रोखे बँकींगची सुरुवात मर्यादित जबाबदारी घेत केली. यात सर्वप्रथम १८०९ साली 'बँक ऑफ बंगाल' ची करारपद्धतीने स्थापना केली. त्याआधी 'बँक ऑफ कलकत्ता' ची सुरुवातीची तीन वर्षे अभ्यासली गेली. त्यानंतर १८४० साली 'बँक ऑफ बॉम्बे' आणि त्यानंतर तीन वर्षांनी 'बँक ऑफ मद्रास' ची स्थापना केली. ब्रिटिशकालीन भारतात या तीन बँकांनी बँकींग क्षेत्रात वरच्या श्रेणीत महत्त्वाचे स्थान मिळवले होते. या बँका प्रामुख्याने अंतर्गत व्यापाराला मदत करण्याबरोबरच कंपनी सरकारला तीन प्रेसिडेन्सीचा कारभार चालवण्यासाठी कर्ज उभारण्यासाठी मदत करीत असत १९२१ साली भारतीय रिझर्व्ह बँकेची स्थापना होईपर्यंत इम्पीरीयल बँक व्यावसायिक बँक आणि मध्यवर्ती बँकेची दुहेरी भूमिका पार पडत असे. त्यानंतर या बँकेला निव्वळ व्यावसायिक बँकेचे स्वरूप प्राप्त झाले व तिने भारतीय बँकिंग जगतात मानाचे स्थान मिळविले.

उपखंडातील विस्तृत भूभागाच्या पतपुरवठ्याची गरज भागविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर संयुक्त रोखे सहभागाच्या युरोपीयन आणि भारतीय नियंत्रणाखालील बँका उदयाला आल्या. यातील आग्रा ॲण्ड युनायटेड सर्विस बँक व युरोपीयन नियंत्रणाखालील एक भागिदाराची बँक यांचे आर्थिक अनियमिततेमुळे दिवाळे निघाले याशिवाय भारतीय नियंत्रणाखाली असलेल्या विशेषत: मुंबई आणि पंजाबमधील अनेक बँका १९१३ आणि १९३० सालच्या बँकींग क्षेत्रातील विपरीत घडामोडींमुळे बंद झाल्या. मात्र, त्यामुळे नंतरच्या काळात १९४९ साली बँकींग कंपनी ॲक्ट संमत होण्याचा मार्ग खुला झाला (नंतर त्याचे नामकरण बँकींग कंपनीज ॲक्ट झाले.) यातील संयुक्त सहभागाने चालवलेल्या बँकांनी नंतरच्या काळात तग धरला आणि त्यांची वाढ झाली. उदा. अलाहाबाद बँक (१८६५) आणि पंजाब नॅशनल बँक (१८९५) या उत्तरेकडील, तर दक्षिणेकडील कॅनरा बँक (१९०६), इंडियन बँक (१९०७) आणि बँक ऑफ इंडियासह सेंट्रल बँक ऑफ इंडिया (१९११) या पश्चिमेकडील काही ठळक बँका होय.

याशिवाय, इतक्या मोठ्या उपखंडाच्या वाढत्या व्यापारीकरणाला अर्थपुरवठा करण्यासाठी १९व्या शतकात अनेक चलन बँका उदयास आल्या. यातून तिन्ही प्रेसिडेंसी बँका आणि रिझर्व्ह बँकेच्या स्थापनेपूर्वीच्या इम्पीरियल बँकेने आपले व्यवहार वेगळे ठेवले होते. यातील बहुतांश बँका एकतर ब्रिटिश संसदेने करारपद्धतीवर अथवा युरोपातील देशामध्ये कायदेशीररीत्या स्थापन झाल्या होत्या. चार्टर्ड बँक ऑफ इंडिया, ऑस्ट्रेलिया ॲण्ड चायना, द चार्टर्ड मर्कन्टाईल बँक ऑफ इंडिया, लंडन ॲण्ड चायना, द हाँगकाँग ॲण्ड शांघाय बँकिंग कॉर्पोरेशन ही यापैकी काही प्रमुख नावे होय.

भारतीय बँकिंग क्षेत्रातील या घटकांशिवाय विसाव्या शतकाच्या सुरुवातीस सहकारी पतसंस्थांची स्थापना झाली. शेतकऱ्यांच्या गरजा भागवणे ही या पतसंस्थांची मुख्य भूमिका होती. मात्र, मुंबई, मद्रास आणि पंजाब प्रांताबाहेर याची प्रगती खालच्या दिशेनेच झाली.

१९४७ च्या अंतापर्यंत देशभरात शेड्युल्ड, नॉन शेड्युल्ड आणि चलन अशा ६५४ बँका कार्यरत होत्या. त्यांची एकूण ५ हजार नऊ कार्यालये होती. त्यांच्याकडील एकूण ठेवी १ हजार १५३ पूर्णांक ४५ कोटी, तर ५२० पूर्णांक २९ कोटी रूपयांची कर्जे वितरित केली होती. बँकेच्या प्रत्येक कार्यालयामागे १९१६ साली असणारे साडेआठ लाख लोकसंख्येचे प्रमाण १९४७ साली ७० हजार झाले होते. मात्र, आंतरराष्ट्रीय मानांकनाच्या दृष्टीने हे प्रमाण अधिकच आहे.

मोठी शहरे अथवा व्यापारी केंद्र वगळता ग्रामीण भागात मात्र खाजगी वित्त पुरवठादार, बडे जमीनदार आणि सावकारांच्या हातात या भागातील वित्तपुरवठ्याची जबाबदारी राहिली आहे. ग्रामीण भागात वित्तपुरवठ्यात विद्यमान बँकिंग यंत्रणेला येणारे अपयश शोधून त्यावर उपाययोजना सुचविण्यासाठी रिझर्व्ह बँकेने अखिल भारतीय ग्रामीण पत पाहणी (All India Rural Credit Survey-AIRCS) च्या संचालकांची समिती स्थापन केली. यात सरकारला सहकारी क्षेत्रात येणारे अपयश समोर आणणे, हे देखील या समितीचे ध्येय होते.

ध्यान क्रेंद्रीत केले आहे. मात्र व्यावसायिक दृष्टीने त्याची प्रतिकृती तयार झालेली नाही.

रास्त टेली मेडिसिन किटच्या सहाय्याने काही ठिकाणी आरोग्यसेवा देण्याचे प्रयोगही झाले आहेत. न्यूरोसिनॅप्ट नावाच्या कंपनीने ह्रदयाची स्पंदने, रक्तदाब आणि ईसीजी काही अंतरावरूनही तपासता येईल असे यंत्र विकसित केले आहे. त्यास व्हिडीओ कॉन्फरन्सींगची जोड देऊन निदानही शक्य झाले आहे. तरीही औषधे, ही यंत्रे आणि व्यावसायिक प्रतिकृती गावागावांत पोहोचवण्यासाठी कठोर परिश्रमांची आवश्यकता आहे. येत्या एक ते दोन वर्षांत त्याचे निकाल समोर येतील.

सुरुवातीला अवघड वाटलेल्या ग्रामीण बीपीओने आता परिस्थितीत बदल घडवला आहे. येत्या काही वर्षात प्रत्येक गावातील दहा ते वीस जण या बीपीओत नोकरी मिळवू शकतील अशी आशा वाटते. यात ग्रामीण भागाकडे बीपीओ सेवा वळण्याचेही स्वप्न कोणाला पडू शकते. शहरी भागात प्रशिक्षित झालेला बीपीओ तज्ज्ञ ग्रामीण भागात पुढील बीपीओ सुरू करू शकतो. देसीक्रू नावाच्या कंपनीने आयआयटी मद्रासच्या मदतीने केलेला प्रकल्प अभ्यासनीय आहे.

माहिती तंत्रज्ञानाधारित उत्पादनांचे आऊटसोर्सिंग करण्याबाबत प्राथमिक स्तरावर काम झाले आहे. मात्र ते प्रत्यक्षात येण्यासाठी कठोर मेहनतीची आवश्यकता आहे. लोकांचे आणि कामांचे स्थलांतर यांनी समानता प्रस्थापित करण्यासाठी गेल्या १०० वर्षांत मोठा परिणाम घडवला आहे. ग्रामीण भागात दळणवळण आणि ऊर्जा उपलब्ध झाल्यास हे घडू शकेल या माध्यमातून आयसीटी दारिद्र्य निर्मूलनाचे काम करू शकेल.

कृषी क्षेत्रातील विविध समस्यां आयसीटीच्या माध्यमातून सोडविण्याचा प्रयत्न होऊ शकतो. आयटीसी e-chaupal आणि EID पॅरी यांनी आयसीटीच्या मदतीने शेतकऱ्यांना उत्पादने घेण्यासाठी मदत केली आहे. शेतकऱ्यांना सल्ला देण्यासाठी एन-लॉग कम्युनिकेशन आणि आयआयटी हैदराबादाच्या ई-सागू प्रकल्पाने व्हीडिओ कॉन्फरसिंग आणि छायाचित्रांचा वापर केला. मात्र सर्वंकषतेच्या दृष्टीने हे प्रकल्प अद्यापही दूर आहेत.

प्रत्येक ठिकाणी आयसीटी आधारित ग्रामीण कृषी सहाय्यता केंद्र उभारता येईल. त्यातून शेतकऱ्यांना इत्थंभूत माहिती मिळेल. यात शेतीची इतिहास, जमिनीचा पोच आणि मोजमाप स्पष्ट केली जातील याशिवाय हवामानाचा अंदाज, कृषीविषयक ज्ञान आणि इतर सल्ला सेवा दिल्या जातील. शेतकऱ्यांचा कृषी तज्ज्ञांशी व्हीडीओ कॉन्फरसिंगद्वारे संपर्क साधला जाऊ शकतो. त्यातील काही मुद्दे इथे आपण तपासू

अ) कृषी क्षेत्रातील धोके ही देशाच्या बहुतांश भागातील शेतकऱ्यांसमोरची समस्या आहे. कर्जबाजारीपणामुळे होणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे वृत्त आपल्या कानावर येते. त्यामुळे एका वर्तमानपत्राने संपादकीय प्रश्न विचारला की, भारतात शेतकी व्यवसाय खरोखरच योग्य राहिलाय का ?

ब) शेतकऱ्यांच्या नियंत्रणाबाहेर असणाऱ्या काही बाबींमुळे हा व्यवसाय अधिक धोकादायक झाला आहे. पिकांवर पडणारे रोग, बेभरवशी हवामान (पावसाळा), विशेषत: पावसावर अवलंबून असणाऱ्या भागात हा प्रश्न उद्‌भवतो, तसेच कृषी मालाचा बाजारभाव या समस्या महत्त्वाच्या आहेत.

क) आयसीटीच्या माध्यमातून हे धोके दूर करण्यासाठी प्रयत्न होऊ शकतात. व्हीडीओ कॉन्फरसिंगच्या माध्यमातून शेतकरी पिकांवर पडलेल्या रोगाबाबत तज्ज्ञांकडून माहिती घेऊ शकतात. ९५ टक्के प्रकरणांत स्थानिक पातळीवरील उपाययोजना सुचवल्या जातात. त्याचे योग्य नियंत्रण आणि मूल्यमापन करायला हवे

ड) कोणत्याही भागात आठ वर्षांतून फक्त एकदाच वाईट पद्धतीने पाऊस होतो, हे अभ्यासातून दिसून आले आहे. इतर वेळी शेतकऱ्यांना चांगला लाभ होतो किंवा किमान लागवडींसाठीचा खर्च तरी निघतोच. त्यासाठी पाऊस काळाचा विमा उतरवण्यासाठीची पद्धत आदर्शवत वाटते. त्यासाठी कमी हप्ते भरण्याची सोयही करता येईल. गावांमध्ये इलेक्ट्रॉनिक पर्जन्यमापक बसवून इंटरनेटच्या माध्यमातून पावसाची माहिती पुरवली जायला हवी. माहिती आणि तंत्रज्ञान खात्याने अशा प्रकारची कमी खर्चाची उपकरणे १०० गावांमध्ये उभारण्यासाठी पावले उचलली आहेत.

इ) सध्या उपलब्ध असणाऱ्या वायदे बाजार पद्धतीमुळे शेतकरी त्यांची उत्पादने महिनाभर आधीच, माहीत असलेल्या किंमतीला विकू शकतात पेरणीच्या वेळीच ही किंमत निश्चित करणे त्यांना सहज शक्य आहे. त्यामुळे बाजारभावाचा धोकाही दूर होऊ शकतो. मात्र छोट्या शेतकऱ्यांपर्यंत ही योजना पोहचायला हवी त्यासाठी आयसीटी सहाय्यक ठरू शकेल.

या धोक्यांना दूर सारुन गेल्या काही वर्षांत घट झालेले कृषी उत्पन्न वाढवण्यासाठी आता प्रयत्न व्हायला हवेत. इतर देशांच्या तुलनेत आपली कृषी उत्पादकता कमी आहे. कृषी क्षेत्राबाबत आणि त्यासाठी लागणाऱ्या इतर बाबींबाबतचे अज्ञान ही त्यामागील काही कारणे आहेत. त्यासाठी शेतीच्या इतिहासाचे ज्ञान मिळवण्यासाठी आयसीटी सहाय्यक ठरु शकते. यात पाऊस, जलसिंचन, कोणती खते वापरावी, मृद परिक्षण आदि बाबीं या मार्फत अभ्यासल्या जाऊ शकतात. शिवाय शेतकऱ्यांना व्यक्तिगतरित्या मार्गदर्शनही केले जाते. यातून त्या-त्या वर्षी कोणते पीक घ्यायचे याचा अंदाज शेतकरी घेऊ शकतात. पाण्याचे नियोजन करण्यासारख्या बाबी एखाद्या गावाला करता येतील. त्यासाठी संगणक महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. लघु पाटबंदारे प्रकल्प किंवा पावसाचे पाणी अडवून त्याचा गावासाठी उपयोग करणे शक्य आहे.

कृषी आणि लघु ग्रामीण उद्योग आयसीटीच्या मदतीने अधिक सक्षम होतील. यात व्यापारात सुधारणा, माहिती आणि प्रशिक्षणाचा वापर करता येईल. ग्रामीण भागातील पुरवठा साखळीसाठी उत्पादनांची वाहतूक आणि वित्तीय सेवांची गरज आहे. या सेवांतून शेतकऱ्यांना १० ते १२ टक्के दराने वित्त पुरवठा करता येईल. या क्षेत्रात काही चांगले प्रयोग झाले आहेत. स्टेटबँक आणि आयसीआयसीआय बँकां इंटरनेट किओस्कच्या मदतीने हे करत आहेत.

(उर्वरित पान क्र. ४४ वर)

ग्रामीण भारताच्या विकासात आयसीटीचे योगदान

✦ अशोक झुनझुनवाला / रोहिणी मेनन

प्रस्तावना :-

भारताच्या नागरी भागात गेल्या दहावर्षात विकासाचे वारे वाहू लागले असून गेल्या पाच वर्षांत त्याला वेग आला आहे. मात्र ग्रामीण भागात ही परिस्थिती नाही. एकीकडे शहरी भाग आत्मविश्वासाने वाटचाल करत असताना, ग्रामीण भागाला मात्र भविष्याबद्दल जाणीवच नाही केवळ दूरचित्रवाणी संचाची उपलब्धता हेच काय ते त्यांना प्राप्त झालेले तंत्रज्ञान, त्यातून ते प्रभावित होत आहेत. त्यांना आता ग्रामीण आणि शहरी भागातील फरक दिसत असून त्याबद्दल त्यांना प्रश्न पडत आहेत.

लोकशाही राज्यपद्धतीत (केंद्र, राज्य, स्थानिक) अनेक निवडणुका वर्ष-दीड वर्षात होतात. ग्रामीण भागातील जनतेत आपल्या दारुण परिस्थितीबद्दल गोंधळ निर्माण होतो, ज्यांचे प्रमाण लोकसंखेच्या ७० टक्के आहे. लोकप्रिय घोषणांच्या मारा करून राज्यकर्ते विविध योजनांच्या माध्यमातून दैन्यावस्था दूर करण्याचे आश्वासन देतात. काही ठोस कार्यक्रम ही आहेत ज्यातून हे दैन्य दूर होईल. सरकारकडून वारंवार घुमजाव होत असल्याने ग्रामीण आणि शहरी भागातील तफावत कायम आहे. शहरी भागाचा विकास करणाऱ्या विविध योजनाही कायम विकास कसा राहील याच्या दडपणाखाली आहेत. त्यामुळे ग्रामीण भागात क्रांती घडवून या भागाचा विकास साधणे हेच, त्यावर एकमेव उत्तर आहे.

आजचा ग्रामीण भारत

एकूण ६ लाख ३८ हजार गावांमध्ये ७० कोटी जनता राहत आहे. या भागात उत्पन्न कमी आहे. ८५ टक्के घरांचे मासिक उत्पन्न दरमहा तीन हजार रुपयांपेक्षा कमी आहे. (पाच जणांच्या कुटुंबाचे प्रत्येकी ६०० रुपये) आता ग्रामीण भागात उद्योगधंद्याचे प्रमाण कमी आहे. अधिक मागणीच्या काळात, शहरी भाग निर्माण होणारी सर्व वीज घेतो व ग्रामीण भाग काळाखास्वा जातो. विजेची टंचाई कायम असते (राज्यांप्रमाणे ० ते १८ तास भारनियमन) वीजेचा दाबही ९० व्होल्ट इतका कमी असतो, तर रात्री गरज नसताना ४४० व्होल्ट इतका होतो. त्यामुळे विक्रेंद्रित ऊर्जा निर्मिती हे त्यावरील उत्तर आहे.

दूरध्वनी सेवांचा विकास झाला असला तरी ग्रामीण भागात या जोडण्यांचे प्रमाण कमी आहे. परिस्थिती वेगाने बदलत आहे. येत्या तीन वर्षांत सर्व गावे मोबाईल सेवेच्या जाळ्याखाली यायला हवीत, तसेच ब्रॉडबँड इंटरनेट सेवाही उपलब्ध होणे आवश्यक आहे. २५६ के.बी.पी.एस्.चा वेग मिळण्याची अपेक्षा केली जाऊ शकते.

माहिती आणि संपर्क तंत्रज्ञानाचा जोर (ICT) ग्रामीण भागात आमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी माहिती आणि संपर्क तंत्रज्ञान मोलाचे योगदान देऊ शकते आयसीटीच्या जोडणीने विकेंद्रित ऊर्जा निर्मिती किंवा गरजेच्या वेळेसाठी ऊर्जेची साठवण अशा बाबींसाठी ही परिणाम घडू शकतो, हे तंत्रज्ञान साकार करण्यासाठी प्रयोगशीलता आणि कार्यक्रम राबवणे गरजेचे आहे. त्यातून याच्या परिणामांचे मोजमाप करता येईल.

गेल्या अनेक वर्षांत अनेक कंपन्यांनी ग्रामीण भागात पायाभूत सुविधा उभारल्या आहेत. इंटरनेट किओस्क हे त्यापैकी एक असून त्या माध्यमातून ग्रामीण आणि शहरी भाग जोडले गेले आहेत. याशिवाय ग्रामीण भागातून शहरी भागात किंवा त्याविरुद्ध व्यापार करणारी व्यापार केंद्रेही असू शकतात. या शिवाय ग्रामीण उत्पादन केंद्रांची स्थापना त्यातून साध्य होऊ शकते. त्यातून ग्रामीण भागातील उत्पन्नात वाढ होऊ शकते. त्यासाठी विविध प्रयोग, कष्ट आणि त्यातून मिळालेली उत्तरे यातून माहिती आणि संपर्क यंत्रणा प्रस्थापित करायलाच हवी.

आयसीटीचा ग्रामीण भागात पुढील क्षेत्रात उपयोग होऊ शकतो

१) शिक्षण आणि प्रशिक्षण २) आरोग्य सेवा ३) कृषी ४) ग्रामीण बीपीओ (माहिती तंत्रज्ञानाशी निगडीत सेवा) ५) आयटीशी संबंधित उत्पादने ६) कृषी आधारित उद्योग ७) लघुद्योग ८) समाजाधारित कार्यक्रम जलसिंचन, स्थानिक स्वाराज्य संस्था

याशिवाय ग्रामीण भागात रास्त भावाने वित्तपुरवठा करणे, वाहतूक आणि कुरीयर सेवा, खरेदी विक्री, ऊर्जा निर्मितीचे विक्रेंद्रीकरण या क्षेत्रांमध्ये आयसीटी महत्त्वपूर्ण ठरू शकते. यातील काही प्राथमिक प्रयोग झालेले आहेत. केवळ काही संस्थांनी आयसीटीच्या माध्यमातून सेवा देण्याचा प्रयत्न केला आहे. इतरांनी आयसीटी तंत्रज्ञानाकडे दुर्लक्षच केले, केवळ दिखाऊगिरीचे प्रकल्प उभारण्याचे काम त्यांच्याकडून झाले.

काही आकर्षक प्रयत्न

तरीही काही उल्लेखनीय प्रयोग झाल्याचे दिसून आले. त्यातील उल्लेखनीय म्हणजे शिक्षण क्षेत्रातील प्रयोग होय. लहान मुलांच्या कल्याणासाठी हे प्रयोग झाले. यातील महत्त्वाच्या म्हणजे ग्रामीण भागातील मुलांना संगणकाचे प्रशिक्षण देणे. एन. लोग. कम्युनिकेशन, ताराहाट, दृष्टी या संस्थानी शेकडो गांवातील हजारो विद्यार्थ्यांना हे प्रशिक्षण दिले. नोकऱ्या मिळविण्यासाठीचे मूलभूत कौशल्य देतानाच त्यांना इंटरनेटवर आधारित प्रशिक्षण देणारे कार्यक्रम राबविले. यातील आयआयटी, मद्रासच्या TeNet समूहाच्या कार्यक्रमाचे निकाल उत्साहवर्धक आहेत. त्याशिवाय सैद्धांतिक प्रशिक्षणावरही त्यांनी

प्रणाली राहू शकेल, पण मनुष्यबळ विकास मंत्रालयाला ते काम देता कामा नये. खरे तर सामाजिक क्षेत्रातील सर्वच योजनांचे अशाप्रकारे मूल्यमापन करता येईल.

माझ्या दृष्टीनं शालेय शिक्षणासाठी या चार महत्त्वाच्या सुधारणा आहेत. त्यातून शालेय शिक्षण व्यवस्थेत चौकटीपलीकडचे बदल घडवून आणता येतील. अशा सुधारणांशिवाय भविष्यातील गरजांना या यंत्रणेचा प्रतिसाद अपुरा ठरेल.

मानवी इतिहासात पहिल्यांदाच आपण अशा परिस्थितीत येत आहोत की, जिथे कोणीही आपल्या भौगोलिक स्थानाच्या आणि सामाजिक स्थितीच्या अपरोक्ष, कौशल्य आणि ज्ञानाधार असल्यास ज्ञान संपादन करू शकतो. त्यातील मोठे अडथळे आहेत खर्च आणि रचनात्मक नियंत्रणं आता चौकटी पलीकडचं विश्व खुलं होत आहे. हे जग सर्व अडथळे पार करणारं आणि अनावश्यक नियंत्रणाच्या विरोधात जाणारं आहे. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर ज्ञान संपादनाची सोय, नेहमीप्रमाणे आर्थिक घटकांवर अवलंबून आहे. पण, नवीन तंत्रज्ञान जुन्या सामाजिक आर्थिक रचनेला आणि विचारांना आव्हान देत आहे, जेणेकरुन ज्ञानोपासना सर्वांना सहज शक्य होईल. पण या तंत्रज्ञानाच्या प्रवाहाला योग्य प्रतिसाद देणाऱ्या यंत्रणा विकसित केल्या नाहीत तर वेळ, श्रम आणि पैसा सारंच वाया जाईल. कार्यालयात वापरण्याजोगे किंवा पुढील संगणक शिक्षणाचा पाया घालणारे संगणक प्रशिक्षक व्यापक स्तरावर देणारा मजेशीर आणि यशस्वी प्रकार म्हणजे महाराष्ट्र शासनाच्या एमएससीआयटी अभ्यासक्रमांचे उदाहरण देता येईल. या अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक पात्रता, माहिती तंत्रज्ञान प्रशिक्षण घेण्याची तीव्र इच्छा आणि अपेक्षित पात्रता आहे 'दहावी उत्तीर्ण' विद्यार्थी इंटरनेटद्वारे प्रशिक्षण घेऊ शकतात त्यासाठी ७२० रुपये आकारले जातात. प्रत्येक प्रयत्नासाठी परीक्षा शुल्क २३० रुपये आकारले जाते. विद्यार्थ्यांनी प्रमाणित केंद्रामध्ये प्रवेश घेतल्यास परिक्षा शुल्क कायम राहत असले तरी अभ्यासक्रमासाठी मात्र १९८० रुपये शुल्क आकारले जाते अभ्यासक्रम शुल्क हप्त्यांनी भरण्याचीही सोय आहे. दोन्ही पद्धतीत विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी साहित्य दिलं जातं केंद्र चालकांना प्रत्येक विद्यार्थ्यांच्या शुल्कातील ५० टक्के रक्कम त्यांचे कमिशन म्हणून दिली जाते प्रत्यक्षात अनेक केंद्रचालक स्वत:च्या उत्पन्नातील काही भाग विद्यार्थ्यांना सवलतींच्या रूपात माफ करतात, कारण तेवढी स्पर्धा आता या प्रशिक्षणाबाबत निर्माण झाली आहे. परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घेतली जाते. उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना दिले जाणारे प्रमाणपत्र शासकीय पदांच्या भरतीत अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. इतरही अनेक आस्थापना हे प्रमाणपत्र मूलभूत कौशल्यांसाठी आवश्यक मानतात.

एमएससीआयटी प्रशिक्षण केंद्र उभारण्यासाठी नवोद्योजकांना किमान दोन बँका कर्ज देण्यासाठी तयार आहेत.

लेखन, संवाद, हिशेब तपासणी, वाहन दुरुस्ती, प्लम्बींग, सुतारकाम किंवा इतर कोणतेही कौशल्य किंवा ज्ञान संपादन करण्याबाबत या प्रशिक्षण अभ्यासक्रमांची पुनरावृत्ती करणे शक्य नाही काय ? लवकरच शुभारंभ होत असलेल्या भव्य व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रमासंदर्भात हा अभ्यासक्रम अतिशय महत्त्वाचा, पर्यायी ठरेल. पण हा अनुभव परंपरागत शिक्षणातही वापरता येईल. विद्यार्थ्यांनी कोणत्याही शाळेत प्रवेश घेतला असला तरी त्याला सीबीएसई किंवा राज्य परीक्षा मंडळ किंवा अन्य कुठल्याही परीक्षेला बसता येईल. अशा परिस्थितीची कल्पना करा, हेच पदवी परीक्षांसाठीही करता येऊ शकेल. विद्यार्थ्यांच्या प्रमाणपत्रांचा पर्याय तो किंवा ती कोणत्या महाविद्यालयात शिकते यावर का अवलंबून असावा ?

पदव्यांचा नोकऱ्यांपासूनचा संबंध तोडण्याची चर्चा गेली अनेक वर्षे सुरू आहे, पण शिक्षण यंत्रणा पदव्या आणि नोकऱ्या यांच्यातला संबंध तोडू शकलेली नाही. बाजारपेठेलाच त्याबाबत काहीतरी करावे लागेल. बीपीओ उमेदवाराला इंग्रजी बोलता येत असल्यास त्याच्या शैक्षणिक पात्रतेकडे अजिबात लक्ष देत नाहीत. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातल्या निम्नस्तरीय कामांसाठी कौशल्य आणि प्रमाणपत्रांना पदव्यापेक्षा अधिक महत्त्व दिले जात आहे. निर्मिती क्षेत्रातही अर्थहीन शैक्षणिक पदवीधारांपेक्षा, प्रशिक्षणयोग्य व्यक्ती अधिक अपेक्षित असतात. आता पदवीधारकांपेक्षा नोकऱ्यांची संख्या कमी असल्यानं आणि एखाद्या विषयाचं ज्ञान असण्यापेक्षा विशेष कौशल्य असलेल्या व्यक्ती अधिक महत्त्वाच्या ठरत असल्यानं यापुढे पदव्या आणि नोकऱ्यांचा फारसा संबंध राहणार नाही ?

आपल्या सामाजिक-राजकीय इतिहासामुळे शिक्षणाबाबत-शिक्षणाबाबतच्या समस्या संचित झाल्या आहेत आणि आपल्याला भविष्याकडे वाटचाल करण्यासाठी बऱ्याच समस्या सोडवणं गरजेचं आहे. दुसऱ्या बाजूला परिमाणात्मक आणि रचनात्मक पातळीवर समस्या आहेतच. गतकाळातल्या समस्या प्रामुख्याने परिणात्मक घटकाशी निगडीत-उपलब्धता आणि मूलभूत साक्षरता निर्माण करण्याशी संबंधित आहेत, तर भविष्यातील संभाव्य समस्या दर्जात्मक स्वरूपाच्या आहेत. दर्जा सुधारण्यासाठीची सध्याची विचारप्रणाली कितीही प्रगतिशील वाटत असली तरी ती इनपुटवर आधारित आणि चौकटीतीलच आहे. आपण एका महत्त्वाच्या वळणावर आहोत आणि आपल्याला चौकटीतच रहायचे की चौकटीबाहेर पडून येत्या दशकात भारताला केवळ साक्षरच नाहीतर शिक्षित बनवायचे याचा निर्णय करावा लागेल लेखक प्रथम या संस्थेचे संस्थापक सदस्य आणि कार्यक्रम संचालक आहेत. ते भारत सरकारच्या राष्ट्रीय सल्लागार समितीचे सदस्यही आहेत

अनुवाद :- कांचन चौधरी

अतिशय महत्त्वाचा आहे. शाळा चालवणारी आणि त्यांचं व्यवस्थापन करणारी यंत्रणा या ऐवजी ज्या पद्धतीने शासन अनुदानित शाळा हाताळते त्याच प्रकारे, केवळ अनुदान देणे, सुविधा उपलब्ध करुन देणे आणि नियंत्रण ठेवणे एवढ्यावरच शासनाची भूमिका मर्यादित राहायला हवी. तत्त्वत: आपण अशा पद्धतीने वळायला हवे की, सर्व शाळांना शासकीय निधी उपलब्ध राहील आणि त्यांचे व्यवस्थापन स्थानिक किंवा खाजगी संस्थाकडे राहील. शिक्षणाचा अधिकार देणाऱ्या २००५ सालच्या विधेयकात दोन प्रमुख सुधारणा प्रस्तावित करण्यात आल्या आहेत. पहिले म्हणजे शिक्षकांची भरती राज्यनिहाय न करता विशिष्ट शाळांपुरती करायची, जेणेकरून त्यांची सेवा बदलीरहित बनेल आणि दुसरी सुधारणा म्हणजे शाळा व्यवस्थापन समित्या स्थापन करून सर्व कारभार नियंत्रण या समित्यांकडे सोपवायचे. या दोन सुधारणांमुळे आणखी एका तिसऱ्या सुधारणेची गरज निर्माण झाली आहे, ती म्हणजे शाळांना थेट निधी पुरवण्याची. त्याखेरीज शाळा व्यवस्थापन समित्यांकडे खऱ्या अर्थाने नियंत्रण येणारच नाही. स्वाभाविक पणे निधी पुरवठ्याचा आधार हा पटसंख्या हाच असायला हवा. शासनाच्या सर्व अंगांनी प्रतिवर्षी प्रत्येक विद्यार्थ्यामागे किती निधी द्यायचा याचा आकडा निश्चित करून, थेट शाळांमध्ये पटसंख्येच्या प्रमाणात निधी वर्ग करायला हवा. माहिती तंत्रज्ञान आणि बँकिंग क्षेत्रात झालेल्या क्रांतीमुळे आता बँका अगदी दुर्गम भागातही इलेक्ट्रॉनिक मार्गानं पैसा वितरित करीत आहेत. ही परिस्थिती भविष्यात अधिक सुधारेल. शासनाने प्रत्येक विद्यार्थ्यामागे ५०० रुपये निधी निश्चित केला, तर सरकारला देशातील ६-१४ वयोगटातील २० कोटी मुलांच्या शिक्षणासाठी १०,००० कोटी रुपये खर्च करावा लागेल. पूरक आहार वगळता २००७-०८ या आर्थिक वर्षासाठी केलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदींएवढाच जवळपास हा आकडा आहे. अर्थात सद्यस्थितीत या निधीतला मोठा वाटा मागास राज्यांना जातो, त्यामुळे मागास राज्य इतर राज्यांच्या समपातळीत येईपर्यंत मूलभूत सुविधा निर्माण करण्यासाठी मागास राज्यांना अतिरिक्त स्वतंत्र निधी देता येईल. शिक्षण यंत्रणेच्या विकासाकरिता गेली अनेक वर्षे मोठ्या निधीची गुंतवणूक करणाऱ्या प्रगत राज्यांवर कदाचित त्यामुळे अन्याय होईलही पण मुद्दा मुलांना न्याय देण्याचा आहे, या किंवा त्या राज्याचा नाही. समानतेच्या तत्त्वाच्या आधारे शासन एक करू शकते, ते म्हणजे शाळांना समान प्रमाणात प्रतिविद्यार्थी निधी अदा करायचा आणि शासकीय गुंतवणुकीच्या मोबदल्यात किमान आवश्यक शैक्षणिक कौशल्य मुलांना शिकवले जाण्याचे उद्दिष्ट निश्चित करून द्यायचे. विविध राज्य, जिल्हा उपजिल्हा स्तरावरील शासन यंत्रणा या निधीत आपापल्या परीने वाढीव योगदान करू शकतील. त्याखेरीज शाळा व्यवस्थापन समित्या किंवा पंचायतींना देणग्या आणि स्थानिक कर रुपाने निधीत इतर स्रोतांद्वारे भर घालण्याची मुभा द्यायला हवी.

आज विविध राज्य आणि शहरांमध्ये प्रत्येक मुलांमागे शिक्षणासाठी होणाऱ्या वार्षिक खर्चाचे गणित करणे कठीण आहे. काही मागास राज्यांमध्ये या खर्चाचा आकडा २००० रुपये तर काही मोठ्या महापालिकांच्या शाळांमध्ये १७००० रुपये आहे. राष्ट्रीय स्तरांवर दरवर्षी प्रत्येक मुलाच्या शिक्षणावर सरासरी ४००० रुपये खर्च होताहेत. अर्थात दरमहा प्रत्येक विद्यार्थ्यांमागे ३३० रुपये खर्ची पडत आहेत. एकदा या प्रत्येक विद्यार्थ्यामागचा वार्षिक खर्च स्पष्ट झाल्यानंतर खर्चाच्या तुलनेत अपेक्षित उद्दिष्ट निश्चित करणे सहज सोपे बनेल आणि यंत्रणेची कार्यक्षमता आणि उत्तरदायित्व सुधारण्यासाठी त्याची मदत होऊ शकेल.

तिसरे म्हणजे, शैक्षणिक सहाय्यकारी संस्थाची फेररचना केली गेली पाहिजे. ढोबळ मानाने या संस्था शासकीयच आहेत आणि या संस्थामध्ये कार्यरत कर्मचारीवर्ग शासकीय कर्मचारी आहे, त्यांची सेवा कुठेही बदली होण्यासारखी आहे. त्यापैकी बहुतांश संस्था जबाबदारी, नेतृत्त्व आणि निधीच्या अभावाने बाधित आहेत. या संस्थांना स्वायत्त बनवले पाहिजे आणि दर तीन-पाच वर्षांनी केलेले काम आणि एकूण निष्पत्तीचा आढावा घेऊन त्याआधारे निधी दिला गेला पाहिजे. मूलभूत सुविधा उपलब्ध असल्याची बाब विचारात घेता, शासकीय संस्थांना स्वायत्ता दर्जा देण्यात अडचणी येतील, पण त्या सोडवायला हव्यात. या संस्था चालवण्यासाठी कदाचित विविध शैक्षणिक संस्था आणि सेवाभावी संस्थांकडून निविदा मागवल्या जाऊ शकतील. या संस्थांची अन्य स्रोतांद्वारे निधी उभारायची इच्छा असल्यास त्या दृष्टीनं त्यांना प्रोत्साहन दिलं गेलं पाहिजे आणि संस्थांना निधी उपलब्ध करून देऊ शकणारे अभ्यासक्रम राबवण्याचीही त्यांना परवानगी दिली गेली पाहिजे.

शिक्षण व्यवस्थेबाहेर शिक्षणाच्या कामाशी न जोडले गेलेले प्रचंड मनुष्यबळ उपलब्ध आहे. या मनुष्यबळाचा वापर करून घेण्यासाठी कल्पक मार्गांचा अवलंब व्हायला हवा. ही यंत्रणा खेड्यांमध्ये तसंच शहरांमध्ये अलिप्तपणे कार्यरत आहे. शिक्षणाला मोठा लाभ मिळवून देण्यासाठी अलिप्तपणा संपायला हवा.

चौथे म्हणजे, विविध संस्थांची चाचणी, नियंत्रण आणि मूल्यमापन याकरिता पण योग्य व्यवस्था करणे अत्यंत आवश्यक आहे. ही व्यवस्था आजघडीला अस्तित्वात नाही. प्रथम संस्थेचा शिक्षणविषयक वार्षिक अहवाल हाच कदाचित राष्ट्रीय स्तरावर राज्य व जिल्हानिहाय शिक्षणाचे पूर्णपणे स्वतंत्र मूल्यमापन करणारा एकमेव प्रयत्न असावा. शिक्षणावर केल्या जाणाऱ्या खर्चाच्या ०.५ टक्क्यांहून कमी खर्चात या मूल्यमापनात सुधारणा करता येईल आणि त्याची व्याप्ती वाढवता येईल. खरेतर शिक्षण करातील काही भाग शैक्षणिक स्थितीचे स्वतंत्रपणे आणि कठोरपणे मूल्यमापन करण्यासाठी राखून ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. नियोजन आयोग किंवा स्वतंत्र शिक्षण आयोग असे मूल्यमापन करण्यासाठीची नियंत्रण

सहज वाचता येतात आणि ज्यांना वाचता येते त्यांना केवळ वाचनाने बोध होणाऱ्या संकल्पना नसल्या तरच आपण काय वाचले याचा बोध होतो. तसेच पाचवीतील निम्मीच मुलं तीन आकडी संख्येला एक आकडी संख्येने भागू शकतात.

अर्थात, हेही खरे की, याच यंत्रणेने प्रत्येक वस्तीच्या एक किलोमीटरच्या परिसरात शाळा उभारल्या आहेत. राजस्थान, उत्तर प्रदेश आणि बिहारचा अपवाद वगळता, इतर बहुतांश राज्यांमध्ये ६-१० वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांची शालेय नोंदणी होण्याचं प्रमाण ९५ टक्क्यांहून अधिक आणि ११-१४ वर्षे वयोगटातील मुलांच्या नोंदणीचे प्रमाण ९० टक्क्यांहून अधिक आहे. मुलांची शाळेतील उपस्थिती देखील लक्षणीय आहे.

महत्वाचा मुद्दा हा की, आतापर्यंत भौतिक उद्दिष्ट साध्य करण्यावरच भर देणारी आणि उपलब्धता वाढवण्यासाठी खर्च करणारी ही यंत्रणा शाळांसाठी इमारती उभ्या करण्यात आणि शिक्षकांच्या नेमणुका करण्यात यशस्वी झाली आहे. तथापि मानवी घटक महत्वाचा ठरतो अशा दर्जा, परिणामकारकता आणि कार्यक्षमतेचा विषय आला की तिथे मात्र ही यंत्रणा फारच वाईट पद्धतीने अपयशी ठरली. उच्च शिक्षणाच्या बाबतीत पुढारलेल्या जातींना जास्त जागा मिळतात. तिथे सुधारणा वेगानं झाल्या आहेत पण जनसामान्यांसाठी महत्वाचं प्राथमिक शिक्षण सुधारणांबाबत फार मागे राहिलं आहे.

भारताला शिक्षित आणि विकसित करणं मनुष्यबळ आणि तांत्रिक स्त्रोत विकासाच्या दृष्टीनं खूपच अवाढव्य काम आहे. नियोजन, व्यवस्थापन आणि शिकवण्यासाठी आवश्यक कौशल्यांची मोठी उणीव आहे. साक्षरतेचे आपले आजचे प्रमाण १८५० मधील पश्चिम युरोपच्या साक्षरतेच्या प्रमाणाएवढे आहे. भारतातील पिरामीडच्या टोकावरील थोडे, जगातील सर्वोत्कृष्ट शिक्षण घेतलेल्यांशी योग्य स्पर्धा करु शकत असले तरी मधली आणि खालची फळी मात्र वेगानं आधुनिक बनणाऱ्या जगाच्या दृष्टीनं फारच मागे आहे. समाजात एकंदरच क्षमता निर्मितीच्या प्रक्रियेला शिक्षणात सुधारणा करण्याच्या प्रक्रियेचा, भाग म्हणून गती द्यायला हवी. आपण क्षमता निर्माण करू शकणार नाही तोपर्यंत आपण आपल्या जनतेला शिक्षित बनवू शकणार नाही आणि आपल्याकडे जोपर्यंत शिक्षित आणि प्रशिक्षित व्यक्ती पुरेशा तयार होत नाहीत, तोपर्यंत आपण आपल्यात क्षमता निर्माण करू शकणार नाही. मनुष्यबळ विकासातील ही दृष्य विसंगती आहे.

चौकटीबाहेरचा विस्तार आणि सुधारणेचा मुद्दा या पार्श्वभूमीवर महत्त्वाचा ठरतो.

चौकटीतील, मर्यादित छापाच्या प्रतिसादामुळे पुन्हा पुन्हा तेच अधिकाधिक करायचे, त्याच कामासाठी अधिक माणसं कामाला जुंपायची आणि परिस्थिती सुधारेल या आशेनं अधिक खर्च करायचा अशी प्रवृत्ती बनली आहे. हे खरे की सध्याची परिस्थिती इतकी वाईट आहे की, शिक्षणात सुधारणा घडवण्यावर थोडे लक्ष दिले तरी अल्पावधीत बराच फरक पडेल. तथापि दर्जा सुधारण्या बाबत आपल्याला मोठी झेप घ्यायची असेल तर बरंच काही करावं लागेल. मात्र यंत्रणेला योग्य दिशा न देता, सुधारणा न करता केलेला वाढीव खर्च दीर्घ पल्ल्यात निरर्थक ठरण्याचीच शक्यता अधिक आहे.

केंद्रीय वित्त मंत्र्यांनी आपल्या अर्थसंकल्पीय भाषणात शिक्षक प्रशिक्षण संस्थांवरील खर्चाची तरतूद २००७-०८ या आर्थिक वर्षात १६२ कोटी रुपयांवरुन ५४० कोटी रुपयांवर नेण्याचे प्रस्तावित केले आहे. सर्व शक्यता गृहीत धरता ही तरतूद, अल्प कर्मचारी असलेल्या शिक्षक प्रशिक्षण संस्थांमध्ये भरती करणे, उपकरणांची खरेदी आणि त्यांच्या दुरुस्तीसाठी वापरली जाईल. पण आपण शासकीय नियंत्रणाखालील केंद्रीकृत अशी ही अपरिणाम कारक यंत्रणाच विस्तारणार काय ? शिक्षक प्रशिक्षणासाठी आपण कोणत्या आदर्श पद्धतीचा अवलंब करणार आहोत ? शिक्षक कोणत्या पद्धतीच्या यंत्रणेखाली काम करणार आहेत? उर्वरित यंत्रणा तीच राहत असताना या शासकीय अनुदानित संस्था कार्य करु शकतील ?

सर्वात पहिले काम म्हणजे यंत्रणेला उद्दिष्ट प्राप्तीकडे लक्ष ठेवून काम करण्यायोग्य बनवले पाहिजे. शिक्षणाच्या वेगवेगळ्या स्तरावर याचा वेगवेगळा अर्थ निघू शकेल आणि तो वेगवेगळ्या मार्गांनी साधता येऊ शकेल. प्रथिमिक शिक्षणाच्या स्तरावर ज्ञानापेक्षा कौशल्यांच्या जोपासनेवर भर दिला गेला पाहिजे आणि ज्यावेळी मुलं मोफत आणि बंधनकारक शैक्षणिक टप्पा किंवा माध्यमिक शिक्षण पूर्ण करतात, तेव्हा पाठ्यपुस्तकांवर आधारित ज्ञान चाचण्यांऐवजी उपयुक्तता चाचण्यांचा मूलभूत दाखला देण्यासाठी वापर व्हायला हवा. वेगवेगळ्या इयत्तांमधील विद्यार्थ्यांची उपेक्षित गुणवत्ता पारदर्शक अशा मोजमाप योग्य परिमाणांमध्ये गणली जाऊ शकेल, अशाप्रकारे स्पष्टपणे मांडली जायला हवी. त्यामुळे पुस्तकी अभ्यासक्रमावरुन कौशल्याधारित शिक्षणाकडे लक्ष वळेल आणि परीक्षादेखील बऱ्याच प्रमाणात तणावमुक्त बनतील. एकदाच तणावग्रस्त परीक्षा घेण्याऐवजी विद्यार्थ्यांना आपण त्या परीक्षेसाठी तयार झालोत असे वाटेल, अशा कोणत्याही वेळी प्रमाणित राज्यस्तरीय परीक्षा देण्याची परवानगी द्यायला हवी. याचा अर्थ असा नाही की ज्ञानाकडे दुर्लक्ष व्हायला हवे. ज्ञानाधारित चाचण्या स्वतंत्रपणे घेता येतील आणि विद्यार्थ्यांना विषयनिहाय वेगवेगळ्या ठिकाणी व्यावसायिक यंत्रणांमार्फत प्रमाणपत्र प्रदान केले जाऊ शकेल. खरे तर विद्यार्थी स्वीकारीत असलेल्या ज्ञानाधारित अभ्यासक्रमांना परंपरागत शालेय अभ्यासक्रमाने मर्यादा घातली जायला नको. कोणाही विद्यार्थ्याला या परीक्षांना बसण्यासाठी त्याने शाळेत प्रवेश घेतला असणे आवश्यक असावे, पण त्यासाठी वयाची अट नसावी.

दुसरे काम म्हणजे या यंत्रणेचे विक्रेंद्रीकरण करणे त्यादृष्टीने निधी पुरवठ्याच्या विषय

भारतीय शिक्षण व्यवस्था

✦ डॉ. माधव चव्हाण

भारतीय शिक्षण आज एका महत्त्वाच्या वळणावर येऊन ठेपलं आहे. सर्वसाधारण पद्धतीने सुरू असलेला विस्तार आणि सुधारणांचा सध्याचा वेग किंवा स्वरूप परिस्थितीची गरज भागवू शकणारे नाही. १९८६ सालच्या शिक्षणविषयक राष्ट्रीय धोरणातील हा उल्लेख आहे. कमी अधिक फरकाने हेच वाक्य २०२६ सालच्या शिक्षणविषयक धोरणाच्या दस्तावेजात सापडण्याची शक्यता कितपत आहे ? या प्रश्नाचे उत्तर तुम्ही निराशावादी आहात की आशावादी हे ठरवील, तथापी, तुमचं उत्तर काहीही असलं तरी वरील वाक्य आजच्या परिस्थितीला चपखल बसतं. तेव्हापासून गेल्या दोन दशकांच्या कालावधीत जे काही घडलं ते म्हणजे केवळ ओघानं सुरू असलेला विस्तार, त्यासोबत सुधारणांचा वेग आणि स्वरूप या अंगाने काही घडलंच असेल तर ते नक्कीच लक्षणीय नाही.

भारतातील शिक्षणाची कथा म्हणजे शब्द आणि प्रत्यक्ष कृती, इच्छा आणि कार्य, एकूण विनियोग आणि निष्पत्ती यातील प्रचंड तफावतीची कथा आहे.

शिक्षण म्हणजे केवळ सामाजिक न्यायाची बाब न राहता आर्थिक विकास आणि संपत्ती निर्मितीसाठी अत्यंत महत्वाचे बनले असताना विलंब, चालढकल आणि गोंधळाचा प्रकार कायम राहणे आपल्याला परवडण्यासारखे नाही. स्पष्ट दिशा आणि निर्धारित कृती आवश्यक आहे.

गेल्या काही दशकांच्या कालावधीत झालेला एक महत्त्वाचा बदल म्हणजे शिक्षणाची गरज, जी कायमच अस्तित्वात होती, आता तिचं शिक्षणाच्या मागणीत रूपांतर झाले आहे. या प्रक्रियेत शिक्षणाला बाजारी वस्तूंचं स्वरूप प्राप्त झालं आहे. तथापि शिक्षण पुरवण्यासाठी जबाबदार असलेल्या यंत्रणेवर रचनात्मक, स्वरूपात्मक आणि घटकांच्या दृष्टीने मर्यादा उभारली गेली आहे. आपण मागण्यांच्या पर्वात प्रवेश करताना वाढीव स्रोत उपलब्ध असल्यानं सहज उपलब्धता आणि दर्जाची साधारण अपेक्षा, खासकरून शिक्षणाच्या वरच्या पातळीवर निवड, वैविध्य आणि लवचिकपणा यांत रूपांतरीत होत आहे. पुरवठ्याच्या काळात देखील बहुतांश धोरणात्मक दस्तावेजांमध्ये शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी आवश्यक कल्पकतेला चालना देणारी लवचिकतेची आवश्यकता विदीत करण्यात आली आहे. तरीही आपण जीवन ही रचना निर्माण केली ती पूर्णत: ताठर आणि निर्जीवच आहे, ओघानं झालेल्या अनपेक्षित विस्तारातूनच ही परिस्थिती ओढवली आहे.

१९८६ सालच्या धोरणात्मक रचना वेगातील एका प्रकरणात शालेय शिक्षण प्रशिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र बदल घडवण्याचा उल्लेख आहे. त्यात जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थांची शिफारस करण्यात आली होती आणि त्याखेरीज कमी दर्जाच्या संस्था हळूहळू नामशेष करण्याचाही त्यात उल्लेख आहे. जिल्हा स्तरावर शिक्षण प्रशिक्षण संस्था स्थापन होण्यात त्याचा परिपाक होणं अपेक्षित होतं, प्रत्यक्षात कमी दर्जाच्या संस्था नामशेष झाल्या नाहीतच, उलट आणखी अनेक हीन दर्जाच्या संस्थांची भर पडली. त्यांची एकतर काही भूमिकाच नाही किंवा त्या निष्क्रीय तरी आहेत. पुढील काही वर्षांच्या काळात. यंत्रणा त्यापुढे गेली आणि गट स्रोत केंद्र आणि समूह विकास केंद्र स्थापण्यात आली. जिल्हा आणि उपजिल्हा स्तरावरील या व्यवस्थेवर राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद आणि राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदा स्थापन करण्यात आल्या आहेत.

शासकीय भाषेत सांगायचं तर ही सर्व यंत्रणा गेल्या एका दशकात अधिक काळ कार्यरत आहे ?

वार्षिक शैक्षणिक स्थितिदर्शक अहवालात (२००५ व २००६) प्रथम या संस्थेने भारतातल्या सिक्किम वगळता सर्व राज्यातील ५७५ जिल्ह्यातल्या ३ ते १६ वयोगटातल्या ३,१८,७६१ ग्रामीण कुटुंबांमधल्या सुमारे ७,१८,००० मुलांबाबत केलेल्या व्यापक सर्वेक्षणाचा शैक्षणिक स्थिति दर्शक वार्षिक अहवाल www.prathan.org या संकेतस्थळावर पाहता येईल. मुलांच्या घरी जाऊन मुलांमधील मूलभूत शैक्षणिक दर्जाचं मूल्य मापन करण्यात आलं. त्यात वाचन, लेखन, आणि अंकगणिती ज्ञान तपासण्यात आलं अहवालातील ढोबळ निष्कर्ष खालील प्रमाणे

- शाळेत पाच महिने घालवल्यानंतरही पहिलीतील जवळपास निम्म्या विद्यार्थ्यांना अक्षरं आणि अंक ओळखता येत नाहीत. उर्वरित निम्म्यांमधील बहुतांश विद्यार्थ्यांना अक्षरं ओळखता येतात पण, शब्द वाचता येत नाहीत.
- तिसऱ्या इयत्तेतील फक्त निम्म्या मुलांनाच पहिलीच्या वर्गाचे वाचन करता येते आणि हातच्याला घेऊन वजाबाकी करता येते.
- पाचव्या इयत्तेतील जवळपास निम्म्या मुलांना दुसऱ्या इयत्तेतील पुस्तकांमधील वाक्य

बलिदान कथा - १ सहोदरा बाई

भारत हा एक असा देश आहे की ज्याने अनेक नररत्नांना जन्म दिला. अपूर्व वीरता, अचाट धैर्य आणि दृढ देशभक्ती या अलौकिक गुणांनी युक्त असलेल्या अनेक व्यक्तींना जन्म देण्याचं श्रेय भारताला प्राप्त झालेलं आहे. देशाकरिता मरणाला मिठी मारणारे कित्येक देशभक्त या देशात जन्मले आणि त्यांनी देशभक्तीच्या वेदीवर प्राणांची आहुति देऊन देशभक्तीचा आदर्श प्रस्थापित केला. पुरूषच नव्हे तर स्त्रियांनीही वेळोवेळी साहस, वीरता आणि देशभक्तीची जी ज्योत जागवली तिला जगाच्या इतिहासात तोड नाही. दुर्गावती आणि झांशीची राणी यांची शौर्यगाथा कुणाला माहीत नसेल? त्यांची नावं भारतीय इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिली गेली आहेत. याच वीरांगनांची परंपरा कायम राखणारी एक महिला सहोदराबाई राय. यांनी आपल्या वीरतापूर्ण कार्याने भारतीय महिलांच्या उज्ज्वल इतिहासात एक नवा अध्याय निर्माण केला. परकीयांच्या दास्यामधून गोवा मुक्त करण्याकरिता १५ ऑगस्ट १९५५ला जो सत्याग्रह केला गेला त्यात सहोदराबाईंनी देशभक्तीचं हे उदाहरण दाखवलं. राष्ट्रीय झेंडा खाली झुकू न देण्याकरता प्राणांचा होम करण्याची तयारी दर्शवली. स्त्री असूनसुध्दा त्यांनी मोठमोठ्या वीरांना थरारून सोडणारं कार्य करण्याची हिंमत दाखवली. त्यामुळे देशाचा तर गौरव झालाच पण परदेशातसुध्दा भारतीय महिलांच्या शौर्य आणि देशभक्तीची प्रशंसा केली जाऊ लागली आणि भारतीय स्त्रियांची थोरवी सर्वमान्य झाली.

देशभक्ती निर्माण होण्यासाठी श्रीमंत कुळात जन्म आवश्यक आहे किंवा उच्च शिक्षण घेतल्याशिवाय देशभक्तीचा धडा वाचला जात नाही असं मुळीच नाही. सहोदराबाई हे याचं ज्वलंत उदाहरण आहे. त्यांचा जन्म एका सामान्य शेतकरी कुटुंबात झाला. मुलीला उच्च शिक्षण द्यावं असं सहोदराबाईच्या वडीलांना खूप वाटत होतं. परंतु पैशाच्या अभावी त्यांची ही इच्छा फलद्रूप झाली नाही. पण इच्छा असते तिथे मार्ग असतोच. सहोदराबाईना कुठल्या न कुठल्या मार्गानं शिक्षण घेण्याची इच्छा होती. त्यांनी स्वत:च यातून मार्ग काढला. शेजारपाजारच्या सुशिक्षित स्त्रियांकडून त्या लिहायला वाचायला शिकल्या. इतक्या की, धार्मिक ग्रंथांचा त्यांना चांगल्याप्रकारे अभ्यास करता येऊ लागला. हिंदीच नव्हे तर अन्य भाषाही त्यांनी चांगल्याप्रकारे शिकून घेतल्या.

सहोदराबाई लहानपणापासून कुशाग्र बुध्दीच्या होत्या. त्याचबरोबर स्वाभिमानीही होत्या. कुणाचाही अन्याय त्यांना कधीच सहन झाला नाही. देश आणि समाज यांच्याबद्दल त्यांच्या मनात अतूट प्रेम होतं. त्या एक प्रामाणिक आणि निष्ठावंत सेविका होत्या. आपल्या स्वत:ची प्रचाराची किंवा प्रसिद्धीची त्यांना काडीमात्र इच्छा नव्हती.

१९४२ च्या सुमारास त्यांचे पती स्वर्गवासी झाले. त्या विधवा झाल्या. पण त्यांचं धैर्य खचलं नाही. पतीच्या मृत्यूनंतर त्यांनी आपलं तन मन धन देशाला अर्पण केलं. तेव्हापासून कितीतरी सार्वजनिक कार्यामध्ये आणि आंदोलनांमध्ये त्यांनी भाग घेतला. १९४२ च्या आंदोलनात त्या जीव तोडून सहभागी झाल्या. स्वातंत्र्यप्राप्तीकरीता जे शक्य होतं ते त्यांनी केलं. आपल्या असहकार पुकारण्याची जनतेला प्रेरणा दिली. इंग्रज अधिकारी त्यांच्यावर अतिशय चिडले. त्यांनी सहोदराबाईना सहा महिने तुरुंगात अंधारकोठडीत बंद केलं. परंतु बाईची देशभक्ती कणभरसुद्धा कमी झाली नाही.

श्रीमती सहोदराबाईनी महात्मा गांधीजींच्या बरोबर नौखालीची पदयात्राही केली. मिठाच्या सत्याग्रहातही त्यांनी भाग घेतला होता. जंगल सत्याग्रहातसुद्धा त्या मागे नव्हत्या. बंगाल आणि बिहारमध्ये भयानक दुष्काळ पडला. हजारो लोक भुकेने तडफडून मरू लागले. त्यावेळी सहोदराबाईंची कर्तव्यपरायणता दिसून आली. स्वत: दुष्काळग्रस्त भागात जाऊन त्यांनी होईल तेवढी लोकांची सेवा केली.

श्रीमती सहोदराबाई काँग्रेसच्या सदस्या होत्या. त्या सागर तहसीलमधील कर्रापूर गावाच्या रहिवासी होत्या. स्थानिक काँग्रेसच्या कार्यात त्या नेहमी सक्रिय भाग घेत असत. सात आठ वर्षे त्या स्थानिक जिल्हा परिषद, जिल्हा समिती आणि स्थानिक समितीच्या सभासद एखाद्या संस्थेचं सभासद होणे हेच केवळ त्यांचं ध्येय. सदस्य होऊन आपल्या कर्तव्याचं पूर्णत: पालन करणं हाच त्या सदस्यधर्म मानत. पुष्कळदा असं होतं की बहुतेक लोक दुसऱ्याना उपदेश करण्यात पटाईत असतात. परंतु 'पर उपदेश कुशल बहुतेरे ही म्हण सहोदराबाईंच्या बाबतीत खोटी ठरली. कारण त्या आपल्या जबाबदारीला जागृत राहणाऱ्या आणि आपल्या कर्तव्याचं पुरेपुर पालन करणाऱ्या महिला होत्या. कर्रापूर व त्याच्या आसपासच्या गावकऱ्यांच्या हितासाठी स्वत:च्या पदराला खार लावून त्यांनी जे काही केलं ते सूर्यप्रकाशाइतकं उज्ज्वल आहे.

श्रीमती सहोदराबाई सदाचारिणी साधं सरळ जीवन त्यांना प्रिय भडक किंवा उथळ पोषाखात त्यांना तलवार चांगल्याप्रकारे चालवता येत.

(उर्वरित पान क्र. ५५ वर)

लाभदायक ठरतील अशा कंत्राटी तत्वावरील शेतीच्या विविध पध्दतींना प्रोत्साहन देण्याची गरज आहे. कंत्राटी शेती पध्दती छोट्या शेतकऱ्यांचे हितरक्षण करणारी असावी, याची खातरजमा करण्यासाठी प्रत्येक राज्यात बहुविध भागधारकांसाठी संवर्धनक्षम कंत्राटी शेती परिषद स्थापन करणे उपयुक्त ठरेल. शेती हंगामाच्या अखेरीला शेतकऱ्याच्या शेतमालाला रास्त भाव मिळण्याची हमी या व्यवस्थेमुळे देता येईल. कंत्राटी शेती सामाजिकदृष्ट्या दीर्घकाळ लाभदायक आणि समन्यायी ठरावी, यासाठी आचारसंहिता तयार करणे अत्यावश्यक आहे.

सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रांमधील संस्थांचा सहभाग असलेल्या परस्परावलंबी आणि दोहोंसाठी लाभदायक कंत्राटी शेती व्यवस्थांची जोपासना करणे शक्य झाल्यास गावपातळीवर सार्वत्रिक पीक विमा योजना सुरू करता येईल. परिणामी शेतकऱ्याला योग्य वेळी आणि योग्य ठिकाणी पतपुरवठा तसेच आवश्यक सामग्रीचा पुरवठा करणे सुलभ होईल. आज लहान प्रमाणावरील शेतीची कार्यक्षमता आणि अर्थकारणात सुधारणा घडवून आणण्याची गरज आहे. शेतजमिनीचा आकार जेवढा लहान असेल तेवढ्या जास्त प्रमाणात विक्रीयोग अतिरिक्त उत्पादनाची गरज असते, जेणेकरून त्या शेतकरी कुटुंबाला पुरेसे उत्पन्न मिळू शकेल. भूक आणि दारिद्र्याचे निर्मूलन हे संयुक्त राष्ट्रसंघाचे सहस्त्रक विकास उद्दिष्ट आहे, छोट्या शेतीच्या व्यवस्थापन तंत्रतील क्रांती हाच ते उद्दिष्ट साध्य करण्याचा मार्ग आहे.

शेती हा भारतातील खाजगी क्षेत्रामधील सर्वात मोठा व्यवसाय आहे. येथे शेतजमिनीची मालकी वैयक्तिक असून जमीनवापराचे निर्णयही व्यक्तिगत आधारावर घेतले जातात. कंत्राटी शेतीच्या उभयपक्षी लाभदायक विविध पध्दती आपल्या देशात पूर्वीपासूनच अस्तित्वात आहेत. यासंदर्भात तंबाखू आणि ऊस लागवडीचे उदाहरण देता येईल. अशा प्रकारच्या यशस्वी प्रतिमानांचा अभ्यास करून त्यामधून काढलेल्या निष्कर्षांचे उपयोजन कापूस, कडधान्ये, तेलबिया, भाजीपाला, फळे, फुलशेती आणि औषधी वनस्पती इ. अन्य पिकांच्या लागवडीत केले पाहिजे. ग्रामीण उत्पादक आणि शहरी खरेदीदार (मोठे उद्योगसमूह) यांच्यातील करार अन्यायकारक सामाजिक व्यवहार ठरता कामा नये. त्या दृष्टीने प्रस्तावित राज्य कंत्राटी शेती परिषदेने परस्परावलंबी खाजगी (शहरी खरेदीदार) आणि खाजगी (ग्रामीण उत्पादक) भागीदारीला प्रोत्साहन देणे अगत्याचे आहे. तसे झाले तरच कंत्राटी शेती छोट्या शेतकऱ्यांसाठी शाप नव्हे तर वरदान ठरेल.

ग्रामीण क्षेत्रांतील ज्ञानाचा अनुशेष भरून काढणे : छोट्या शेतीच्या व्यवस्थापन तंत्रात क्रांती घडवून आणण्यासोबतच उत्पादनाची क्षमता आणि प्रत्यक्ष उत्पादन यांच्यातील वाढती दरी बुजवण्यासाठी शेतीच्या पध्दतींमध्येही सुधारणा केली पाहिजे, त्यासाठी प्रायोगिक स्थितीतील तंत्रज्ञानाचाही वापर करता येईल. जाणकारी आणि उपयोजन म्हणजेच सिध्दान्त आणि व्यवहार यांच्यातील दरी भरून काढण्यासाठी पुढील उपाययोजना उपयुक्त ठरतील :

- ❖ शेतकरी ते शेतकरी (शेती ते शेती) या स्तरावर ज्ञान आणि माहितीच्या देवाण-घेवाणीला प्रोत्साहन देण्यासाठी लक्षणीय कामगिरी करणाऱ्या शेतकऱ्यांच्या शेतावरच 'शेतीशाळा' स्थापन करणे.
- ❖ प्रत्येक ग्रामपंचायतीतील एक स्त्री आणि एक पुरुष, अशा दोन सदस्यांना शेतीविज्ञान व्यवस्थापक म्हणून प्रशिक्षण देणे आणि जनुकीय फेरफार केलेली पिके तसेच शेतकऱ्यांचे हक्क याविषयी त्यांना माहिती देणे.
- ❖ शेतमालाचे उत्पादन व त्यानंतरच्या प्रक्रिया यांमधील विसंवाद मिटविणे आणि शेतावरील व शेताबाहेरील उपजीविकेच्या संधी वृध्दिंगत करणे ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सध्याच्या कृषी विज्ञान केंद्रांची कृषी आणि उद्योग विज्ञान केंद्रे अशी पुनर्रचना करणे.
- ❖ दर्जेदार व्यापार आणि शेतकऱ्यांच्या हक्कांसंदर्भात कायदेविषयक साक्षरता यांना प्रोत्साहन देणे. तसेच हवामान आणि विपणन या घटकांबाबत अद्ययावत माहिती पुरविणे, या कार्याकरिता 'ज्ञानचौपाल' म्हणजे ग्रामीण ज्ञान केंद्रे स्थापन करणे.
- ❖ कापणी किंवा उत्पादनानंतरचे तंत्रज्ञान, शेतमालावरील प्रक्रिया आणि विपणन या क्षेत्रांमध्ये 'प्रयोगशाळा ते शेत' या स्वरूपाची ६०,००० प्रात्यक्षिके आयोजित करणे.
- ❖ तंत्रज्ञान आणि धोरणांशी निगडित मुद्यांबाबत शेतकरी कुटुंबांशी निरंतर आणि रचनात्मक संवाद साधण्यासाठी राज्य शेतकरी आयोग स्थापन करणे.

ही होती एकविसाव्या शतकात आपल्यासमोर उभी ठाकलेली काही आव्हाने. प्रत्येक समस्या सोडविण्याच्या अनेक पध्दती आणि मार्ग उपलब्ध असू शकतात. म्हणूनच अन्नधान्य, डाळी आणि अन्य क्रयवस्तूंची परदेशांतून आयात करण्याचा सोपा मार्ग आपण अवलंबणे योग्य नाही. हा पर्याय अल्प मुदतीसाठी आकर्षक वाटला तरी दीर्घ काळाचा विचार करता घातक ठरू शकतो. आपण ही बाब सदोदीत ध्यानात ठेवली पाहिजे की, भारताच्या लोकसंख्येतील दोन तृतीयांश लोक शेतकरी आहेत, याचाच अर्थ असा की आपल्या देशातील बहुसंख्य ग्राहक शेतकरीच आहेत. म्हणूनच ज्या औद्योगिकदृष्ट्या विकसित देशांमध्ये फक्त तीन टक्के लोकसंख्या शेतीव्यवसायावर अवलंबून आहे, तेथे केली जाणारी ग्राहक - उत्पादक वर्गवारी येथील परिस्थितीत ग्राह्य ठरत नाही. "उपासमार, दारिद्र्य, अज्ञान, रोगराई आणि संधीची विषमता यांचे निर्मूलन" असा कार्यक्रम जवाहरलाल नेहरू यांनी आपल्या नियतीशी झालेल्या करारासाठी आखला होता. शेतीच्या उत्पादकतेत लक्षणीय सुधारणा घडवून आणणे, हाच एकमेव मार्ग आपल्याला तो कार्यक्रम राबविण्यासाठी उपलब्ध आहे. शेतीचा विकास गतिमान केला तरच सर्वसमावेशक आर्थिक विकासाचे उद्दिष्ट आपल्याला गाठता येईल.

अनुवाद - ***विजय बनसोडे***

गळिताच्या बिया, भाजीपाला आणि फळफळावळ\ या शेतमालाच्या दरवाढीला आणि पर्यायाने चलनवाढीला आळा घालणेही शक्य होईल. कोरडवाहू शेतीवर भर देणे हीच चलनवाढ, भूक आणि गरिबी या समस्यांवर खात्रीलायक आणि सर्वोत्तम उपाययोजना आहे. पशुसंवर्धन आणि फळा-फुलांच्या लागवडीसाठीसुध्दा हे आदर्श क्षेत्र आहे. संकरित तुरीची लागवड करण्यासारख्या उत्पादन आणि उत्पन्नात वाढ करणाऱ्या तंत्रपध्दतींचा कोरडवाहू शेतीमध्ये प्रभावी वापर शक्य आहे. या विभागात कडधान्ये - डाळींच्या पेठा, फळ-फूल-भाज्यांचे मळे आणि दुग्धउत्पादन व्यवसाय स्थापन करण्यास मोठा वाव आहे.

प्रसूत लेखात विवेचन केल्यानुसार, प्राप्त संचिताचे म्हणजे पूर्वी मिळविलेल्या लाभाचे परिरक्षण करणे, या आव्हानाचा आशय हरितक्रांतीच्या मूळ प्रदेशाचे हितरक्षण हा आहे. या लाभाचा किंवा संचिताचा विस्तार जलसिंचनाची समस्या नसलेल्या अन्य राज्यांमध्ये करणे, हे दुसरे आव्हान पेलण्यात फारशी अडचण येणार नाही. त्यासाठी पूर्व आणि दक्षिण भारतात आणखी दोन सुपीक विभाग तातडीने निर्माण केले पाहिजेत. तिसरे आव्हान आहे कोरडवाहू शेतीच्या उत्पादन वाढीद्वारे नवीन यश मिळविण्याचे. कोरडवाहू क्षेत्राची उत्पादकता वाढल्यावर तेथील अर्थव्यवस्था सुदृढ होण्यास मदत होईल. वापर उपभोग वाढल्याखेरीज उत्पादन वाढणार नाही. म्हणूनच सार्वजनिक शिधावाटप व्यवस्थेचा सर्वत्र विस्तार झाल्यास शेती उत्पादनाला चालना मिळेलच. शिवाय जगात सर्वाधिक कुपोषित बालके, स्त्रिया आणि पुरुषांचा देश अशी अवमानास्पद ओळखही पुसली जाईल.

हवामानातील बदलांच्या आव्हानाशी मुकाबला : हवामानामधील बदलांसंदर्भातील आंतरशासकीय तज्ज्ञमंडळाने फेब्रुवारी २००७ मध्ये प्रसिध्द केलेल्या आपल्या चौथ्या आढावा अहवालात पुढील मुद्दे आणि शक्यतांचा ऊहापोह केला आहे :

❖ गेल्या बारा वर्षांतील (१९९५-२००६) अकरा वर्षांचा, जागतिक भूपृष्ठीय तापमान अभिलेखांतील नोंदीनुसार, सर्वाधिक उष्ण १२ वर्षात समावेश होतो. सन १८५०-१८९९ ते २००१-२००५ या कालखंडात तापमानात एकंदर ०.७६ अंश सेल्सिअस एवढी वाढ झाली आहे.

❖ जागतिक सरासरी सागरी पातळीत १९६१ ते २००३ या काळात दरवर्षी १.८ मिमी एवढी वाढ झाली आहे. समुद्राची पातळी वाढण्याचा हा दर १९९३-२००३ या काळात प्रतिवर्ष ३.१ मिमी एवढा जास्त होता. विसाव्या शतकात सागरी पातळीत ०.१७ मीटर वाढ झाल्याचा अंदाज आहे.

❖ आगामी दोन दशकांत जागतिक तापमान अधिक उष्ण होणार आहे. दर दशकात तापमानात ०.२ अंश सेल्सियस वाढ होईल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. अगदी सर्व हरितगृह वायूंच्या उत्सर्जनाचे आणि एरोसॉल वापराचे प्रमाण सन २००० च्या स्तरावर कायम राखले, तरी येणाऱ्या प्रत्येक दशकात सुमारे ०.१ अंश सेल्सियस एवढी तापमानवाढ होणे अपेक्षित आहे.

❖ भूपृष्ठावरील हवा एकविसाव्या शतकात अधिक तप्त होणार आहे. हवेच्या तापमानात किमान १.८ अंश सेल्सियस ते कमाल ४ अंश सेल्सियस वाढ होईल, असे अंदाज व्यक्त करण्यात आले आहेत.

❖ अधिक उष्म्याचे कालखंड, उष्णतेच्या लाटा आणि मुसळधार पाऊस यांच्या वारंवारतेत वाढ होईल, हे ९० टक्के तरी निश्चित आहे. अवर्षण, उष्णकटिबंधीय चक्रीवादळे आणि अत्यंत मोठी भरती यांच्यातही वाढ होण्याची ६६ टक्क्यांहून अधिक शक्यता आहे.

❖ वातावरणातील कार्बनडाय ऑक्साईड वायूंच्या प्रमाणात वाढ झाल्यामुळे महासागरांच्या आम्लतेत वाढ होईल.

या पार्श्वभूमीवर 'हवामानातील बदलांचे व्यवस्थापन' या विषयावर आंतरविद्याशाखीय संशोधन केंद्रे स्थापन करण्यात आपण आता आणखी वेळ दवडता कामा नये. त्याचबरोबर प्रत्येक ग्रामपंचायतीमधील एक स्त्री आणि एक पुरुष अशा दोन सदस्यांना 'हवामान व्यवस्थापक' म्हणून प्रशिक्षण दिले पाहिजे. लहरी हवामानाचा अनिष्ट परिणाम किमान पातळीवर राखणे आणि सर्वसाधारण मोसमी पावसाचा जास्तीत जास्त लाभ मिळविणे, हे उद्दिष्ट ठेवणे आवश्यक आहे. अवर्षण, पूर आणि सागरी पातळीतील वाढ या आव्हानांचा सामना करण्यासाठी अग्रिम संशोधन करणे गरजेचे आहे. अशा संशोधनाचे उदाहरण म्हणजे, एमएसएसआरएफ (MSSRF) या संस्थेत डॉ.अजय परिदा आणि त्यांचे सहकारी वैज्ञानिक, 'ॲव्हेसेनिया मरिना' या तिवराच्या जातीत असलेला अधिक क्षारता सहन करण्याचा गुणधर्म तांदूळ, कडधान्य आणि किनारपट्टीच्या प्रदेशातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्व असलेल्या अन्य पिकांमध्ये उतरविण्याचे प्रयत्न करीत आहेत. त्याचप्रमाणे, 'प्रॉसोपिस जूलिफ्लोरा' या वनस्पतींमधील अवर्षणाचा मुकाबला करण्याची जनुके अन्नधान्यांमध्ये प्रविष्ट करण्याबाबत संशोधन सुरू आहे. लैंगिक प्रजोत्पादनाच्या मर्यादा ओलांडून जनुकीय स्थानांतर आणि बदल घडवून आणण्याच्या तंत्रामुळे अनेक असाधारण संधी उपलब्ध झाल्या असून त्यांचा पूर्ण लाभ घेतलाच पाहिजे.

लहान शेतजमीन असलेल्या कुटुंबांचे सक्षमीकरण : छोट्या शेतीच्या व्यवस्थापना संदर्भात क्रांतीची गरज : दुग्धव्यवसाय क्षेत्राने मिळविलेल्या असामान्य यशाचे श्रेय मुख्यत्वे दूध उत्पादकांच्या सहकारी संस्थांना जाते. उत्पादकांच्या सहकारी संस्थांमुळे विशेषत: कापणीनंतरची प्रक्रिया आणि विपणन या क्षेत्रात छोट्या प्रमाणावरील विकेंद्रीकृत शेती उत्पादनाला साहाय्य करण्यासाठी महत्वपूर्ण स्वरूपाच्या केंद्रीकृत सेवा पुरविणे शक्य होते. छोट्या शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी सहकारी संस्थांप्रमाणेच स्वयंसहाय्यता गट, उत्पादकांची कंपनी, कंत्राटी शेती अशा अनेक पध्दती अस्तित्वात आहेत. उत्पादक आणि खरेदीदार या दोघांनाही

प्रणालीमार्फत मिळालेली माहिती आणि तज्ज्ञ व्यावसायिकांचे मार्गदर्शन या आधारावर वैज्ञानिक आणि राजकीयदृष्ट्या स्वीकारार्ह जमीन-वापर व्यवस्था जेवढ्या लवकरात लवकर विकसित केली जाईल, तेवढ्याच त्वरेने शेतकरी समुदायांमधील कलह आणि संघर्ष शमवणे, नियंत्रित करणे शक्य होईल. देशाच्या आर्थिक प्रगतीला खीळ घालणाऱ्या संभाव्य जमीन संघर्षांकडे यापुढे दुर्लक्ष करून चालणार नाही.

जमीन संपादन कायद्यातील (१८९४) तरतुदींचा वापर करून, शेतजमिनी बिगरशेती विनियोगासाठी खुल्या करून घेण्याचे प्रकार काही ठिकाणी सुरू आहेत. हा कायदा पूर्णपणे कालबाह्य झाला असून त्यातील पुढील कलम तर विशेषत्वाने शेतकरी-विरोधी आणि धनदांडग्यांना अनुकूल आहे. "संपादित जमिनीसाठी नुकसान भरपाईची रक्कम निर्धारित करताना, त्या जमिनीच्या भविष्यातील वापरामुळे होणारी मूल्यवृध्दी न्यायालयाने विचारात घेऊ नये." जमिनीचे छोटे-छोटे तुकडे कसणाऱ्या शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने आपल्या जमिनी उद्योग आणि व्यवसायांना विकून टाकल्या, तर ते काही लोकांना निश्चितच आवडेल. छोट्या शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनींचा रास्त मोबदला मिळावा, यासाठी 'जमीन बाजार' स्थापन करण्याची सूचना केली जात आहे. पण शेतकऱ्यांसाठी 'निर्गमन' योजना सुचविणाऱ्यांनी 'आगमन' योजनाही सुचविली पाहिजे. 'निर्गमन' आणि 'आगमन' योजना एकत्रितपणेच प्रस्तावित करणे आवश्यक आहे. उद्योग आणि किरकोळ व्यापार या क्षेत्रातील सर्व विकासयोजना आणि वाणिज्यिक प्रकल्पांसंदर्भात स्थानिक जनतेच्या उपजीविकेवर होणाऱ्या संभाव्य परिणामांबाबतचा अहवाल तयार करणे अनिवार्य ठरविणे ही आपल्या देशासाठी तातडीची गरज आहे. किरकोळ विक्री आणि छोट्या व्यवसायांमध्ये लक्षावधी स्त्री-पुरुष आपली रोजी-रोटी मिळवित असून या क्षेत्रात येणाऱ्या काही बहुराष्ट्रीय सुपर मार्केट समूहांमुळे त्यांच्या उपजीविकेवर निश्चितच अनिष्ट परिणाम होईल. शहरी तसेच ग्रामीण भागातही मोठ्या प्रमाणात असलेली छोटी दुकाने, किरकोळ विक्री व्यवसाय यांनीच सर्वाधिक लोकांना रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली आहे. या पार्श्वभूमीवर हे ध्यानात घेणे अत्यंत महत्वाचे आहे की, सामाजिक असंतोष आणि कलह टाळायचा असेल तर रोजगार संपुष्टात येतानाच रोजगार निर्मितीच्या अन्य संधी उपलब्ध झाल्या पाहिजेत.

संचिताची वृध्दी : आधी नमूद केल्याप्रमाणे, आपल्या देशात उत्पादनाच्या सुप्त संधींचा मोठा साठा उपलब्ध आहे. ही क्षमता म्हणजे आपल्या ग्रामीण अर्थव्यवस्थेची एक मुख्य शक्ती आहे.

तक्ता क्र. १

तुलनात्मक पीक उत्पादकता

(किलो/हेक्टर)

पीक	अमेरिका	चीन	भारत
मका	८९००	४९००	२१००
तांदूळ	७५००	६०००	३०००
सोयाबीन	२२५०	१७४०	१०५०
कापूस	२०६०	३५००	७५०
टोमॅटो	६२५०	२४००	१४३०

आपल्या देशात आणखी दोन सुपीक पट्टे निर्माण करण्यासाठी तंत्रज्ञान, तांत्रिक पायाभूत सुविधा, प्रशिक्षण आणि व्यापार या घटकांची सांगड घातलेल्या क्षमतावर्धक योजना तात्काळ राबविणे आवश्यक आहे.

बिहार, उत्तर प्रदेशाचा पूर्व भाग, पश्चिम बंगाल आणि आसाम : या विभागात मुबलक पाणी आणि चांगली जमीन उपलब्ध आहे. येथे संरक्षण-लागवड-वापर-व्यापार या साखळीवर समग्रलक्षी भर दिला पाहिजे. या साखळीतील सर्व घटकांकडे लक्ष पुरविणे महत्वाचे आहे. पंजाब, हरियाणा, पश्चिम उत्तर प्रदेश या पहिल्या सुपीक विभागाप्रमाणेच, या विभागातही शेतमालाला रास्त भाव आणि वितरणाची हमी या घटकांवर भर दिला तर उत्पादकता वाढविण्याकरिता शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळेल.

तमिळनाडू-कर्नाटक-आंध्र प्रदेश आणि ओरीसा : कावेरी जल लवादाने कावेरी खोऱ्यातील पाणीवाटपाबाबत निर्णय दिला असल्याने, आता उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर करण्यावर लक्ष केंद्रित करण्याची वेळ आली आहे. भारत सरकार या वर्षापासूनच 'भरघोस पीक आणि अधिक उत्पन्नासाठी पाण्याच्या प्रत्येक थेंबाचा सुयोग्य वापर' मोहीम देशभरात हाती घेणार आहे. या विभागाने सदर माहिमेत अत्यंत सक्रिय सहभाग घेतला पाहिजे, जेणेकरून पाणी, पीक, बियाणे, स्थूल आणि सूक्ष्म पोषकद्रव्ये, अवजारे या घटकांचा सुयोग्य ताळमेळ घालून जास्तीत जास्त उत्पन्न मिळविणे शक्य होईल.

हे आणखी दोन सुपीक विभाग पूर्णत: साकार झाले तर सार्वजनिक शिधावाटप व्यवस्थेसाठी अन्नधान्याच्या पुरवठ्यात स्थैर्याची निश्चिती होईल, एवढेच नव्हे तर लक्षावधी ग्रामीण कुटुंबांना अधिक उत्पन्न आणि रोजगार सुरक्षाही लाभेल.

यशप्राप्तीची नवीन संधी : फक्त पावसाच्या पाण्यावर निर्भर असलेल्या ६६ टक्के शेतीक्षेत्रात उत्पादन वाढीद्वारे यश मिळविण्याच्या जास्तीत जास्त संधी उपलब्ध आहेत. पर्जन्यजलाची साठवण आणि भूगर्भातील जलवाहिन्यांचे पुनर्भरण यासोबत उच्च मूल्य पण पाण्याची कमी आवश्यकता असलेल्या पिकांची लागवड करणे हे, कोरडवाहू शेतीक्षेत्रातील कडधान्ये आणि गळिताची धान्ये अशा मुख्य पिकांची उत्पादकता सुधारण्याच्या कार्यात साहाय्यकारक ठरेल. कोरडवाहू शेतीची क्षेत्रे आज तथाकथित 'दुसऱ्या हरितक्रांतीच्या प्रतिक्षेत आहेत. या क्षेत्रांकडे अधिक लक्ष दिले तर कडधान्ये,

आज आपल्या स्वातंत्र्याच्या हिरकमहोत्सवी वर्षात शेती क्षेत्रावर मात्र नैराश्य आणि विनाशाचे सावट पडले आहे. आपल्या लोकसंख्येचा सुमारे दोन तृतीयांश हिस्सा आजही उपजीविकेसाठी शेतीवर अवलंबून असला तरी, सकल देशांतर्गत उत्पादनातील शेतीचा वाटा २० टक्क्यांपेक्षा कमी झाला आहे. सुमारे ८० टक्के शेतकरी अल्पभूधारक किंवा छोटे शेतकरी या गटात मोडतात, या छोट्या शेतकऱ्याच्या जमिनीचे क्षेत्रफळ सरासरी १.४१ हेक्टर एवढेच आहे. एकंदर भौगोलिक क्षेत्र ३२ कोटी ९० लाख हेक्टर असून त्यापैकी १४ कोटी २० लाख क्षेत्र प्रत्यक्ष लागवडीखाली आहे. त्यातही सुमारे ६३ टक्के शेती निव्वळ पावसाच्या पाण्यावर केली जाते. राष्ट्रीय प्रतिदर्श सर्वेक्षण संघटनेने अलीकडेच केलेल्या एका पाहणीत आढळले की, मुलाखती घेतलेल्या शेतकऱ्यांपैकी जवळपास ४० टक्के शेतकऱ्यांनी अन्य पर्याय उपलब्ध असल्यास शेतीचा व्यवसाय सोडून देण्याची तयारी दाखविली. या परिस्थितीत बदल कसा घडवून आणायचा? शेतीबाबत १९६० आणि १९७० च्या दशकांत, हरितक्रांतीच्या काळात शेतकऱ्यांमध्ये असलेला अभिमान आणि आत्मसन्मान परत कसा मिळवून द्यायचा?

प्रमुख आव्हाने :

एकोणीसशे साठच्या दशकातील 'हम होंगे कामयाब' ही भावना पुनरुज्जीवित करण्यासाठी कृषिवैज्ञानिक आणि धोरण निर्मात्यांना कोणत्या सहा प्रमुख आव्हानांचा मुकाबला करावयाचा आहे, त्याबाबत मी येथे विवेचन करू इच्छितो.

संचिताचे परिरक्षण : पंजाब, हरियाणा आणि उत्तर प्रदेशाचा पश्चिम भाग असा व्यापक भूभाग व्यापणारे सुपीक क्षेत्र म्हणजे आपल्या अन्नसुरक्षा व्यवस्थेचा मूलाधार. पण दुर्दैवाने या क्षेत्राला गंभीर पर्यावरणीय आणि आर्थिक समस्यांशी झगडावे लागत आहे. भूजलाची पातळी दरवर्षी दोन ते तीन फूट अशा भयावह गतीने खालावत आहे, शिवाय जमिनी क्षारयुक्त होत आहेत. शेतीमधील खर्च-जोखीम-परतावा व्यवस्था आर्थिक दृष्ट्या अव्यवहार्य ठरली असून परिणामतः बहुसंख्य शेतकरी कर्जबाजारी झाले आहेत.

अशा क्षेत्रांमध्ये पर्यावरणाचे संतुलन राखणाऱ्या कमीत कमी नांगरणीची आवश्यकता असलेल्या आणि नैसर्गिक स्वरूपाच्या शेतीला प्रोत्साहन देणे महत्त्वाचे आहे. पर्यावरणाचे संतुलन राखणाऱ्या, संवर्धनात्मक शेतीमध्ये मृदेची गुणवत्ता आणि पाण्याचे व्यवस्थापन या घटकांवर काटेकोर भर दिला जातो, त्याचबरोबर कौशल्यपूर्ण कृषितंत्रांचा अवलंब आवश्यक असतो. हरित शेती, म्हणजे नैसर्गिक स्वरूपाच्या शेतीमध्ये एकात्मिक कीटक नियंत्रण पध्दती, एकात्मिक पोषकद्रव्य पुरवठा, पीक-पशुधन साखळी अशा परिसंस्थेचे संवर्धन-जतन करणाऱ्या तंत्रांसह सर्वाधिक योग्य पिकाची आणि वाणाची निवड या घटकांचा अंतर्भाव होतो. सेंद्रीय शेती पध्दतीत रासायनिक खते आणि कीटकनाशकांचा वापर केला जात नाही, पण 'हरित' शेतीपध्दतीत मात्र किमान मात्रेत अत्यावश्यक खनिज खते आणि रासायनिक कीटकनाशकांचा वापर करण्यास वाव असतो, त्याचबरोबर जनुकीय फेरफार केलेले पीक घेण्यासही मुभा असते. सेंद्रीय आणि हरित शेती पध्दतींच्या उत्पादनांना प्रमाणित करण्यासाठी दोन वेगवेगळ्या प्रक्रिया असाव्यात, अशी सूचना राष्ट्रीय शेतकरी आयोगाने केली आहे. सर्वोत्कृष्ट शेतजमीन शेतीसाठीच संरक्षित करणे, ही अत्यंत महत्त्वाची गरज आहे. पर्यावरण, अर्थशास्त्र, समन्याय आणि रोजगारनिर्मिती या तत्त्वसमुच्चयावर आधारित भू-विनियोग आराखडा प्रत्येक राज्याने आखला पाहिजे. व्यावसायिक दृष्ट्या सक्षम असलेल्या भू-विनियोग सल्लागार सेवा संस्थेने उपलब्ध शेतजमिनीची वर्गवारी खालीलप्रमाणे केल्यास ते उपयुक्त ठरेल :

- **परिरक्षित क्षेत्र** - वने, राष्ट्रीय उद्याने, अभयारण्ये, जैविक वैविध्य असलेले आरक्षित वनक्षेत्र इ.
- **पुनर्स्थापना क्षेत्र** - जमिनीची निगा राखणे आणि मृदेच्या गुणवत्तेत सुधारणा करणे या दृष्टीने लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता असलेले क्षेत्र.
- **संवर्धनक्षम सघन क्षेत्र** - लागवड, पशुसंवर्धन, मत्स्यव्यवसाय, वनशेती यासाठी आदर्श क्षेत्र. या क्षेत्रात पर्यावरणाचे कसलेही नुकसान न करता सातत्यपूर्ण हरितक्रांतीला चालना देणे शक्य असते, परिणामी उत्पादकतेतही निरंतर वाढीला मोठा वाव असतो.
- **औद्योगिक आणि बिगरशेती क्षेत्र** - शेती व्यवसायासाठी निम्न जैविक क्षमता असलेले क्षेत्र. असे क्षेत्र उद्योग, गृहनिर्माण, रस्ते आणि विशेष आर्थिक क्षेत्र इ. वापरासाठी आदर्श असते.

प्रत्येक राज्यात उपलब्ध जमिनीचे अशाप्रकारे वर्गीकरण केल्यास शेती आणि उद्योगाचा सुसंवादी विकास घडवणे सुलभ होईल. संवर्धनक्षम किंवा चिरस्थायी शेती हा ग्रामीण जनतेच्या निरंतर उपजीविका व्यवस्थेचा कणा आहे, एवढेच नव्हे तर ती राष्ट्रीय सार्वभौमत्वाची मुख्य पूर्वअट आहे, हे ध्यानात ठेवले पाहिजे. पाण्यावरून विवाद उद्‌भवले असताना आता जमिनीसाठीही संघर्ष सुरू झाल्याचे आपण पाहात आहोत. वाढत्या लोकसंख्येमुळे शेतजमिनीवर पडलेला प्रचंड दबाव आणि आधुनिक उद्योगांची रोजगारशून्य वाढ लक्षात घेता उपरोक्त परिस्थिती म्हणजे हिमनगाचे केवळ वरचे टोक असून आगामी काळ अधिक खडतर असल्याचे चिन्ह आहे. सद्यस्थितीत वेगवेगळ्या पिकांची लागवड, पशुसंवर्धन, सागरी आणि गोड्या पाण्यातील मासेमारी, वनशेती आणि शेती उतपादनांवरील प्रक्रिया यांचा अंतर्भाव असलेला शेतीव्यवसायच रोजगारनिर्मितीयुक्त आर्थिक विकासाला चालना देऊ शकतो. दूरसंवेदन तंत्रज्ञान

कृषिक्षेत्रात भारताचा नियतीशी करार

प्रा.एम.एस. स्वामिनाथन्

भारताचा नियतीशी करार झाल्याचे सुतोवाच जवाहरलाल नेहरू यांनी १४ आणि १५ ऑगस्ट, १९४७ या दिवसांमधील मध्यरात्रीस केले. स्वातंत्र्याच्या प्रभातकालापासूनच आपण असे राष्ट्र साकार करण्याठी कार्यरत झाले पाहिजे की, जेथे प्रत्येक बालक, स्त्री आणि पुरुष यांना उत्तम आरोग्य, पोषण, शिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध असतील, असे आवाहन त्यांनी केले होते. गेल्या ६० वर्षांतील सार्वजनिक धोरणे, गुंतवणूक आणि कृषी संशोधन, शिक्षण व विस्तार या क्षेत्रात देशाने केलेल्या उल्लेखनीय प्रगतीच्या बळावर शेतीच्या उत्पादकतेत लक्षणीय सुधारणा आणि मानवी आयुर्मानातही मोठी वाढ, अशी ठसठशीत कामगिरी आपण बजावली आहे.

भारताच्या प्रगतीत सार्वजनिक क्षेत्रातील संशोधनाने दिलेले योगदान पुढील माहितीवरून पुरेसे स्पष्ट होईल :

- अन्नधान्य उत्पादन १९५१-५२ मध्ये सुमारे साडेचार कोटी टन होते, ते वर्तमान शतकाच्या आरंभाला २० कोटी टनांवर गेले.
- मुख्य तृणधान्यांची उत्पादकता १९६१-६२ मध्ये हेक्टरी ७०० किलो होती, ती वाढून आता हेक्टरी १७०० किलो झाली आहे.
- सन १९५१-५२ मध्ये सिंचनाखालील निव्वळ क्षेत्र अंदाजे दोन कोटी १० लाख हेक्टर होते, ते आज सहा कोटी हेक्टर आहे; याच काळात सिंचनाखालील एकंदर शेतीक्षेत्रातही ३०० टक्क्यांपेक्षा जास्त वाढ झाली आहे. अधिकाधिक क्षेत्र सिंचनाखाली आणण्यात भूजल सिंचनाने प्रमुख भूमिका बजावली असून, त्याचे श्रेय तंत्रज्ञानातील प्रगतीला दिले पाहिजे.
- वार्षिक दुग्धउत्पादनाचे प्रमाण १९५०-५१ मधील दोन कोटी टनांवरून वाढून यावर्षी (२००७) जवळजवळ १० कोटी टनांवर गेले आहे, जागतिक दुग्धउत्पादनात भारताने अग्रस्थान पटकाविले आहे. राष्ट्रीय दुग्धविकास मंडळाने पुढाकार घेऊन नाविन्यपूर्ण व्यवस्थापकीय पध्दती विकसित केल्या, त्यामुळे दूध उत्पादन, पक्रिया आणि विपणन यांच्यातील दुवे दृढ झाले; त्याची फलश्रुती म्हणजे दुग्धउत्पादन क्षेत्रातील भारताची उत्तुंग झेप.
- सागरी आणि गोड्या पाण्यातील मत्स्यव्यवसायाची प्रगतीही वाखाणण्याजोगी आहे. मत्स्यबीज आणि मत्स्यखाद्य उत्पादनातील वैज्ञानिक प्रगती, कृत्रिम प्रजनन क्षेत्रातील विकसित तंत्रे आणि अत्याधुनिक कौशल्ये व उपकरणांचे उपयोजन आदी घटकांचा यात मोठा वाटा आहे.
- विज्ञान, तंत्रज्ञान आणि सामाजिक अभियांत्रिकी यांची सांगड घातल्यामुळे वनक्षेत्राचे जतन, संवर्धन तसेच समुद्रकिनाऱ्यावरील खाजण क्षेत्रातील तिवरांचे पुनरुज्जीवन करणे शक्य झाले आहे.
- हिवताप, क्षयरोग, कुष्ठरोग, पटकी आणि अन्य आजारांना रोखण्यासाठी किफायतशीर औषधे विकसित करण्यात लक्षणीय प्रगती झाली आहे; त्याचप्रमाणे देवी रोगाचे पूर्णत: निर्मूलन झाले असून कुष्ठरोगाचेही उच्चाटन लवकरच होण्याची शक्यता आहे.
- सूक्ष्मपोषक द्रव्यांच्या कमतरतेमुळे उद्‌भवणाऱ्या अनेक पोषणविषयक आजारांवर आता किफायतशीर औषधे उपलब्ध आहेत. त्यासाठी अन्नपदार्थ सकस करण्याच्या पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे.
- साधी-सोपी रचना असलेले पाण्याचे पंप बसविणे, दूरसंवेदन प्रणालीचे उपयोजन आणि कठीण खडकात छिद्र करण्याच्या तंत्राचा वापर या त्रिसूत्रीची व्यापक अंमलबजावणी केल्यामुळे जवळपास संपूर्ण ग्रामीण क्षेत्रात पेयजलाचा पुरवठा करणे शक्य झाले आहे.
- बायोगॅस, बायोमास, सौरऊर्जा आणि पवनऊर्जा अशा अपारंपरिक आणि नूतनीक्षम ऊर्जास्त्रोतांच्या वापराबाबत झालेल्या वैज्ञानिक संशोधन कार्यामुळे ग्रामीण ऊर्जा प्रणालींना मोठ्या प्रमाणात लाभ झाला आहे. पूर्णपणे देशातच विकसित केलेल्या तंत्रज्ञानावर आधारित अणुऊर्जा निर्मितीमुळे देशाच्या ऊर्जासुरक्षेला मोलाचा हातभार लागला आहे. जैव-इंधने विकसित करण्याकडेही अधिक लक्ष दिले जात आहे.
- अंतराळ तंत्रज्ञान आणि अणुऊर्जेचा विधायक वापर, या दोन्ही क्षेत्रांत भारताने मोठी झेप घेतली आहे.
- माहिती आणि संपर्क तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात भारताने जागतिक स्तरावर अग्रगण्य स्थान मिळविले असून 'ज्ञान चौपाल' म्हणजेच ग्रामीण ज्ञान केंद्रांची स्थापना 'प्रत्येक गावात एक ज्ञान केंद्र' या मोहिमेअंतर्गत केली जात आहे, त्यामुळे शहर आणि गाव यांच्यातील 'डिजिटल' दरी भरून काढणे संभव झाले आहे.

पण एवढी प्रगती झाली असली तरी,

तक्ता क्र. ७ : शहरे / नागरी वस्त्यांनिहाय भारतीय नागरी लोकसंख्या : १९९१ - ०१

शहरांचा/छोट्या नगरांचा दर्जा	शहरांची/छोट्या नगरांची संख्या		लोकसंख्या (दशलक्ष)		एकूण लोकसंख्येची टक्केवारी		शहरी भागातील लोकसंख्या वाढीचे वार्षिक प्रमाण
	१९९१	२००१	१९९१	२००१	१९९१	२००१	१९९१-०१
१००००० आणि जास्त	३००	४४१	१२२.३	१७८	५६.७	६२.३	३.८४
५०००० - ९९९९९	३४५	४९६	२८.८	३४	१३.३	१२.०	१.८१
२०००० - ४९९९९	९४७	१,३८८	३५.३	४२	१६.४	१४.७	१.७८
१०००० - १९९९९	१,१६७	१,५६१	२१.१	२३	९.८	७.९	०.६९
५००० - ९९९९	७४०	१,०४१	७.४	८	३.४	२.८	०.६४
पेक्षा कमी ५०००	१९७	२३४	०.९	१	०.५	०.३	-०.६६
सर्व दर्जांसाठी	३,६९६	५,१६१	२१५.८	२८६	१००	१००	२.८६

स्रोत - महानिबंधकाचे कार्यालय

७. निष्कर्ष :

भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीचा काळ आणि स्वातंत्र्यानंतरच्या काळात मानवी विकास निर्देशांकातील तफावत दाखवण्याचा प्रयत्न या लेखात करण्यात आला आहे. आंतरराष्ट्रीय सरासरीच्या तुलनेत साक्षरता (शिक्षण), आरोग्य (अर्भक मृत्युदर) स्त्री-पुरुष प्रमाण आणि नागरिकरण या सर्व मानवी विकास निर्देशांकात भारत बराच मागे आहे, भारतात आजही निरक्षरतेचे प्रमाण खूप अधिक आहे. अर्भक मृत्यूचे प्रमाण अधिक आहे, स्त्री-पुरुषांच्या संख्येत बरीच विषमता आहे, आणि नागरिकरणाचा वेग धिमा आहे.

स्वातंत्र्य मिळाले त्यावेळी स्त्री-पुरुष प्रमाण वगळता इतर सर्व निर्देशांकाची स्थिती खूपच भीषण होती हे लक्षात घेण्याची गरज आहे. साक्षरता, अर्भक मृत्युदर आणि अगदी स्त्री-पुरुष प्रमाण सुधारून उंच राखण्यासाठी प्रचंड सार्वजनिक आणि खाजगी निधीची आवश्यकता आहे. तथापि स्वातंत्र्याच्या नंतरच्या काळात लोकसंख्या दोन टक्के दराने वाढत असताना अतिशय खालच्या मानव विकास निर्देशांकांच्या स्थितीतून साक्षरता आणि अर्भक मृत्युदरात माफक सुधारणा करीत भारताने आजची स्थिती गाठली आहे. याचा संपूर्ण विचार करूनच या मानव विकास निर्देशांकांचे विश्लेषण व्हायला हवे. याचा अर्थ असा की, भारतातील मानव विकास लक्षणीय आहे.

तक्ता क्र. ८ राज्यनिहाय भारतातील नागरी लोकसंख्या, २००१

राज्ये	नागरी लोकसंख्या
जम्मु आणि काश्मिर	२४.९
हिमाचल प्रदेश	९.८
पंजाब	३४.०
उत्तरांचल	२५.६
हरीयाणा	२९.०
दिल्ली	९३.०
राजस्थान	२३.४
उत्तर प्रदेश	२०.८
बिहार	१०.५
आसाम	१२.७
वेस्ट बंगाल	२८.०
झारखंड	२२.३
ओरिसा	१५.०
छत्तीसगड	२०.१
मध्यप्रदेश	२६.७
गुजरात	३७.४
महाराष्ट्र	४२.४
आंध्रप्रदेश	२७.१
कर्नाटका	३४.०
केरळा	२६.०
तामिळनाडू	४३.९
भारत	२७.८

स्रोत - महानिबंधकाचे कार्यालय

साक्षरतेच्या बाबतीत स्वातंत्र्यानंतरच्या काळात वार्षिक सुधारणेचा दर स्वातंत्र्यापूर्वीच्या काळातील दरापेक्षा अधिक नाही. त्यामुळे केंद्र आणि राज्य शासनांच्या स्तरावर गेल्या जवळपास एका दशकाच्या काळात झालेली सुधारणा धुळीस मिळणार नाही याची खातरजमा करण्यासाठी अधिक आणि नेमके प्रयत्न आवश्यक आहेत. अर्भक मृत्युदरात घट झालेली दिसत असली तरी हा प्रश्नही तातडीचा प्रश्न समजून त्यावर उपाययोजना व्हायला हव्यात. भारताचा समृद्ध सांस्कृतिक वारसा आणि जागतिक स्तरावर भारतीय कुटुंब व्यवस्था तसेच भारतीय कौटुंबिक मूल्यांबद्दलच्या संकल्पना विचारात घेता, स्त्री-पुरुष प्रमाणातील विषमता मात्र लज्जास्पद आहे.

अनुवाद :- *कांचन चौधरी*

६. भारतातील नागरिकीकरणाचा कल

विकसनशील राष्ट्रांमधील नागरिकरणाचे सर्व घटक भारतातही पहायला मिळतात. नागरी समूह / नगरांची १९०१ मधील १८२७ ही संख्या २००१ साली ५१६१ पर्यंत पोहचली होती. १९०१ साली २३.८ कोटी असलेली लोकसंख्या २००१ साली. १०२.७ कोटींवर पोहचली होती. तर नागरी लोकसंख्या १९०१ मधील २.६ कोटींवरुन २००१ साली २८.६ कोटींवर पोहचली होती. भारतातील नागरिकरणाचा वेग विकासाच्या प्रमाणात धिमा आहे. २००१ सालच्या जणगणनेत भारताच्या एकूण १०२७ दशलक्ष लोकसंख्येतील २३८ दशलक्ष लोकसंख्या शहरांमध्ये वास्तव्याला असल्याची नोंद करण्यात आली आहे. तथापि नागरी क्षेत्रच विविध वर्गांत विभागण्यात आले आहे. ५००० लोकसंख्येपासून बहुलक्ष लोकसंख्येपर्यंत ही विभागणी आहे.

एकूण लोकसंख्या आणि शहरी लोकसंख्येची टक्केवारी, १९०१ ते २००१



अनेक विकसित राष्ट्रांच्या तुलनेत भारतातील नागरिकरणाचा वेग कमी आहे. नागरी लोकसंख्यावृद्धीचा सरासरी वेग पाहता १९२१-३१ ते १९५१ या कालावधीत नागरी लोकसंख्या सर्वाधिक झपाट्याने वाढली. १९५१-६१ या कालावधीत त्यात मोठी घसरण झाली. १९६१-७१ आणि १९७१-८१ या दशकांमध्ये नागरिकरणाच्या वेगात सुधारणा झाली. पण पुढे ती सध्याच्या २.८ टक्के दरावर स्थिर राहिली. १९५१-६१ या काळात झालेली घट प्रामुख्याने अनेक नागरी वस्त्या, नगरांच्या गटांतून वगळण्यात आल्याने झालेली दिसते.

तक्ता क्र. ६ नागरिकरणाचे निर्देशांक, १९०१-२००१

जनगणनेचे वर्ष	छोटी / मोठी शहरे	नागरी लोकसंख्या (दशकांमध्ये)	नागरी लोकसंख्या (टक्केवारी)	नागरिकरण वाढण्याचा वार्षिकयंत्र
१९०१	१८२७	२६	१०.८	-
१९११	१८१५	२६	१०.३	०.०३
१९२१	१९४९	२८	११.२	०.८०
१९३१	२०७२	३३	१२.०	१.७७
१९४१	२२५०	४४	१३.९	२.८१
१९५१	२८४३	६२	१७.३	३.५३
१९६१	२३६५	७९	१८.०	२.३७
१९७१	२५९०	१०९	१९.९	३.२९
१९८१	३३८७	१५९	२३.३	३.८७
१९९१	३६९६	२१६	२५.७	३.०८
२००१	५१६१	२८६	२७.८	२.८५

स्त्रोत - भारताच्या महानिबंधकाचे कार्यालय

ऐतिहासिक दृष्ट्या शहरे आर्थिक आणि सामाजिक विकासाची केंद्रे राहिली. २००१ साली जवळपास २८६ दशलक्ष भारतीय ५१५१ शहरें आणि नागरी वस्त्यांमध्ये वसले होते. एकूण लोकसंख्येच्या तुलनेत हा आकडा २८ टक्के आहे. १९५१ मधील ६२ दशलक्ष (१७%) लोकसंख्येच्या तुलनेत हा आकडा बराच मोठा आहे. भारतातील निम्म्याहून अधिक लोकसंख्या एक लाखापेत्रा अधिक लोकसंख्या असलेल्या प्रथम श्रेणीच्या शहरांमध्ये वास्तव्याला आहे. प्रथम श्रेणीतील शहरांमधील लोकसंख्यावृद्धीचा दरही १९९१-०१ या कालावधीत वार्षिक ३.८ एवढा उच्च राहिला आहे. याच कालावधीत छोट्या नगरांची ५००० हून कमी लोकसंख्या असलेल्या नगरांची लोकसंख्या मात्र कमी झाली आहे. (-०.७%)

घरं आणि आरोग्य संस्थामधील प्रसूतीच्या प्रमाणाची टक्केवारी





तक्ता क्र. ५ भारतीय राज्यांमधील स्त्री-पुरुष प्रमाण :

राज्य	स्त्री - पुरूष प्रमाण					
	१९०१	१९३१	१९५१	१९७१	१९९१	२००१
भारत	**९७२**	**९५०**	**९४६**	**९३०**	**९२७**	**९३३**
आंध्रप्रदेश	९८५	९८७	९८६	९७७	९७२	९७८
आसाम	९१९	८७४	८६८	८९६	९२३	९३२
बिहार	१,०६१	९९५	१,०००	९५७	९०७	९२१
छत्तीसगड	१,०४६	१,०४३	१,०२४	९९८	९८५	९९०
दिल्ली	८६२	७२२	७६८	८०१	८२७	८२१
गोवा	१,०९१	१,०८८	१,१२८	९८१	९६७	९६०
गुजरात	९५४	९४५	९५२	९३४	९३४	९२१
हरीयाणा	८६७	८४४	८७१	८६७	८६५	८६१
हीमाचल प्रदेश	८८४	८९७	९१२	९५८	९७६	९७०
जम्मु आणि काश्मिर	८८२	८६५	८७३	८७८	८९६	९००
झारखंड	१,०३२	९८९	९६१	९४५	९२२	९४१
कर्नाटका	९८३	९६५	९६६	९५७	९६०	९६४
केरळा	१,००४	१,०२२	१,०२८	१,०१६	१,०३६	१,०५८
मध्यप्रदेश	९७२	९४७	९४५	९२०	९१२	९२०
महाराष्ट्र	९७८	९४७	९४१	९३०	९३४	९२२
ओरिसा	१,०३७	१,०६७	१,०२२	९८८	९७१	९७२
पंजाब	८३२	८१५	८४४	८६५	८८२	८७४
राजस्थान	९०५	९०७	९२१	९११	९१०	९२२
तामिळनाडू	१,०४४	१,०२७	१,००७	९७८	९७४	९८६
उत्तर प्रदेश	९३८	९०३	९०८	८७६	८७६	८९८
उत्तरांचल	९१८	९१३	९४०	९४०	९३६	९६४
वेस्ट बंगाल	९४५	८९०	८६५	८९१	९१७	९३४

तक्ता क्र. ४ : कालखंडनिहाय अर्भक मृत्यूदर विकसीत आणि अविकसीत राष्ट्रांच्या तुलनेत भारताची स्थिती

वर्ष	जागतिक	विकसीत राष्ट्र	अविकसीत राष्ट्र	भारत
१९६०-६५	११८	३३	१३५	-
१९६५-७०	१०२	२६	११५	-
१९७०-७५	९३	२१	१०४	१३४
१९७५-८०	८७	१८	९८	१२४
१९८०-८५	७८	१	८७	१०४
१९८५-९०	६९	१३	७६	९१
१९९०-९५	६२	११	६८	७६
१९९५-००	-	-	-	७१
२०००-०४	-	-	-	६३

स्रोत - जागतिक लोकसंख्या आकडेवारी १९९६ पुर्नआढावा १९९८ समूहराष्ट्रे भारतासाठी नमुना नोंदणी प्रणाली, महानिबंधक

प्रस्तूतीचे स्थळ आणि आरोग्य : १९९९-२०००

गर्भातील बाळ, अर्भक आणि बालमृत्यूचे प्रमाण कमी करणे हे शासनाची एक उद्दिष्ट आहे. त्यासाठी शासनाने विकेंद्रित आरोग्य सुविधा उभारल्या आहेत आणि स्थानिक स्तरावर आरोग्य कर्मचारी पुरवले आहेत. (उदा. सहाय्यक परिचारिका, परिचारिका) ही मूलभूत सुविधा आणि आरोग्य कर्मचारी यांच्या माध्यमातून जन्मपूर्व काळजी आणि प्रसूतीशी निगडीत सवयींसह माता आणि बालकांचे आरोग्य सुधारणे अपेक्षित आहे. या मोठ्या उपक्रमाचे मूल्यमापन करणे कठीण आहे. तथापि त्यांचे अल्प मूल्यमापन नक्कीच करता येईल. उदाहरणार्थ, मुलांचा जन्म कोठे झाला या विषयीच्या माहितीचे विश्लेषण करून सुरक्षित प्रसूतीच्या सवयींबाबत मूल्यमापन करता येईल. दुसरे म्हणजे प्रसूतीवेळी तांत्रिकदृट्या प्रशिक्षित व्यक्तीचे सहाय्य / उपस्थिती लाभले अथवा नाही याबाबतची माहिती आरोग्य सेवेच्या स्थितीबद्दल अधिक प्रकाश टाकू शकेल. याविषयीची एनएफएचएस-२ आकडेवारीचे खाली विश्लेषण करण्यात आले आहे.

कोणीही अपेक्षा करेल की, प्रसूती प्रशिक्षित वैद्यकीय आणि परिचारिका कर्मचाऱ्यांची सेवा उपलब्ध असलेल्या दवाखान्यांमध्ये किंवा रुग्णालयांमध्येच व्हायला हवी. तथापि अंतर किंवा खर्च या दृष्टीनं संस्थात्मक सुविधा आजही अनेकांच्या आवाक्याबाहेर आहे. आकडेवारी सूचित करते की, प्रसूतीच्या ठिकाणाबाबत शहरी आणि ग्रामीण भागात बरीच तफावत आहे. शहरी भागांमध्ये प्रसूती प्रामुख्याने संस्थात्मक ठिकाणी, बव्हंशी खाजगी रुग्णालयांमध्येच होत असताना ग्रामीण भागांमध्ये मात्र प्रसूती प्रामुख्याने घरीच प्रशिक्षीत कर्मचाऱ्यांच्या अनुपस्थित होताहेत. ग्रामीण भागात जवळपास तीन चतुर्थांश बाळंतपणे घरीच केली जात असून त्यातील ८० टक्के प्रशिक्षित कर्मचाऱ्यांच्या अनुपस्थितीत केली जात आहेत. गेली पाच दशके किंवा त्याहून अधिक काळ सुरू असलेल्या या कार्यक्रमाचा प्रभाव फारसा दिसलेलाच नाही, कारण फक्त १० टक्क्यांहून कमी प्रसूती प्रशिक्षित कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत होत.आहेत. मुस्लीम महिलांच्या प्रसूतीचे चित्र तर शहरी भागातही भयावह आहे. वास्तविकता मुस्लीम महिलांच्या बाबतीत प्रशिक्षित आरोग्य कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीचे प्रमाण मागास महिलांपेक्षा कमी आहे. संस्थात्मक सुविधांचा कमी वापर होत असला तरी, ग्रामीण भागातही इतर मागासवर्गीय आणि नव्या पिढीतील काही घटकांमध्ये सुरक्षित प्रसूती करण्याचे प्रमाण अधिक आहे.

२००१ सालच्या जणगणनेनुसार संपूर्ण देशात एक हजार पुरुषांमागे ९३३ स्त्रिया आहेत. १९९१ सालच्या जणगणनेच्या तुलनेत ९२७ हा स्वागतार्ह बदल आहे. चित्र क्रमांक ३ मध्ये १९०१ सालापासून भारतातील स्त्री-पुरुष प्रमाण देण्यात आले आहे. भारतात हे प्रमाण कायम पुरुषांच्या बाजूने झुकणारे राहिलेले आहे. तथापि दीर्घ पल्ल्याचा विचार करता स्त्री-पुरुष प्रमाणात सातत्याने घटच होत आलेली आहे. त्यावरून भारतीय महिलांची खालावलेली स्थिती निदर्शनास येते. विसाव्या शतकाच्या प्रारंभी स्त्री-पुरुष प्रमाण ९७२ होते आणि त्यापश्चात १९४१ सालापर्यंत त्यात सातत्याने घट झालेली आहे. पुढील एका दशकात त्यात सुधारणा झाली खरी, पण पुढे १९७१ पर्यंत पुन्हा हे प्रमाण ९३० पर्यंत खाली आले. खरेतर १९६१-७१ या कालावधीत देशाने स्त्री-पुरुष प्रमाणात सर्वाधिक ११ ने घट झालेली पहिली. त्यानंतरच्या जनगणनांमध्ये हे प्रमाण सातत्याने ९३० च्या आसपास बदलत राहिले जगातील इतर मानवी लोकसंख्येतील स्तंर सर्वात मोठ्या घटकांमध्ये सर्वाधिक राहिला आहे. पुरुषांच्या तुलनेत भारतीय मुलींच्या मुत्यूचे प्रमाण अधिक असल्यानेच हा प्रकार घडत असल्याचे सांगितले जाते. मुलींच्या वाढीस मृत्यूदर लिंगभेद केला जात असल्यानेच आहे. असे मानले जाते, मुलींच्या अन्न आणि आरोग्य विषयक सुविधांकडे दुर्लक्ष केले जाण्याच्या प्रकाराला भारतात सर्वासाधारणपणे लिंगभेद असे संबोधले जाते. पुरुषांच्या तुलनेत महिलांचे प्रमाण कमी असल्याने भारतीय समाजात महिलांना गौरवस्थान असल्याचे स्पष्ट होते. हिमाचल प्रदेश, आसाम, जम्मू कश्मीर, केरळ, पंजाब आणि उत्तरांचलचा अपवाद वगळता इतर सर्व राज्यांमध्ये स्त्री-पुरुष प्रमाण कमी झालेले आहे.

विषुववृत्तावरील भारताच्या विशिष्ट स्थानामुळे आपल्या देशात नैसर्गिक स्थितीत वैविध्य आहे आणि परिणामी मृत्यूचे प्रमाण आणि आजारांचे प्रकारही जास्त आहेत. उन्हाळ्याचा दीर्घ कालावधी आणि प्रखर उष्मा तसेच शेतीसाठी मोसमी पावसावरील अवलंबित्व हे काही महत्त्वाचे नैसर्गिक घटक आहेत. पाऊस मोसमान्वये असमान विभागलेला असतो. कृषी चक्रावर त्याने विपरीत परिणाम होतो. परिणामी जलसाठे कोरडे पडल्याने भारताच्या अनेक भागांत वाळवंटातगत स्थिती उद्भवते, अशाप्रकारे नापिकीची शक्यता, पाण्याच दुर्भिक्ष आणि दुष्काळासारखी स्थिती अनेक प्रांतामध्ये निर्माण होते. १९०० सालापर्यंत जवळपास नियमित कालखंडानंतर दुष्काळांचा चटका देशाला बसला. बालविवाह, अल्पवयात गर्भधारणा आणि अस्वच्छ पद्धतीने बाळंतपण करण्याच्या पद्धतीमुळे आरोग्याची हेळसांड ही सामान्य बाब होती.

बालमृत्यूच्या दरातील घट १९०१ ते २००१



तथापि १९३१ सालानंतर अर्भक मृत्युदरात मोठी घसरण झाली. विसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या वैद्यकीय संशोधन आणि उपचार पद्धतींनी मलेरीयासारख्या रोगांचा प्रादुर्भाव कमी केला. माता आणि बालक लसीकरण कार्यक्रम, स्वच्छतेबाबात झालेली सुधारणा, ॲण्टी बायोटीक्स यामुळे अर्भक मृत्युदर कमी करण्यास पोषक वातावरण तयार झाले. त्या शिवाय जगभरात पोषण आहाराच्या बाबातीत झालेल्या सुधारणेमुळे आजारांचा प्रतिरोध करण्याची मानवी क्षमता वाढली. १९२० नंतरच्या दशकांत दुष्काळ निवारण्यासाठी अनुभवसिद्ध विकसित शासकीय यंत्रणा कामी आली. वेगाने वाढलेल्या रेल्वेच्या जाळ्यानेही जलद वाहतुकीच्या माध्यमातून अन्नधान्य साठवण्याचा प्रश्न सोडवण्यात सहाय्य केले. यासोबत काही प्रांतामध्ये सिंचन कालव्यांच्या जाळ्याने अन्न धान्य पुरवठ्यात स्थैर्य आणण्यात सहाय्य केले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे महिलांमध्ये साक्षरतेचे प्रमाण वाढणे हेदेखील अर्भक मृत्युदर घटण्यामागील महत्त्वाचे कारण आहे.

विवध राज्यांमधील अर्भक मृत्युदरात बरीच तफावत आहे, यांची नोंद घेणे आवश्यक आहे. उत्तर प्रदेश, बिहार, महाराष्ट्र, मध्य प्रदेश या मोठ्या राज्यांमध्ये आजही प्रती हजारी ७५ अर्भके दगावत आहेत, जागतिक सरासरीच्या तुलनेत हा दर खूप अधिक आहे.

तक्ता क्र. ३ मोठ्या राज्यांसाठी निवडक मानवी विकास निर्देशांक

राज्य	जन्माच्यावेळी अपेक्षित आयुर्मान (१९९९ - २००३)			अर्भक मृत्यूदर (प्रती हजारी जन्मांमागे) - २००५		
	पुरूष	स्त्री	एकूण	पुरूष	स्त्री	एकूण
आंध्रप्रदेश	६२.२	६४.८	६३.७	५६.०	५८.०	५७.०
आसाम	५७.८	५८.३	५८.०	६६.०	६९.०	६८.०
बिहार	६१.६	५९.७	६१.०	६०.०	६२.०	६१.०
गुजरात	६२.५	६४.६	६३.५	५२.०	५५.०	५४.०
हरियाणा	६५.०	६५.६	६५.४	५१.०	७०.०	६०.०
कर्नाटक	६२.९	६६.४	६४.६	४८.०	५१.०	५०.०
केरळ	७०.९	७६.०	७३.६	१४.०	१५.०	१४.०
मध्यप्रदेश	५७.२	५६.९	५७.१	७२.०	७९.०	७६.०
महाराष्ट्र	६५.२	६७.६	६६.४	३४.०	३७.०	३६.०
ओरीसा	५८.६	५८.७	५८.७	७४.०	७७.०	७५.०
पंजाब	६७.६	६९.६	६८.६	४१.०	४८.०	४४.०
राजस्थान	६०.७	६१.८	६१.३	६४.०	७२.०	६८.०
तामिळनाडू	६४.३	६६.५	६५.४	३५.०	३९.०	३७.०
उत्तरप्रदेश	५९.६	५८.७	५९.३	७१.०	७५.०	७३.०
पश्चिम बंगाल	६३.५	६५.०	६४.१	३८.०	३९.०	३८.०
भारत	६१.८	६३.५	६२.७	५६.०	६१.०	५८.०

स्त्रोत - भारताच्या महानिबंधकाचे कार्यालय केंद्रीय गृहखाते

तक्ता क्र. २ वरुन

राज्य	साक्षरतेचे प्रमाण २००१ %			साक्षरतेचे प्रमाण १९९१ टक्के	१९९१-०१ या
भारत	व्यक्ती	स्त्री-पुरूष यांच्यातील तफावत (%)	ग्रामीण व शहरी यांच्यातील तफावत	प्रमाण १९९१ (टक्के)	काळात साक्षरतेच्या प्रमाणात झालेला बदल (%)
ओरीसा	६३.६	३२.९	२६.०	४९.१	१४.५
पंजाब	७०.०	१६.०	१८.२	५८.५	११.५
राजस्थान	६१.०	४२.०	२७.४	३८.६	२२.५
तामीळनाडू	७३.५	२१.६	१९.८	६२.७	१०.८
उत्तर प्रदेश	५७.४	३८.८	२४.७	४०.७	१६.७
उत्तरांचल	७२.३	२८.३	१६.४	५७.८	१४.५
वेस्ट बंगाल	६९.२	२२.४	२१.९	५७.७	११.५
सी.वी	१४.९	--	--	**२४.१**	--

स्त्रोत जनगणना २००१ :

शेवटचा दु:खदायक घटक म्हणजे विविध सामाजिक-धार्मिक गटांमधील साक्षरतेचे प्रमाण आणि शैक्षणिक स्तरातील फरक आकडेवारीवरून फरकाचे प्रमाण प्रचंड असल्याचे आणि अनुसूचित जाती जमाती तसेच मुस्लिमांमध्ये मुलांचे शाळेत जाण्याचे प्रमाण अत्यंत कमी असल्याचे दिसते. शिक्षणातील तफावतीचे हे प्रमाण शिक्षणाचा दर्जा जसजसा उंचावत जातो, तसतसे वाढत जाते. उदाहरणार्थ, पदवी स्तरावर या समाजांचे प्रतिनिधीत्व नगण्य आहे.

विद्यमान नावनोंदणी दर



वीस वर्षांवरील पदवीधरांचे प्रमाण - २००५ - ०६



४. आरोग्यविषयक संक्रमण : अर्भक मृत्यूदर

भारतीय नागरिकांच्या आरोग्यविषयक स्थितीची सध्या खूपच हेळसांड सुरू आहे. कोणताही देश किंवा देशातील कोणत्याही प्रांतातील आरोग्य विषयक स्थितीचे ढोबळ दर्शन घडवणारे एक मोजमाप म्हणजे अर्भक मृत्यूदर संदर्भाधीन वर्षात प्रति हजारी जन्मांमागे हे प्रमाण मोजले जाते. विसाव्या शतकाच्या प्रारंभी अर्भक मृत्युदर खूप जास्त होता. उदा. १९११ मध्ये तो दर २०० होता. त्याचाच अर्थ असा की, प्रत्येक १००० जन्मांपैकी २०० बालके वयाचे एक वर्ष पूर्ण करण्याआधीच गतप्राण होत होती. अर्भक मृत्युदर १९२० सालापासून सातत्याने कमी होत आला आहे. १९७१ पश्चात त्यात वेगाने घट झाली आहे. मात्र २००१ सालीदेखील अखिल भारतीय पातळीवर अर्भकमृत्युदर ६० पर्यंत होता, जगातील सर्वाधिक प्रमाणातच त्याचा समावेश होतो. वास्तविक स्वातंत्र्य पूर्व भारतात उच्च अर्भक मृत्युदर हे भारतीय समाजाचे एक लक्षणच बनले होते.

साक्षरतेचे प्रमाण ६५ टक्क्यांपर्यंत आणण्यात सार्वजनिक प्रयत्नांचे एक शतक जावे लागले आहे. तथापि त्याहून अधिक महत्त्वाचे म्हणजे आजही देशातील ३५ टक्के जनता निरक्षर आहे. निरक्षरांची नेमकी आकडेवारी पाहिल्यावर त्यात बहुतांश महिला आहेत, हे सहज ध्यानी येते. १९७१ किंवा त्या आसपासपर्यंत १९४ दशलक्ष महिला निरक्षर होत्या. त्यावेळच्या १११ दशलक्ष निरक्षर पुरूषांच्या तुलनेत तो आकडा खूपच मोठा होता. जगातील कोणत्याही राष्ट्रापेक्षा भारतात निरक्षरांची संख्या अधिक आहे, अधिक आहे, हे देशाचे दुर्दैवच म्हणावे लागेल. भारत जगातील सर्वात मोठा प्रशिक्षित, शिक्षित कामगारांचा पुरवठादार असल्याची आजची वल्गना त्यामुळेच चुकीचा दिशानिर्देश करणारी आणि शासकीय स्तरावर गुंतागुंत निर्माण करणारी ठरेल. त्यासाठी भारतातील साक्षरता आणि शैक्षणिक संक्रमणाचे योग्य विश्लेषण व्हायला हवे आणि ते अचूकपणे समजून घ्यायला हवे, अन्यथा आणखी काही दशके आपण जगातील सर्वाधिक निरक्षरांचा समाज म्हणून गणले जाऊ.

त्यापुढे याचीही नोंद घेणे आवश्यक आहे की, भारतातील विविध राज्ये आणि प्रांतामध्ये शैक्षणिक तफावत प्रचंड आहे. ९१ टक्के साक्षरता असलेले केरळ राज्य किमान स्त्री-पुरुष असमानतेसह एक अपवाद ठरले असले तरी, साक्षरतेच्या बाबतीतील दुसऱ्या क्रमांकावरील राज्यात साक्षरता ७७ टक्क्यांपर्यंत खाली आहे. बिहार सर्वाधिक कमी ४८ टक्के साक्षरता असलेले राज्य आहे. केरळची अपवादात्मक स्थिती बाजूला सारली तरी दुसऱ्या सर्वाधिक साक्षर आणि सर्वात कमी साक्षर राज्यांमध्ये २९ टक्क्यांचा फरक आहे. चांगले उत्पन्न असलेल्या राज्यांमध्ये साक्षरतेचे प्रमाण अधिक आहे, असे म्हणणे चुकीचे आहे. कारण केरळ केवळ एक मध्यम उत्पन्न असलेले राज्य आहे आर्थिक उन्नतीबाबत काहीसे मागे असलेल्या हिमाचल प्रदेश आणि उत्तरांचल राज्यांमध्ये राष्ट्रीय सरासरीपेक्षा साक्षरतेचे प्रमाण अधिक आहे. त्यातून प्रामुख्याने साक्षरतेच्या प्रसारात आर्थिक घटकापेक्षा सामाजिक घटक अधिक महत्त्वाचा असल्याचे स्पष्ट होते.

दुसरी दु:खदायक बाब म्हणजे स्त्री-पुरुषांच्या प्रमाणातील तफावत. अखिल भारतीय स्तरावर ही तफावत २९ टक्के आहे, तर बिहार, झारखंड आणि राज्यस्थान या राज्यांमध्ये त्याचे प्रमाण ४० टक्क्यांहून अधिक आहे. तिसरी दु:खदायक बाब म्हणजे साक्षरतेच्या प्रमाणात ग्रामीण-शहरी भागातील फरक. आज या तफावतीचे प्रमाण २७ टक्के आहे. शहरी भागांतील साक्षरतेचे प्रमाण अधिक आहे. तथापि राज्या-राज्यांमधील तफावत काही वर्षांच्या काळात कमी झालेली आहे.

तक्ता क्र. २

राज्य	साक्षरतेचे प्रमाण २००१ %			साक्षरतेचे प्रमाण १९९१ टक्के	१९९१-०१ या
भारत	व्यक्ती	स्त्री-पुरूष यांच्यातील तफावत (%)	ग्रामीण व शहरी यांच्यातील तफावत	प्रमाण १९९१ (टक्के)	काळात साक्षरतेच्या प्रमाणात झालेला बदल (%)
भारत	६५.४	२८.५	२६.५	५१.६	१३.८
आंध्रप्रदेश	६१.१	२७.८	२८.४	४४.१	१७.०
आसाम	६४.३	२२.१	३०.०	५२.९	११.५
बिहार	४७.५	४४.३	३८.९	३७.५	१०.०
छत्तीसगड	६५.२	३२.७	२४.९	४२.९	२२.३
दिल्ली	८१.८	१४.२	४.७	७५.३	६.५
गुजरात	७०.०	२७.२	२५.१	६१.३	८.७
हरीयाणा	६८.६	२८.९	२०.२	५५.९	१२.७
हीमाचल प्रदेश	७७.१	२०.९	१५.६	६३.९	१३.३
जम्मु आणि काश्मिर	५४.५	३६.४	३०.८		
झारखंड	५४.१	४२.०	४२.२	४१.४	१२.७
कर्नाटक	६७.०	२४.७	२६.४	५६.०	११.०
केरळा	९०.९	६.७	३.४	८९.८	१.१
मध्यप्रदेश	६४.१	३४.५	२७.२	४४.७	१९.४
महाराष्ट्र	७७.३	२१.७	१७.७	६४.९	१२.४

व्यवस्थेला शिस्त लावली. विद्यापीठांची फेररचना आणि फेरस्थापना करण्यात आली. १९१७ मध्ये शासनाने कलकत्ता विद्यापीठाची स्थिती आणि भविष्यातील वाटचाल यांची चौकशी करण्यासाठी सॅडलर आयोगाची स्थापना केली होती. प्रत्यक्षात आयोगाच्या कामाची व्याप्ती राष्ट्रीय स्तरावरील होती. वाराणसीत १९१८ मध्ये बनारस हिंदू विद्यापीठ या नावाने तर अलीगडमध्ये अलीगड मुस्लीम विद्यापीठ या नावाने १९२० मध्ये आणखी एक विद्यापीठ स्थापन झाले, त्यासह शैक्षणिक संस्थांचे जाळे उभे रहायला लागले. तथापि या विद्यापीठांची स्थापना अनुक्रमे हिंदू आणि मुस्लीम समुदायांमधील प्रभावी व्यक्तींना खूश करण्यासाठीच करण्यात आली होती. नावांवरूनच एकप्रकारचा ठसा या विद्यापीठांवर पडलेला दिसत होता आणि आज स्वातंत्र्यानंतर साठ वर्षानंतरही ती विद्यापीठे तो ठसा कायम बाळगून आहेत.

पहिल्या महायुद्धानंतर १९२१ मध्ये नवीन भारतीय राज्यघटना आली. त्यातून शिक्षणाचा विषय पूर्णपणे भारतीय नियंत्रणाखाली आणला गेला आणि प्रांतिक सरकारांवर शिक्षणाची सारी भीस्त सोपवण्यात आली. पण नवीन राज्यघटना भारतीय राष्ट्रीय काँग्रेसला अपुरी वाटत होती. त्या निषेधार्थ महात्मा गांधी यांनी असहकार चळवळ आरंभली आणि इंग्लिश संस्था आणि उत्पादनांवर बहिष्कार टाकण्याचं आवाहन त्यांनी केले. संपूर्ण देशात राष्ट्रीय विद्यालये स्थापना करण्यात आली आणि निवडक ठिकाणी राष्ट्रीय विद्यापीठांचीही स्थापना करण्यात आली. काँग्रेसचा स्वराज्यासाठीचा लढा अधिक तीव्र बनला आणि त्यासोबतच राष्ट्रीय गरजांनुरूप शिक्षण पद्धती अंगिकरणाच्या मागणीसाठी उभी राहिलेली चळवळही विस्तारली. भारत सरकारच्या १९३५ सालच्या कायद्याने प्रांतांची स्थिती भक्कम केली. त्यावेळी काँग्रेसच सत्तेवर होती. प्रांतिक सरकारच्या विकासात्मक कार्यक्रमात प्राथमिक व्यावसायिक, प्रौढ शिक्षणाचा समावेश होता. त्यात मुली तसेच मागास घटकांच्या शिक्षणावर भरही देण्यात आला होता. इंग्रजीचे महत्त्व कमी करण्यात आले होते आणि अभ्यासाचे विषय आणि शिक्षणाचे माध्यम म्हणून भारतीय भाषांना अधिक महत्त्व प्राप्त झाले होते.

गांधीजींची मूलभूत शिक्षणाची संकल्पना ही याच काळात अमलात आणली गेली. गांधीजींची ही संकल्पना म्हणजे शिक्षणाला केवळ पुस्तकी आणि शाब्दिक स्वरुपाच्या पद्धतीतून सोडवून शाळेतील प्रत्येक विषय काहीतरी व्यक्तिगत स्वरुपाच्या निर्मितीक्षम कलेच्या माध्यमातून शिकवणे होय. जनतेस राजकीय जागृती आल्यानंतर माध्यमिक शिक्षणाची सर्वसाधारण मागणी वाढीस लागली. ग्रामीण, अर्धनागरी आणि कमी विकसित समुदायांमध्येही शाळा स्थापन झाल्या. त्याखेरीज मुलींसाठीही शाळा सुरू झाल्या. प्रांतिक सरकारांनी तंत्रशिक्षण, वाणिज्य आणि कृषी विद्यालये सुरू केल्यावर पर्याची आणि व्यावसायिक शिक्षणासाठीही तरतूद व्हायला लागली आणि प्रांतिक सरकारे अपरंपरागत शिक्षण देणाऱ्या संस्थांना अधिक अनुदाने द्यायला लागले तथापि निधी व प्रशिक्षित शिक्षकांच्या अभावी अपेक्षित परिणाम साध्य झाले नाहीत. याच कालखंडात मुलींच्या शिक्षणाबाबतचे पूर्वग्रहदेखील नाहीसे होत गेले गांधीजींनी सुरू केलेल्या राष्ट्रीय चळवळीतून या विचारप्रवाहाला चालना मिळाली. हजारो महिला या काळात घराबाहेर पडून राष्ट्रीय कर्तव्यासाठी बलिदान द्यायला पुढे आल्या. त्यासोबत मुलींनी शिक्षण घेणे म्हणजे आईने आणि त्यापुढे तिच्या मुलांनी शिक्षण घेण्यासारखे आहे, या वास्तवाची जाणीवही प्रथम या काळात झाली. १९२१ ते १९४६-४७ या कालखंडात मुलींसाठीच्या शैक्षणिक संस्थांची संख्या दुपटीनं वाढली.

३. शैक्षणिक संक्रमण : अनुभवाचा पुरावा

१९०१ पासून साक्षरतेतील पातळी आणि लैंगिक तफावत भारतीय जणगणना हा साक्षरतेची आकडेवारी देणारा एकमेव स्त्रोत आहे. भारतात जणगणना १८८१ सालापासून केली जात असली तरी साक्षरतेसंबंधी आकडेवारी १९०१ पासूनच उपलब्ध आहे. कोणाच्याही सहज लक्षात येईल की, १९३१ मध्ये प्रत्येक १०० भारतीयांमध्ये केवळ ५ साक्षर होते. हे प्रमाण १९३१ पर्यंत १० टक्क्यांवर आणि १९५१ मध्ये १८ टक्क्यांवर गेले आणखी पन्नास वर्षे गेल्यानंतर २००१ मध्ये साक्षरतेचे प्रमाण १८ टक्क्यांच्या प्रामाणहुन ६५.४ टक्क्यांवर गेले. प्रारंभीच्या काळात स्त्री-पुरूषांमधील साक्षरतेच्या प्रमाणात खूप तफावत होती. परिणामी स्त्रियांच्या साक्षरतेच्या प्रमाणातील वाढ काहीशी प्रभावशालीच आहे. स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण १९५१ मधील नगण्य ८.९ टक्क्यांहून २००१ सालापार्यंत ५४.३ टक्क्यांवर पोहोचले, जवळपास सहापटीने वाढ, याच कालावधीत पुरूषांच्या साक्षरतेचे प्रमाण मात्र जेमतेम साडेतीन पटीने वाढले.

तक्ता क्र. १ स्वातंत्र्यापूर्व आणि पश्चात कालावधीतील स्त्री पुरूषांमधील साक्षरतेच्या प्रमाणातील वाढ

	पुरूष	महिने	व्यक्ती
१९०१ - ५१ या काळातील टक्केवारीतील वाढ	१७.४	८.३	१३.०
१९०१ - ५१ या काळातील सरासरी वार्षिक वाढ	३.५	२७.५	४.९
१९५१ - २००१ या काळातील टक्केवारीतील वाढ	४८.७	४५.३	४७.१
१९५१ - २००१ या काळातील सरासरी वार्षिक वाढ	३.६	१०.२	५.१

नोकरशाही चालवणारे प्यादे तेवढे हवे होते. त्यामुळे स्थानिकांमधील अगदी मोजक्या उच्चवर्णियांना आपल्या धन्याच्या हितासाठीच काम करणाऱ्या नोकरशाहीच्या विशिष्ट वर्गात स्थान मिळाले. उच्च शिक्षण घेतलेले मोजके सर्व यंत्रणा हाताळत होते. उर्वरित भारतीयांना शिक्षणाची संधी देणं आर्थिक आणि राजकीय दृष्ट्या गरजेचं नव्हतं आणि आपले साम्राज्य कायम राखण्यासाठी किंवा नैसर्गिक साधन संपत्तीची लूट करण्यासाठीही ते गरजेचं नव्हतं. १८५४ मध्ये प्रथम ब्रिटिश सत्ताधाऱ्यांनी शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून प्राथमिक शिक्षणापासून विद्यापीठां पर्यंतची यंत्रणा स्थापन केली. शिक्षण प्रशिक्षण संस्थाचाही त्यात समावेश होता. ब्रिटिश साम्राज्याचे क्षेत्र विस्तारत गेल्याने शासकीय कर्मचाऱ्यांची वाढीव गरज भागवण्यासाठी हे केलं गेलं. दुसरे म्हणजे कनिष्ठ स्तरातील शासकीय कर्मचारी जे गुलामांच्या पद्धतीने काम करीत होते, आणि तुटपुंज्या वेतनावर होते. त्यांना प्रशिक्षण देण्याचीही गरज निर्माण झाली होती.

तथापि, शैक्षणिक व्यवस्थेसाठी आर्थिक तरतूद पूर्णत: स्थानिक राज्यकर्त्यांची शिक्षण आवड आणि मानवतावादी प्रवृत्तीवर अवलंबून आणि त्यांच्या आर्थिक कुवतीच्या मर्यादेत होती. ब्रिटिश साम्राज्य काळातही काही भारतीय भूभागांवर महाराजांचे शासन होते. उदा. त्रावणकोर, मैसूर, हैदराबाद, वडोदरा, ग्वाल्हेर वगैरे. या राजसत्तांच्या राजधान्या त्या काळात शैक्षणिक सुविधांच्या केंद्रं बनल्या होत्या आणि त्या आसपासच्या परिसरातल्या लोकांना त्याद्वारे शिक्षणाची सुविधा उपलब्ध होती. ब्रिटिशांनी त्यांच्या सत्तेची केंद्रस्थाने असलेल्या कोलकत्ता, मद्रास, मुंबई आणि दिल्ली यासारख्या शहरांमध्ये आणि त्या आसपासच्या परिसरांमध्ये शैक्षणिक संस्था पुरस्कृत केल्या. कँटोनमेंट बोर्डस स्थापन करण्यात आलेल्या शहरांनी आणि नगरांनी प्रामुख्याने तिथली स्वच्छता, साफसफाई राखण्यासाठी मुस्लीम आणि दलीतांना आकर्षित केले. त्यांच्याखेरीज मासे आणि मांस यासारख्या खाद्यपदार्थांच्या पुरवठ्याच्या व्यवसायानेही मुस्लिमांना या भागात आकर्षित केले. त्यावेळच्या शहरांमध्ये आणि नगरांमध्ये उपलब्ध सुविधांमुळे शिक्षणाची संधी उपलब्ध झाली होती. तथापि उच्चवर्णीय जे ब्रिटिश सत्ताधारी आणि स्थानिक राज्यकर्त्यांच्याही जवळ होते, अधिकार म्हणून त्यांना शैक्षणिक सुविधा प्राधान्यक्रमाने मिळत होत्या.

हिंदू धर्मव्यवस्थेतील चातुर्वर्ण व्यवस्थेत ब्राह्मणांसह सर्व उच्चवर्णियांना अधिकार आणि उपलब्धता यो दोन्ही बाबतीत कायम प्राधान्य मिळाले, पण स्वातंत्र्यपूर्व काळात व्यवस्थेबाहेर गणले जाणारे दलित, आदिवासी आणि गैरहिंदूंच्या शैक्षणिक अवहेलनेकडे फारसे लक्ष दिले गेले नाही. स्वातंत्र्यापूर्वी भारतात साक्षरतेचे प्रमाण खूप कमी होते. त्यावरुन सर्व धर्मियांमधील केवळ उच्चवर्णीयांनाच शैक्षणिक विकासाच्या संधी उपलब्ध होत्या हे स्पष्ट होते. मुस्लिमांमध्ये केवळ पुढारलेले उच्चवर्णीयच, सत्ताधारी वर्गाला जवळ असलेलेच आणि उच्च नोकरशाहीतील घटक असलेल्यांना बहुतांश संधी मिळाल्या. या काळात देशभरात केवळ केरळ राज्यात साक्षरतेबाबत सुधारणा निदर्शनास आली. त्यावरुन असे दिसते की, ख्रिश्चन मिशनऱ्यांची शिक्षण व्यवस्था फक्त ख्रिश्चनांपर्यंत मर्यादित नव्हती तर ती हिंदू आणि मुस्लीम धर्मियांसाठीही खुली होती.

स्वातंत्र्यापूर्व आणि स्वातंत्र्यपश्चात कालावधीतील मानवी विकास :

स्वातंत्र्यपूर्व काळातील आणि स्वातंत्र्यानंतरच्या काळातील भारतातील मानवी विकासाची तुलना करण्याच्या दृष्टीनं आवश्यक आकडेवारी मर्यादित आहे. केवळ साक्षरता, अर्भक मृत्यूदर, लैंगिक प्रमाण याबाबतची आकडेवारी खाली नमूद करण्यात आली आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळातील शैक्षणिक चळवळीचा संक्षिप्त इतिहास :

एकोणीसाव्या शतकात राष्ट्रवादाच्या उदयानंतरच ब्रिटिशांनी उपलब्ध करुन दिलेल्या शिक्षण व्यवस्थेतील पाश्चात्य पद्धतीच्या वरचष्ठावर भारतीय टीका करायला लागले आणि भारतीय भाषा आणि संस्कृतीवर अधिक भर देण्याची मागणी करु लागले. उदाहरणार्थ भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आणि अनेक मुस्लीम संघटनांनी ब्रिटिश शिक्षण व्यवस्थेविरुद्ध आवाज उठवला. अखेरीस व्हॉईसरॉय बॅरन कर्झन यांनी (१८९८) भारतातील शिक्षण व्यवस्था सुधारण्यासाठी पुढाकार घेतला. त्यांनी नोंद केली की त्याकाळी चार पैकी तीन गावांमध्ये शाळा नव्हत्या, चार पैकी तीन मुले कोणत्याही शिक्षणाशिवाय मोठी होत होती. तर चाळीसपैकी केवळ एक मुलगी शाळेत जात होती. त्यांनीच सर्वप्रथम निवडक प्रकारच्या शाळा खाजगी संस्थापुढे आदर्श ठेवण्यासाठी काही निवडक शिक्षण संस्था सार्वजनिक निधी देण्याची गरज ओळखली. त्यांनीच खाजगी शाळांवर शासकीय नियंत्रण ठेवण्याचे धोरण पुढे आणले. शिक्षित भारतीयांनी त्याबद्दल तीव्र नापसंती व्यक्त केली

भारतातील उच्च शिक्षणात सुस्थिती आणण्यासाठी कर्झन यांच्याच अधिपत्याखाली १९०२ मध्ये भारतीय विद्यापीठ आयोगाची स्थापना करण्यात आली होती. भारतीय बुद्धिवाद्यांनी उच्च शिक्षण संस्था स्थापन करण्याच्या भारतीयांच्या अधिकारांवर गदा आणण्याचा प्रकार म्हणून त्याकडे पाहिले. हा वाद शैक्षणिक मुद्यांपेक्षा विकेंद्रीकरणाच्या राजकीय मतप्रवाहावरच केंद्रित झालेला होता स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे, हा मंत्र भारतीयांना देणारे बाळ गंगाधर टिळक ही त्यात सहभागी झाले होते.

राष्ट्रीय शिक्षणासाठीची पहिली राष्ट्रीय चळवळ, स्वातंत्र्य आणि परकीय वस्तूंवर बहिष्काराची हाक देणाऱ्या स्वदेशी चळवळीचा भाग बनली. शिक्षणाची राष्ट्रीय यंत्रणा उभारण्याची वेळ येऊन ठेपली असल्याचा ठराव काँग्रेसच्या कलकत्ता अधिवेशनात (१९०६) मंजूर झाल्याने या चळवळीला मोठा हातभार लागला. कलकत्यातील शैक्षणिक चळवळ मोडकळली, पण इतरत्र मात्र चळवळीचा परिणाम जाणवत होता. रवींद्रनाथ टागोर यांनी १९०१ मध्ये पश्चिम बंगालमधील बोलपूरजवळ त्यांची प्रख्यात शाळा सुरू केली. आर्यप्रतिनिधी सभेने वृंदावन आणि हरिद्वार येथे गुरूकुल सुरू केले. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आणि मुस्लीम लीगने त्यांच्या अनुक्रमे अलाहाबाद आणि नागपूर इथल्या अधिवेशनांमध्ये मुक्त आणि अनिवार्य प्राथमिक शिक्षणाचा ठराव मंजूर केला.

तथापि कर्झन यांच्या प्रयत्नांनी शिक्षण

गत शतकातील निवडक मानवी विकास निर्देशांकांचा कल

✦ अबुसालेन शरीफ

१. प्रस्तावना :

काळजीपूर्वक भारताचं वर्णन अनेकदा ब्रिटिश साम्राज्याच्या शिरपेचातील तुरा असं केलं जातं. भारताची प्रचंड व्याप्ती, विपुल नैसर्गिक साधनसंपत्ती आणि प्रचंड मनुष्यबळ खरोखरच ब्रिटिशांच्या ताब्यातील एकोणीसाव्या आणि विसाव्या शतकातील बहुतांश कालखंडातील सर्वात मौल्यवान बाब होती. तथापि ऑगस्ट १९४७ मधील फाळणीत भारतानं केवळ २१ टक्के भूभागच ८९.५ वर्ग किलोमीटर गमावला नाही तर ७६ दशलक्ष लोकसंख्यादेखील गमावली, सुमारे १७ टक्के लोकसंख्या. असा आरोप केला जातो की, फाळणीमुळे झालेल्या लोकसंख्येच्या विस्थापनामुळे भारताच्या बाजूच्या लोकसंख्येचं मनुष्यबळ स्वरूप विस्कळीत केले, त्याचाच परिणाम म्हणून आजघडीला भारतात विविध सामाजिक धार्मिक घटकांच्या निर्देशांकामध्ये कमालीची तफावत दिसते. तथापि या मतप्रवाहाला तशी राजमान्यता कमीच आहे. १९५१ पर्यंत जवळपास १५ दशलक्ष स्थलांतरीत भारतात आले होते तर त्याच कालखंडात १७ दशलक्ष नागरिक देशाबाहेर गेले होते. साधारणपणे निर्वासितांचे लोंढे सीमा भागात बाहेर गेलेल्यांनी रिकाम्या केलेल्या जागांवर आणि मोठ्या शहरांमध्ये आले. या स्थलांतराचे प्रमाण राज्यनिहाय वेगवेगळे होते आणि सीमावर्ती राज्यांमध्ये जाणाऱ्यांची आणि येणाऱ्यांची संख्या मोठी होती. या जाणाऱ्या येणाऱ्यांमध्ये लैंगिक, शैक्षणिक आणि व्यावसायिक पात्रता याबाबतीत भिन्नता होती. त्यात पुरुष शिक्षित आणि गैरकृषी क्षेत्रातील व्यावसाईकांचे प्रमाण अधिक होते. पूर्वी सीमेच्या तुलनेत पश्चिमी सीमेवर स्थलांतराचे प्रमाण अधिक होते. भारताच्या बाबतीत बाहेर जाणाऱ्यामध्ये मुस्लिमांची संख्या अधिक होती. (भारतीय पंजाबी मुसलमानांचे प्रमाण १९३१ मधील ३२ टक्क्यांवरुन १९५१ मध्ये १.८ टक्क्यांवर गेले होते) बाहेर गेलेल्यांमध्ये तुलनेत अधिक लैंगिक संतुलन, कमी शेतमजूर आणि किंचित अधिक शिक्षित होते. उलटपक्षी पाकिस्तानी पंजाबातील जवळपास सर्व शीख आणि हिंदू भारतात आले आणि त्यांचे प्रमाण २२ टक्क्यांवरुन ०.२ टक्क्यांवर आले. (भारद्वाज ख्वाजा आणि मियां, २००७ ब्रिटिश भारताची फाळणी लैंगिक भेद, शिक्षण आणि व्यवसायावरील परिणाम (हारवर्ड विद्यापीठ दक्षिण आशियाई पुढाकार)

खासकरुन बाहेर जाणाऱ्यांसाठी अंतर हा महत्त्वाचा घटक होता त्यामुळे भारत आणि पाकिस्तान (सध्याच्या बांग्लादेशासह) यांच्यात लोकसंख्येचे जे काही स्थलांतर झाले. त्यातील बहुतांश नवीन राष्ट्रांना स्वतंत्र करणाऱ्या सीमांपासून ५० किलोमीटरच्या अंतरातच स्थिरावले. भारतातून बाहेर जाणाऱ्यांमध्ये तसे सर्व देशभरातील मुसलमान होते. पण दिल्ली (०.४५ दशलक्ष बाहेर गेले तर ०.५ दशलक्ष आले) गुरगाव आणि हैदराबाद यासारख्या शहरांमधील छोट्या समूहांचा त्यात समावेश होता. त्यामुळे भारताच्या उर्वरित भागातून बाहेर पडलेल्यांनी ते जेथे स्थलांतरित झाले तिथले मानवी निर्देशांक बदलले नाहीत, त्यातील बहुतांश पाकिस्तानात कराचीसारख्या निश्चित भागात गेले. उदाहरणार्थ भारताच्या विविध भागातील जवळपास ६ लाख स्थलांतरित कराचीत विसावले आणि त्यातील बहुतांश शिक्षणाचा स्तर उच्च होता. त्यामुळेच आजघडीला कराचीतील शिक्षणाचा दर्जा आज उंचावलेला दिसतो, तथापि त्यांच्या भारतातून जाण्याने इथल्या शैक्षणिक आणि व्यावसायिक पातळीत फारसा फरक पडला नाही, कारण शिक्षणाचा इथला व्यापक प्रसार आणि स्थानिक लोकसंखेच्या तुलनेत स्थलांतरित झालेल्यांचे अल्प प्रमाण. ब्रिटिश सत्तेचं प्रखर अस्तित्व असताना स्वातंत्र्यपूर्व भारतात राजे आणि स्थानिक प्रमुखच त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांतर्गत शासन करीत होते. सर्व स्थानिक राज्यकर्त्यांना ब्रिटिश सत्ताधाऱ्यांच्या हाताखाली काम करावे लागत होते आणि त्यांना आर्थिक सहाय्यही करावे लागत होते. हे वास्तव त्यावेळच्या सर्व भारतीयांना बांधणारा धागा होता आजच्या सार्वभौम रचनेप्रमाणे जेथे राज्यसरकारांना केंद्र सरकारकडून अर्थसंकल्पीय निधी आणि पैसा मिळतो, त्या काळात पैशाचा हा प्रवास उलट होता. देशाला बांधून ठेवणारा ब्रिटिश काळातील दुसरा घटक म्हणजे मजबूत प्रशासकीय रचना आणि अधिकारपदांची सांखळी आणि तत्कालीन रेल्वेचं जाळं.

२. मानव विकास निर्देशांक :

मानवी विकास निर्देशांकात विशेषत: प्राथमिक आणि त्यापुढील शिक्षणासाठी तरतूद करण्याला ब्रिटिश भारतात सर्वात खालचा प्राधान्यक्रम होता. भारतावर ब्रिटिशांचे दोन शतकांहून अधिक काळ शासन होते आणि ब्रिटिश साम्राज्य विस्तारत असताना स्थानिक प्राथमिक शिक्षणाला अजिबात महत्त्व दिले गेले नव्हते. अर्वाचिन भारताला शिक्षणाची मोठी परंपरा लाभली आहे. भूतकाळात येथे प्रत्येक गावात आणि वस्तीवर शाळा होत्या. शाळेतील शिक्षक स्थानिक समुदायातीलच एक असल्याने ते त्यांच्या सर्व विद्यार्थ्यांना ओळखायचे. पण ब्रिटिशांना केवळ सत्ताधारी आणि भारतीय जनता यांच्यात त्या दुभाषांचे काम करणारा एकच वर्ग हवा होता. तत्कालीन नोकरशाही म्हणजे भारतीय जनतेला एकाच जागी खिळवून ठेवणारी व्यवस्था होती. आणि त्याच वेळी ब्रिटिश सत्ताधारी मात्र, आर्थिक शोषण करीत होते, इथली विपुल नैसर्गिक साधनसंपत्ती लुटत होते. ब्रिटिशांची संख्या कमी होते, त्यामुळे त्यांना त्यांच्या नावे

1857



एक ख़्याल था .... इन्क़लाब का
इक जज़बा था
सन अठाराह सौ सत्तावन!!
एक घुटन थी, दर्द था वो, अंगारा था, जो फूटा था
डेढ़ सौ साल हुए हैं इसकी
चुन चुन कर चिंगारियाँ हमने रोशनी की है
कितनी बार और कितनी जगह बीजी हैं वो चिंगारीयाँ हमने,
और उगाए हैं पौदे उस रोशनी के !!
हिन्सा और अहिन्सा से
कितने सारे जले अलाव
कानपुर, झांसी, लखनऊ, मेरठ, रूड़की, पटना।
आज़ादी की पहली पहली जंग ने तेवर दिखलाए थे
पहली बार लगा था कोई सांझा दर्द है बहता है
हाथ नहीं मिलते पर कोई उंगली पकड़े रहता है
पहली बार लगा था खूं खौले तो रूह भी खौलती है
भुरे जिस्म की मिट्टी में इस देश की मिट्टी बोलती है

पहली बार हुआ था ऐसा....
गांव गांव
रूखी रोटियाँ बटती थीं
ठन्डे तन्दूर भड़क उठते थे!
चंद उड़ती हुई चिंगारियों से
सूरज का थाल बजा था जब,
वो इन्क़लाब का पहला गजर था!!
गर्म हवा चलती थी जब
और बिया के घौसलों जैसी
पेड़ों पर लाशें झूलती थीं
बहुत दिनों तक महरौली में
आग धुऐं में लिपटी रूहें
दिल्ली का रस्ता पूछती थीं।

उस बार मगर कुछ ऐसा हुआ........
क्रान्ति का अश्व तो निकला था
पर थामने वाला कोई न था
जांबाज़ों के लश्कर पहुंचे मगर
सालारने वाला कोई न था

कुछ यूँ भी हुआ.........
मसनद से उठते देर लगी
और कोई न आया पांव की जूती सीधी करे
देखते देखते शामे अवध भी राख हुई ।
चालाक था रहज़न, रहबर को
इस कुऐ यार से दूर कहीं बर्मा में जाकर बांध दिया ।
अब तक वो जलावतनी में है
काश कोई वो मिट्टी लाकर अपने वतन में दफ़्न करे!

आज़ाद हैं अब ...
अब तो वतन आज़ाद है अपना
अब तो सब कुछ अपना है
इस देश की सारी नदियों का अब सारा पानी मेरा है
लेकिन प्यास नहीं बुझती

ना जाने मुझे क्यूं लगता है
आकाश मेरा भर जाता हैं जब
कोई मेघ चुरा ले जाता है
हर बार उगता हूँ सूरज
खेतों को ग्रहण लग जाता है

अब तो वतन आज़ाद है मेरा ....
चिंगारियाँ दो .... चिंगारियाँ दो......
मैं फिर से बीजूं और उगाऊं धूप के पौदे
रोशनी छिड़कू जाकर अपने लोगों पर
मिल के फिर आवाज़ लगाऐं ....

इन्क़लाब
इन्क़लाब
इन्क़लाब!!

गुलज़ार

आर्थिक विकासाठी शासकीय स्तरावर नियोजन आवश्यक असल्याची चर्चा १९३४ पर्यंत भारतीय भांडवलदार वर्गाने सार्वजनिक व्यासपीठावर आणली होती. या वर्गाने प्रकट केलेल्या राष्ट्रीय आकांक्षेला राजकीय क्षेत्रातूनही लवकरच पाठबळ मिळाले. सुभाषचंद्र बोस आणि जवाहरलाल नेहरू यांच्यासारखे काँग्रेसमधील डाव्या विचारांकडे कल असलेले आधुनिक विचारसरणीचे नेते नियोजनबध्द आर्थिक विकासाचे कैवारी म्हणून पुढे आले. ब्रिटिशांच्या अमलाखालील बहुतेक प्रांतांमध्ये १९३७ मधील निवडणुकांनंतर काँग्रेसने सत्ता ग्रहण केली. त्यानंतर तत्कालीन काँग्रेस अध्यक्ष सुभाषचंद्र बोस यांनी सर्व प्रांतांच्या उद्योगमंत्र्यांची परिषद आयोजित केली. या परिषदेत राष्ट्रीय नियोजन समितीची स्थापना करून तिचे अध्यक्षपद जवाहरलाल नेहरू यांच्याकडे सोपविण्यात आले. बहुतेक प्रांतांमध्ये काँग्रेस सत्तेवर आली असून नव्या द्विस्तरीय (डायार्की) शासनव्यवस्थेत उद्योगांचा समावेश प्रांतीय विषयसूचीत करण्यात आला आहे. त्यामुळे नियोजनासंदर्भात पावले उचलण्याची जबाबदारी काँग्रेसची आहे, असा तर्क त्यासाठी देण्यात आला. बोस यांच्या या निर्णयाला काँग्रेसमधील उजव्या गटानेच काय तो विरोध दर्शवला. महात्मा गांधी यांनी मात्र संदिग्ध भूमिका घेतली होती. गांधीवाद्यांच्या विरोधाचे शमन करण्यासाठी, त्यांची समजूत घालण्यासाठी नेहरू-बोस यांनी असा युक्तिवाद सुरू केला की, मोठे उद्योग म्हणजे 'अत्यावश्यक आपत्ती' असल्याने त्यांचा विकास आणि नियंत्रण शासनामार्फतच केले पाहिजे. वेगवेगळ्या ज्ञानक्षेत्रांतल्या तांत्रिक तज्ज्ञांचा समावेश असलेल्या राष्ट्रीय नियोजन समितीचे नेतृत्व जवाहरलाल नेहरू यांच्यासारख्या राजकीय व्यक्तीकडे देण्यात आले. (लवकरच सुभाषचंद्र बोस यांची काँग्रेसमधून हकालपट्टी करण्यात आली.)

मात्र राष्ट्रीय नियोजन समितीने फार काळ तग धरला नाही. दुसरे महायुध्द सुरू झाल्यानंतर काही काळातच ब्रिटिशांनी काँग्रेसच्या जवळपास सर्व नेत्यांना तुरुंगात डांबले, त्यातच राष्ट्रीय नियोजन समितीमधील सदस्यांच्या अंतर्गत मतभेदाचे निराकरण न झाल्यामुळे समितीचे कामकाज ठप्प झाले. नियोजनबध्द औद्योगिक विकास आणि पायाभूत उद्योगांमधील गुंतवणुकीत शासनाचा हस्तक्षेप, पाठबळ आवश्यक आहे, या मुद्यावर काँग्रेस आणि राष्ट्रीय नियोजन समितीमधील भांडवलवादी आणि समाजवादी या दोन्ही गटांची सहमती होती; पण मोठ्या पायाभूत उद्योगांची मालकी कोणाकडे असावी, या मुद्यांबाबत मात्र त्यांच्यात अत्यंत तीव्र मतभेद होते. भांडवलवादी गटाचे दोन्ही प्रतिनिधी आणि समितीचे सरचिटणीस के.टी. शाह (समाजवादी विचारसरणीकडे कल असलेले अर्थतज्ज्ञ) यांच्या नेतृत्वाखालील तज्ज्ञांचा गट या दोघांचीही भूमिका होती की, पायाभूत उद्योगांचा विकास सार्वजनिक क्षेत्रातच झाला पाहिजे. पण या क्षेत्रात आपल्याला पाहिजे तेव्हा किंवा शक्य असेल तेव्हा गुंतवणूक करण्याचे स्वातंत्र्य मिळावे, असे भांडवलवादी प्रतिनिधींचे म्हणणे होते. तर, फक्त ग्राहकोपयोगी वस्तूंचे उद्योग खाजगी क्षेत्रात ठेवून अन्य सर्व उद्योगांवर शासनाची मालकी असावी, असा विचार तज्ज्ञांनी मांडला. वादविवाद मिटविण्याचे कार्य करणारे नेहरू तेव्हा तुरुंगात असल्यामुळे हा पेच सुटला नाही आणि लवकरच राष्ट्रीय नियोजन समिती अस्तंगत झाली.

राष्ट्रीय नियोजन समितीचे कामकाज १९४१ मध्ये ठप्प झाले. तेव्हापासून नेहरू, त्यांच्या मृत्यूपर्यंत शासनपुरस्कृत नियोजनबध्द आर्थिक विकासाचे समर्थक आणि आधुनिकतेकडील भारताच्या वाटचालीचे शिल्पकार म्हणून ओळखले जाऊ लागले. स्वतंत्र भारतात नियोजन आयोग स्थापन करण्यात नेहरू यांनी कळीची भूमिका बजावली आणि काँग्रेसमधील समाजवादी तसेच काँग्रेसबाहेरील साम्यवादी हे दोघेही भारतात नियोजनबध्द औद्योगिक विकास घडविण्याचे समर्थक होते, हे सर्वज्ञात आहे. पण या संदर्भात एक लक्षणीय मुद्दा असा की, नियोजनाबाबतचा मुख्य कार्यक्रम भारतीय भांडवलदारांनी एक वर्ग म्हणून आखला होता आणि जी.डी. बिर्ला, पी.ठाकूरदार व अन्य उद्योजक व्यावसायिकांनी या कार्याचे चाणाक्ष नेतृत्व केले होते. राष्ट्रीय नियोजन समितीमधील मतभेदांवरून त्यांनी ही खूणगाठ बांधली होती की, भारतीय राष्ट्रवादी राजकारणाच्या भविष्यातील संभाव्य वाटचालीमुळे खाजगी उद्योगांचे स्वातंत्र्य धोक्यात येण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर युध्दकाळात भारतीय उद्योगांनी अर्जित केलेला नफा कोणत्या ना कोणत्या बहाण्याखाली देशाबाहेर पाठविण्याचा ब्रिटिशांचा कावा भारतीय भांडवलदारांच्या ध्यानात आला, त्यामुळे सतर्क झालेल्या या वर्गाने भारताच्या भविष्याबाबत आपल्या योजना आखण्यास आणि मांडण्यास आरंभ केला. देशातील आघाडीच्या भांडवलदारांनी गुप्तपणे बैठका घेऊन १९४४ च्या सुरुवातीला 'बॉम्बेप्लॅन' जाहीर केला. या योजनेला लाभलेले यश तपशीलवार भौतिक किंवा वित्तीय नियोजनात नव्हते. 'बॉम्बे प्लॅन' द्वारा असे औद्योगिक धोरण आखण्यात आले की, ज्याचा वसाहतिक तसेच स्वातंत्र्योत्तर काळातीलही शासनांवर दीर्घकालीन प्रभाव पडला, यातच या योजनेचे यश होते. भारतातील ब्रिटिश शासनाने १९४४-४५ मध्ये स्वीकृत केलेला औद्योगिक धोरणाचा ठराव म्हणजे तथाकथित 'बॉम्बे प्लॅन'ची जवळजवळ शब्दश: नक्कल होती. त्यानंतर १९४८ मध्ये स्वतंत्र भारताची धोरणे आखण्यात आली, तेव्हाही, त्यांचा आशय भारतीय भांडवलदारांच्या मूलभूत मागण्यांशी सुसंगत असाच होता.

लेखाचा समारोप करताना अशी टिप्पणी करावीशी वाटते की, भारत सरकारने नियोजनाची प्रक्रिया १९५१ मध्ये सुरू केली, तेव्हापासून किमान १९८६ पर्यंत तरी भारतीय भांडवलदार आणि आधुनिकतावादी मध्यमवर्ग या दोहोंच्या सामायिक हिताची पूर्तता करणे हेच नियोजनाचे उद्दिष्ट होते. पायाभूत उत्पादनांची निर्मिती करणारे स्वतंत्र, भक्कम उद्योग देशात स्थापित व्हावेत आणि त्या पायावर भारताचा एक औद्योगिक शक्ती म्हणून उदय व्हावा, अशी या वर्गाची आकांक्षा आहे. मात्र नियोजन प्रक्रियेच्या मर्यादा, तिचे यश आणि अपयश, ही एक वेगळीच कहाणी होऊ शकेल.

अनुवाद - *विजय बनसोडे*

द्रष्टे समर्थक होते. शासकीय नियोजनास आरंभ झाला नाही तर नवजात भारतीय उद्योग एकाकी पडतील आणि अजस्त्र साम्राज्यवादी उद्योगसमूहांच्या विषम स्पर्धेत त्यांचा टिकाव लागणे अशक्य आहे, परिणामत: देशी अर्थव्यवस्थेचा विकासही कुंठित होईल. हे या नेत्यांनी जाणले. म्हणूनच या अग्रगण्य विचारवंतांनी भारतीय उद्योगांना संरक्षण देण्याची मागणी केली होती.

सन १९०३-०८ या काळातील स्वदेशी चळवळ आणि त्यानंतर झालेले पहिले महायुध्द या घडामोडीतून मिळालेल्या अनुभवांनी भारतीय भांडवलदारांच्या समर्थकांची संरक्षणात्मक भूमिका यथार्थ ठरविली. स्वदेशी चळवळीने भारतीय उत्पादनांसाठी विस्तारित बाजारपेठ तयार केली. पहिल्या महायुध्दा दरम्यान आयातीवर घालण्यात आलेल्या निर्बंधांमुळे सरकारला भारतीय उद्योगांची उत्पादने खरेदी करणे भाग पडले. स्वदेशी चळवळ आणि पहिले महायुध्द या दोन कालखंडांत भारतीय उद्योगांची आणि विशेषत्वाने मुंबईच्या उद्योगांची मोठी वाढ झाली. त्यामुळे संरक्षणात्मक भूमिका रास्त असल्याचे सिध्द झाले, त्याचबरोबर शासनाचे पाठबळ लाभल्यास भारतीय उद्योगांचा झपाट्याने विकास होऊ शकतो, हे निर्विवादपणे सिद्ध झाले.

उद्योगधंद्यांना संरक्षण देण्याची ही मागणी पुढील काळात शासन पुरस्कृत आर्थिक विकासाचा सिध्दांत या स्वरूपात विकसित झाली. मात्र भारतीय उद्योगांच्या वाढीतील आणखी एक अडथळा पहिल्या महायुध्दाच्या काळातील अनुभवांनी दृग्गोचर झाला. भूमध्य समुद्रात जर्मनीच्या यू-बोटींनी घातलेल्या थैमानामुळे आयातीवर आपसूकच निर्बंध आले होते, त्यामुळे भारतीय उद्योगांना देशातच अत्यंत सुरक्षित बाजारपेठांचा लाभ झाला. पण आयात ठप्प झाल्यामुळे भांडवली आणि मध्यम अवस्थेतील सामग्रीची आवक थंडावली, या सामग्रीच्या अभावी भारतीय उद्योगांच्या विस्ताराला खीळ बसली. भारतात यंत्रसामग्रीची निर्मिती होत नव्हती, त्या परिस्थितीत तत्कालीन कारखाने आणि यंत्रसामग्री सुस्थितीत कार्यरत ठेवण्यासाठी सुट्या भागांच्या आयातीवर विसंबून राहावे लागत असे. भारतीय उद्योगांनी कमावलेला प्रचंड नफा वित्तीय भांडवलाच्या स्वरूपात संचित झाला, पण त्याला नवीन उद्योगांत परिवर्तित करणे मात्र शक्य नव्हते. त्या काळात चालू असलेल्या उद्योगांचीही पहिल्या महायुध्दाच्या अखेरीला दमछाक झाली होती. एतद्देशीय उद्योगांची वाढ आणि त्या वाढीतील अडथळे, अशा दोन्ही गोष्टी भारतीय भांडवलदारांच्या नेतृत्वाने पहिल्या महायुध्दाच्या कालखंडात अनुभवल्या. औद्योगिक विकासासाठी आपण आयातीवर विसंबून असल्याची जाणीवही त्यांना आणि त्यांच्या तत्त्ववेत्त्यांना झाली.

स्वदेशी चळवळ आणि पहिले महायुध्द या काळातील अनुभवांची शिदोरी भारतीय भांडवलदारांकडे होती, त्या आधारावर एतद्देशीय उद्योगांच्या वाढीसाठी शासकीय हस्तक्षेपाचे पाठबळ आवश्यक असल्याचे आकलनही त्यांना झाले होते. या पार्श्वभूमीवर भारतीय भांडवलदारांच्या तत्त्ववेत्त्यांनी शासनपुरस्कृत औद्योगिक विकासाच्या सिध्दांताचे जोरदार समर्थन सुरू केले. महान आर्थिक मंदीचा जागतिक प्रभाव आणि त्यानंतर बाजारकेंद्रित अर्थव्यवस्थांमध्ये केन्सप्रणित शासकीय हस्तक्षेपाला आरंभ, या वातावरणात त्यांनी आपली भूमिका अधिक ठामपणे आणि स्पष्टपणे मांडली. नियोजनबध्द आर्थिक विकासाची निकड असल्याची आग्रही मांडणी बिर्ला आणि सरकार यांनी १९३४ मध्ये केली होती, त्यांच्या मांडणीला उपरोक्त घडामोडींचा आधार होता. 'फिक्की'च्या वार्षिक सर्वसाधारण सभेत, मावळत्या आणि उगवत्या अध्यक्षांनी केलेली ती मांडणी म्हणजे महासंघाच्या अधिकृत भूमिकेचा प्रकट उच्चारच म्हणावा लागेल, तोपर्यंत भारतीय वाणिज्य आणि औद्योगिक महासंघाने भारतीय भांडवलदार वर्गाचा प्रतिनिधी म्हणून आपले स्थान भक्कम केले होते. भारतीय उपक्रम आणि भारतीय भांडवलदारांना एक वर्ग म्हणून जाणवत असलेल्या गरजा बिर्ला यांनी त्या व्यासपीठावर मांडल्या. भारतीय व्यवसायांना परदेशी व्यवसायांच्या स्पर्धेपासून संरक्षण मिळाले पाहिजे, ज्या ठिकाणी ग्राहकांच्या खरेदी क्षमतेत वाढ झालेली आहे. अशा विस्तारित बाजारपेठा उपलब्ध झाल्या पाहिजेत आणि देशातच स्वतंत्र पाया असलेल्या मूलभूत उद्योगांच्या आधारावर अर्थव्यवस्थेचे झपाट्याने औद्योगिकीकरण झाले पाहिजे, अशी त्यांची स्पष्ट भूमिका होती.

भारतातील ७० टक्क्यांपेक्षा जास्त लोकसंख्या शेतीवर अवलंबून असल्याने शेतीची उत्पादकता वाढवून दारिद्र्य निर्मूलनाला गती देणे, असे सूत्र बिर्ला यांनी बाजारपेठांच्या विस्तारासाठी मांडले होते. हे उद्दिष्ट गाठण्याकरिता मोठ्या क्षमतेचे पाटबंधारे आणि ऊर्जानिर्मिती प्रकल्प उभारणे आवश्यक बनले. मात्र शासनाने पुढाकार घेतला आणि गुंतवणूक केली, तरच ते शक्य होते. (येथे हे नमूद करणे महत्वाचे आहे की, बिर्ला यांनी शेतीक्षेत्राच्या विकासासंदर्भात केलेल्या मांडणीत, शेतीला विकलांग करणाऱ्या जमीनदारी व्यवस्थेचा एका शब्दानेही उल्लेख केला नव्हता, विशेष म्हणजे राष्ट्रीय राजकारणात तोपर्यंत या मुद्यावर चर्चेला आरंभ झाला होता. एक वर्ग म्हणून भारतीय भांडवलदार जमिनीचा प्रश्न समजून घेण्यात अपयशी ठरले, अगदी आजपर्यंत भारताच्या विकासाची गती मंद राहण्याचे हे सुध्दा एक मुख्य कारण आहे. या मुद्यावरील चर्चा मात्र सदर लेखाच्या कक्षेत येत नाही.)

उद्योगक्षेत्रासंदर्भात बिर्ला यांनी मागील अनुभवांतून निष्कर्ष काढला आणि जोपर्यंत 'कळीचे स्थान असलेले उद्योग (भांडवली आणि मध्यम स्थितीतील सामग्रीचे उत्पादन करणाऱ्या, धातूनिर्मिती उद्योगांसह पायाभूत अवजड उद्योग) देशात स्थापन केले जात नाहीत तोपर्यंत सर्वंकष आणि वेगवान औद्योगिक विकास होणे शक्य नाही, असे निदर्शनास आणून दिले. औद्योगिक विकास झाल्याखेरीज भारताची भरभराट होणार नाही. भांडवलदारांची समृध्दी आणि राष्ट्राची समृध्दी या दोन्ही बाबी एकमेकांशी घट्टपणे निगडित आहेत. पण, बिर्ला यांनी हे सुध्दा स्पष्ट केले की, कळीचे उद्योग विकसित करण्यासाठी आवश्यक असलेली प्रचंड गुंतवणूक करणे भारतातील खाजगी उपक्रमांच्या ताकदीबाहेरचे आहे, भारतीय भांडवलदारांना वसाहतिक कालखंडातून जावे लागत असल्यामुळे त्यांच्याकडे अतिरिक्त भांडवलाचा अभाव असल्याचे त्यांनी सूचित केले होते.

भारतातील नियोजनाची उत्क्रांती

इंडियन इन्स्टिटट्यूट ऑफ मॅनेजमेंट, कलकत्ता

✦ राघवेंद्र चट्टोपाध्याय,

पॉल स्वीझी यांनी असा अभिप्राय व्यक्त केला होता की, सोव्हिएट रशियाच्या पहिल्या पंचवार्षिक योजनेला लाभलेले यश आणि महान आर्थिक मंदीचा उद्‌ध्वस्त करून टाकणारा अनुभव यांनी जागतिक स्तरावर नियोजनाबाबत जागरूकता निर्माण केली. निश्चितच, १९३०-३१ च्या सुमारास जराजर्जर झालेल्या 'ना हस्तक्षेप' (LAISSEZ FAIRE) सिध्दांताला शेवटच्या घटका मोजताना अवघ्या जगाने पाहिले. अर्थशास्त्राच्या अँग्लो सॅक्सन दुनियेत 'केन्स'वादाने आपली मुळे पसरण्यास आरंभ केला होता, अमेरिकेने 'नवा करार' आखण्याच्या हालचाली सुरू केल्या. तसेच इंग्लंडनेही आपली आर्थिक सल्लागार परिषद स्थापन केली. बाजारकेंद्रित अर्थव्यवस्थेत शासकीय हस्तक्षेप आवश्यक असल्याचे सूत्र केन्स यांनी मांडले होते, त्यानुसार शासनयंत्रणेची घडण करणे, हाच यामागील उद्देश होता. याचाच कित्ता ऑस्ट्रेलियासारख्या अन्य देशांनीही गिरविला.

भारतातील वसाहतवादी शासनानेही येथे आर्थिक सल्लागार परिषद स्थापन करण्याचा प्रयत्न केला. मात्र जॉर्ज शूस्टर यांचा हा प्रयत्न निष्फळ ठरला, कारण जी.डी. बिर्ला आणि पी. ठाकूरदास यांच्या नेतृत्वाखालील भारतीय भांडवलदारांनी, प्रस्तावित परिषदेवर सदस्य म्हणून अधिकार मिळावेत, अशी भूमिका घेतली. अर्थातच ब्रिटिशांनी ते मान्य केले नाही. भारतात नियोजनाचा आरंभ करण्याचा हा पहिला शासकीय प्रयत्न होता, असे म्हणता येईल. पण तत्कालीन भारतमंत्र्यांचा (सेक्रेटरी ऑफ स्टेट) हा प्रयत्न यशस्वी झाला नाही. पण शूस्टर यांच्या या प्रयत्नामुळे भारतातील काही अभिजनांमध्ये मात्र शासकीय नियोजनाच्या संकल्पनेबाबत जागरूकता निर्माण झाली. त्यापैकी काहीजणांनी १९३१ मध्येच केंद्रीय विधिमंडळात हा मुद्दा उपस्थित केला. भारतीय उद्योगक्षेत्रातील आघाडीचे उद्योजक आणि व्यावसायिक १९३४ पर्यंत 'फिक्की' (FEDERATION OF INDIAN CHAMBERS OF COMMERCE AND INDUSTRIES) म्हणजे 'भारतीय वाणिज्य आणि औद्योगिक महासंघ' या शिखर संघटनेच्या छत्राखाली संघटित झाले होते. या महासंघाने, भारतात शासकीय नियोजनाला आरंभ करण्याची जोरदार मागणी केली. 'फिक्की'च्या वार्षिक सर्वसाधारण सभेला जॉर्ज शूस्टर मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहिल्याची संधी साधून महासंघाचे मावळते अध्यक्ष बिर्ला आणि नूतन अध्यक्ष एन.आर. सरकार यांनी शासकीय नियोजनाची आवश्यकता असल्याचा पुनरूच्चार केला. भारतातील दारिद्र्याचे निर्मूलन आणि अर्थव्यवस्थेचे औद्योगिकीकरण करण्यासाठी नियोजनबध्द आर्थिक विकासाचे पर्व सुरू केले पाहिजे, अशी भूमिका त्यांनी हिरिरीने मांडली.

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या २५ वर्षांत भारतातील आर्थिक विचारांच्या विकासाचा आढावा घेतला, तर भारतीय भांडवलदारांनी १९३० च्या दशकातच देशात शासकीय नियोजन अत्यावश्यक असल्याची मागणी कशी केली असावी, याचे आकलन होते. एकोणिसाव्या शतकातील भारत कमालीच्या दारिद्र्यात पिचून गेला होता. याच काळात न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, दादाभाई नौरोजी आणि अन्य सामाजिक विचारवंतांनी दारिद्र्य निर्मूलनासाठी प्रयास करताना 'ना हस्तक्षेप' (LAISSEZ FAIRE) सिध्दांतावर हल्ला चढविला. या सामाजिक विचारवंतांच्या लेखनातील 'आर्थिक राष्ट्रवादा'च्या प्रवाहाचा उगम आणि विकास बिपन चंद्र यांनी तपशीलवारपणे विशद केला आहे. अँग्लो-सॅक्सन राज्यकर्त्यांची 'मुक्त व्यापार' संकल्पनेवर असलेली श्रध्दा पक्षपाती आणि मर्यादांनी जखडलेली असल्याचे या सामाजिक विचारवंतांनी स्पष्टपणे दाखवून दिले होते. ब्रिटिशांनी एकोणिसाव्या शतकाच्या आरंभापासून राबविलेल्या 'ना हस्तक्षेप' धोरणामुळे भारतातील उद्योगांचा ऱ्हास झाला. तसेच गरिबीतही मोठी वाढ झाली, असे मार्मिक विश्लेषण त्यांनी केले. या सामाजिक विचारवंतांच्या प्रभावळीतील सर्वात महत्वाचे नाव म्हणजे न्यायमूर्ती रानडे, आपल्या अनेक समकालीन विचारवंत आणि लेखकांप्रमाणे रानडे यांनी फ्रेडरिक लिस्ट यांनी मांडलेला संरक्षणात्मक राष्ट्रवादी आर्थिक विचार उचलून धरला आणि स्मिथ-रिकार्डो पठडीतील अभिजात अर्थशास्त्राचा समर्थ प्रतिवाद केला.

भारतात एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आकारास आलेल्या 'ना हस्तक्षेप' किंवा मुक्त व्यापारविरोधी विचाराचे उगमस्थान मुंबई-पुणे पट्टयात असल्याचे दिसते. उपरोक्त सामाजिक विचारवंतही बहुश: या विभागातीलच होते, ही आश्चर्याची बाब म्हणता येणार नाही. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात मुंबईत कापड गिरण्यांची उभारणी लँकेशायरच्या विरोधाला न जुमानता झाली होती. बंगालमधील तागाच्या सर्व गिरण्या ब्रिटिशांच्या मालकीच्या होत्या, पण मुंबईतील एतद्देशीय भांडवलदारांच्या कापड गिरण्या मात्र आधुनिकता आणि आर्थिक समृध्दीच्या भारतीय आकांक्षेचे प्रकटीकरण म्हणता येईल. रानडे यांच्यासारख्या विचारवंतांसाठी औद्योगिकीकरण, आधुनिकता आणि आर्थिक विकास या समानार्थी संज्ञा होत्या. त्यांच्यापैकी बहुतेकजण मुंबईतील या नव्या उपक्रमांचे भागधारक होते, मुंबईच्या उदयमान उद्योगांच्या क्षमतेवरील त्यांच्या विश्वासाचे ते जणू प्रतिबिंबच होते. नुकत्याच स्थापन झालेल्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे गोपाळ कृष्ण गोखले यांच्यासारखे आधुनिकतावादी नेते भविष्यवेधी विचारांचे

प्रवेशाचा मार्ग खुला झाला.

मॉरीस डी. मॉरीस, यांनी आयात केलेल्या धाग्यामुळे भारतीय विणकरांवर अल्प परिणाम झाला, तर हा उद्योग अबाधित राहिल्याचा दावा केला. हातमागही अबाधित राहिल्याने अर्थव्यवस्थेची घडीही कायम राहिली. याशिवाय यंत्राद्वारे तयार केलेल्या स्वस्त धाग्यांमुळे विणकरांची परिस्थिती चांगली झाल्याचेही ते म्हणतात. त्यामुळे ब्रिटिश आयातीमुळे भारतीय अर्थव्यवस्था डळमळीत झाल्याचे म्हणणे चुकीचे असल्याचा दावाही त्यांनी केला.

१९०० साली हातमागावर विणलेल्या धाग्याचे वजन २५ टक्के होते, ते पहिल्या महायुद्धापूर्वी १८ टक्के झाले तर १९२० च्या उत्तरार्धात १० टक्क्यांपेक्षा कमी झाले. विणकरांना बाजारपेठा बंद झाल्या. विदेशी बड्या व्यापाऱ्यांसमोर ते कमी पडू लागले. त्यातच भारतीय सूत गिरण्याही यात सहभागी झाल्याने विणकरांची अवस्था आणखीच बिकट झाली. त्यामुळे १९२० नंतर विणकाम केवळ महिलांसाठी वेळ काढण्याचे साधन ठरले.

मॉरीसची अनेक विधाने गोंधळ निर्माण करणारी आहेत. त्यांच्या मते ब्रिटिशांमुळे येथील विणकरांची दुरवस्था झाली नाही. पण तो एका जागी म्हणतो की, १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात प्रचंड नापिकीमुळे कापडाची स्थानिक पातळीवर मागणी कमी झाली, आणि त्याची अधिकृत सूत्रांनी दखल घेतली नाही. हे त्याने ध्यानात घेतले नाही, तसेच भारतीय निर्यातही कमी झाल्यचा परिणाम विणकरांवर झाला, हेही त्याने लक्षात घेतले नाही.

देशात घडून आलेला औद्योगिक ऱ्हास वेगवेगळ्या ठिकाणी, वेगळ्या काळात आणि वेगळ्या कामगारगटांत झाला. १९ व्या शतकाच्या सुरूवातीला बंगालमधील विणकाम कमी झाले, तर मध्य भारतात १८६७ साली परिणाम झाला. राजस्थानात १९११ साली रेल्वेचे आगमन झाल्यावर विणकरांची दुरवस्था झाली. आसामात हातमागांची अवस्था कायम राहिली, मात्र विणकाम कमी झाले.

मुंबई परगण्यातील बहुतेक विणकाम करणारी केंद्र एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात तेजीत होती. मध्य परगण्यात हा उद्योग विसाव्या शतकाच्या सुरुवातीला पुन्हा उभा रहात होता. या काळात संपूर्ण देशात हातमागाचा धिम्या गतीना विकास होत होता. १९२४ साली ए.टी. वेटसन बंगालमधील उद्योगांबद्दल म्हणतात की, येथील कुटिरोद्योग अद्यापही आपले महत्त्वाचे स्थान टिकवून आहे.

भारतातील अर्धा वस्त्रोद्योग महिलांच्या ताब्यात होता. त्या विविधरंगी आणि आकर्षक कापडाला प्राधान्य देत. त्यांना मोठी मागणी असल्याने स्थानिक पातळीवर तो टिकला. भारतीय साडीचे विशेष मोजमाप, रंगसंगती आणि त्यावरील कलाकुसर याला संस्कृती आणि परंपरेच्या दृष्टीने मानचे स्थान असल्याने हा व्यवसायही तग धरू शकला. भारतीय सूत गिरण्याही त्यावर परिणाम घडवू शकल्या नाहीत. याबाबत एन. एम. जोशी यांनी मुंबईत १९३६ साली म्हटले होते की, भारतीय गिरण्या आणि विदेशी यांच्यातील स्पर्धा कायम राहिली तरी महिलांची वस्त्रे तयार करणारे उद्योग अबाधित राहतील.

लोखंड वितळवण्याचा व्यवसाय कुद्दू लागला असला तरी या काळात लोहारकामाला विस्तारीत स्वरूप येऊ लागले होते. वसाहतीपूर्वी लोखंड महाग असल्याने त्याचा मर्यादित वापर होत असे. आगबोटी आणि रेल्वे सेवेच्या विकासाबरोबर आयात पोलाद दूरवरच्या भागापर्यंत पोहोचू लागले. त्याची किंमतही कमी झाली. मोठमोठे तुकडे, सळ्या, पत्रे आणि गोळ्यांच्या स्वरूपात ते उपलब्ध झाले. रेल्वेतील भंगार अगदी नगण्य किंमतीत मिळू लागले.

रेल्वेच्या कार्यशाळेतील लघु अभियांत्रिकी विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, आगबोटी आणि संबंधित कंपन्या, ताग आणि सूतगिरण्यांमध्ये लोहारांची गरज भासू लागली. हावडा आणि मुंबई या ठिकाणी त्यांच्या वस्त्या मोठ्या प्रमाणावर दिसू लागल्या.

याशिवाय विदेशी स्पर्धा आणि बड्या क्षेत्रांच्या परिणामांशिवाय हस्तकारागिरांच्या उत्पादनात ब्रिटिशकाळात घट झाली.

वसाहतीच्या काळात तांबे आणि त्याच्या मिश्रधातूंची किंमत कमी करण्यात आली. १८६१ ते १८९० या काळात कलकत्त्याच्या बाजारात तांब्याची किंमत २० टक्क्यांहून अधिक कमी झाली. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी आयात केलेल्या धातूच्या पट्ट्यांमुळे धातूकाम करणाऱ्यांचे काम सुलभ झाले. त्यांना आपली बाजारपेठ वाढवण्याची संधी मिळाली. युरोपातून मुरादाबाद येथे तयार होणाऱ्या ब्रासच्या वस्तूंची मागणी वाढल्याने त्याचा या उद्योगावर चांगला परिणाम झाला.

वसाहतीच्या काळात देशातील वस्त्रोद्योगांवर प्रचंड विपरित परिणाम झाला असला, तरी भारताच्या मोठ्या आणि वैविध्यपूर्ण हस्तकारागिरीवर झाला नाही. १९४७ सालात हस्तकारागिरांची संख्या उत्पादन क्षेत्रात सहा टक्के शेती, यावरून ब्रिटिश काळात उद्योगधंद्यांचा झालेला ऱ्हास स्पष्ट होतो. ब्रिटिशांचे प्रचंड मोठे रेल्वेजाळे भारताला आधुनिकीकरणाकडे नेऊ शकले नाही, असे याबाबत कार्ल मार्क्सने नमूद केले आहे.

या हस्तकारागिरांनी स्वत:ला बदलत्या काळाप्रमाणे घडवले, म्हणून ते तगले. उदा औद्योगिक आणि सामाजिक संरचना, तंत्रज्ञान, कच्च्या मालाचा वापर आणि इंधन याबाबत त्यांनी बदल घडवले. पारंपरिक चामडे उद्योग हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. मात्र, देशातील पारंपारिकतेमुळे त्यांना अधिक बदल घडवता आले नाहीत.

या कारागिरींनी आपली पारंपरिक बैठक मोडली, त्यांचे उत्पादन तसेच विपणनावर नियंत्रण होते, ही हस्तकारागिरांची ब्रिटिशकाळातील काही ठळक वैशिष्ट्ये ठरली. बदलत्या समाजघटकानुसार त्यांनी उत्पादनातही बदल घडवले. या सर्व गोष्टींमुळे जुन्या पद्धतीने ज्ञान पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचण्याचा मार्ग बंद झाला. हळूहळू आणि लक्षातही न येता या कारागिरांचे मजुरांमध्ये रूपांतर झाले.

अनुवाद - नितीन सावंत

ब्रिटिश राजवटीत भारतीय उद्योगांचा ऱ्हास

✦ स्मृतिकुमार सरकार

ब्रिटिशांच्या आगमनापूर्वी भारत उत्पादक देश होता. १६०० सालाच्या सुमाराला पिरडस्च्या निरीक्षणानुसार केप ऑफ गुड होप ते चीन आणि प्रत्येक स्त्री-पुरुष, भारतीय मागांवर तयार केलेली वस्त्रेच वापर असत सालबँकच्या त्याआधीच्या गुजरात भेटीत त्याने अद्वितीय असे हातमाग आणि विणकर पाहिले. अठराव्या शतकाच्या मध्यात रॉबर्ट अेमिने बंगालमध्ये प्रत्येक घरातील प्रत्येक व्यक्ती कापड तयार करताना पाहिली.

१७५० च्या सुमारास जगातील एक चतुर्थांश उत्पादित वस्तू भारत पुरवायचा. आशियाई राष्ट्रे, चीन आणि नंतर युरोपीय राष्ट्रे भारताशी व्यापारात अग्रेसर होती. भारतही दक्षिण-पूर्व आशियाई राष्ट्रांशी मसाल्यांच्या बदल्यात कापडाचा व्यापार करत असे.

१०० वर्षांनंतर परिस्थिती आमूलाग्र बदलली. भारतातील उद्योगांना घरघर लागली. ब्रिटिशांनी इथल्या राज्यकर्त्यांबरोबरच उद्योगही संपवले. या राज्यकर्त्यांकडून खरेदी होणाऱ्या महागड्या आणि हस्तकौशल्याच्या वस्तूंची विक्री बंद झाली. १७४७ साली जेम्स टेलरने म्हटले होते की, ढाक्याची एक तृतियांश मलमल युरोपात, तर उरलेली सर्व भारत आणि आशियाई राष्ट्रे खरेदी करत.

नंतरच्या काळात ब्रिटिशांकडून होणाऱ्या आयातीचा विपरीत परिणाम येथील व्यापारावर झाला. १८१३ च्या चार्टर कायद्याने ब्रिटिश यंत्रमागावरील उत्पादनांसाठी भारतीय बाजारपेठ खुली झाली. कापडांसाठी लागणाऱ्या सुताची भारत ते ब्रिटन अशी उलटी वाटचाल सुरू झाली. १८४० मध्ये ब्रिटिश संसदेत सर जॉर्ज लारपेन्ट यांनी नमूद केले की, आम्ही भारतातील उत्पादकांना नेस्तनाबूत केले. कार्ल मार्क्सनेही असेच वक्तव्य करताना नमूद केले की, ब्रिटिशांनी सुतानेच सुताच्या मातृभूमीला बुडविले.

याआधी १९१३ मध्ये बनारसच्या जिल्हाधिकाऱ्यांनी 'कदुआ' या शहर भागातील विणकरांची दुरवस्था मांडली होती. दोन दशकानंतर हे विणकर क्षुल्लक कामे करतांना आझमगडमध्ये दिसू लागले. नंतरच्या काळात ब्रिटिश वस्त्रोद्योगाच्या आक्रमणाने येथील विणकर नामशेष झाले.

मुघलांकडून नावाजलेले 'मऊ' हे उत्तम विणकरांचे केंद्रही जवळपास नष्ट झाले. उत्तरेकडच्या मोमिनांनी मग निर्वाहासाठी कलकत्ता आणि मुंबईची वाट धरली.

याशिवाय ब्रिटिश आणि स्वीडिश व्यापाऱ्यांनी पोलाद वितळवण्याचा व्यवसायही उद्ध्वस्त केला. त्यामुळे 'धावड' समाजाला आपला पारंपारिक लोहारकामाचा व्यवसाय सोडावा लागला.

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात भारतात रेल्वेबरोबर वाफेची इंजिने, पीठ, तेल, भात आणि कापडगिरण्या आल्या. त्यांच्याकडून मोठ्या अपेक्षा व्यक्त होऊ लागल्या. त्याचा मोठा परिणाम येथील जीवनावर झाला.

मात्र, नंतरच्या काळात कृषी आणि उद्योग क्षेत्रातील मंदीचा विपरीत परिणाम दिसू लागला. त्याचबरोबर वारंवार येणारे दुष्काळही त्यात भर घालू लागले. त्याशिवाय कार्ल मार्क्सने भारतीय अर्थव्यवस्थेवरील ब्रिटिश आगमनाच्या विपरीत परिणामांविषयी वारंवार भाष्य केल्याने भारताच्या दुरवस्थेला जबाबदार असणाऱ्यां विरोधात एक भूमिका तयार होऊ लागली.

कोणत्याही प्रकारच्या औद्योगिकीकरणामुळे स्थानिक कारागिरांवर परिणाम होतोच, अशा प्रकारची भाष्ये केली जाऊ लागली. मात्र, भारत आणि इतर देशांमध्ये हा फरक होता की, येथे दूरवर मँचेस्टर, लँकेशायरसारख्या ठिकाणी वसलेल्या कापड गिरण्यांमुळे येथील हातमाग व्यवसाय उद्ध्वस्त झाला.

मात्र, ब्रिटिशांनी हे मुद्दे खोडून काढण्याचा प्रयत्न केला. ब्रिटिश आयातीमुळे भारताच्या वस्त्रोद्योगावर केवळ सहा टक्के परिणाम झाल्याचा दावा क्रॉफर्ड याने केला. याशिवाय त्यांनी या संदर्भात सादर केलेली आकडेवारीही स्वीकारण्याजोगी दिसत नाही.

वसाहतीच्या राजवटीनंतरच्या काळात जुन्या वादाला नवीनच वळण लागले. औद्योगिकीकरणाचा ऱ्हास करणारी आकडेवारी सांगून म्हणू लागले की, ब्रिटिश राजवटीत उद्योगधंद्याच्या ऱ्हासामुळे जनतेची उदरनिर्वाहाची साधने बदलली. जनगणनेचा हवाला देऊन ही माहिती देण्यात आली होती. आधीच्या गणनेत मिश्र उदरनिर्वाहाची साधने विचारात घेतली नव्हती. डॅनियल आणि एलिस थेनिट यांनी त्यासाठी १९३१ च्या तुलनेत १८३१ च्या आकडेवारीला प्रमाण मानले होते. त्यांनी १८८१ आणि १९३१ दरम्यान भारतीय कामगारांचे औद्योगिक क्षेत्रातील स्थान कायम असल्याचा दावा केला.

याला अमेयकुमार बागची यांनी जोरदार आक्षेप घेत १९०१ च्या जनगणनेची आकडेवारी देत, फ्रान्सिस बुकननच्या बिहारमधील हातमाग कामगारांच्या अवस्थेबद्दलचे मत खोडून काढले. १८०६ ते १८१३ आणि १९०१ या काळात एकूण लोकसंख्येच्या दहा टक्के उद्योगक्षेत्राचा वाटा हिरावला गेल्याचे त्यांनी नमूद केले. त्यामुळे ब्रिटिश सुती उत्पादनांना भारतात

यांच्यातील संबंध मौल्यवान वाटत होते. पण या लुटीविरुद्ध त्यांनी आयुष्यभर राबवलेल्या मोहिमेने त्यांना राजकीय आतंकवादाकडे नेले. भारतीयांच्या खर्चात चालणाऱ्या या दुष्ट आणि अनाधिकारी प्रशासनात ब्रिटिश सत्तेचे हीत आणि भारताचे शोषण होत आहे

अशा प्रकारे ड्रेन थिअरीचा अभ्यास करून दादाभाई आणि इतरांनी १) वसाहतवादाचा मथितार्थ शोधून दृष्य स्वरूपात मांडला. २) भारतीय जनता आणि परकीय सत्ताधारी यांच्यातील विसंवाद पुढे आणला, यातून दोन्ही गटांमध्ये राजकीय संघर्ष उठला. ३) त्याने राजकीय बळाचा मुद्दादेखील ऐरणीवर आला, कारण दादाभाई सातत्याने मांडत आले की, भारताची लूट हा भारतीय लोकांना दुय्यम स्थान दिल्याचाच परिपाक आहे. अंतिमत: त्यातूनच ब्रिटिश सत्ता उलथून टाकण्याची गरज प्रकर्षाने जाणवली गेली. ड्रेन थिअरीतून निघालेल्या या निष्कर्षांनी अखेर दादाभाईंना राजकीय आतंकवादाकडे वळवले आणि अशाप्रकारे अत्यंत सहिष्णू राजकीय व्यक्ती म्हणून कारकीर्दीला प्रारंभ करणारे दादाभाई हळूहळू वर्षागणिक आपले राजकारण आणि राजकीय मागण्यांबाबत अधिकाधिक टोकाची भूमिका घेणारे बनायला लागले. १९०५ साली झालेल्या काँग्रेसच्या बनारस आधिवेशनात त्यांनी पाठवलेल्या संदेशात स्पष्टपणे नमूद केले होते की, स्वराज्याशिवाय भारतीयांची सध्याच्या लुटीतून आणि त्यातून उत्पन्न झालेल्यां गरिबी, दु:ख आणि हानीतून सुटका... होऊ शकणार नाही. कोणत्याही प्रकारच्या उपायांद्वारे प्रशासनाच्या यांत्रिक यंत्रणेत केलेले बदल काही भले करू शकत नाहीत, शकणार नाहीत. ही लूट केवळ शासन स्वत: जनताच थांबवू शकेल.. भारताचे दु:ख आणि समस्यांवर स्वशासन हा एकच उपाय आहे.

भारतीय आणि ब्रिटिश सत्ताधारी यांच्या स्वारस्यांत अंगभूत विरोधाभास होता, हे वास्तव सामान्य भारतीय आणि शेतकरी यांना सहज समजले 'शोषण थांबवा' जणू काही आवश्यक क्रांतीचं घोषवाक्यचं बनलं होतं, ते सहज दिसतही होतं. त्यासाठी आणखी युक्तिवाद करण्याची गरज नव्हती.

दादाभाई नौरोजी यांच्या विचारांच्या आणखी दोन बाजू मी येथे मांडू इच्छितो. त्यातील पहिली बाजू म्हणजे दादाभाई परकीय भांडवलाचे कट्टर विरोधक होते. परकीय भांडवल भारतीय भांडवलाला सवत असल्याचे त्यांचे मत होते. भारतीय भांडवलाला विकसित होण्यास, संचित होण्यास आणि स्पर्धा करण्यास मुक्त वाव मिळाला तर कदाचित परकीय भांडवल सकारात्मक भूमिका बजावू शकेल. १८९५ मध्ये त्यांनी म्हटले होते, 'आपल्याला स्वबळावर भांडवल उभारण्याचे पूर्ण स्वातंत्र्य मिळाले तर देशात येणाऱ्या परकीय भांडवलाशी समान आणि योग्य पातळीवर स्पर्धा करू शकू आणि मग कदाचित परकीय भांडवलामुळे नुकसानीऐवजी फायदा होईल. आजघडीला आपण त्याचे तोटे पहात आहोत कारण आपण असहाय आणि तळाला आहोत.

दुसरे म्हणजे, परकीय ब्रिटिश सत्तेने भारतावर स्वामीत्व गाजवीत- लूट करण्याचा प्रकार त्यांना अतिशय अयोग्य वाटत होता. तत्कालीन भारतीय नेत्यांना जुलमी सरकार आणि ब्रिटिश यांच्यात फरक करणे शक्य झाले होते. जेत्यांनी जिंकलेली राष्ट्रं स्वत:ची करून टाकली होती, ब्रिटिशांनी मात्र, या देशावर सत्ता स्थापन करून शोषण केले. नादीरशाहसारखे आक्रमक एकदाच येऊन गेले, पण ब्रिटिशांची लूट मात्र सातत्यानं सुरू होती.

इतरांसोबत दादाभाईंनी भारतीय राष्ट्रीय चळवळीचा पाया भक्कम केला आणि ब्रिटिशांचं वर्चस्व संपुष्टात आणलं आणि भारतीयांच्या मनातून ब्रिटिश सत्तेला उतरवलं.

अशाप्रकारे 'सोने की चिडीया' समजला जाणारा भारत सातत्याने लुटला गेला आणि आजची दरिद्र्य आणि कंगाल परिस्थिती निर्माण झाली, ही भावना राष्ट्रवादी चळवळीच्या केंद्रस्थानी होती.

त्यामुळे अधिकृत आणि अनधिकृत ब्रिटिश लेखकांनी कायम ड्रेन थिअरीवर टीका केली आणि या थिअरीचे उद्गाते दादाभाई नौरोजी यांच्यावरही त्यांनी अतिरेकी आणि दांभिक अशी टीका करुन निष्ठाहीन म्हणून त्यांची संभावना केली. १८९० मध्ये जॉर्ज हॅमील्टन, भारतासाठीचे सचिव यांनी जाहीर केले होते की, 'तुम्ही स्वत:ला ब्रिटिश सत्तेचे प्रामाणिक समर्थक म्हणून जाहीर करीत होतात आणि ब्रिटिश सत्तेपासून विलग न करता येणाऱ्या परिस्थितीवर आणि त्यांच्या परिणामांवर कायम टीका करीत आहात. त्याचप्रमाणे आपल्या **'रीअल इंडिया'** या पुस्तकात जे.डी रीस यांनी गृह शुल्काखेरीज भारतात ब्रिटिश सरकार राहूच शकत नाही, असं सांगत दादाभाईंना धारेवर धरले आहे.

परिणामी, दादाभाई नौरोजी यांना आजही भारताचे महान वृद्ध गृहस्थ म्हणून संबोधले जाते. १९२४ मधील गांधीजींच्या एका वचनाने मी या लेखाचा शेवट करु इच्छितो, 'दादाभाई ऋषीप्रमाणे आयुष्य जगले. भारताचे हे महान वृद्ध गृहस्थ माझ्या आयुष्याला आकार देणाऱ्यांपैकी एक आहेत.. त्यांच्या मनात कायम एकच विचार असायचा आणि तो म्हणजे भारत कसा उभा राहील आणि स्वातंत्र्य प्राप्त करेल. ज्या काळात शासनावर टीका म्हणजे राजद्रोह मानला जात होता आणि सत्यकथन करण्याचे कोणी धाडस करीत नव्हते, त्याकाळात दादाभाईंनी शासन यंत्रणेवर अतिशय कठोर शब्दांत टीका केली. माझ्या मनात अजिबात शंका नाही की, जोपर्यंत भारत या विश्वात स्वतंत्र घटक म्हणून राहील तोपर्यंत लोक दादाभाईंचे प्रेमाने, आदराने स्मरण करतील' स्वत: पुरते बोलायचे तर मी त्यांना टिळक, गांधीजी आणि नेहरु यांच्या पंक्तीत भारतीय स्वातंत्र्य लढ्यातल्या सर्वाधिक उंच नेत्यांपैकी एक मानतो.

अनुवाद :- कांचन चौधरी

करणाऱ्या राष्ट्रवादी चळवळीच्या सर्व अंगांत त्या मुद्याचा समावेश झाला. राष्ट्रवादी नेत्यांना वसाहतवादी परिस्थितीचे आंतर संबंध आणि एकात्मिक आर्थिक विकासाच्या दृष्टीने केलेल्या विश्लेषणात तो मध्यमवर्ती विषय बनला होता.

स्वत: दादाभाई नौरोजी यांनी आपल्या आर्थिक आणि राजकीय आंदोलनाच्या काळात तत्कालीन सर्व मुद्यांना स्पर्श केला. गतिमान औद्योगिकीकरणाची गरज, आर्थिक विकासातील शासकीय आणि परकी गुंतवणुकीची भूमिका, परकीय व्यापाराचे स्वरूप स्वभाव आणि परिणाम, रेल्वेची भूमिका, शासनाची आर्थिक धोरणं, प्रामुख्यानं करप्रणाली, विक्रीकर, आयकर आणि जमीन महसूल आणि नागरी खर्च, कर आकारणी चलन आणि चलनाचे परिवर्तन आणि सेवांचे भारतीयीकरण यांच्या त्यात समावेश होता.

आयात आणि निर्यात यांचा कल विचारात घेता निर्यात एका दिशा मार्गाने जाणारी होती, हे दादाभाई काळजीपूर्वक नमूद करायचे. दादाभाई यांच्या मते या शोषणाचे तीन प्रमुख घटक होते.

१. ब्रिटिश सरकारातील नागरी आणि लष्करी कर्मचारी, वकील, डॉक्टर वगैरे यांचे वेतन उत्पन्न आणि बचतीच्या रूपाने ब्रिटनला जाणारा पैसा १८९२ मध्ये संसदेला सादर करण्यात आलेल्या माहितीच्या आधारे गणन करून लष्करी जवान वगळता इतर युरोपीय नागरीकांना भारतात त्यावेळी एकूण १५ कोटी रुपये वेतन आणि निवृत्ती वेतन दिले जात होते, असे गणित दादाभाई नौरोजी यांनी मांडले होते. त्यावेळच्या आकडेवारीनुसार देशाच्या एकूण महसुली उत्पन्नाच्या ३० टक्के एवढी ही रक्कम होती.

२. दुसरा महत्त्वाचा घटक होता भारत सरकारचे गृह शुल्क अर्थात भारताच्या राज्य सचिवां द्वारे भारत सरकारच्या वतीने ब्रिटनमध्ये केला जाणार खर्च

३. शोषणाचा तिसरा मोठा स्त्रोत होता भारतात व्यापार आणि उद्योगात खाजगी परकीय गुंतवणुकीवरील नफा.

या शोषणाद्वारे ब्रिटनला जाणाऱ्या पैशाची नेमकी आकडेवारी दादाभाई नौरोजी यांनी अनेकवेळा मांडली. १९०५ मधील त्यांच्या अंदाजानुसार प्रतिवर्षी ५१.५ कोटी रुपये ब्रिटनला जात होते.

बरीच गुंतागुंत आणि खोलवर अभ्यास करून दादाभाई नौरोजी यांनी ही ड्रेन थिअरी मांडली होती. पहिले, म्हणजे लॉड कर्झन चांदीच्या स्वरूपात होणारे आयात व निर्यातीचे व्यवहार ताळेबंदात घेणे बंधनकारक केले, तथापि त्यांची कमजोर बाजू ही होती की त्यांनी ब्रिटिश कर्मचाऱ्यांच्या वेतनावरचं लक्ष केंद्रित केले.

दुसरे म्हणजे त्यांनी दृष्य आणि अदृष्य आयात किंवा व्यापार आणि देण्याचा समतोल यांच्यात त्यांनी अंतर आणले.

तिसरे म्हणजे दादाभाईंनी निदर्शनास आणून दिले की, ते शोषण म्हणजे राष्ट्रीय संपत्तीचे नुकसान किंवा अंतर्गत वितरणासाठी आवश्यक राष्ट्रीय उत्पादन आणि खर्चात घटच होती. परिणामी लूट झालेला हा पैसा आणि राष्ट्रीय उत्पन्न देशात खर्ची पडला असता तर जो रोजगार आणि उत्पन्न दुय्यम स्तरावर निर्माण झाले असते त्याचाही तोटा झाला.

चौथे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे हे शोषण म्हणजे भांडवलाचा तोटाही होता. भारताचे उत्पादक भांडवल किंवा सामाजिक अतिरिक्त उत्पन्नातील निर्यातीचा मोठा वाटा किंवा बचत किंवा संचित भांडवल. आपल्या जवळपास प्रत्येक भाषणात दादाभाईंनी या भांडवली नुकसानीचा मुद्दा-जो खरेतर या ड्रेन थिअरीचा मध्यवर्ती घटक होता-प्रकर्षाने मांडला.

अधिक स्पष्टपणे सांगायचे तर भांडवलाच्या निर्यातीमुळे देशात भांडवलाचा तोटा निर्माण झाला आणि त्यामुळे उद्योग आणि शेतीच्या विकासात अडथळे निर्माण झाले आणि तोच भाग भारत अविकासित राहण्याचे मूळ कारण ठरले.

दादाभाई नौरोजी यांच्याखेरीज इतरही अनेक भारतीय नेत्यांनी भारतातून होत राहिलेल्या लुटीचे गणन करण्याचा प्रयत्न केला. उदा. आर. सी. दत्त आणि जि. व्ही. जोशी यांच्या अंदाजानुसार लुटीचा आकडा त्यावेळी देशाच्या एकूण बचतीच्या एकतृतीयांश होता, आजच्या परिस्थितीत तो आकडा देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या ८ टक्के होईल.

महत्त्वाचे म्हणजे दादाभाई नौरोजी यांनी असेही पाहिले की, गतकाळात झालेली भारताची भांडवली लूट इंग्लंडमध्ये मोठ्या संचित भांडवलाची स्त्रोत बनली आहे आणि त्यातून तिथे वेगाने औद्योगिकीकरण झाले आहे.

दादाभाईंनी ड्रेन थिअरीचा वापर हेही दाखवण्यासाठी केला की, भारतात प्रत्यक्षात परकीय गुंतवणूक काही आलेलीच नाही आणि भारत कायम केवळ भांडवल निर्यातदारच राहिला होता. जे काही परकी भांडवल देशात आले ते वास्तवत: भारतातून लुटीच्या मार्गाने गेलेल्या भांडवली निर्यातीचा अल्पभाग होते.

दादाभाईंना असेही वाटायचे की, सीमाशुल्क, कर वगैरे यासारखी भारत सरकारची तत्कालीन सर्व धोरणं मर्यादेत आणता येतील पण ही लूट नाही याबाबत तडजोड होण्यासारखीच नव्हती. म्हणूनच ब्रिटिश साम्राज्याचा मूलभूत आणि अंगभूत घटक बनलेली लूट त्या सत्तेसोबत राहणारच होती

ड्रेन थिअरीचे राजकीय परिणाम:

अनेक वर्षे ड्रेन थिअरीचा पिच्छा पुरवल्यानंतर आलेल्या निष्कर्षामुळे दादाभाईंच्या मनात भारतातील ब्रिटिश साम्राज्याबद्दलची समजूतीवर आणि प्रवृत्तीवर ढग निर्माण होऊ लागले. प्रारंभी दादाभाईंना भारत आणि ब्रिटन

स्वशासन हा एकमेव उपाय आहे. १९०६ साली काँग्रेसच्या कलकत्ता अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी घोषित केले की, भारतीय जनतेच्या राजकीय मागण्या एकाच शब्दात मांडता येतील, तो शब्द म्हणजे ब्रिटन किंवा वसाहतींप्रमाणे **'स्वशासन' किंवा 'स्वराज'**

ते महान राजकीय अर्थतज्ज्ञ होते. त्यांचा पहिला आर्थिक निबंध १८६७ मध्ये प्रकाशित झाला. त्यानंतर जवळपास ४० वर्षे त्यांनी अनेक लेख आणि भाषणांच्या माध्यमातून भारतीय अर्थव्यवस्थेच्या सर्व अंगाचे विश्लेषण केले. १९०१ साली त्यांचे सर्व लेख आणि भाषणांचे संकलन **'गरिबी आणि ब्रिटिश साम्राज्य'** या पुस्तकात करण्यात आले. या माध्यमातून त्यांनी लक्षावधींना आर्थिक प्रश्नासंदर्भात साक्षर केलं. स्वत: गांधीजींनी १९२४ मध्ये लिहीलं आहे की 'भारतीय जनतेच्या दारिद्र्याची कल्पना मला सर्वप्रथम दादाभाई नौरोजी यांच्या पुस्तकातून आली.'

भारताचा आर्थिक विकास हाच देशातील दारिद्र्य निर्मूलनावर एकमेव उपाय आहे. यावर दादाभाईंचा दृढ विश्वास होता आणि आर्थिक विकासाप्रती त्यांची संपूर्ण कटीबद्धता होती. आधीच नमूद केल्याप्रमाणे प्रारंभी दादाभाईंना भारतातील ब्रिटिश सत्ता लाभदायी वाटत होती. पण १८७१ पर्यंत ते सातत्यानं गरिबीत होत असलेली वाढ आणि देशाची लूट यांचे संदर्भ द्यायला लागले होते. पुढे ते भारतातील वसाहतवादाचे सर्वात महत्त्वाचे, कठोर टीकाकार बनले.

भारतीय अर्थव्यवस्थेच्या विविध अंगांचा समाचार घेताना भारतीय जनतेचं दारिद्र्य आणि भारतीय संपत्तीची लूट यावरच त्यांनी लक्ष केंद्रित केले होते.

दादाभाईंची मूळ तक्रार अशी होती की भारतीय गरिबच होते, पण दिवसेंदिवस ते अधिकाधिक गरिब बनत होते. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य सातत्यानं गरिबीत होत असलेली वाढ आणि भारताची व्यथित स्थिती याबाबत भारतीयांना तसंच ब्रिटिश जनतेलाही जागृत करण्यासाठी समर्पित केले. तोच त्यांच्या प्रमुख दिनक्रम होता. पुढे त्यांचे म्हणणे होते की, भारत केवळ गरिबच नाही तर त्याला अधिकाधिक गरिब बनवले जात आहे. परिणामी त्यांनी जाहीर केले की, ब्रिटिश सत्ता हा भारतासाठी आत्तापर्यंतचा सर्वांच मोठा शाप ठरला आहे.

आपलं म्हणणं सिद्ध करण्यासाठी त्यांनी देशाच्या पहिल्या दरमाणशी उत्पन्नाची आकडेवारी काढली आणि त्या आधारे १८७३ मध्ये भारतीयांचे प्रती माणशी उत्पन्न २० रुपये असल्याचा निष्कर्ष काढला. त्यांनी असेही नमूद केले की, वास्तव या सरासरीत दाबले गेले आहे. कारण त्यात उच्चस्तरीय अधिकारी, परकीय भांडवलदार, बडे जमीनदार, शहरांतील व्यापारी, ग्रामीण सावकार आणि ग्रामीण तसंच शहरी मध्यमवर्गीयांचाही समावेश होता. या मुद्यांचा विचार करताना भारताला त्यांनी गरिबी आणि दुष्काळ यांच्यातही नाते जोडले आणि निष्कर्ष काढला की, गरिब अवर्षणाच्या स्थितीला दुष्काळात रूपांतरित करते. त्यांचे असे मत होते की, ब्रिटिश सत्ताधाऱ्यांना भारतीय जनतेच्या गरिबीशी काही घेणेदेणे नव्हते, त्यांना केवळ त्यांच्या करदात्यांची चिंता आहे.

त्यांच्या दृष्टीने आर्थिक विकास गरिबी निर्मूलनामागचे मूळ कारण आहे. उत्पादनाच्या अभावाची समस्या हीच त्यांच्या दृष्टीनं गरिबीच्या समस्येमागील प्रमुख कारण होते, आर्थिक विकासाच्या फलितांचे वितरण नव्हे. आर्थिक विकासाच्या फलितांचे वितरणही त्यांना महत्वाचे वाटायचेच पण, त्यांच्या दृष्टीने मूळ समस्या जनतेच्या सर्वसाधारण गरजा भागवण्यासाठी अपुरे उत्पादन हीच होती. भारतीय लोकांच्या गरिबीमागचे मूळ कारण सर्वांना लाभ देऊ शकण्यास अपुरा राष्ट्रीय आर्थिक विकास हेच होते. दादाभाईंनी नमूद केल्याप्रमाणे एक भारतीय म्हण आहे की, आडात असेल तर पोहऱ्यात येईल. आपल्याकडे भरभराटीची विहीर आहे. त्यातून आपल्याला आपला वाटा आला पाहीजे, पण विहीरच कोरडी असेल तर आपल्याला त्याशिवायच भागवायला लागेल ?

ब्रिटिश सत्ताधाऱ्यांनी भारतातील संपत्तीची लूट केल्यानेच भारतातील दारिद्र्य आणि अविकसित स्थिती निर्माण झाली आहे, असा त्यांचा विश्वास होता. १८६७ मध्ये 'इंग्लंडचे भारताला देणे' या मथळ्याखालील लेखात त्यांनी हा मुद्दा मांडला होता. ड्रेन थिअरी १८७६ च्या एका निबंधात त्यांनी परिपूर्ण स्वरुपात मांडली होती. त्या निबंधाचा शेवट होता. 'ब्रिटिशांच्या या अनैसर्गिक धोरणामुळे संपूर्ण नियमच चुकीच्या अनैसर्गिक आणि आत्महत्येच्या दिशेने जात आहे.'

त्यानंतर दादाभाईंनी आपलं पुढचं सर्व आयुष्य या ड्रेन थिअरीच्या कारणासाठी समर्पित केले, आणि त्या लूटमारीविरोधात, धडाडीची मोहीम सुरू केली. त्यांच्या मते ही लूटमार म्हणजे ब्रिटिश सभेतील मूळ दोष होता. १८८० मध्ये त्यांनी जाहीर केले की, आजचा सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे की, भारताचे हे रक्त शोषण कसे थांबवायचे ? त्यावरील प्रत्येक उपायाचे महत्त्व किंवा गुणवत्ता त्याच्या हे शोषण थांबवण्याच्या क्षमतेवर अवलंबून राहील. १८८१ मध्ये त्यांनी निरीक्षण केले की, थोडक्यात मथितार्थ सांगायचा तर सध्याच्या दुष्ट आणि अनाधिकारी प्रशासनाच्या खर्च भारतीयांना झेलावा लागत आहे. त्याचे लाभ सत्ताधारी ब्रिटिशांना मिळत आहेत तर शोषण मात्र, भारतीय जनतेचे होत आहे. भारताचे हे शोषणच देशातील दारिद्र्याला कारणीभूत आहे, असा त्यांचा विश्वास होता, तेच गरिबीमागचे मूळ कारण होते. ड्रेन थिअरी येता जाता जनतेसमोर मांडून त्यांनी भारतातील वसाहतवाद, शोषणाचे मूळ कारण आणि मागासलेपणाचा मुद्दा वसाहतवादाच्या विरोधात उभ्या राहिलेल्या राष्ट्रवादी चळवळीतला महत्त्वाचा मुद्दा बनवला. वसाहतवादाचा विरोध

दादाभाई नौरोजी आणि ड्रेन थिअरी

✦ **बिपन चंद्रा**

ड्रेन थिअरी अर्थात भारताला पुरेसा आर्थिक किंवा वस्तू रूपातील मोबदला न देता देशातील राष्ट्रीय संपत्ती किंवा एकूण राष्ट्रीय उत्पादन इंग्लंडला निर्यात केले जात होते, हा मतप्रवाह सर्वप्रथम दादाभाई नौरोजी यांनी व्यक्त केला. दादाभाईंचा जन्म १८२५ मध्ये झाला होता. १९१७ साली त्यांचे देहावास झाले. गणिताचे शिक्षक म्हणून त्यांनी आपल्या कारकीर्दीला प्रारंभ केला, पण नंतरचे सर्व आयुष्य आणि सर्व संपत्ती भारतीय राष्ट्रीय चळवळीसाठी समर्पित केली.

भारतीय जीवनाचं असं कोणतंच अंग नव्हतं की ज्याला त्यांनी स्पर्श केला नव्हता. ते समाज सुधारक होते, पत्रकार होते, भारतीय राष्ट्रीय काँग्रेससह अनेक राष्ट्रवादी संघटनांचे ते संस्थापक होते, राजकीय आंदोलक होते, सर्वात महत्त्वाचे म्हणजे एक राष्ट्रवादी अर्थतज्ञ ब्रिटिश वसाहतवादाचे कठोर टीकाकार होते. आणि अनेक पिढ्यांमधील लक्षावधी भारतीयांचे राजकीय शिक्षकही होते.

१८५५ मध्ये दादाभाई एका व्यापारी संस्थेत सहभागी झाले पण या शर्तीवर की, गांजाच्या व्यवस्थापनाची त्यांचा संबंध राहणार नाही आणि नंतर त्यांनी गांजा तसंच दारूच्या व्यवसायातील आपला नफ्याचा वाटा स्वीकारण्यासही नकार दिला होता.

भारतीय जनतेची त्यांना चांगली समज होती, त्यांच्याबद्दल सहानुभूती होती. भारतातील गरिबीमागचे प्रमुख कारण म्हणजे विवाह, सामाजिक कार्य आणि दागिन्यांची खरेदी यातून प्रदर्शित होणारी भारतीयांची उधळपट्टी आणि अनावश्यक व्यय करण्याची प्रवृत्ती आहे, असं त्यावेळचे ब्रिटिश अधिकारी मानत होते.

ही कारणमीमांसा नाकारून भारतीयांचे अल्प उत्पन्न व खर्च दाखवून देताना दादाभाई उद्‌गारले होते की, भारतीय जनतेला उल्हास आणि आनंदाचे काही क्षण उपभोगण्याचा अधिकारच नाही काय ? आणि इतर मानवी संस्कृतीचे आयुष्य, आयुष्यातील भौतिक, नैतिक आणि स्वाभाविक आनंद या दृष्टीनं पुढे जाण्याचा काही अधिकार किंवा कारणच नाही काय ? त्यांनी कायम तळागाळातच रहायचे त्यांनी काही सामाजिक खर्च करूच नये काय ? म्हणजे मूर्खपणा त्यांच्या संस्कृति, व्रतवैकल्पे बुद्धीचा अभाव असच मानायचे का ?

त्या वेळी भारतीयांच्या राजकीय मागण्या आणि आंदोलनांचा स्तर खाली होता. कारण ती चळवळ बुद्धिवादी आणि अल्पसंख्येने असलेल्या नागरी मध्यमवर्गापर्यंतच मर्यादित होती आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यावेळी राजकीय चळवळी आणि आंदोलनांमधील सहभागाचा प्रकार भारतीयांसाठी नवीन होता. भारतीय जनतेचं राजकीयीकरण करून लोकांना लोकप्रिय बहुमताच्या राजकारणात आणणं हा दादाभाईंच्या पिढीचा मुख्य हेतू होता. 'राजा लोकांसाठी असतो लोक राजासाठी नसतात.' या शब्दांत दादाभाई नौरोजी यांनी भारतीय जनतेला राजकीयदृष्ट्या जागृत करण्याचा प्रयत्न केला. प्रत्यक्ष लढा लढ्याच्या नेमकेपणा स्वरूप नंतर आलं, नंतर म्हणजे दादाभाईंच्या जीवनकाळातच.

जेव्हा भारतीय काँग्रेस नेते डी.ई. वाच्छा यांनी भारतातील तरुण ऐकत नाहीत अशी तक्रार केली, तेव्हा दादाभाई नौरोजी त्यावर उद्‌गारले, 'काँग्रेस धिमी आणि अप्रगतशील असल्याची टीका करीत तरुण पिढी व्यक्त करीत असलेलं असमाधान आणि अधिरपणा म्हणजे संघटनेच्या फलिताचा एक सर्वोत्कृष्ट भागच आहे. ही संघटनेची स्वत:ची प्रगती आहे.... (आपले कार्य) म्हणजे त्यासाठी आवश्यक क्रांती घडवून आणणं, ती शांततामय असेल वा हिंसक, क्रांतीचे स्वरूप सर्वस्वी ब्रिटिशांच्या कृतीवर अवलंबून राहील.'

सातत्यानं काहीतरी नवीन करीत, बदल घडवीत दादाभाई कायम तरुण राहिले भारतातील ब्रिटिश साम्राज्याच्या लाभांमध्ये प्रारंभी विश्वास वाटणारे दादाभाई नंतर टप्प्या टप्प्याने ब्रिटिशांचे भारताबद्दलचे अयोग्य, बेकायदा, विश्वासघातकी, अनैसर्गिक, घातक धोरण संपविण्यासाठी त्यांनी ब्रिटिश नोकरशाही, ब्रिटिश पक्षनेते, खासदार, उदारवादी ब्रिटिश कामगार यांजकडे अपिलं केली स्वत:चे धोरण सुधारण्याच्या ब्रिटिशांच्या क्षमतेची जाण असलेल्या दादाभाईंनी निष्कर्ष काढला की, भारताला आर्थिक उन्नती साधायची असेल तर भारत राजकीयदृष्ट्या स्वतंत्र व्हायला हवा. १९०४ मध्ये त्यांनी आंतरराष्ट्रीय सामाजिक काँग्रेस मध्ये भाग घेतला आणि तेथे जाहीर केले की, भारताला स्वशासन देणे हाच उपाय आहे... स्वत:वर शासन करण्याची आणि भूतलावर इतर राष्ट्रांसोबत साधारण प्रगती करण्याची त्यांची (भारतीय जनतेची) मागणी आहे. नंतर काँग्रेसच्या बनारस अधिवेशनात पाठवलेल्या संदेशात त्यांनी स्पष्टपणे नमूद केले होते. स्वशासनाखेरीज भारतीय जनता सध्याच्या लूटमारीतून कधीच बाहेर पडू शकणार नाही. भारताची दु:ख आणि समस्यांवर

९७ मधील दुष्काळात ५१ लाख ५० हजार व्यक्तींना प्राण गमवावे लागले. या आपत्तींना तत्कालीन भारत सरकारने कसा प्रतिसाद दिला? प्रशासकीय कार्यवाहीसाठी 'दुष्काळ संहिते'नुसार निरिक्षण आणि मदत कार्य यंत्रणेची उभारणी करण्यात आली. त्यामुळे विसाव्या शतकात दुष्काळात प्राणहानीचे प्रमाण कमी झाले. बंगालमध्ये १९४३ साली पडलेला दुष्काळ मात्र याला अपवाद होता. कारण दुसऱ्या महायुध्दादरम्यान पूर्वेकडील आघाडीला रसद पुरविण्यासाठी बंगालमधील मदतकार्य ठप्प करण्यात आले. युध्दकालीन आर्थिक धोरणाच्या दबावामुळे विनिमय व्यवहारात झालेले मोठे बदल हेच बंगाल दुष्काळाचे मुख्य कारण होते, असे विश्लेषण अमर्त्य के.सेन यांनी केले आहे. बंगालमध्ये १९४३ या वर्षी उपलब्ध असलेला धान्यसाठा त्यापूर्वीच्या पाच वर्षांतील सरासरी धान्यसाठ्यापेक्षा फक्त पाच टक्के कमी होता. एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकांतील दुष्काळांचा तडाखा प्रामुख्याने गरिब कारागीर, भूमिहीन शेतमजूर आणि छोटे शेतकरी अशा सीमांत उपजीविका असलेल्या समाज घटकांनाच बसला, ही वस्तुस्थिती आहे.

अधून मधून येणाऱ्या दुष्काळापेक्षा अधिक लक्षणीय बाब म्हणजे विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात दरडोई उपलब्ध धान्यसाठ्यामध्ये झालेली घट. जॉर्ज ब्लाईन (BLYN) शिवसुब्रमणियन आणि ए. हेस्टन यांनी या संदर्भात १९०१ ते १९४६ या काळात स्वतंत्रपणे अभ्यास केला होता. त्यांचे निष्कर्षही उपरोक्त मुद्याची पुष्टी करणारे होते. विसाव्या शतकातील दुष्काळांमध्ये उदरनिर्वाहासाठी अन्नधान्याची तीव्र टंचाई जाणवण्याचे संकट तुलनेने कमी वेळा ओढवले. कारण, प्रादेशिक किंवा स्थानिक स्वरूपाच्या दुष्काळात अन्नधान्याची रसद अन्य भागांतून रेल्वे किंवा जहाजांमार्फत पाठवून या संकटाचे निराकरण करणे शक्य होते. पण, सर्वसाधारण कालखंडातही जनतेसाठी उपलब्ध धान्यसाठ्यात घट झाली होती. वैद्यकीय सेवेचा प्रमुख असलेल्या एका इंग्रज अधिकाऱ्याने १९३३ मध्ये केलेल्या एका पथदर्शी सर्वेक्षणातून अत्यंत महत्त्वपूर्ण माहिती उपलब्ध झाली. भारताच्या ग्रामीण भागातील २६ टक्के लोक कुपोषणाने ग्रस्त असल्याचे आढळले. जनतेचे सरासरी आयुर्मान हा आरोग्याच्या स्थितीचा एक चांगला निकष असतो. एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकांत भारतीय नागरिकांचे आयुर्मान किती होते? अधिकृत ब्रिटिश भारतीय जनगणनेच्या आकडेवारीनुसार भारतात जन्मलेल्या व्यक्तीचे आयुर्मान १८८१-९१ या काळात २५.१ वर्षे, १९०१-११ या दशकात २३ वर्षे होते. हा आकडा १९२१-३१ दरम्यान २६.७ वर्षांवर तर १९३१-४१ या दशकात ३१.७ वर्षांवर गेला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मात्र सरासरी आयुर्मानात झपाट्याने वाढ झाली. ब्रिटिशांच्या राजवटीत १९४१ मध्ये झालेल्या जनगणनेनुसार जेवढे सरासरी आयुर्मान होते, ते स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवापर्यंत दुप्पट झाले.

साक्षरतेचा स्तर हा आणखी एक सर्वसामान्यपणे वापरला जाणारा निर्देशांक. स्वातंत्र्यापूर्वी भारतातील साक्षरतेचे प्रमाण फक्त १० टक्के एवढ्या न्यूनतम पातळीवर होते. ब्रिटिश राजवटीत भारतातील साक्षरतेच्या प्रमाणात घसरण झाली असल्याचा मुद्दा महात्मा गांधी यांनी गोलमेज परिषदेत मांडून हर्टोग यांच्याशी वाद घातला होता. हा वाद सुप्रसिध्द असला तरी दोन्ही पक्षांना आपला मुद्दा सिध्द करता आला नव्हता, कारण ब्रिटिशपूर्व काळातील साक्षरतेच्या प्रमाणाची नोंद कुठेही आढळणे सर्वथैव अशक्यच होते. पण, वसाहतीच्या काळात साक्षरतेच्या प्रमाणात लक्षणीय वाढ झाली नाही, ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. ब्रिटिशपूर्व काळात देशात वाचन-लेखन आणि गणिताच्या अध्ययनाची प्राथमिक स्वरूपाची स्वदेशी प्रणाली अस्तित्वात होती आणि स्थानिक उच्चभ्रू वर्ग तिचा आश्रयदाता होता. पण इंग्रजांच्या आमदानीत मात्र ही व्यवस्था कोलमडून पडली.

एकोणिसावे शतक आणि विसाव्या शतकातील सुरुवातीच्या काळामधील भारतीय अर्थव्यवस्था प्रभावित करणारे काही मूलभूत घटक पुढीलप्रमाणे : कमी आयुर्मान, चक्रनेमि क्रमाने येणारे दुष्काळ, पोषक अन्नाअभावी लोकसंख्येतील मोठ्या विभागाचे खालावलेले आरोग्य, साक्षरतेची न्यूनतम पातळी. वसाहतिक भारताच्या या वैशिष्ट्यांमध्ये आपल्या इतिहासातून वारसाहक्काने मिळालेल्या काही घटकांची भर पडली : वर्ण आणि जातींच्या उतरंडीमध्ये समाजाची विभागणी, धर्मशास्त्राने काही जातींवर लादलेला नीच दर्जा आणि अस्पृश्यतेचा कलंक, पुरुषसत्ताक व्यवस्थेत शास्त्री-पंडितांनी लादलेल्या नियमांनुसार स्त्रियांची गळचेपी या नियमांनी स्त्रीदास्याला मान्यता मिळवून दिली, हिंदू समाजाच्या चौकटीबाहेर ठेवलेल्या आदिवासी समूहांचे शोषण, हिंदू आणि मुस्लीम समुदायांना एकमेकांपासून दूर सारून संकुचित आणि सीमाबध्द जीवन जगण्यास भाग पाडणाऱ्या वेगवेगळ्या सामाजिक प्रथा.

हा होता भारतीय प्रजासत्ताकाला मिळालेला वारसा. स्वतंत्र भारताने १९४७ नंतर जे काही साध्य केले, ते बऱ्याच प्रकारे मर्यादित असले तरी, त्याचे मूल्यमापन या इतिहासाच्या प्रकाशातच केले पाहिजे.

सव्यसाची भट्टाचार्य
(अनुवाद - विजय बनसोडे)

(डॉ. सव्यसाची भट्टाचार्य यांनी जवाहरलाल नेहरू विद्यापीठात इतिहासाचे प्राध्यापक आणि शांतिनिकेतन येथील विश्वभारती विद्यापीठाचे कुलगुरू या पदांवर काम केले असून ते सध्या भारतीय इतिहास संशोधक परिषदेचे अध्यक्ष आहेत.)

विरोधातील कायद्यासारख्या काही बाबतीत भारतीय समाजसुधारकांच्या सहकार्याने सामाजिक हस्तक्षेप करण्याची काही न्यायोचित पावले इंग्रज सत्ताधीशांनी त्यापूर्वी उचलली होती. पण १८५७ चा उठाव म्हणजे लष्करात नव्यानेच आलेल्या एनफिल्ड रायफलीच्या वंगणातील काही घटकांमुळे भावना दुखावलेल्या एतद्देशीयांची प्रतिक्रिया, असा अन्वयार्थ ब्रिटिशांनी लावला. म्हणूनच सामाजिक सुधारणा किंवा समाज परिवर्तनासाठी पूर्वीपेक्षा जास्त भारतीय क्रियाशील झाले असले, तरी त्या प्रक्रियेपासून अलिप्त राहणे बेहत्तर असल्याचा निष्कर्ष त्यांनी काढला. सामाजिक क्षेत्राबाबत इंग्रजांनी घेतलेल्या 'जसे आहे, तसे असूद्यात' धोरणाची कारणमीमांसा अशी करता येते.

एकंदर पाहता, १८५७ च्या उठावाचा सार्वजनिक अर्थव्यवस्थेवर प्रत्यक्ष तर सर्वसाधारण आर्थिक धोरणावर अप्रत्यक्ष प्रभाव पडला, पर्यायाने ब्रिटिश अमलाखालील भारताच्या आर्थिक इतिहासाच्या प्रवाहावर त्याचा व्यापक परिणाम झाला. सन १८५७ मधील घडामोडींबाबत विपुल प्रमाणावर लेखन झाले असले तरी या मुद्यांची मात्र पुरेशी दखल कोणी घेतल्याचे आढळत नाही. उठावानंतर इंग्रज सत्तेने घेतलेल्या भूमिकेचे सावट पुढील अर्धशतकातील आर्थिक धोरणांवर पडल्याचे दिसते.त्यानंतर पहिल्या महायुध्दाच्या काळातच नवीन पर्व सुरू झाल्याचे स्पष्ट होते. या स्थित्यंतराची महत्त्वाची खूण म्हणजे भारतीय कापड उद्योगाने, आपला प्रतिस्पर्धी असलेल्या मँचेस्टर कापड उद्योगाच्या भारतातील आयातीपेक्षा केलेले जास्त उत्पादन. याच सुमारास, १९०७ मध्ये 'टाटा आयर्न अँड स्टील कंपनी' या भारतीय उद्योगाने उत्पादन सुरू केले; भारतीय उद्योजकांच्या पुढाकाराने आधुनिक स्वदेशी उद्योगाच्या नव्या पर्वाचा आरंभ होत असल्याचे हे आणखी एक ठसठशीत चिन्ह होते. तिथपासून ते महान आर्थिक मंदीला १९२९ मध्ये सुरू वात होण्यादरम्यानचा कालखंड हा दुसरा टप्पा किंवा पर्व म्हणतात येईल. तर महामंदी, दुसरे महायुध्द ते स्वातंत्र्यप्राप्ती हा कालखंड तिसऱ्या पर्वात समाविष्ट करावा लागेल. सन १८५० ते १९४० या दशकांमधील गतिमान वास्तवाचा, घडमोडींचा आणि स्थित्यंतरांचा ऊहापोह करणारे तज्ज्ञमंडळींचे उत्कृष्ट लेख या संग्रहात अंतर्भूत करण्यात आले आहेत. या स्थितीत त्या विषयांवर या प्रस्तावनेत आणखी चर्चा करणे अनावश्यक ठरेल.

पण तरीही, काही ठळक प्रवाहांची नोंद घ्यावी लागेल. ईस्ट इंडिया कंपनीची भारतावरील राजवट १८५८ मध्ये संपुष्टात आली. अॅडॅम स्मिथ यांनी 'द वेल्थ ऑफ नेशन्स' (१७७६) या ग्रंथात ईस्ट इंडिया कंपनीच्या राजवटीचा ताळेबंद पुढीलप्रमाणे मांडला आहे : "पूर्णत: व्यापाऱ्यांचा समावेश असलेल्या कंपनीचे हे शासन अन्य कोणत्याही देशाच्या शासनापेक्षा कदाचित सर्वात वाईट असावे." कंपनी सरकारच्या उच्चाटनानंतर भारताची सत्तासूत्रे हाती घेतलेल्या शासनाच्या कामगिरीचे गुण आवडीने गाण्याची प्रवृत्ती अगदी आजही थोड्याफार प्रमाणात आढळते. त्या राजवटीच्या आर्थिक धोरणांचे परिणाम काय झाले? भारतावर राज्य करणाऱ्या इंग्रज शासनाच्या पुढाकाराने आणि गुंतवणुकीने (ही रक्कम भारतीय करदात्यांच्या योगदानातूनच उभी राहिली होती.) झालेली रेल्वे, रस्ते, बंदरे इ. पायाभूत सुविधांची निर्मिती, आधुनिक तंत्रज्ञानाचे आगमन आणि त्याचा कालांतराने भारतीय उद्योजकांनी केलेला स्वीकार, वित्तसंस्था ते न्यायपालिका अशा नानाविध संस्थात्मक जडणघडणीचा प्रारंभ, इंग्रज साम्राज्याचा अफाट विस्तार आदी मुद्दे ब्रिटिशांच्या भारतावरील राजवटीच्या ताळेबंदात जमेच्या बाजूस दाखविण्याचा प्रघात आहे, परंतु प्रदीर्घ काळ राजसत्तेचा शकट हाकणाऱ्या या राजवटीने भारतीय जनतेचे दरिद्रीकरण केले, ही वस्तुस्थिती इंग्रज सत्तेच्या तथाकथित कामगिरीतला फोलपणा उघड करते.

ब्रिटिश राजवटीत भारतीय जनता दारिद्रयाच्या खाईत लोटली गेल्याची वस्तुस्थिती दादाभाई नौरोजी यांच्यासारख्या राष्ट्रवादी विचारवंतांनी साधार स्पष्ट केली. ब्रिटिशपूर्व काळात भारताची स्थिती अधिक चांगली होती का ? असा प्रश्न डब्ल्यू.एच. मोरलँड आणि अन्य ब्रिटिश इतिहासतज्ज्ञांनी उपस्थित केला. या प्रश्नाचे उत्तर वादातीत नाही, तसेच त्यासंदर्भात निश्चित आकडेवारीचा आधारही देण्यात आलेला नाही. पण ब्रिटिशांच्या राजवटीत भारताचे झालेले दरिद्रीकरण व अविकसित भारत आणि औद्योगिकदृष्ट्या प्रगत पाश्चिमात्य देश यांच्यातील वाढती आर्थिक दरी, या मुद्यांची राष्ट्रवादी विचारवंतांनी स्पष्टपणे मांडणी केली. येथे या वादात गुंतण्याची गरज नाही. पण ब्रिटिशांची राजवट आपल्यासाठी कितपत कल्याणकारी होती, याबाबत भारतीय जनतेची भूमिका अगदी वस्तुनिष्ठ आणि अनुभवांवर आधारित आहे. दुष्काळाची वारंवारता हा एक निकष इंग्रजांच्या राजवटीचे मूल्यमापन करण्यासाठी लावता येतो. ब्रिटिशांच्या अमलाखालील भारतात एकोणिसाव्या शतकात पडलेल्या दुष्काळांची संख्या निश्चितच लक्षणीय आहे. उत्तर भारत : १८००-०४, १८३७-३८, १८६०-६१, १८६८-७०, १८७७-७८, १८९६-९७, १८९९-१९००. पश्चिम भारत : १८००-०४, १८१२-१३, १८२४-२५, १८३३-३४, १८६६-६७, १८७६-७८. पूर्व भारत : १८७३-७४, १८८८-८९, १८९६-९७. दक्षिण भारत : १८०६-०७, १८२४-२५, १८३३-३४, १८६६-६७, १८७६-७८. दुष्काळाबाबतच्या शासकीय अहवालांत त्यांची नोंद मोठे दुष्काळ अशी करण्यात आली आहे. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापासून दुष्काळात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांच्या संख्येबाबतच्या अंदाजित नोंदी उपलब्ध आहेत. त्यावरून वरीलपैकी काही दुष्काळ अत्यंत संहारक असल्याचे स्पष्ट होते. उदा.१८७६-७८ च्या दुष्काळाने ४३ लाख लोकांचा बळी घेतला, तर १८९६-

सार्वजनिक बांधकाम खर्च अशा अनुषंगिक बाबींच्या अर्थसंकल्पीय तरतुदीमुळे हा बोजा वाढत गेला. व्याजापोटी प्रचंड रक्कम अदा करणे भाग पडल्यामुळे पाटबंधारे कामांसारख्या नागरी सार्वजनिक कार्यासाठी निधीचा खडखडाट होऊ लागला.

तथाकथित 'गृहखर्च' म्हणजे 'होमचार्जेस', अर्थात ब्रिटिश भारतीय शासन चालविण्यासाठी इंग्लंडमध्ये होणारा खर्च, हा १८५७ च्या उठावाचा तिसरा परिणाम. सन १८५७-५८ मधील लष्करी खर्चामुळे या 'गृहखर्चात' वाढ झाली. ब्रिटनमधून भारतात कर्तव्य बजावण्यासाठी आणलेल्या सैनिकांच्या आणि अधिकाऱ्यांच्या वेतनाचा भार भारतीय करदात्यांना उचलावा लागला. लंडनस्थित युध्द कार्यालयाने लष्करी खर्चाची पै अन् पै भारताकडून वसूल केली. सार्वजनिक कर्जावरचे वाढते व्याज आणि भारत सरकारशी करार केलेल्या ब्रिटिश मालकीच्या रेल्वे, कंपन्यांना द्यावी लागणारी रक्कम या बाबींचा समावेशही 'होमचार्जेस' मध्ये करण्यात आला. त्याचबरोबर इंग्लंडमधून येणारी सामग्री, नागरी आणि लष्करी सेवेतील अधिकाऱ्यांचे निवृत्तीवेतन, ब्रिटनच्या मंत्रिमंडळातील भारतमंत्र्याचे वेतन, लंडनमधून कामकाज पाहणाऱ्या त्यांच्या परिषदेतील सदस्य आणि अधिकाऱ्यांचे वेतन, आशिया खंडात वेगवेगळ्या ठिकाणी सुरू केलेल्या राजनैतिक आस्थापनांचा खर्च, एवढेच नव्हे तर भारतात कार्यरत असलेल्या ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या नातेवाईकांसाठी मनोरुग्णालय चालवण्याचा खर्च अशा असंख्य बाबींची भर दिवसेंदिवस पडत गेली.

पिळवणूक करण्याच्या या प्रवृत्तीचे शिखर म्हणजे भारतावरील कराच्या बोजात झालेली वाढ, याकडे दादाभाई नौरोजी यांच्यासह अन्य राष्ट्रवादी विचारवंतांनी लक्ष वेधले आहे. सन १८५७ मधील उठावाची थेट परिणती सार्वजनिक अर्थव्यवस्थेच्या क्षेत्रात मोठे बदल होण्यात झाली. 'द फायनान्शियल फाऊंडेशन्स ऑफ द ब्रिटिश राज्य' (ब्रिटिश साम्राज्याचा आर्थिक पाया) या गतवर्षी पुनमुर्द्रण झालेल्या माझ्या ग्रंथात वरील मुद्यांचा ऊहापोह मी केला आहे, त्यामुळे त्या इतिहासाचे सदर लेखात विवेचन करणे आवश्यक नाही. म्हणूनच, सार्वजनिक अर्थव्यवस्थेच्या क्षेत्रापलीकडे जाऊन, १८५७ च्या बंडाचा सर्वसाधारण आर्थिक धोरणावर पडलेला प्रभाव,या मुद्यांकडे आता वळूया. उठावानंतर रेल्वेमार्ग उभारण्याची मोहीम मोठ्या प्रमाणावर हाती घेण्यात आली. भारतात रेल्वेचे आगमन १८५३ मध्येच झाले होते खरे, पण तो अडखळता, गतिहीन आरंभ होता. कँटोन्मेंट म्हणजे लष्करी छावण्यांच्या क्षेत्रात राहणाऱ्या ब्रिटिश सैन्यदलाच्या पलटणींना रेल्वे आणि संपर्क यंत्रणेमुळे गतिमानता प्राप्त होईल आणि भविष्यातील उठाव चिरडून टाकणे शक्य होईल, हा त्यामागील आडाखा होता. त्याहीपेक्षा १८५७ च्या नागरी असंतोषातून इंग्रजांनी आणखी एक धडा घेतला होता. सन १८५७ मध्ये शेतकऱ्यांनी बंड पुकारले असता सरंजामशहा, जमीनदार, तालुकदार इ. घटक मात्र ब्रिटिशांशी एकनिष्ठ राहिले होते. म्हणूनच जमीनदार आणि त्यांच्या हितसंबंधी घटकांना स्पष्टपणे अनुकूल ठरेल, असेच जमीन महसूल धोरण आखण्यात आले.

आयात करविषयक धोरणात १८५७-६० या काळात महत्त्वाचे बदल करण्यात आले. साधारणत: १८२० पासूनच ब्रिटनमधील औद्योगिक भांडवलदार आणि त्यांच्या हितसंबंधी घटकांनी भारताच्या आयात करविषयक धोरणावर प्रभाव टाकण्यास सुरुवात केली होती, पण या संदर्भात सर्वंकष कार्यक्रम राबवण्यास आरंभ मात्र ब्रिटनमधून पाठविलेल्या एका माणसाने १८६०मध्ये केला. जेम्स विल्सन हे त्या माणसाचे नाव. लंडनहून प्रकाशित होणाऱ्या 'द इकॉनॉमिस्ट' या अग्रगण्य अर्थविषयक नियतकालिकाचा संस्थापक असलेल्या विल्सनने भारताचा पहिला वित्तमंत्री (त्या काळात या पदाला 'व्हाईसरॉयच्या मंडळातील वित्त-सदस्य' असे नामाभिधान होते.) विल्सन आणि त्यानंतरच्या वित्तमंत्र्यांनी ब्रिटनमधील उद्योजक व्यापारी वर्गाला लाभदायक आणि भारतातील कारागीर आणि कुशल कामगारांना हानिकारक धोरणे धडाक्याने राबविली. इंग्लंडमध्ये उत्पादित झालेला माल भारतात आयात करताना त्यावरील सीमाशुल्कात कपात केली जाऊ लागली. त्याचबरोबर भारतातून इंग्लंडकडे निर्यात होणाऱ्या शेतमाल आणि कच्च्या मालावरील करही कमी करण्यात आला. हे धोरण ब्रिटिश भांडवलदारांसाठी अनुकूल आणि भारतीय कारागिरांसाठी प्रतिकूल होते, त्याच्या घातक परिणामांची माहिती आज प्रत्येक विद्यार्थ्याला आहे. रोमेशचंद्र दत्त ते महात्मा गांधी अशा अनेक राष्ट्रवादी विचारवंतांनी त्यावर प्रखर प्रकाशझोत टाकला आहे.सन १८५७ मध्ये झालेल्या उठावाच्या पार्श्वभूमीवर इंग्लंडमधील औद्योगिक हितसंबंधांना लाभदायक ठरतील अशी पक्षपाती धोरणे राबविण्यास तेथील जनमतही अनुकूल होते. त्याच वातावरणात, भारतातल्या इंग्रज राज्यकर्त्यांनी बंडखोरांचे कठोरपणे निर्दालन आणि ब्रिटिशांच्या हितासाठी एतद्देशीयांच्या हिताचा बळी असे निर्दय धोरण अंगिकारले. हे धोरण मान्य नसलेले काही ब्रिटिश अधिकारी होते, पण ते केवळ अपवादापुरतेच. बंडामुळे राज्यकर्ते आणि एतद्देशीय प्रजा अशी स्पष्ट विभागणी झाली होती. परिणामी उपरोक्त धोरण दृढमूल होणे स्वाभाविकच होते.

भारतातील ब्रिटिश नोकरशहा आणि राजकीय निर्णयकर्ते यांची १८५७ च्या उठावानंतर एक विशिष्ट मनोभूमिका तयार झाली होती, सामाजिक धोरणात बदल होण्यामागे तेही एक महत्त्वाचे कारण ठरले. सम्राज्ञी व्हिक्टोरियाने १८५८ मध्ये जारी केलेल्या जाहीरनाम्यात या बदलाचे संकेत होते. एतद्देशीयांच्या भावनांचा आदर राखण्याकरिता सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्रात शासकीय हस्तक्षेप न करण्याचे धोरण या जाहीरनाम्यात उद्घोषित करण्यात आले. सती प्रथेच्या

१८५७ मधील उठावाचा अर्थव्यवस्थेवरील परिणाम

✦ प्रा. सव्यसाची भट्टाचार्य

सन १८५७ मधील उठावाचा लक्षणीय प्रभाव त्यानंतरच्या दशकांवर आणि त्या काळातील अर्थव्यवस्थेवर पडला. तत्कालीन आर्थिक इतिहासावर झालेल्या १८५७ च्या उठावाच्या परिणामांचे विस्मरण आज या स्वातंत्र्यलढ्याचा शतकोत्तर सुवर्णमहोत्सव साजरा करीत असताना आपल्याला होत आहे. सार्वजनिक वित्तपुरवठा आणि आर्थिक धोरणे, ही दोन क्षेत्रे उठावामुळे प्रभावित झाली होती. ब्रिटिशांनी 'बंड' असा उल्लेख केलेल्या या उठावाचा भारतावरील ब्रिटिश राजवटीच्या अर्थव्यवस्थेवर तत्काळ झालेला परिणाम म्हणजे सैन्यदलावरील खर्चात झालेली प्रचंड वाढ. सम्राज्ञी व्हिक्टोरियाच्या प्रसिध्द जाहिरनाम्याद्वारे १८५८ मध्ये भारताच्या सत्तेवर आलेल्या इंग्रज सरकारच्या अर्थसंकल्पातील तीस ते पस्तीस टक्के हिस्सा लष्करावर खर्च झाला होता. याची कारणे काय असावीत?

'तलवारीच्या बळावरच' ब्रिटिशांना भारतावरील नियंत्रण टिकवावे लागेल, असे वॉरन हेस्टिंग्जने फार पूर्वी म्हटले होते, १८५०७ च्या बंडामुळे त्या विधानाची सार्थता इंग्रजांना पुरेपूर पटली. सैन्यदलातील भारतीय शिपायांच्या तुलनेत इंग्रज सैनिकांचे संख्याबळ अल्प असल्यामुळेच १८५७ च्या बंडाने भारतावरील बिटिशांच्या सत्तेपुढे जबरदस्त आव्हान उभे केले, असा निष्कर्ष तत्कालीन इंग्रज अधिकाऱ्यांनी काढला. सन १८५७ मध्ये भारतातील सैन्यदलातील गोरे सैनिक आणि भारतीय शिपाई यांचे प्रमाण १:६ असे होते, एवढेच नव्हे तर काही लष्करी छावण्यांमध्ये ब्रिटिश वंशाचे मोजके श्वेतवर्णीय अधिकारी आणि त्यांच्या हुकुमाचे ताबेदार असलेल्या पलटणींत मात्र, जवळपास सर्वच शिपाई एतद्देशीय असे चित्र होते. बंड झाले त्यावर्षी इंग्रजांच्या वर्चस्वाखालील भारतीय लष्करातील दर सात शिपायांमध्ये फक्त एक गोरा सैनिक असे प्रमाण होते. मात्र १८५८-६० या काळात हे प्रमाण आमूलाग्र बदलून इंग्रज सैनिक आणि अधिकाऱ्यांना अनुकूल झाले. या काळात गोरे सैनिक आणि एतद्देशीय शिपाई यांचे प्रमाण १:२ इतपत कमी झाले, त्याचबरोबर ब्रिटिशांच्या सुरक्षिततेचा विचार करून तोफखान्यासारख्या विभागांमध्ये फक्त इंग्रज सैनिकांचाच समावेश करण्यात आला. परिणामी भारतातील सैन्यदलात कार्यरत असलेल्या दर तीन सैनिकांमध्ये एक इंग्रज तर दोन एतद्देशीय सैनिक असे प्रमाण झाले. त्यासाठी ब्रिटनमधून आणलेल्या सैन्याची बडदास्त ठेवणे ही मोठी खर्चिक बाब होऊन बसली. ब्रिटिश सरकारकडून 'नेटिव्ह' सैनिकांवर केल्या जाणाऱ्या खर्चाच्या तुलनेत इंग्रज सैनिकांची भर्ती, प्रशिक्षण, अन्नपाणी, निवासासाठी बराकी आणि निवृत्तीनंतरचे लाभ या बाबींवर अफाट खर्च होऊ लागला. ब्रिटिश लष्करी अधिकाऱ्यांवर केल्या जाणाऱ्या खर्चाचे प्रमाण तर त्याहीपेक्षा अधिक होते. (सैन्यदलात भारतीयांना 'कमिशन्ड'अधिकाऱ्यांची पदे ब्रिटिश राजवटीच्या अगदी अखेरच्या काही वर्षांपर्यंत दिली जात नसत आणि जेव्हा भारतीयांची 'कमिशन्ड ऑफिसर' म्हणून नियुक्ती केली जाऊ लागली तेव्हा ते 'कमिशन' म्हणजे नेमणूकपत्र, सम्राटाचे नव्हे तर व्हाईसरॉयचे असायचे, (वांशिक आधारावरील भेदभावाचा सूक्ष्म-चलाख प्रकार होता.) लष्करी खर्चात झालेल्या या वाढीचा परिणाम म्हणजे १८६०-६१ मध्ये इंग्लंडने भारताकडून १६ लाख २० हजार पौंड एवढी रक्कम वसूल केली, १८५६-५७ मध्ये भारताला इंग्लंडकडे लष्करी खर्चापोटी तीन लाख ४० हजार पौंड रकमेचा भरणा करावा लागला होता. हा बोजा त्यानंतर सतत वाढतच गेला. या संदर्भात १८६९ मध्ये व्हाईसरॉय लॉर्ड मेयो यांनी तत्कालीन ब्रिटिश मंत्रिमंडळातील भारतमंत्री लॉर्ड अर्जिल (LORD ARGYLL) यांच्याशी खाजगी संभाषणादरम्यान केलेले एक विधान येथे उद्धृत करणे उद्बोधक ठरेल. "भारतातील सैन्यदलातील अधिकारी सुखलोलुप झाले असून निरीक्षण अधिकाऱ्यांकडे निरीक्षण करण्यासारखे काम अभावानेच दिसते तर 'कर्तव्य बजावणाऱ्या' अधिकाऱ्यांचा या कार्याशी सुतराम संबंध नाही.", अशी कबुलीच लॉर्ड मेयो यांनी दिली होती.

थोडक्यात सांगायचे तर, भारतावर अवाढव्य लष्करी खर्चाचा भार लादणे, हीच १८५७ च्या उठावाला इंग्रजांची प्रतिक्रिया होती. उठावाचा आणखी एक परिणाम म्हणजे सार्वजनिक कर्जात झालेली वाढ, त्यामुळे सेवाशुल्क किंवा व्याजापोटी दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा भरणा भारताला करावा लागत होता. आपलाच उठाव चिरडून टाकण्यासाठी भारतीयांना ही किंमत द्यावी लागत होती. सन १८५७ आणि १८६१-६२ या पाच वर्षांत ब्रिटिशांच्या भारत सरकारने मुख्यत्वे इंग्लंडमध्येच घेतलेल्या कर्जात पाच कोटी ९० लाख पौंडावरून १० कोटी ८० लाख पौंड एवढी, म्हणजे दुप्पट वाढ झाली. कर्जाची ही रक्कम १८७२ पर्यंत १२ कोटी २० लाख पौंडांवर पोचली. लष्करी खर्च तसेच युरोपीय सैनिकांसाठी बराकी बांधणाकरिता लष्करी

'योजना' ची काळानुरूप बदलती 'मुद्रा'

एखाद्या संस्थेच्या कामाचे स्वरूप शब्दांपेक्षा चित्राच्या माध्यमातून झटकन लक्षात येते. आपली कल्पकता वापरून अशा चित्रामधून आपल्या कार्याकडे आकर्षून घेण्याचे, आपला दर्जा आणि महत्त्व सिद्ध करण्याचे काम त्या त्या आस्थापनाची मुद्रा सातत्याने करीत असते, आपल्या 'योजना' मासिकानेही १९५७ साली सुरूवात करतांना काळानुरूप अशी मुद्रा तयार केली होती. त्यावेळी आपली अर्थव्यवस्था बव्हंशी कृषी आधारित होती. त्यामुळे त्या मुद्रेमध्ये दाण्यांनी भरलेल्या गव्हाची लोंबी चित्रित करण्यात आली होती.

काही वर्षानंतर भारत उद्योग क्षेत्रातही नावारूपाला आला. कृषीबरोबर उद्योगांनीही लक्षणीय प्रगती करून चांगलेच हातपाय पसरले. कृषी आणि उद्योग हातात हात घालून देशाच्या अर्थव्यवस्थेला हातभार लावू लागले. परिणामी योजनाच्या मुद्रेमध्ये कृषीबरोबरच उद्योगही विराजमान झाला.

कृषी आणि उद्योग क्षेत्रांनी पाहता पाहता आपला वेग वाढवला आणि एकविसाव्या शतकावर स्वार व्हायला भारत सिद्ध झाला. जागतिकीकरणाच्या लाटेखाली दबून न जाता माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात मुसंडी मारून जगाला थक्क करुन टाकणारी भरारी भारतानं घेतली. त्यामुळे येत्या १५ वर्षात भारत महासत्ता बनेल याची खात्री साऱ्या जगालाच आता पटली आहे. या सगळ्या घडामोडींमध्ये मानवी विकासाचा वाटा अत्यंत महत्त्वाचा आहे. समर्थ मानवी विकासाशिवाय आर्थिक विकासाला अपेक्षित गती मिळणे शक्य नाही. लोकांच्या गरजांमध्ये विकासाचे परिवर्तन व्हायला हवे, हे ध्यानात घेऊन 'योजनां' ने आता नवी मुद्रा तयार केली आहे. त्यात जनता केंद्रस्थानी असून कृषी, उद्योग, गृह आणि ऊर्जा यांसारखी क्षेत्रं त्याभोवती चित्रित करण्यात आली आहेत.

संपादकीय स्वातंत्र्याची ६० वर्षे

भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी वर्ष, भारतीय स्वातंत्र्याचे हीरकमहोत्सवी वर्ष आणि 'योजना' मराठीचे पस्तिसाव्या वर्षातले पदार्पण अशा त्रिवेणी संगमाचे औचित्य साधून हा विशेषांक आम्ही सादर करीत आहोत. वास्तविक दीडशे वर्षांच्या कालखंडाचा आढावा - आणि तोही स्वातंत्र्यसंग्रामापासून स्वातंत्र्योत्तर साठ वर्षांचा - घेण्यासाठी 'योजना'चा हा प्रयत्न खूपच तोकडा पडेल, याची आम्हाला जाणीव आहे. तरीही या निमित्ताने क्रांतिकारकांचे स्मरण आणि स्वातंत्र्योत्तर भारताच्या जडणघडणीतील यशापयशाचा ऊहापोह व्हावा, अशी आमची अपेक्षा आहे.

दीडशे वर्षांपूर्वी भारत एक वेगळा देश होता, दादाभाई नौरोजी, न्यायमूर्ती एम्. जी. रानडे आणि आर. सी दत्त यांनी ब्रिटिशांच्या आर्थिक धोरणांचे आणि त्याच्या भारतावर होणारा परिणामांचे यांचे विश्लेषण केले होते, या विश्लेषणानुसार भारतीय अर्थव्यवस्था ब्रिटिशांची मांडलिक करण्याचा प्रयत्न असल्याचे म्हटले होते. ब्रिटिशांची धोरणे या देशाला आर्थिक दृष्ट्या मागास करणारी होती कृषी क्षेत्राकडे दुर्लक्ष, शिक्षण, आरोग्य, औद्योगिकीकरणाला नकार यामुळे येथील पारंपारिक हस्तव्यवसाय मोडकळीला आला होता. ही काही उदाहरणे म्हणता येईल.

आत्ताच्या भारताने ब्रिटिशांच्या राजवटीचा अंधकार विसरला आहे. भारताचा स्वातंत्र्यलढा आर्थिक विकासासाठी होता. भारताला विकसित करण्यासाठी या लढ्याने आपल्या नेत्यांना आर्थिक धोरणांसाठी दूरदृष्टी दिली. १९४७ साली स्वातंत्र्यानंतर आणि १९९१ च्या आर्थिक सुधारणांनंतर अर्थव्यवस्था वेगाने पुढे चालली आहे. भारताची प्रगती ही नवी कथा आहे.

मात्र शंभर कोटींहून अधिक लोकसंख्या असणाऱ्या या देशात विकासाची फळे सर्वांना समान चाखता आली नाहीत. शिक्षणाचा अभाव, पिण्याचा पाण्याची टंचाई, बालकांमधील कुपोषण, ग्रामीण भागात आरोग्य सुविधांचा अभाव मलनिःसारणाच्या सोयींचा अभाव यासारख्या बाबींनी येथील जनतेचे दोन भागांत विभाजन केले आहे. ज्यांच्याकडे या सुविधा आहेत ते आणि नाहीत ते असे हे दोन भाग झाले आहेत. कृषी क्षेत्राची ढासळलेली प्रगती ही चिंतेची बाब आहे. सरकारकडून केल्या जाणाऱ्या विविध उपाययोजना ज्यांच्यासाठी आहेत त्यांन न मिळतात राबवल्या जात असल्याची अनेकांच्या मनात भावना असली तरी, सरकार आपल्या सुधारणांना मानवी चेहरा असल्याचे म्हणते. अकराव्या पंचवार्षिक योजनेच्या 'वेगवान आणि सर्वंकष विकासाकडे' या बाबींशी ही गोष्ट अधिक निगडीत आहे.

या विशेष प्रसंगी 'योजना' ने ही सिंहावलोकन करण्याचा प्रयत्न केला आहे. विशेषांक तीन भागांमध्ये आहे.

पहिल्या भागात ब्रिटिश वसाहतीमुळे अर्थव्यवस्थेवरील दुष्परिणाम अभ्यासले आहेत, दुसऱ्या भागात स्वातंत्र्यापासून आतापर्यंतच्या भारतीय अर्थव्यवस्थेचा अभ्यास आहे. तर तिसरा भाग भावी विकासाची धोरणे सांगतो आम्ही. 'योजना' मध्ये १८५७ पासूनच्या प्रवासाची माहिती तज्ज्ञांद्वारे देण्याचा प्रयत्न केला आहे. याशिवाय ख्यातनाम चित्रकार सतीश गुजराल यांनी तयार केलेले मुखपृष्ठ आणि सुप्रसिद्ध हिंदी कवी गुलजार यांच्या दोन कविता ही अंकाची विशेष आकर्षणे आहेत.

१८५७ च्या विविध कंगोऱ्यांचा अभ्यास करतानाच 'योजना' ने भारतीय प्रशासन आणि अर्थव्यवस्थेवर प्रकाश टाकला आहे. आगामी वर्षे महत्त्वाची असून आतापर्यंत दुर्लक्षित राहिलेल्या बाबींची काळजी घेतली जाईल. अशी आशा वाटते. भारताला ओळखण्यासाठी 'योजना' वाचत रहा आणि भारताचा अतुलनीय प्रवास अनुभवण्यासाठी सज्ज व्हा !

प्रकाशन विभागाची नवीन हिंदी प्रकाशने

☆ **उपग्रह के बाहर-भीतर भारत के हस्ताक्षर**
रजनीकांत तिवारी/विश्वमोहन तिवारी — मूल्य ६५ रुपये

☆ **जब्तशुदा गीत**
डॉ. रामजन्म शर्मा — मूल्य ५० रुपये

☆ **क्रांतिकारी महिलाए**
आशारानी व्होरा — मूल्य ६० रुपये

☆ **हे वसुधा....**
मधुकर उपाध्याय — मूल्य ९० रुपये

☆ **हमारे पक्षी**
असद रहमानी — मूल्य १९० रुपये

☆ **भारत की सांस्कृतिक एकता**
गर्टूड इमर्सन सेन — मूल्य ४५ रुपये

☆ **बच्चों के लिये संगीत**
विनयचंद्र मौदगल्य — मूल्य ८० रुपये

☆ **तंत्रीवादक**
डॉ. प्रकाश महाडिक — मूल्य ६० रुपये

वरील सर्व पुस्तकांसह प्रकाशन विभागची ७000 हून अधिक प्रकाशने, नॅशनल बुक ट्रस्ट, सी.एस.आय.आर., आय.सी.ए.आर. आणि पुरातत्व विभागाने प्रकाशित केलेली पुस्तके, तसेच राष्ट्रीय कला संग्रहालयाची पेंटिंग्ज मिळण्याचे ठिकाण.

व्यापार प्रबंधक
प्रकाशन विभाग, सेल्स एम्पोरियम सी - ७०१, केंद्रीय सदन, सी.बी.डी. बेलापूर,
नवी मुंबई ४०० ६१४ दूरध्वनी २७५७०६८६.

योजना

नियोजन आणि विकास समर्पित

Vol. XXXV
No. I

वर्ष ३५ अंक १ ऑगस्ट २००७

अंतरंग

मुख्य संपादक
अनुराग मिश्र

संपादक
डी. एल. नारायण राव

सह संपादक
नीतीन केळकर

उपसंपादक
दीपाली दुर्गे.

मुखपृष्ठ सजावट
आशा सक्सेना

मुखपृष्ठ चित्र
सतीश गुजराल

नियोजव मंडळाच्या वतीने आसामी, उर्दू, इंग्रजी, कन्नड, गुजराती, तामिळ, तेलगू, पंजाबी,बंगाली, मल्याळम्, मराठी, हिंदी व उडीया भाषांतून प्रकाशित योजना हे केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे प्रसिद्ध होत असले तरी देशाच्या देशाच्या सर्वांगीण विकासाची खुली चर्चा करणारे ते व्यासपीठ आहे. योजनेत प्रसिद्ध होणाऱ्या लेखांतील मते त्या त्या लेखकांची असतात

योजना वर्गणीचे नवे दर :
वार्षिक : १०० रू
किरकोळ किंमत १० रू.
शेजारी राष्ट्रे
(एअरमेल) वार्षिक : ५३० रू.
युरोप व अन्य राष्ट्रे
(एअरमेल) वार्षिक : ७३० रू.

- १८५७ च्या उठावाचा परिणाम - प्रा. सव्यसाची भट्टाचार्य ५
- दादाभाई नौरोजी आणि ड्रेन थिअरी - प्रा. बिपन चंद्रा ९
- भारतीय उद्योगांचा ऱ्हास - प्रा. स्मृतिकुमार सरकार १३
- भारतातील नियोजनाची उत्क्रांती - प्रा. राघवेंद्र चट्टोपाध्याय १५
- गतशतकातील मानवी निर्देशांकाचा कल - डॉ. अबुसालेह शरीफ १९
- कृषी क्षेत्रात नियतीशी करार - प्रा. एम. एस्. स्वामिनाथन् २९
- भारतीय शिक्षण व्यवस्था - डॉ. माधव चव्हाण ३५
- ग्रामीण विकासात आयसीटीचे योगदान - अशोक झुनझुनवाला/रोहिणी मेनन ३९
- भारतातील बँकिंग यंत्रणा - ओ. पी. भट्ट ४१
- आर्थिक विकासाची दीडशे वर्षे - एन्. आर. नारायणमूर्ती ४५
- भारतीय भूमीतले अनोखे पीक - अझीम प्रेमजी ५३
- १९५७-५८ चे प्रवासवर्णन - नीतीन केळकर ५७
- विशेष आर्थिक क्षेत्र.... - दीपक भामरे / प्रल्हाद गोविंद ७५
- चिकुन गुनिया.... - धोंडीरामसिंह राजपूत ७९
- माहितीचा आधिकार... - अभि श्रीकृष्ण लांडे ८०
- भारतीय कृषिधर्म.... - प्रा. सुधाकर देशपांडे ८१
- शिक्षणाची दुर्दशा... - डॉ. जी. पी. सुर्वे ८६
- शेतकऱ्यांच्या आत्महत्या.... - प्रा. शरद कुळकर्णी ९२

(याशिवाय कथा बलिदानाच्या, हुतात्म्यांची पत्रे, तुम्ही सांगू शकाल काय)

योजनेसाठी लेख, वर्गणी, जाहिराती इ. सर्व पत्रव्यवहारासाठी पत्ता :
योजना मासिक कार्यालय
७०१, बी विंग (७ वा मजला), केन्द्रीय सदन, सेक्टर १० सी. बी. डी. बेलापूर
नवी मुंबई - ४०० ६१४

"THE RISING"

मुखपृष्ठ संकल्पना

परिस्थितीच्या दुष्टचक्रात अडकलेल्या विजिगीषु माणसाचा चक्रव्यूह भेदण्यासाठी सुरू असलेला जीवनसंघर्ष

Date of Posting - 1 Aug 2007
ojana Marathi (Monthly) Aug 2007 Reg. No. MH/MR/South - 206/2006 - 08 W.P.P. No. South - 109/2006 - 08

१८५७ च्या उठावाची केंद्रे



(स्त्रोतः एन. सी. ई. आर. टी. च्या स्ट्रगल फॉर ईन्डिपेन्डन्स मधून विशेष करारान्वये)

Chief Editor ANURAG MISRA
Printed and Published by **D. L. NARAYAN RAO,** Editor, Yojana (Marathi). on behalf of the Director, Publications Division and Printed at **M/s Mayur Printers,** 201 Gopal House, I. B. Patel Road, Goregaon (East), Mumbai - 400 063. (Ph) : 26852449, 26859491 Published at B-701, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai - 400 614.